
सूरज गाताडे
अंत:पूर

# अंतःपूर

## हे पुस्तक विनामूल्य आहे

# पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अंतःपूर

सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

अंतःपूर

सूरज काशिनाथ गाताडे

स्क्रिनरायटर्स असोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१

रा. पेठवडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६११२

ई-मेल आयडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहेतसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## प्रकाशक :ईसाहित्यप्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन :१९ मे २०२०



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

प्रस्तावना -



नमस्कार, मी सूरज काशिनाथ गाताडे. पुन्हा प्रश्न, प्रस्तावनेत काय लिहावं... पण लिहितोयच...

कोणती नवीन कथा प्रकाशित झाली, की ती कथा वाचकांना आवडते; पण तरी वाचकांची तक्रार असतेच, की मी मिस्टर वाघ परत न आणता वेगळी कथा का घेऊन आलो... अनेक प्रश्न असतात, त्यात मिस्टर वाघ परत येणार का? प्लिज त्याला मारू नका... इत्यादी इत्यादी... विनंती सुद्धा असतात...

प्रस्तुत कथा देखील मिस्टर वाघच्याच पॉईंट ऑफ व्ह्यूने लिहिणार होतो... पण नंतर तो विचार ड्रॉप केला... मिस्टर वाघ येईल! नक्की येईल... पण त्यासाठी मी स्वतः अजून तयार झालो नाही... म्हणून तो मागे राहतोय... 'डॉक' तर खूपच मागे पडलेत... त्यांची पुढील कथा लिहण्याची खूप इच्छा आहे... ती चालूही केली होती... पण अर्धवट पडली आहे... परंतु डॉक यांना देखील परत आणेन नक्की!

आता थोडं प्रस्तुत 'अंतःपुर' बद्दल - अंतःपुर; ही एक एक्शन थ्रिलर आहे. खूप दिवसांपासून मला एक पॉलिटिकल व इकनॉमिकल थ्रिलर लिहायची होती... पण योग्य विषय सुचत नव्हता... पण एक दिवस आयडिया स्ट्राईक झाली आणि सुरवात झाली 'अंतःपुर'ला!

मला नेहमी असं वाटतं, की यावेळी जरा सोपी कथा लिहू... पण पुढची कथा ही मागील कथेपेक्षा जास्तच किचकट होते... या तर कथेने खूप डोकेदुखी दिली. हे दुखणं प्रसव वेनदेसारखंच असावं कदाचित... कारण नवीन कथा जी डोक्यात जन्म घेत असते... (नाही! या दोन्हीची तुलनाच होऊ शकत नाही... स्त्रीची वेदना ही माझ्या वेदनेपेक्षा अवर्णनीय व मोठीच आहे... फक्त एक कल्पना सुचली म्हणून लिहिलं...)

कथा लिहायला १५-२० दिवस गेले. आणि १५-२० दिवस सलग डोकेदुखी. ना झोप, ना शांतता...

जेव्हा 'समाप्त' पर्यंत आलो, तेव्हा कुठं डोकं दुखायचे थांबलं... पण हे होणं बरंच आहे... यामुळे चांगलं - चांगलं व सकस वाचकांसमोर येतं आहे...

डोकेदुखीचा हा अनुभव मला मिस्टर वाघची कथा लिहिताना नेहमी होतो... म्हणून यातील 'शक्तीसेन' पात्राला मी मिस्टर वाघ व्हर्जन 2 म्हणतो. (तरी दोघांमध्ये खूप फरक आहे. सुजाण वाचकांनी 'मिस्टर वाघ' व 'शक्तीसेन' यांची एकाच तूलात तुलना करू नये ही विनंती...)

गंमत म्हणजे यात फक्त शक्तीसेन बुद्धीमान नाही, तर सर्वच पात्रं तोडीस तोड बुद्धीसंपदेचे मालक आहेत. ही कथा म्हणजे त्यांच्या शह-काटशहाचा खेळ आहे. या पात्रांच्या हुशारीबद्दल उदाहरण द्यायचे, तर फर्स्ट ड्राफ्टच्या तिसाव्या पानावरच गोष्ट संपली होती, हिरो व व्हिलन एकमेकांसमोर होते. गोष्ट संपली होती आणि मला तर अजून बरंच काही सांगायचं होतं... क्रिएटिव्ह मेंटल ब्लॉक आला... कारण मला जसं हवं होतं तशी पात्रं वागलीच नव्हती... त्यांनी स्वतःच्या मनाचा कारभार केला होता... मला किमान ही कथा नव्वद पानांची करायची होती. आणि इथं पुढं तर काही मार्गच राहिला नव्हता... काय करावं असा प्रश्न पडला. पण आतापर्यंत जसा पात्रांनी स्वतःच गोष्टीला आकार दिला होता, तशीच इथून पुढेही या पात्रांनीच कथा घडवली... इतकी की एकशे वीस पानं झाली तरी गोष्ट थांबायचं नाव घेईना... ती वाढतच जात होती... स्वतः लिहीत असून मला बघ्याची भूमिका घ्यावी लागली होती... इकडं पात्रांची एकमेकांवर कुरघोडी चालूच होती... यावेळी मात्र मग मी हस्तक्षेप केला आणि गोष्ट समारोपाला आणली... ही कथा घडवण्यासाठी माझ्यापेक्षा या कथेतील पात्रांचा मोठा हात आहे. इतकी या कथेतील पात्रं स्वयंसिद्ध आहेत...

ही कथा लिहिणं खरंच खूप मोठा टास्क होता... कारण मी कथेचा पट तर जागतिक पटलावर मांडत होतो, पण मला कथेची पार्श्वभूमी एकाच शहरात घडवायची होती... याला कारण म्हणजे

जर भविष्यात याच्यावर चित्रपट बनवायचा झालाच, तर तो कमी खर्चात व्हावा... (यासाठीच कथा होता होईल तेवढी मोठी करायची होती...) पण चित्रपटाचा विषय हा विस्तृत असावा...

असो... आपणास कथा आवडेल अशी आशा करतो... यातील नायक 'शक्तीसेन' हा आपल्याला 'मिस्टर वाघ' इतकाच आवडेल अशी खात्री देतो... आणि मी आपल्याला या कथेचा आस्वाद घेण्याचं आवाहन करतो...

धन्यवाद...!!!

**सूरज काशिनाथ गाताडे.**

पत्ता - चिंगळे गल्ली, पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२

ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सएॅप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

## सूरज काशिनाथ गाताडे यांची यापूर्वीची प्रकाशित पुस्तके (अनुक्रमे)

१) द डेथ ऑफ लिंकन्स् मदर (सायंटिफिक क्राईम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_of_lincolns_mother_suraj_gatade.pdf

२) डेथ विल (मिस्टर वाघची पहिली कथा - सायंटिफिक सायकॉलॉजिकल क्राइम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_will_suraj_gatade.pdf

३) दे किस्ड् बाय मिस्टेक (रोमँटिक कॉमेडी/ट्रॅजेडी)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kiss_surajgatade.pdf

४) द पॅरासाइट (सायन्स फिक्शन)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parasite_suraj_gatade.pdf

५) फ्लेम (म्युसिकल - फॅन्टसी/सायकॉलॉजिकल/ट्रॅजेडी/लव स्टोरी या चार विविध कथा प्रकारांचा कथा संग्रह)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/flame_suraj_gatade.pdf

६) अ हेवी प्राईझ् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahp_suraj_gatade.pdf

७) डेडली मिटिंग्स् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/deadly_meeting_wagh_suraj_gatade.pdf

८) एजंट - X - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/agent_x_suraj_gatade.pdf

९) तूमाझासांगाती - (सायन्सफिक्शन)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/tu_majha_saangaati_suraj_gatade.pdf


१०) वृत्र (सायकॉलॉजिकल/एक्शन/मिस्ट्री/थ्रिलर)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vrutra_suraj_gatade.pdf


११) अ प्योर वन


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/the_pure_one_suraj_gatade.pdf



सूरज गाताडे
द पॅरासाईट



सूरज गाताडे
दि डेथ ऑफ लिंकन्स मदर


आ हेवी प्राईझ



सूरज गाताडे
दे
किस्ड
बाय मिस्टेक


सूरज गाताडे
डेथ विल



सूरज गाताडे


सूरज गाताडे


सूरज गाताडे
फ्लेम


सूरज गाताडे
वृत्र


सूरज गाताडे
X


सूरज गाताडे
'अ प्योर् वन-दि एप्रिल चेज़्!'

# <u>अंतःपूर</u>

**(सायकॉलॉजिकल/एक्शन/थ्रिलर/सस्पेन्स/ड्रामा)**

**(लेखक - सूरज काशिनाथ गाताडे)**

साहित्यप्रेमींना समर्पित



## १. मित्राचा प्रस्ताव (फ्रेंड्स प्रपोसल)...

**"प्लिज डोन्ट किल हर... प्लिज..."**

**"नो..."**

गडद अंधारात आवाज घुमत होते... आधी पुरुषाचा व नंतर स्त्रीचा... त्यांच्या विनंतीचा उपहास करणारं न जाणो किती जणांचं विकट हास्य रात्रीच्या शांततेला फाडून आसमंत दुमदुमून टाकत होतं...

आणि अचानक एका गन शॉटने एक कलेवर जमिनीवर पसरलं गेलं. आणि नंतर शॉटगनच्या रिकॉईल पॅडच्या फटक्याने आणखी एक शरीर जमिनीवर आदळलं... धाड्....

**"नाही!..."**

शक्ती ओरडत उठला! सत्य परिस्थिती अवगत व्हायला त्याला थोडा वेळ गेला...

हे... हे... स्वप्न होतं का...? नाही! ही एक आठवण होती! ट्विस्टेड् असली तरी आठवणच! जी रोज शक्तीला सतावत होती... याचमुळे त्याने ठरवून टाकलं होतं... की काही झालं तरी रात्री झोपायचं नाही... किंबहुना मुळी झोपायचंच नाही...

पण शरीरधर्मावर विजय मिळवणं कोणाला जमलंय थोडीच... मग त्याला शक्ती तरी कसा अपवाद ठरणार? रोज रात्री झोपाळू  तारवटतलेले डोळे महत्प्रयासाने उघडे ठेवणे हा त्याचा यत्न असायचा... नाही तो योगी नाही... पण काही घटना होती, जी त्याला डोळ्यांसमोर येऊ द्यायची नव्हती. पण त्याच्या इच्छेला त्याची वासना भीक घालत नव्हती...

हो वासनाच ती... झोप ही शरीराची वासनाच नाही का...?! प्रयत्न करूनही त्याला या वासनेवर विजय मिळवता येत नव्हता. आणि म्हणूनच कधीतरी त्याची इच्छा नसताना रात्री झोपेच्या त्याच्यासाठी काळकूस असणाऱ्या कुशीत तो गुरफटला जायचा... आणि मग तीच एक आठवण जी त्याला विसरायची होती; ती त्याच्या नजरेसमोर रोज रात्री उभी राहायची... जिवंत व्हायची...!

घामाने थबथबलेल्या त्याचा जोराने श्वासोच्छ्वास चालू होता... घर्माने त्याचे केस तर असे निथळले होते, की जणू त्याने डोक्यावरून अंघोळ केली होती... पण स्वतःच्या अस्वस्थ अवस्थेवर विजय मिळवत तो अंथरुणातून उठला. नित्यकर्म आटोपून त्याने आपला व्यायाम चालू केला... शरीराला बळकट ठेऊन मनाला सबळ करण्याचा त्याचा प्रयत्न होता हा... पण तरी तो त्याच्या आठवणीतून बाहेर काही पडत नव्हता.

दिवस जायचा कसातरी... पण रात्र काळसर्पिनी ठरायची... जी त्याला ग्रासून टाकायची...

वर्कआऊट झाल्यावर तो घरातून बाहेर पडला. घराजवळील महावीर उद्यानमध्ये तो आला...

वर्कआऊट नंतर पार्क जवळच्या कॅफेमध्ये ब्रेकफास्ट करणं हा त्याचा नित्याचा क्रम. पण व्यायामानंतर लगेच काही खाऊ नये म्हणून तो या पार्कमध्ये अर्धा तास बसून काढायचा.

लहान मुलं खेळत असायची. त्यांना पाहणं हे त्याच्यासाठी पर्वणीचं असायचं... एक प्रकारचं स्ट्रेसबस्टर! काही वेळातच शाळेची वेळ होईल म्हणून या मुलांच्या आया त्यांना घेऊन गेल्या की मग शक्ती पण उठायचा आणि कॅफे गाठायचा.

"रोजची ऑर्डर!" 'युथ'स् चॉईस' या कॅफेच्या आत शिरता शिरता दाराजवळच्या काउंटरवर बसलेल्या मालकाला शक्ती म्हणाला.

आणि त्याने त्याचं रोजचं टेबल गाठलं. कोणाशीच संपर्क नको असल्याने शक्ती कॅफेच्या अगदीच मागे कोपऱ्यात असलेल्या टेबलपाशी प्रवेशाकडे पाठ करून बसला. रोजसारखंच!

कॅफेच्या वेटरने शक्तीच्या समोर त्याची रोजची ऑर्डर आणून ठेवली. 'वेगन टाकोज् विथ कॅलिफोर्निया वॉलनट्स' आणि 'बनाना अँड वीटग्रास स्मूदी' आयडियल डायट आफ्टर वर्कआऊट...

युज्वली या कॅफेत असलं काही डायट फूड मिळत नाही. पण शक्ती रोजचा ग्राहक असल्याने आणि ओळखीचा असल्याने या कॅफेत त्याच्यासाठी हा खास डायट तयार केला जात असायचा.

जसं पुढं खाणं आलं तसं सगळं दुःख विसरून तो त्याच्यावर ताव मारू लागला. खाणं हा त्याचा विलास नव्हता. जिवंत राहण्यासाठी खाणं गरजेचं आहे म्हणून तो खात होता...

पुढंलं अन्न संपवण्यात तो तल्लीन असतानाच त्याच्या खांद्यावर एक तगडा हात येऊन आदळला!

"यु आर अंडर अरेस्ट शक्तीसेन!" हात टाकणारा माणूस म्हणाला.

त्याचा आवाज इतका मोठा लागला होता, की तो कॅफेभर घुमला आणि कॅफेतल्या सगळ्यांना तो ऐकू आला. सगळेच आश्चर्याने आवाजाच्या आणि पर्यायाने शक्तीच्या दिशेने पाहू लागले. शक्ती सारख्या आश्राप व्यक्तीला अटक? पण का? त्याचा गुन्हा काय होता? सगळेच भवचक्क होते!!!

शक्तीने मागे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावरची शांतता ढळली नव्हती.

"माझा गुन्हा काय आयबी डिरेक्टर शौर्यजीत?" त्याने तोंडातला घास चघळत विचारलं.

तसा तो माणूस शक्तीसमोर भिंतीला टेकून बसला.

"इतक्या वर्षात आमच्याशी संपर्क न ठेवणे. यासाठी तर तुम्ही मृत्यूस पात्र आहात. पण सध्या अटकेवर निभावतंय याचं नशीब माना!"

"माझा नशिबावर विश्वास नाही!" शक्ती त्याच कोरड्या नजरेने म्हणाला.

"कर्मावर तर आहे?!" ऑफिसर म्हणाला.

"काय हवंय!" शक्तीने विचारलं.

"तू!"

"मला कसं शोधलंस?"

"तुझं घर माहीत आहेच. सकाळपासून तुला फॉलो करतोय. म्हटलं तुझं रुटीन पहावं!"

"आणि मला कॅफेमध्ये बघून तुला भूक आवरली नाही!" शक्तीने खिल्ली उडवली.

"खाऊन घे!" शौर्यजीत हसून इतकंच म्हणाला.

आणि तो विरंगुळ्यासाठी इतस्ततः पाहू लागला... आणि त्याला आपली चूक लक्षात आली.

"हे सगळे असे का बघत आहेत?" तो शक्तीला म्हणाला.

"मला अटक करणार म्हणतोयस तू... म्हणून बघत असतील..." शक्ती घास चावत स्मूदीचा सीप घेत म्हणाला.

तसा शौर्यजीत खजील स्मित चेहऱ्यावर घेत उठला.

"सॉरी फ्रेंड्स! हा माझा मित्र आहे. चेष्टेत म्हणालो. तुम्हाला डिस्टर्ब करण्याचा हेतू नव्हता..." तो म्हणाला व उंचावलेले हात खाली घेत तो संथपणे खाली बसला.

सगळे पुन्हा आपापल्या चर्चेत मग्न झाले. शौर्यजीत टेबलवर लिन झाला व खुसपुसल्यासारखा शक्तीला म्हणाला,

"मला माहित नव्हतं तू तुझ्या एरियात इतका पॉप्युलर आहेस..."

"कसला पॉप्युलर? माझ्या जागी कोणीही असतं तरी सगळ्यांची हीच अवस्था झाली असती. जस्ट थिंक ऑफ इट, तू ज्या कॅफेत बसला आहेस तिथे एक क्रिमिनल बसलाय. आणि एक ऑफिसर त्याला पकडण्यासाठी तिथे आला आहे. काय अवस्था होईल तुझी?"

"मी सामान्य असतो, तर नक्कीच दचकलो असतो!"

"तेच इथं झालंय! असो बोल कशी आठवण झाली?"

"तुला होत नाही म्हणून!"

"आता सांगणार आहेस का?"

"आवर. बाहेर बोलू."

"तू काही घेणार?"

"नको!"

"ठीक!" शक्ती पुन्हा डायट फूड संपवण्यात मग्न झाला...

चाळीस-पंचेचाळीस मिनिटांनी दोघे शक्तीच्या घराकडे चालले होते... शक्ती जर्कीनच्या खिशांत हात कोंबून चालत होता...

"आता बोल. इंटेलिजन्स ब्युरोला माझ्याकडून काय हवंय!" शक्तीनं शौर्यला येण्याचं प्रयोजन विचारलं.

"स्वतःला चांगलंच फिट ठेवलंयस!" शौर्यने मात्र थेट मुद्द्याला हात घालणं टाळलं.

कारण तसं केलं तर शक्ती देखील थेट मुद्याला हात घालून नाही म्हणायची त्याला खात्री होती...

"हं! तू इतक्या लांब मला हे सांगायला आला आहेस, की मी स्वतःला वेल मेंटेन ठेवलंय!"

"हा! हा! नाही! एक असाईंमेन्ट आहे!"

"नाही!" शौर्यजीतची शंका रास्त ठरली. काम ऐकून घेण्याआधीच शक्तीने नकार दिला होता.

"ऐकून तर घे!" शौर्यने विनंती केली.

"गाडी आणलीच असशील?" त्याला टाळत शक्ती म्हणाला. 'तू निघ' हा त्याचा अंतर्भाव होता.

शक्ती पुढे चालत गेला... शौर्यजीत घाईने त्याच्या समोर जाऊन उभारला.

"लिसन. ऍट लिस्ट वन्स! जास्त काही करावं लागणार नाही."

शक्ती पुन्हा नकार देईल म्हणून शौर्य थोडा थांबला, पण शक्ती काही बोलला नाही. चाचपणी करून शौर्यजीतच पुढे म्हणाला,

"इंद्रदत्त वाचस्पती मेलेत हे तर तू जाणून असशील..."

"गाडी घे!" ऑफिसरला पुढं काही बोलू न देता शक्ती रुक्षपणे म्हणाला.

शक्ती किचन मध्ये गेला आणि फ्रीज मधून ऑरेंज ज्यूस घेऊन बाहेर आला. डायनिंग टेबल जवळ बसलेल्या शौर्यजीत समोर त्याने ग्लास ठेवला आणि तो काठाला थोडा कमी भरला. आपल्यालाही त्याने ज्यूस ओतून घेतला.

"मला माहित आहे, तू का नाही म्हणतोय! पण हा टास्क रोजच्या सारखा नाही... तुझी गरज पडेल असं वाटलं म्हणून आलो..."

"मुद्याचं बोल!" शक्तीने हस्तक्षेप केला.

"तेच सांगतोय. वाचस्पती इथे असताना त्यांचा खून झाला. सुट्टीसाठी काही काळ ते त्यांच्या मूळ गावी म्हणजे इथं कोल्हापूरला असताना!"

"त्यांच्या खुन्याला पकडलं पण गेलंय. पुढं!" शक्ती त्याला ऐकून घेतोय असं दाखवून होता होईल तेवढं उडवून लावण्याचा प्रयत्न करत होता.

"त्याची टेस्टमनी करण्यासाठी एक समिती इथे येणार आहे. मीही त्याचा एक भाग आहे. चार महिन्यांत लोकसभा इलेक्शन्स् लागणार आहेत. वाचस्पती हे अपोजिशन पार्टीतील असल्याने शिवाय त्या पार्टीचे पंतप्रधान पदाचे उमेदवार असल्याने रुलिंग पार्टीवर खूप प्रेशर आहे हे पण तुझ्या लक्षात आलंच असेल.

"या खुनामागील खरा  सूत्रधार नाही शोधला तर प्रस्थापित पार्टीला पुढच्या निवडणुकीत याचा खूप मोठा फटका बसेल. सस्पिशन सर्वांत आधी रुलिंग पार्टीवरच येतं! जनमानसात तर अशी थिअरी जन्म घेत आहे, की सत्ता पक्षानेच त्यांना आपल्या मार्गातून हटवले आहे. करप्शनमुळे त्यांचे नांव आधीच बदनाम आहे त्यामुळे पुढची इलेक्शन्स हातून जाण्याची चिन्हे स्पष्ट आहेत. आणि याचा फायदा वाचस्पती यांनाच होणार होता. म्हणून मग त्याचा काटा काढण्यात आला असं समजलं जातंय!"

"मूर्खपणा आहे! या कॉन्स्पिरिसी थियरीला काहीच आधार नाही! सत्ता पक्ष यावेळी असं काही करून आपल्याच पायावर दगड का मारून घेईल... कोणाही मूर्खाला हे समजायला हवं, की आत्ता आपण किती स्वच्छ आहोत हे दाखवणेच सत्ता पक्षाला इष्ट आहे अशावेळी ते कोणावरही मारेकरी घालणार नाहीत. जनतेच्या सहानुभूतीची काठी ते स्वतःच विरोधी पक्षाला आधारासाठी का देतील? कारण साधी अफवाही त्यांना धूळ चारू शकते मग ते सत्यात असे काही आत्ता तरी नक्कीच करणार नाहीत!" ज्यूस ओठाला लावत शक्ती म्हणाला.

"बरोबर आहे तुझं! पण हाच विचार करून सत्ता पक्ष मारेकरी घालू शकतो हे देखील नाकारता येणार नाही. गोष्टी खूप कॉम्प्लिकेटेड् आहेत! आणि म्हणूनच सत्य शोधून काढायचं आहे! पंतप्रधान पुनीत चिंतपल्ली यांचे स्पष्ट निर्देश आहेत की मूळ सूत्रधार कोणत्याही परिस्थितीत सापडला पाहिजे आणि त्यासाठी काहीही करावे लागले तरी चालेल! कोणतेही रुल्स रेग्युलेशन्स नाहीत! इट इज युअर काईंड ऑफ जॉब! मला वाटलं तुला करायला आवडेल म्हणून तुझ्याकडे आलो!"

"आय एम सिक ऑफ इट! सॉरी आय कान्ट हेल्प यु!" शक्तीने प्रपोसल उडवून लावलं.

"गार्गीसाठी? अं?" शौर्यजीतने गंभीर होत विचारलं...

"आपलं कर्तव्य पार पाडत असताना मी तिला गमावलं आहे. हे मी कसा विसरू?" शक्ती आता जरा विचलित होऊन बोलला.

"पण आता गमवायला तुझ्याकडे आहेच काय?" शौर्यजीतनेही विचलित होत थोडा आवाज चढवत विचारलं.

"स्वतः!"

"तू तर स्वतःवर प्रेम करणारा नाहीस! मग?"

"माझी मुलगी. तिच्यासाठी जगायचंय! तिच्याचसाठी स्वतःवर प्रेम करायला लागलोय! म्हणून या सगळ्यापासून लांब रहायचंय!"

"ओके! एक डील करूया!"

"मित्व्! तुला मीच का हवा आहे?"

"कारण तू प्रो आहेस!"

शक्तीने झिटीने मान झटकली... आपल्याला यातून सुटका नाही हे त्याच्या लक्षात आलं...

"आणि तू या शहराला कोणाही  पेक्षा खूप चांगल्याप्रकारे ओळखतोस!" शौर्यने पुढं आणखी एक कारण जोडलं.

"बरं बोल!" वैतागून शक्ती म्हणाला.

"वाचस्पती यांचा खूनी कळंबाच्या सेंट्रल जेलमध्ये आहे. त्याची तिथं चौकशी होईल! त्यानंतर त्याला मुंबईला घेऊन जाण्यात येईल! तोपर्यंत तुला सोबत रहायचं आहे बस."

"मुंबईला नेऊनच चौकशी करा ना!"

"तिथं गेल्यावरही पुन्हा चौकशी होईलच! त्याच्या स्टेटमेंटमध्ये काही बदल होतोय का हे यातून कळेल. कळंबा जेल ते उजळाईवाडी बाय रोड. तेथून मुंबई विमानाने. असा रूट असणार आहे. दिल्लीत कोणाचा हस्तक्षेप नको म्हणून मुंबईत त्या कैद्याला ठेवण्यात येणार आहे."

शौर्यजीतने मग '500 एस अँड डब्लू मॅग्नम स्नब नोस' (स्मिथ अँड विल्सन कंपनी) रिव्हॉल्व्हर आणि 'केल-टेक पीएमआर 30' (केल-टेक कंपनी) ही पिस्टल आशा दोन गन्स निवडण्यासाठी शक्ती समोर ठेवल्या.

"व्हॉट से?" स्मित करत शौर्यजीतने विचारलं.

पण दोन्ही पैकी एक निवडेल तो शक्ती कसला! गन्सवर असलेलं शक्तीचं प्रेम लक्षात घेऊनच तर ही दोन मॉन्स्टर्स शौर्यजीत शक्तीसाठी घेऊन आला होता!

शक्तीने त्या दोन्ही उचलून बेडरूममध्ये नेल्या.

हे पाहून शौर्यजीतच्या चेहऱ्यावरचं स्मित विस्तारलं. यांना पाहून तरी तो नाही म्हणायचा नाही हा त्याचा तर्क सिद्ध झाला होता. हा जॉबशिवाय राहू शकत नाही हा शौर्यजीतचा अंदाज सुद्धा खरा ठरला होता...!

बाहेर येत असतानाच दरम्यान शौर्यजीतच्या प्रपोसलवर शक्तीने विचार करून निर्णय घेतला होता. आपला नाईलाज पाहून त्याने शौर्यजीतची विनंती मान्य केली...!

पण साधारण वाटणारं हे 'एस्कोर्ट मिशन' पुढं काय वळण घेणार होतं हे कोणालाच माहीत नव्हतं...!

## २. अकस्मात आघात (एक्सिडेंटल बफे)...

सकाळी साडे आठ वाजता शक्तीची बाईक सेंट्रल जेलला लागली. सेंट्रल जेल कळंबापासून पाचशे मीटर व्यासाचा परिसर लॉकडाऊन करून टाकला होता. कोणी आत व बाहेर येऊ जाऊ शकत नव्हतं! जवळ असलेल्या बिल्डिंग्स्, दुकाने पूर्णपणे बंद करण्याचे आदेश आधीच देऊन ठेवले होते, जी दुपारपर्यंत काही खुली होणारी नव्हती... तेथे आलेल्या एसआयटी व जेल अधिकाऱ्यांशिवाय व जेलमधील कैद्यांशिवाय तिथं चिटपाखरू देखील नव्हतं. जेलला लागून हायवे असूनही सगळं चिडीचूप शांत होतं...

बाहेर कोल्हापूर पोलीस अधीक्षक सुशेन मित्र, आयबी डिरेक्टर शौर्यजीत वाबळे, पब्लिक प्रोसेक्युटर जयंत राऊत व वाचस्पती यांच्या कुटूंबाने व 'जनमानस पक्ष' या त्यांच्या पक्षाने संमतीने, एकमताने निवडलेले मुंबई हायकोर्ट ॲटर्नी चारुदत्त ढवळे व रिटायर्ड् सुप्रीम कोर्ट जज मिलिंद फडतरे आदी मोजकी मंडळी जमली होती.

चौकशी नंतर स्टेटमेंटमध्ये, पुराव्यांमध्ये काही फेरफार होऊ नये म्हणून 'जनमानस'चा वकील देखील टीम सोबत ठेवण्याचा 'जनमानस'चा आग्रह सत्ता पक्षाने मान्य केला होता. यामुळे जनतेचा रोष काही प्रमाणात उतरेल व आपली पारदर्शिता दिसून येईल, निर्दोषत्व सिद्ध होईल व किमान आपला मतदार तरी आपल्या जवळच राहील असा सत्ता पक्षाचा समज व विचार. म्हणून विरोधी पक्षाने अविश्वास दाखवून देखील व त्यांनी गंभीर आरोप केलेले असून देखील त्यांची ही जबरदस्ती चालू दिली होती... असे असले तरी ढवळे सत्ता पक्षाच्या विरोधात थोडीच जाणार होता... काही झाले तरी सत्तेचा दबाव हा कितीही कर्तव्यदक्षतेने वागले तरी असतोच...!

महाराष्ट्र एटीएस चीफ सुरेंद्र सुब्रमण्यम देखील या टीमचा एक भाग होते... आणि 'रॉ'ची एक विशेष तुकडी देखील या प्रकरणाच्या शोधासाठी गठीत केली गेली होती, जी स्वतंत्र

ऑपरेट होणार होती. दृश्य रूपाने त्यांना यात भाग घेता येत नसल्याने वरील समिती जो काही अहवाल तयार करीत त्याची सत्यता तपासण्यासाठी रॉच्या या टीमकडे रिपोर्ट पाठवण्यात येणार होता. तसेच या प्रकरणाच्या काही इंटरनॅशनल लिंक्स असतील तर त्या तपासण्याची जबाबदारी देखील रॉच्या या टीमवर होती! हा सगळा वृत्तांत कालच्या भेटीत शौर्यजीतकडून शक्तीसेनला देण्यात आला होता.

शक्ती आला तसा शौर्यजीतने सगळ्यांची ओळख शक्तीशी करून दिली. एसपी नवीन असल्याने तो देखील शक्तीला ओळखत नव्हता. नाही तर कोल्हापूर पोलीस मध्येच 'अँटी टेररिसम सेल' व 'डिस्ट्रिक्ट स्पेशल ब्रँच' या दोन्ही डिपार्टमेंटची कामं शक्ती एकटा पहायचा. इतका तो हुशार व कार्यकुशल होता. त्याच्या याच गुणांमुळे तर आयबी चीफ असून शौर्यजीतला त्याची मदत घेण्याची लालसा झाली होती...

त्यांना प्रोटेक्शन देण्यासाठी कोल्हापूर अँटी टेररिसम सेलचे काही ऑफिसर्स व एटीएसचे काही ऑफिसर्स तेथे गार्ड्स म्हणून सशस्त्र तैनात होतेच. शक्ती आल्यावर त्याला ओळखणाऱ्या अँटी टेररिसम सेलमधील ऑफिसर्सनी तो आता फोर्स मध्ये नाही हे लक्षात न घेता अनायासेच एक्साईमेन्टमध्ये सल्युट ठोकले होते.

शक्तीला पाहून नाही म्हणायला एसपी थोडा उखडलाच होता. 'माझ्या शहरात हा कोण ज्याला इतका मान मिळतोय' हा भाव त्याच्या मनाला चाटून गेला असेल बहुदा... पण त्याने रोष चेहऱ्यावर येऊ दिला नाही!

प्रवेशद्वारातून आत जाताच शौर्यजीत, सुशेन, सुरेंद्र व शक्ती सर्वांनी आपापल्या गन्स जमा केल्या. चौकशी दरम्यान कोणतेही शस्त्र वापरता येत नाही. कारण 'आर्टिकल 20' नुसार गुन्हेगाराला त्याचा गुन्हा कबूल करण्यास बाध्य केले जावू शकत नाही... त्यामुळे सर्वांना हत्यारे तात्पुरती त्यागावी लागली होती. सोबत असलेल्या गार्ड्सना तेवढे त्यांच्या गन्स सोबतच ठेवू दिल्या होत्या. कारण ते व्यक्तीशः इंटेरोगेशनमधे इन्वॉल्व्ह होणार नव्हते. इंटेरोगेशन रूमला

सुरक्षा देणं एवढंच त्यांचं काम होतं. आणि त्यासाठी त्यांच्याकडे वेपन्स असणंच आवश्यकच होतं. तरी सेंट्रल जेलमध्ये कोणी मारेकरी येण्याची शक्यता नाहीच्या बरोबरच होती, तरी काळजी घेतली जात होती...

सर्व प्रोसिजर पूर्ण झाल्यावर सर्वांचा मोर्चा हा या कैद्यासाठी तयार केलेल्या खास इंटेरोगेशन रूमकडे वळला. त्याचा रस्ता त्यांना जेलरनेच दाखवला होता.

एसआयटीला इंटेरोगेशन रूमपर्यंत पोहोचवून जेलर माघारी परतला. त्याला या कामाशी काही स्वैर-सुतक नव्हतं. आणि शिवाय तो तिथे नसावा हे त्याने शौर्यजीतच्या नजरेत वाचलं होतं. त्याने शौर्यजीतशी शेकहँड केलं आणि तो आपल्या केबिनकडे संचारला... गार्ड्सनी इंटेरोगेशन रूमच्या भोवती आपली पोजिशन घेतली...

आणि ही एसआयटी इंरेरोगेशन रूममध्ये प्रवेशली. पण समोरचं चित्र पाहून सगळे स्तब्ध झाले. शक्तीवर मात्र काही परिणाम झाला नव्हता. तो मेंटली, इमोशनली या प्रकरणाशी जोडला गेलेला नव्हता. ना त्याच्यावर कसलं प्रेशर होतं हे काम करण्याचं...

समोरचा कैदी अर्धशुद्ध अवस्थेत होता. त्याच्या तोंडून रक्त गळत होतं. त्या कैद्याचा पांढरा शर्ट त्याच्या रक्ताने लालेलाल झाला होता... जणू हाच त्या शर्टचा वास्तविक रंग असावा... शौर्यजीत स्वतःला सावरून तडख पुढे झाला. आणि त्याने त्या कैद्याची मान उंचावून त्याचं तोंड उघडून पाहिलं. कैद्यांने आपली जीभ चावून चावून त्याचे तुकडे केले होते... साहजिक होते त्याला काही बोलायचे नव्हते... पण म्हणून त्याने इतके अत्याचार स्वतःवर करावेत? हो, पण का नाही?! जर जीभ गमावून प्राण वाचणार असतील तर जीभेची आहुती देण्याचे त्याने स्वीकारले होते. आता काही करून त्याला कोणी सत्य सांगण्यासाठी जबरदस्ती करू शकणार नव्हतं!

एव्हाना एटीएस चीफ पण समोर झाला होता...

"आत्ताच कारभार केलाय." एटीएस चीफने त्याला वाटणारी परिस्थिती विदित केली.

"शक्ती! जेलरला हाक मार!" शौर्यजीत अधिकार वाणीने उच्चारला! त्याचा संताप अवर्णनीय होता.

शक्ती बाहेर पळाला. त्याने लगोलग जेलरचं केबिन गाठलं.

"आयबी डिरेक्टरनी आपल्याला बोलवलं आहे." शक्ती जेलर समर वणकुंद्रेला म्हणाला.

हे ऐकताच जेलरला शहारे आले.

"का काय झालं?" जेलरने चिंतेनं विचारलं.

"तुमचा कैदी जखमी आहे!"

"काय?" जेलरला काही कळायचंच बंद झालं...

"हे कसं झालं?" भांबावलेल्या जेलरने शक्तीलाच प्रश्न केला.

"आता ते तुम्ही सांगायचंय!" शक्ती शांतपणे त्याला बोलला,

"चला!" तो जेलरला म्हणाला.

तसा जेलर घाईने इंटेरोगेशन रूमकडे पळाला. शक्ती मागून येतोय की नाही पाहण्याची सूद देखील त्याला नव्हती. आणि तशी तसदी देखील त्याने घेतली नव्हती. हे सगळं त्याच्यावरच तर शेकणार होतं...

गडबडीने आत येणाऱ्या जेलरचा हात दारावर जोरात आपटला आणि तो आल्याची ग्वाही देणारा आवाज झाला. सगळ्यांनी त्याच्याकडे पाहिलं. सर्वांच्या चेहऱ्यावर अवीट राग होता.

ज्याच्यासाठी एवढी धडपड करत कोणी मुंबई, तर कोणी दिल्ली वरून आलं होतं आणि इथं येऊन पाहतात तर काय? तर हे...!

"या जेलर साहेब या! खूप छान ध्यान ठेवता तुम्ही तुमच्या कैद्यांची!" उखडलेला शौर्यजीत ठसक्याने म्हणाला.

"माफ करा साहेब... हा असं काही करेल याची आम्हाला कल्पना नव्हती..." जेलर माफीच्या सुरात म्हणाला.

"तुम्हाला माहीत होतं ना, की हा किती महत्वाचा दुवा होता!" शौर्यने कठोरतापूर्वक विचारलं.

"सॉरी सर!" जेलर खाली मान घालून म्हणाला.

"काय सॉरी? आता काय आपण याला विचारणार आणि काय हा सांगणार...?" वैतागाने शौर्यजीत पुटपुटला.

"असो याला नेण्याची तयारी करा!" त्याने जेलरला सूचना केली. आणि अचानक त्याला काही स्ट्राईक झालं!

"एक मिनिट!"

जायला निघालेला जेलर त्याच्याकडे वळला.

"येस सर?" जेलरने विचारलं.

"आम्ही येण्याआधी किंवा याला अटक केल्यापासून याला कोणी भेटायला आलेलं?"

"नो सर!"

"मीच काल याला भेटून गेलो होतो." एसपी सुशेन मित्र मधेच बोलला.

"मग तुम्ही कोणी नाही का म्हणालात?" शौर्यजीतने जेलरवर आवाज चढवला.

"एसपी सरांवर संशय कसा घेणार? पण ते सोडून कोणीच आले नाही म्हणून नाही म्हणालो...!" जेलर चाचरत बोलला.

"तुम्ही इथे का आला होतात?" त्याच्याकडे दुर्लक्ष करत शौर्यजीतने एसपीला प्रश्न विचारला.

"इथली व्यवस्था लावण्यासाठी. मग म्हंटलं आलोच आहे तर याला पण पहावा... म्हणून..." कचरत एसपी बोलला.

"तुम्ही याच्याशी काही बोललात?" शौर्यने एसपीचचं इंटेरोगेशन चालू केलं.

"नाही. फक्त याला बघितलं आणि निघालो." एसपीने स्वतःला शंकेतून मुक्त केलं.

"तुमच्या येण्यानेच तो सतर्क झाला असेल... याला इथं हलवलं म्हंटल्यावर त्याच्या लक्षात आलं असेल, की याची चौकशी होणार. म्हणून याने हा प्रताप केला..." शौर्यजीत नाराजीने स्वतःशीच बोलल्यागत बोलला.

"सॉरी सर..." एसपी खजील होत म्हणाला.

"नो नीड! तुमच्या येण्यामुळे काही झाले नाही. इंटेरोगेशन रूम बघून त्याने हे केलंय त्याला काही बोलायला लागू नये म्हणून. तुम्ही याला भेटला नसतात, तरी इंटेरोगेशन होणार म्हंटल्यावर याने हेच केलं असतं.

"आता एक करा!" शौर्यजीत जेलरकडे वळाला,

"ही गोष्ट बाहेर कळता काम नये! नाही तर आम्हीच सत्य बाहेर पडू नये म्हणून हे केलंय असं अपोजिशन, मीडिया आणि जनता देखील म्हणायला कमी करायची नाही..." शौर्यजीतने जेलरच्या माध्यमातून सर्वांनाच ताकीद दिली.

हे शक्तीच्या पटकन लक्षात आले कारण सूचना देत असताना शौर्यजीतने अपोजिशनच्या वकीलावर करडी नजर टाकली होती! वकीलही काय ते समजला होता...

जणू काही झालेच नाही असा त्या कैद्याला तयार करायचा होता. त्याच्या अंगावरील रक्ताळलेले कपडे काढून टाकायचे होते. त्याच्या तोंडातून वाहणारे रक्त बंद करायचे होते. त्याच्यावर उपचार व त्याची अंघोळ... उपचारासाठी डॉक्टर देखील पाचारून आणले होते.

यात बराच वेळ जाणार होता. इकडे सगळेच काळजीत. सर्वांत जास्त शौर्यजीत! कारण त्याला या एसआयटीचा प्रमुख म्हणून पाठवण्यात आलं होतं! आणि याला आधी मुंबई व तेथून दिल्लीला एस्कॉर्ट करण्याची जबाबदारी देखील शौर्यजीतवरच होती.

तो शक्तीसोबत बाजूला उभा सिगरेटचे झुरके घेत होता. काय करावे सुचत नसल्याने डोके खाजवत होता...

"तुझ्याकडे काही प्लॅन?" त्याने सिगरेट धरलेल्या हातानेच डोके खाजवत शक्तीला विचारलं.

"सध्यातरी नाही!" शक्ती चेहरा थंड ठेऊन म्हणाला. त्याला कशाचाच काही फरक पडला नव्हता.

बाकीच्यांची दुसऱ्या एका बाजूला कुजबुज चालू होती... कैद्याच्या अशा अवस्थेत त्याच्याकडून आता कसलीच माहिती मिळू शकणार नव्हती... आत्ता तर त्याला कोणीच बळजबरी करू शकणार नव्हतं...

"बॅक टू स्केअर वन..." निराशेने शौर्यजीत म्हणाला आणि राहिलेलं थोटूक त्याने जमिनीवर आदळलं.

शक्तीने शांतपणे ते थोटूक उचलून कचरापेटी शोधून त्यात टाकलं. शौर्यजीतची अवस्था तो समजून होता म्हणून त्याने 'स्वच्छतेचं ग्यान' देणं टाळलं. आणि तोही जाणून होता, की शौर्यजीतने मुद्दाम असं केलं नसतं. शक्तीची कृती पाहून शौर्यजीतला देखील आपली चूक लक्षात आली.

"सॉरी!" जवळ आलेल्या शक्तीला तो म्हणाला.

"इट्स ओके!" शक्ती त्याला सांत्वना देत बोलला.

इतक्यात जेलर पळत आला. सर्वांनी कान टवकारले.

"सर प्रोटेक्टिव्ह विहेकल तयार आहे." जेलर शौर्यजीतला म्हणाला.

"गुड!" आणि शौर्यजीतने एग्झिटचा रस्ता पकडला.

एग्झिट जवळ सर्वांची हत्यारे जाची त्याला परत केली गेली. सर्व ठीक आहे का बघून ती आपापल्या जवळ ठेवत असतानाच शौर्यजीत इथून पुढचा एक्शन प्लॅन समजावून सांगत होता...

"एस्कॉर्ट विहेकलमधून मी, एटीएस चीफ, दोन गार्ड्स, आणि हे शक्तीसेन जातील. बाकी सर्व मागून गाडींतून येतील. नो नीड टू वरी. त्या कार्स देखील हेविली प्रोटेक्टेड् आहेत."

ही ताकीद मुख्यत्वे रिटायर्ड् जज, विरोधी पक्षाचे वकील यांना होती.

"आपल्याला हवे असल्यास आपण आपापल्या हॉटेल्स वर जाऊन नंतर देखील येऊ शकता. सध्यातरी करण्यासारखे काही नाही. असे केल्यास आपण अधिक सुरक्षित रहाल. चॉईस इज युअर्स!"

"ठीक आहे. आम्ही आधी हॉटेल्सला जातो. तुमच्यावरील भार देखील कमी होईल!" रिटायर्ड् जजनी सर्वांच्या वतीने निर्णय घेतला.

कोणी ऑब्जेक्शन घेतलं नाही यावरून हे सर्वांनाच मान्य असल्याचं शौर्यजीतनेही गृहीत धरलं. आणि मग शौर्यजीत सोबत जे जाणार होते ते सोडून सर्व आपापल्या ठिकाणी रवाना झाले...

मग शौर्यजीतने त्याचा मोर्चा गार्ड्सकडे म्हणजे एटीएस ऑफिसर्सकडे वळवला,

"आपण प्रोटेक्टिव्ह विहेकलला सर्व बाजूनी घेरून चलावं!"

"येस सर!" ऑफिसर्सचा म्होरक्या म्हणाला.

"मला वाटतं एवढा लवाजमा नेण्याऐवजी फक्त तू, मी आणि तो असॅसिन एवढेच कार मधून जावू! अशाने कुणाला संशय देखील येणार नाही!" शक्ती सुचवत म्हणाला,

"आफ्टर ऑल डिसीजन इज युअर्स!" त्याने निर्णय शौर्यजीतवर सोडला...

"आय थिंक यु आर राईट!"

त्या कैद्याला बाहेर आणला गेला. तो आता असा दिसत होता, की जणू त्याला काहीच झाले नव्हते. तरी तो शुद्ध हरपलेल्या अवस्थेत होताच... आपला सगळा भार त्याने त्याला धरलेल्या गार्ड्सच्या अंगांवर टाकला होता... आणि यामुळे चालण्यास त्याच्यासह त्याला आधार देणाऱ्या दोघांनाही कष्ट पडत होते...

त्याला चारी बाजूनी गार्ड करून एग्झिट पॉईंट मधून बाहेर काढण्यात आले.

हा मुख्य प्रवेशद्वारच; जो कोल्हापूर - गारगोटी रोडला लागूनच आहे.

बाहेर हेवी विहेकल, काही गाड्या उभ्या होत्या. रिटायर्ड् जज व दोन्ही वकील कधीच निघून गेले होते.

"टार्गेट इज अप्रोचिंग!"

"थिस इज द टाईम. ही वेळ चुकवली तर पुन्हा चान्स मिळणार नाही!" सेंट्रल जेल समोरच्या एका बिल्डिंगवर घात लावून बसलेल्या असॅसिनच्या सुचनेनंतर त्याच्या कानात असलेल्या वायरलेसमध्ये वरील सूचना देणारा आवाज घुमला.

तो त्याच्या यूएस मेड 'बॅरेट एम 107' स्नाईपर रायफलच्या स्कोप (बॅरेट ऑप्टिकल रेंजिंग सिस्टम) मधून वाचस्पतीच्या खुन्यावर नजर लावून होता.

"हो. पण टार्गेट क्लिअर नाही!" तो म्हणाला.

"असू दे. टेक दि शॉट्स!" वायरलेसमधून पुन्हा आवाज घुमला.

आणि त्या स्नाईपरच्या गोळ्या धडाडू लागल्या...

इकडे झाडाची पाने गळून पडावीत तशी कैद्याचे टार्गेट क्लिअर होईपर्यंत त्याच्या भोवतीचे गार्ड्स व त्या कैद्याच्या आजूबाजूचे गोळ्या लागून जमीन पाहू लागले...

प्रोटेक्टिव्ह विहेकलच्या छताच्या कागदासारख्या चिंध्या करत गार्ड्सना जिथे गोळी लागेल तिथले त्यांचे शरीराचे भाग शरीरापासून वेगळे होऊन पडू लागले...

सुरक्षित राहिलेले सर्व सावध झाले. त्यांच्या गन्स कधीच हाती आल्या होत्या... शक्ती शौर्यसह सगळे गोळ्या येत असलेल्या दिशेचा वेध घेऊ लागले. पण कोणालाच अंदाज येत नव्हता. अचानक शक्तीजवळ असलेल्या शौर्यजीतला तो कैद्याच्या दिशेने सरकल्याने

प्रोटेक्टिव्ह विहेकलच्या आरपार येत रायफलची '.50 बीएमजी' गोळी हिट झाली आणि तो खाली कोसळला. त्याच्या हाताच्या चिंधड्या उडाल्या होत्या. रक्ताचे व मांसाचे तुकडे शक्तीलाही भिजवून गेले. त्याला सांभाळण्यासाठी शक्ती त्याच्याजवळ खाली बसला. यामुळे तो अनायासे असॅसिनच्या रेंजपासून दूर झाला...

शौर्यजीतचा उजवा हातच गोळी लागून तुटून पडला होता. त्याला प्राणाचे कोणतेच संकट नव्हते. पण होणाऱ्या वेदना प्राणांतिक कष्ट देऊन जात होत्या...

"खालीच रहा!" शक्तीने शौर्यजीतला ताकीद दिली.

आणि त्याचं वाक्य पूर्ण होतं ना होतं तोच वाचस्पतीचा खुनी डोक्यात गोळी लागून बॉलिंग गेमचा बॉल लागून पिन पडावी तसा मागे डोक्यावर आदळला. पण तत्पूर्वी कलिंगडाच्या चिंध्या व्हाव्या तसं त्याचं डोकं फुटून त्याचं विस्कळीत मगज रक्ताच्या शिंतोड्यासह सर्व बाजूंना उडाला व त्याला संरक्षण देण्यासाठी पुढे आलेल्या गार्ड्सना रजस्नान घालून गेला...

मके विकटावेत तसे त्याचे दात दाही दिशांनी उडाले होते...

पडताना आधारासाठी त्याला हातांचा उपयोग देखील करता आला नव्हता. त्याचे हातात हतकडी जी होती...

तो जागीच ठार झाला होता. स्कोपमधून याची खात्री करून मग मारेकरी त्याची रायफल तेथेच सोडून बिल्डिंग उतरू लागला... त्याच्या हाती लेदर गल्व्ह्ज् असल्याने त्यावर ठसे राहण्याची त्याला भीती नव्हती. शिवाय ओझे सोबत घेऊन पळण्यासाठी तो मुर्खही नव्हता...

जे वाचले होते त्यांनी गाड्यांमागे कव्हर घेतले होते. पण त्या ह्युमंगस गोळी समोर त्या कव्हरचाही काही उपयोग नव्हता. त्या गाड्यांचाही यकश्चित कागदाप्रमाणे छेद घेण्यास ती

राक्षसी गोळी सक्षम होती, पण काम झाले होते. म्हणून गोळ्यांचा वर्षाव देखील थांबला होता. आता त्या मारेकऱ्याचं लक्ष्य एकच होतं; तेथून सुखरूप पसार होणं...

"जखमी झालेत त्यांना हॉस्पिटलला घेऊन जा!" सुखरूप वाचलेल्यांना शक्तीने इन्स्ट्रक्शन दिली आणि तो पुढे झाला.

त्याचा हात पकडून शौर्यने त्याला ते भलते धाडस करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला. पण शक्तीने त्याचा हात बाजूला झटकला आणि तो पुढे झाला. त्याला माहित होतं, कैदी मेलाय याचा अर्थ मारेकऱ्याचं काम झालं आहे. तो आता गोळीबारी करणार नाही. त्याचं पहिलं चित्त आता येथून निसटण्याचं असेल आणि हेच शक्तीला होऊ द्यायचं नव्हतं. हायवेच्या कडेला जाऊन त्याने सगळीकडे निरीक्षण केलं.

समोरच्याच एका बिल्डिंगमधून एक व्यक्ती घाईने बाहेर पडलेली त्याला दिसली. हा कैद्याला मारायला आलेला मारेकरीच होता. त्याने संशय येऊ नये म्हणून स्वतःचा कायापालट केला होता. गल्व्ह्ज् कधीच खिशात कोंबले होते. लेदर ब्लेझर उलटे करून घातले होते. जितके सोफेस्टिकेटेड् दिसता येईल तितके दिसावे असा त्याने प्रयत्न केला होता. पण त्याच्या या चतुराईचा काही उपयोग झाला नाही. त्याची घाई त्याची कुकृत्याची ग्वाही देऊन जात होती आणि हे शक्तीने बरोबर हेरले होते. शिवाय पूर्णतः नाकेबंदी केलेल्या या आवारात एक व्यक्ती एका बिल्डिंग मधून पळत येणं हा दुसरा कोणता संकेत असणार होता...?!

असॅसिनने जशी त्याची टूव्हीलर गाठली तशी ती लक्षात घेऊन शक्ती त्याच्या बाईककडे पळाला.

"काळजी घे आलोच!" शक्ती ओरडून शौर्यला म्हणाला.

"मूर्खपणा करू नको थांब!" शौर्य मागून ओरडत होता.

पण हे ऐकू न ऐकल्यासारखे करत आपल्या बाईकवर राईड होऊन शक्ती कोल्हापूर मुख्य शहराकडेकडे रवाना झाला...

शक्तीची 'सुझुकी हायाबुसा' बाईक रस्त्यावर गोळीच्या वेगाने धावत होती... आणि त्याची नजर गरुडासारखी त्या मारेकऱ्याचा वेध घेत होती...

हायवेच्या खालच्या रस्त्याला त्या असॅसिनची 'कावासाकी निंजा एच 2' धावताना त्याला दिसली. त्याच्या बाईकच्या स्पीडला देखील थांग नव्हता. असणार तरी कसा? आपण सापडलो तर काय होईल याची पुरेपूर कल्पना त्याला होती... आज जसे त्याने एकाला उडवले, तसा उद्या दुसरा कोणीतरी येऊन त्याला उडवून जाईल हे तो जाणून होता... आणि म्हणूनच काही केल्या त्याला पोलिसांच्या हाती लागायचं नव्हतं!

हायवेवर धावणाऱ्या शक्तीच्या गाडीचा वेग अजूनच वाढला. त्याची नजर आता त्या मारेकऱ्यावर स्थिर झाली होती. आता काही केल्या तो त्याला आपल्या नजरेच्या टप्प्यातून निसटू देणार नव्हता!

मारेकरी ज्या रस्त्यावरून गाडी हाकतो आहे तो समोर जाऊन याच हायवेला मिळतोय हे शक्तीला ज्ञात होतं. त्याला पकडण्याची ही नामी संधी होती जी शक्तीला गमवायची नव्हती... त्याने स्पीड आणखी वाढवला... पण तरी खालून जाणारी गाडी अजूनही पुढेच होती...

शक्तीने अजून वेग वाढवला. त्याला पकडता आले नाही तरी त्याला धकड देऊन पाडावे हा त्याचा विचार होता...

शेवटी जिथे दोन रस्ते एकत्र येतात तिथे शक्तीची बाईक पोहोचली. त्या मारेकऱ्याची बाईक देखील जवळच पोहोचली होती. पण शक्तीची त्याला धडक बसणार इतक्यात लगोरीतून खडा सुटावा तसा तो मारेकरी बाईक घेऊन निसटला. शक्तीची हिट वाया गेली

होती. त्याने आपली बाईक बाजूच्या उतारावरून खाली जाण्यापासून वाचवली व मूठ वाढवून तो पुन्हा त्या असॅसिनच्या मागे गेला...

शक्तीची मग सहनशीलता संपली आणि त्याने शौर्यजीतने देऊ केलेली '500 एस अँड डब्लू मॅग्नम स्नब नोस' (स्मिथ अँड विल्सन) रिव्हॉल्व्हर बाहेर काढकी. याची एक '50' कॅलिबर गोळी असॅसिनच्या डोक्याच्या चिंधड्या करायला पर्याप्त होती... ६०० - ७०० किलोचं अजस्त्र अस्वल देखील ठार करण्याची याच्यात क्षमता होती, मग साधारण माणसाची काय कथा? या कार्टेजची पॉवर तो मारेकरीही जाणून होता. म्हणून तर तो शक्तीच्या गोळी पासून स्वतः वाचवण्याचा पुरजोर प्रयत्नात होता!

त्याने वापरलेल्या 'एम 107' रायफलची 50 बीएमजी व 'शक्तीची ही '500 एस अँड डब्लू मॅग्नम'ची या '50 कॅलिबर'च्या बुलेट्स दिसायला व वजनाला सारख्या नव्हत्या, तरी दोन्हीची डिस्ट्रक्शन पॉवर खूपच होती.

म्हणून तर त्याने वाचस्पतीच्या असॅसिनला मारायला 50 बीएमजी बुलेट वापरली होती!

शक्ती असॅसिनचा वेध घेण्याच्या प्रयत्नात होता... पण वाहनांची रहदारी असल्याने त्याला ते जमत नव्हतं. आणि त्याला दुसऱ्या कोणाला इजा देखील करायची नव्हती... चीड येऊन शक्तीने त्याची मॅग्नम पुन्हा होलस्टरमध्ये सारली. एव्हाना तो असॅसिन खूप दूर निघून गेला होता... आणि म्हणून पर्यायाने शक्तीला त्याचा वेग अजून वाढवावा लागला... स्पीडोमीटरचे काटे बाहेर पडतील की काय असे वाटत होते इतक्या वेगाने त्याची बाईक पळत होती... आणि हीच अवस्था असॅसिनच्या गाडीची सुद्धा होती...

असॅसिनची दुचाकी शिये व कसबा बावडा या दोन गावांना जोडणाऱ्या पुलाला लागली... १७ किमीचं हे अंतर मुख्य शहरातून रहदारीतून येत असल्याने सुमारे ३५ - ४० मिनिटांचं...

पण असॅसिनने ते अगदीच कमी वेळात पार केलं होतं... त्यामुळे शक्तीलाही त्याच वेगाने हे अंतर चिरावं लागलं होतं!

असॅसिनच्या बाईकचा वेग कमी होत ती थांबली. आत्तापर्यंत तो शक्तीला चकवण्यात यशस्वी झाला होता, म्हणजे असं त्याला वाटलं होतं... त्यानं जेव्हा मागे वळून पाहिलं, तर शक्ती मागे होताच! असॅसिनने मग गाडी खाली पंचगंगेकडे घेतली. गाडीचा वेग कमी करत तो गाडीवरून उडी मारूनच उतरला. ती महागडी कावासाकी मातीत आपटली व धुळीचे लोट उडवत काही पुढं जाऊन आडवी स्थिरावली.

असॅसिन त्याच्यासाठीच तयारीत असलेल्या मोटरबोटीत चढला. मोटरबोट असॅसिनला पाहिल्यावरच बोटमनने चालू करून ठेवली होती. आणि ती मग प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला पश्चिमेला मार्गक्रमित झाली...

शक्ती पुलावर पोहोचला. त्याला बोट जाताना दिसत होती. तो गाडीवरून उतरून कठड्यापाशी आला. तो हताशपणे पाहत होता. दुसरं तो काय करू शकत होता?... पण नाही! एक उपाय होता...!

असॅसिनची बोट एका बोटीला क्रॉस करून गेली. शक्तीने मॅग्नम काढून हवेत फायर केलं. तो आवाज इतका मोठा होता, की त्या मोटरबोटीतील मासे पकडणाऱ्या नाविकाने आवाजाच्या दिशेने पाहिलं. शक्ती हातात पैसे उंचावून उभा होता. आणि तो त्या नाविकाला जवळ येण्यास खूण करत होता. नाविकाची नाव शक्तीच्या दिशेने वळली. पण ती पुलाखाली येइपर्यंत शक्तीला धैर्य नव्हते. त्याने रिव्हॉल्व्हर होलस्टर मध्ये लॉक करून पुलावरून थेट पाण्यात सूर मारला व पाण्याच्या सरफेसला येऊन तो त्या बोटीच्या दिशेने पोहू लागला. बोट त्याच्या दिशेने येत होती. शक्ती व बोट काही १५ - २० फुटांवर आल्यावर शक्तीने बोटीला वळवण्याचा इशारा केला तशी नाविकाने बोट वळवली.

शक्ती बोटीत चढला. पैसे नाविकाच्या खिशात कोंबत,

"मघासच्या बोटीच्या मागून चला!" शक्ती तातडीने म्हणाला.

ओले असले तरी ते 'पैसे' होते! आणि लक्ष्मीचे दास तर सगळेच! मग का नाही नाविक शक्तीचे ऐकणार?

आता शक्तीची बोट असॅसिनच्या बोटीचा पाठलाग करत होती... पण इतक्यात ती बोट बरीच पुढे निघून गेली होती. म्हणून शक्तीने नाविकाला बोटीचा वेग वाढवण्यास सांगितला... बोट फुलस्पीडला धावू लागली...

एका पॉईंटला असॅसिनची बोट दृष्टीगोचर झाली! असॅसिन मागेच डोळा लावून होता. त्याला शक्ती एका बोटीतून येत असलेला दिसला. त्याने त्याच्या बोटमनच्या खांद्यावर शक्तीवर नजर रोखतच टॅप केलं. बोटमन काय ते समजला. आपलं बोट चालवण्यावरचं ध्यान न हलवता त्याने त्याच्या ब्लेझरमध्ये लपवलेली पिस्टल काढून असॅसिनला हँडओव्हर केली. असॅसिनने शक्तीच्या बोटीवर फायर केलं. शक्तीची बोट याच्या पिस्टलच्या रेंजच्या बाहेर असल्याने गोळ्या शक्तीच्या बोटीपर्यंत पोहोचत नव्हत्या. पण शक्तीच्या घाबरलेल्या नाविकाने त्याचा देह पंचगंगेत झोकून दिला होता. लोक लक्ष्मीपेक्षाही विष्णूचे (जीवनाचे) दास अधिक असतात... आणि याचाच प्रत्यय या नाविकाने दिला होता.

आता मात्र शक्तीला मोटरबोट स्वतः चालवण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याने बोटीचे स्टेअरिंग हातात घेतले. आता मात्र शक्ती त्या असॅसिनला अजिबातच सोडणार नव्हता. शक्तीने त्याच्याकडील रिव्हॉल्व्हर व पिस्टल दोन्ही बाहेर खेचल्या. त्याने आधी असॅसिनच्या बोटमनला रिव्हॉल्व्हरची 50 कॅलिबरची गोळी घालून ठार केलं. त्याचवेळी असॅसिनने चालवलेली गोळी देखील त्याने वाकून डॉज केली होती.

अर्सॅसिनच्या नाविकाचे छिन्न विच्छिन्न झालेले शरीर अर्धे स्टेअरिंगवर पडले होते, तर अर्धे पाण्याच्या पृष्ठभागावर घासत होते. त्यामुळे पाणी फवाऱ्यासारखे अर्सॅसिनला भिजवत होते...

शक्तीने मोटरबोट स्पीडने पुढं घेत 'केल-एल 30' पिस्टलच्या दोन गोळ्या दागल्या. एक अर्सॅसिनच्या उजव्या मांडीवर व दुसरी पिस्टल असलेल्या उजव्या हातावर!

अर्सॅसिनच्या हातून त्याची पिस्टल गळून पडणार होती, पण सैल झालेली ग्रीप त्याने पुन्हा घट्ट करून पिस्टल हातातच ठेवली. याला आताच असा मारून शक्तीला मिळणारी संभावित माहिती गमवायची नव्हती. म्हणून शक्तीने त्याला फक्त जखमी करण्याची रहमत त्याच्यावर दाखवली होती.

बोटमन मरून पण अर्सॅसिनची मोटरबोट पाणी कापतच होती. म्हणून मग तिला थांबवण्यासाठी शक्तीने मोटरबोटच्या मोटरीवरच 50 कॅलिबर दागली. इंजिन एक्सप्लोड् झालं. आगीचे व काळ्या धुराचे लोट उठले. मोटरबोट काही अंतर कापून थांबली. शक्तीची मोटरबोट मागून येतच होती. अर्सॅसिनच्या बोटीला मागून लावत त्याने त्याच्या बोटीचं इंजिन बंद केलं व अर्सॅसिनच्या बोटीवर उडी घेतली. शक्तीने त्या अर्सॅसिनच्या कॉलरला मागून धरून त्याला उठवलं.

त्याचा चेहरा नीट पाहिला आणि स्वतः आणलेल्या बोटीवर गुडघ्यांवर पाडला. चिवट अर्सॅसिनच्या हाती अजूनही त्याची पिस्टल होती. आता मात्र ती अर्सॅसिनच्या हातून सुटून डेकवर पडली. तसा अर्सॅसिन देखील डेकवर उपडा पडला.

शक्तीने रिव्हॉल्व्हर होलस्टरमध्ये बंद करून त्याच्या मोटरबोटचं इंजिन चालू केलं व त्याची बोट पुढे धावू लागली. मग शक्ती पुन्हा अर्सॅसिन समोर येऊन उभा राहिला.

शक्तीच्या पिस्टलमधून आणखी एक गोळी बाहेर पडली, ती अर्सॅसिनच्या डाव्या पायात!

"आरटीओ ऑफिस, शक्तीसेन बोलतोय. माझी सुझुकी आणि एका क्रिमिनलची कावासाकी बावडा पुलावर आहे तेवढी प्लिज ताब्यात घ्या. नंतर कलेक्ट करतो." शक्ती अगदी सहज म्हणजे कॅरमची सोगटी उडवावी तशी गोळी उडवत फोनमध्ये बोलला होता.

मग शक्तीने असॅसिन डेकवर चाचपून उचलू पाहत असलेली त्याची पिस्टल उचलून स्वतःजवळ ठेवून घेतली.

शरीरातील रक्त वाहत जात असल्याने आता असॅसिनने शक्तीला मारण्याचा विचार त्यागला आणि तोच शांतपणे स्वतःच्या गरम रक्ताच्या थारोळ्यात पडून राहिला; निरभ्र आकाशाकडे बघत... पण काहीवेळाने त्याचे डोळे अंधारमय होऊ लागले... सूर्य देखील काळा भासू लागला... खूप रक्त गेल्याने तो मूर्च्छित होत चालला होता... उष्ण रक्त शरीरातून निघून आणि त्यात तो स्वतः निजला असून त्याला आता थंड भासू लागलं होतं... पण ही शीतलता थंड पडत चाललेल्या त्याच्या शरीराची होती... की... की पंचगंगेच्या उडणाऱ्या शीतल शिंतोड्यांची...

आणि ही बोट पश्चिमकडून शहराच्या दिशेने प्रवास करू लागली...

## ३. अधिकृत नियुक्ती (ऑफिशियल अपॉईंटमेंट)...

हॉस्पिटल बेडवर पडलेल्या असॅसिनने डोळे उघडले तेव्हा शक्ती त्याच्या समोरच कोचवर बसलेला होता. स्पेशल वॉर्डमध्ये या खास पाहुण्याची खास सोय केली होती.

"बोलतं व्हा!" शक्ती त्याला शुद्धीवर आलेला पाहून म्हणाला!

असॅसिनने नकारार्थी मान हलवली.

"हॉस्पिटल्समध्ये एक्सिडेंट्स होऊ शकतात! नाही?!" शक्ती धमकीचा सुरात म्हणाला.

"मला माहित नाही कोणी? मला... मला फोनवरून इन्स्ट्रक्शन्स दिल्या होत्या... त्यांनीच सगळी... सगळी... सोय केली... केली... होती..." असॅसिन कष्टाने म्हणाला.

तो बोलला तसा तोंडावर व्हेंटिलेटरचा मास्क असल्याने त्याचा तो अस्पष्ट आवाज नुसताच घुमल्यासारखा झाला व त्याच्या श्वासाच्या वाफेनं त्या मास्कवर बाष्प जमा झाल्यासारखं झालं.

शक्तीने उठून चढवलं जात असलेलं रक्त बंद केलं. मग तो व्हेंटिलेटरजवळ गेला... आणि स्विच ऑन-ऑफ करू लागला...

असॅसिनला श्वसन करण्यास त्रास होऊ लागला... तो  जीवाच्या आकांताने तडफडू लागला...

"तुझ्यामुळे सात ऑफिसर्स मेलेत, माझ्या मित्राने कायमचा हात गमावला आहे. तुला मारायला मला काहीच दुःख होणार नाही!" शक्ती स्विच ऑन-ऑफ करत म्हणाला.

असॅसिन जगण्यासाठी धडपड करत होता... तो शक्तीच्या हातावर मारत होता... पण त्याच्या फटक्यांत ती शक्ती नव्हती जी शक्तीला रोखू शकेल...

अनेकदा स्विच चालू - बंद करून शक्तीने स्विच चालू ठेवला.

"आता बोलायचंय?" शक्तीने त्याला विचारलं.

अस्वस्थ तडफडणाऱ्या असॅसिनने त्याच अवस्थेत होकारार्थी मान हलवली व काही काळ तो तसाच अर्धवट डोळे उघडे ठेवून पडून राहिला...

बराचवेळ गेल्यावर तो मारेकरी व्यवस्थित शुद्धीवर आला.

"बोला! बोला! सुरवात आपल्या शुभनामापासून करा!" चेहऱ्यावरची शांतता विरू न देता शक्ती त्याला म्हणाला.

त्याच्या चेहऱ्यावरची ती शांतता असॅसिनला भयाण जाणवली. शक्ती त्याला कोल्ड ब्लडेड मर्डरर वाटत होता... स्वतः अनेकांना मृत्यूसदनी पोहोचवलेल्या या मारेकऱ्याला शक्तीची मोठी भीती वाटून गेली...

शक्ती शौर्यजीतच्या बेडजवळ उभा होता. चढवलेल्या सलाईनमुळे कदाचित तो ग्लानीत होता...

जसे त्याने डोळे उघडले तसा त्याने शक्तीला आपल्या जवळ पाहिला.

"बरा आहेस?" शक्तीने त्याला विचारलं.

शौर्यने हळुवार मान हलवून शक्तीला आश्वस्त केलं. त्याला धीर दिला.

"डोन्ट वरी मित्रा! तू बरा व्हायच्या आत हे प्रकरण मिटलेलं असेल!" शक्ती ठामपणे म्हणाला.

शक्तीला वेड्यासारखं काही करू नको हे सांगण्यासाठी शौर्यजीतने नकारार्थी मान हलवून त्याला सुचवण्याचा प्रयत्न केला आणि त्याला अडवण्यासाठी शक्तीचा हात धरला. पण ऐकेल तो शक्ती कसला?!

"मी नाही म्हणत असताना तू मला यात ओढलंस! आता मागे फिरणे नाही! तेव्हा तर अजिबात नाही; जेव्हा त्या लोकांमुळे माझा मित्र अशा अवस्थेत आहे!"

शक्तीने त्याचा हात बाजूला केला.

"काळजी करू नको. काळजी घे! आता काम पूर्ण झाल्यावरच भेटू!"

आणि शक्ती शौर्यजीतला विवंचनेत ठेवून निघून गेला...

रात्री एसपी त्याच्या रेसिडेन्सीमध्ये प्रविष्ट होत होता. त्याने दरवाजा उघडला, तसा मागून त्याला कोणी तरी ढकलून दिलं आणि लाईट्स लावल्या. एसपी स्वतःला पडण्यापासून सावरत स्विचबोर्डच्या दिशेने वळला. एसपीला ढकलणार शक्ती, तिथं उभा होता.

"हॅलो एसपी साहेब!" शक्ती त्याला म्हणाला.

"तू? इथं असा? काय अर्थ आहे या सगळ्याचा?" एसपी जाब विचारत आवाज चढवून विचारलं.

"ते तुम्ही सांगायचंय साहेब! या बसा!" कोचवर बसत तो एसपीला म्हणाला. आणि त्यालाही समोर बसण्यासाठी हाताने निर्देश दिला. त्या निर्देशात हुकूम होता.

शक्तीच्या अशा धिटाईमुळे एसपी चांगलाच चिडला, पण काही पाऊल उचलण्याआधी त्याला शक्तीचा थांग घ्यायचा होता... तो शक्तीसमोर बसला!

"मुलं बाळं, फॅमिली? कुठं आहेत?" शक्तीने प्रश्न केला.

"अशा परिस्थितीत नकोत म्हणून गावी पाठवलंय."

"कुटूंबाची काळजी आहे; आणि समाजाची?" शक्तीने डावी भुवई उडवत विचारलं.

"काय हवंय?" एसपी सुशेनने उखडत शक्तीला प्रश्न केला.

"काही प्रश्नांची उत्तरं!" शक्ती रिव्हॉल्व्हर काढून हातात घेत म्हणाला.

"तुला खरंच असं वाटतं, की तू मला संपवू शकतोस?" एसपीनं विचारलं व तो विकट स्मित करत पुढं म्हणाला, "माझी एक हाक आणि त्यानंतर तू असंख्य गोळ्या शरीरात घेऊन कुठेतरी धूळ चरत पडशील!"

"हाक मारून बघ! बघू ऑफिसर्स कुणाचं ऐकतात!" शक्ती शांत भाव चेहऱ्यावर घेऊन म्हणाला!

मग एसपी सुशेन कुंठीत झाला. कारण शक्तीच्या वक्तव्याची त्याने प्रचिती सकाळीच सेंट्रल जेल बाहेर घेतली होती. शक्तीला कसलीच ऑथेरिटी नसताना त्याच्या ऑफीसर्सनी शक्तीला प्रोटोकॉल तोडून सल्युट केला होता.

आपली शेवटची वेळ जवळ आली आहे हे तो समजून चुकला.

"बोल काय हवंय...?" हताश होऊन खाली पाहत त्याने शक्तीला विचारलं.

"तो असॅसिन तू अपॉईंट केला होतास?"

"नाही..."

"वाचस्पतीच्या असॅसिनला तू घाबरवलं होतंस? त्याची जीभ कापण्यासाठी तू त्याला सांगितलंस?"

"हो!"

"का?"

"ऑर्डर्स होत्या!"

"कुणाच्या?"

"नाही सांगू शकत!"

"मग त्या असॅसिनला का मारलं?"

"संभवत: त्यांची भीती संपली नसेल..."

"म्हणून असॅसिनला मारायला नवीन असॅसिन अपॉईंट केला?"

"हो!"

"पण त्या असॅसिननं तुझं नांव घेतलंय!"

शक्तीच्या या वाक्यावर एसपी खाली कुठेतरी शून्यात पाहत दुर्दैवी स्मित करत हसला.

त्याचं काम झालं होतं म्हणून त्याला आता अडकवण्यासाठी हा सापळा आहे हे तो समजून चुकला होता...

"ओ, तर तुझा काटा काढायचं निश्चित केलेलं दिसतंय. मी तुला नाही मारलं, तरी त्या असॅसिनच्या स्टेटमेंटवरून कोर्ट शिक्षा देईलच."

"त्या असॅसिनच्या सांगण्यावरून तू इथं आलास? तो खोटं देखील बोलू शकतो याची जराही शंका तुझ्या मनाला शिवली नाही?" एसपी त्वेषाने डोळे बारीक करत उलट शक्तीला जाब विचारू लागला.

"त्यानं तुझं नाव घेतलं नसतं, तरी मी तुझ्याकडं येणार होतोच!"

"कशाच्या आधारावर?" कठोरतेने एसपी ओरडला.

"वाचस्पतीच्या खुन्याने स्वतःला इजा करण्याआधी तू त्याला भेटला होतास. शंकेला इतकी जागाही पुरेशी आहे."

"हं! याने काहीच सिद्ध होत नाही!" एसपीने शक्तीच्या तर्काची व पर्यायाने शक्तीच्या बुद्धीची कीव केली.

"लॉकडाऊन करणं तुझ्या अखत्यारीत होतं ना? तरी पाचशे मीटरचा ब्लॉकेड् तोडून तो असॅसिन आत आला कसा? तुझ्याशिवाय त्याला कोण एक्सेस देऊ शकत होतं?"

शक्तीचा हा तर्क मात्र एसपीला मान्य करावाच लागला! तो जरा घाबरला आणि गत्यंतर नाही पाहून तो शक्तीला उत्तर देऊ लागला...

"मी जास्त काही सांगू शकणार नाही! पण तो जो कोणी आहे, तो 'सिराज नाईट क्लब'ला रोज संध्याकाळी भेट देत असतो! साडे नऊ - दहाचं टायमिंग. तिथं गेल्यावर तुला खरा सूत्रधार भेटेल..."

"आज, उद्या असेल?"

"सेलिब्रेशन करायला नक्कीच येईल..." हताष एसपी म्हणाला.

"तुमच्या मरणाचं?" त्याला डिवचण्यासाठी शक्तीनं कुटील हसत विचारलं.

एसपी मात्र नजर चोरत खाली पाहत राहिला...

"आणि हे तुला कसं माहीत?" शक्तीनं पुढं विचारलं.

"एक्स्क्यूज मी! मी या डिस्ट्रीक्टचा एसपी आहे!" तो शक्तीकडे नजर टाकून आवाजात जरब आणत म्हणाला.

मृत्यूच्या दारात उभा राहूनही अजूनही अधिकाराची खोटी तृष्णा न मिटलेला एसपी स्वामित्व सिद्ध करू पाहत होता.

शक्तीने त्याच्या या अज्ञानावर त्याचा उपहास करणारं स्मित केलं व तो एसपीला म्हणाला,

"तरी तू अर्धवट माहिती घेऊन काम केलंयस! आपण कुणासाठी काम करतोय आणि त्याचे पुढे काय परिणाम होणार आहेत याचा जराही विचार केला नाहीस ना?!" आणि तो जाण्यास उभारला.

"ज्याने तुला हे सांगितलं, त्याला आणि एकदा भेट दे!" शक्ती दरवाजाकडे जात असताना शेवटी एसपी त्याला एवढंच म्हणाला.

शक्तीने मागेही पाहिलं नाही. तो दरवाज्यातून जसा बाहेर आला, तसा त्याच्यामागे एक स्पार्क झाल्याचं त्याला जाणवलं. आणि एक आवाज... गनशॉटचा!

बाहेर तैनात गार्ड्स शक्तीला जाताना पाहत होते... पण त्यांनी त्याला पकडण्याचा अट्टहास केला नाही... शक्ती काय आहे हे ते जाणून होते... आणि तो आता कोणाच्या रोखण्याने थांबणार नाही हे देखील ते ओळखून होते...

एसीपी मरणासाठी शक्तीमुळेच उद्युक्त झाला आहे हे समजून देखील ते शांत राहिले. शक्तीला घाबरून नाही, तर तो काही चुकीचं करणार नाही हे माहीत असल्याने!

शक्ती पुन्हा त्याने असॅसिनला ठेवलेल्या हॉस्पिटलमध्ये पोहोचला. त्याने थेट असॅसिनचा वॉर्ड गाठला. पहातो तर असॅसिन निपचित पडला होता. चेक करण्याची आवश्यकता नाही हे शक्तीही समजून होता... असॅसिनचा काटा काढला गेला होता...

एसपीने संकेत दिल्यावरच शक्तीला संशय आला होताच की हेच होणार आहे! मग अचानक त्याला काही क्लिक झालं. तो लगोलग शौर्यजीतच्या वॉर्डकडे पळाला. बाहेर तैनात दोन गार्ड्स शक्तीला असा आलेला पाहून जरा सावध झाले. शक्ती जसा वॉर्डमध्ये शिरला तसे तेही हातातील शस्त्र सज्ज करून त्याच्या मागून आत शिरले. शौर्यजीत पण निपचितच होता...

शंकेने शक्ती हळूहळू त्याच्या दिशेने सरकला. आपली भीती सत्यात उतरलेली नसावी अशी न जाणो कितीवेळा या मधल्या काळात त्याने प्रार्थना केली होती...

तो शौर्यजीत जवळ पोहोचला. त्याचे पोट हलताना पाहून त्याचा श्वासोच्छ्वास चालू आहे हे शक्तीच्या लक्षात आले आणि तो रिलॅक्स झाला... दबकन तो शौर्यच्या बेडजवळच्या स्टूलवर बसला. त्याने थोडा आवाज झाला. त्याच्याही नकळत तो उसासा टाकत होता... त्याने डोळे बंद करून घेतले.

कपाळावर आलेले घर्मबिंदू फोरआर्मने टिपत असतानाच, त्याच्या मांडीवर शौर्यचा डावा हात आला.

"काय रे काय झालं?" शौर्यजीतने तोंडचा मास्क काढून विचारलं.

शक्ती स्टुलावर पडला तेव्हा त्या आवाजाने शौर्यची तंद्री भंगली होती.

तो आवाज कानात घुमताच शक्तीने ताडकन डोळे उघडून शौर्यजीतकडे पाहिलं. शक्तीच्या डोळ्यांत अश्रू होते... चेहऱ्यावर साचलेला घाम आणि त्याचे अश्रू एकरूप झाले होते... आणि ते जमिनीवर ठिबकत होते...

काय चाललंय याबद्दल गार्ड्स पूर्णतः क्लूलेस होते. त्यांना बाहेर जाण्याची शौर्यजीतने त्यांना खूण केली. त्याच्या सूचनेनुसार बाहेरून दार देखील लावून घेतलं गेलं...

मग काहीच न बोलता शौर्यजीतने सोबतच्या टेबलवर असलेलं एक जाडजूड एन्वेलोप उचलून ते शक्ती समोर धरलं.

शक्ती प्रश्नार्थक नजरेनं पाहत राहिला... जास्त बोलण्याचा त्रास न घेता शौर्यजीतने शक्तीला इशारा करूनच एन्वेलोप घेण्याचा आग्रह केला.

शक्तीने डोळे आणि घाम पुसले. शौर्यकडून एन्वेलोप घेऊन त्याने तो फोडून पाहिला. आत खूप सारे पैशांचे दोन पुडके. प्रत्येक बंडलांत दोन हजारांच्या पंचवीस नोटा. दोन पत्रं होती आणि एक कसली तरी आयडी...

ती पत्रं शक्तीने वाचली आणि शक्तीची चर्या बदलली... त्याच्या चेहऱ्यावरच्या आठ्या गडद झाल्या...

"यु आर ऑफिशियल अपॉईंटेड् ऑन थिस केस बाय प्राईम मिनिस्टर अँड सेन्ट्रल होम मिनिस्ट्री! त्या स्पेशल आयडीमुळे तुला तुझ्या कामात कोणी बाधा आणणार नाही! याचा तू क्रेडिट कार्ड म्हणून पण उपयोग करू शकतोस. आणि डोन्ट वरी हे अनडिटेक्टेबल आहे. मला माहित आहे तू काही आता ऐकायचा नाहीस. म्हणून मी ही स्पेशल परमिशन काढली आहे."

"आय वोन्ट लेट यु डाऊन ब्रदर्...!" कागद हातात असून शक्तीने गहिवरून शौर्यचा हात हातात घेतला व भरल्या डोळ्यांनी त्याला आश्वस्त करत म्हणाला आणि यामुळे हातातले ते महत्वाचे कागद चुरगळले गेले.

"पण लक्षात ठेव! विशेष परिस्थितीतच त्या आयडीचा उपयोग कर. अदरव्हाईज, नाही. तू ऑफिशियली जरी या केसवर अपॉईंट असलास, तरी तुझं काम अनॉफिशियल असणार आहे. त्यामुळे एसआयटी सोबत आणि रॉ सोबत कधी ओव्हरलॅप होऊ नको!" शौर्यजीतने शक्तीला ताकीद दिली.

## ४. मोहिनी (फेम फेटल)...

दुसऱ्या दिवशी शक्तीची फोर व्हीलर कोल्हापूर एसपी ऑफिसच्या बाहेर होती. तो मोबाईलवर बोलत होता...

"मिहीर, वाचस्पतींच्या खुन्याला मारायला वापरलेली स्नाईपर रायफल सापडली?"

एसपी ऑफिसर मध्ये वर्किंग डेस्क, मिहीर नांवाचा डीवायएसपी शक्तीच्या प्रश्नांना उत्तर देत होता...

"हो सर."

"काय मी पाहू शकतो?" शक्तीने पलिकडून विचारलं.

"नक्कीच सर! मी येतो घेऊन तुमच्याकडे!" मिहीर एक्साईमेन्टमध्ये म्हणाला.

"ठीक आहे तर, मी खालीच आहे. ये!" शक्तीने कॉल कट केला.

आणि तो मिहीरच्या येण्याची वाट पाहू लागला...

शक्तीची गाडी एसपी ऑफिसच्या कंपाऊंडला लागून असलेल्या फुटपाथजवळच उभी होती. मिहीर रायफल असलेली केस घेऊन धावत ऑफिस उतार झाला होता. तो झटकन येऊन शक्तीच्या बाजूला बसला...

गाडीत बसल्या बसल्या मिहीरने रायफलची केस मांडीवर ठेवत शक्तीशी हँडशेक केला.

"गुड मॉर्निंग सर! गुड टू सी यु!" तो हसत म्हणाला.

"काय नवीन एसपीची नियुक्ती झाली?" रुक्ष चेहऱ्याने शक्तीने हात बाजूला घेत विचारलं.

"तातडीने. सांगलीचे एसपी इमर्जन्सी पाहून इकडे पाठवण्यात आले आहेत!"

"सर्वांत अनुभवी आहेत. त्याचा रेकॉर्ड चांगला आहे. तरी त्यांच्यावर लक्ष ठेवा!" शक्तीने विचार करत सूचना केली.

"हो सर!"

"या परिस्थितीत कोणावरही अंधविश्वास ठेवणं जोखमीचं जाऊ शकतं!" शक्ती ताकीद करत बोलला.

"हो..." मिहीरही विचारपूर्वक उद्गारला.

त्याने केस उघडून ती रायफल शक्ती समोर धरली.

"फॉरेन्सिक टेस्ट झाली?" त्या रायफलवर हात फिरवत शक्तीने विचारलं.

"झाली. पण काही सापडले नाही!" मिहिरने खुलासा केला.

"आपल्याकडील डाटाबेस, रेकॉर्ड्स चेक केले? या बंदुका कोण वापरतं किंवा ट्रेड करतं काही?"

"आपल्या भागात तर कोणी नाही!"

"तेही बरोबरच म्हणा. आपल्याकडे देसी बंदुकाच जास्त खरीदल्या - विकल्या जातात. घेणाऱ्याला स्वस्त पडतं आणि विकणाऱ्याला प्रॉफिट पण होतो." शक्ती म्हणाला.

"मला इन्वेस्टीगेशन, फॉरेन्सिक आणि अटॉप्सी रिपोर्ट्स मिळू शकतील?" शक्तीने मिहीरकडे मागणी केली.

"सॉरी सर! त्याचा निर्णय तर नवीन एसपीच घेऊ शकतील... मी याबाबत काहीच करू शकत नाही. तुम्ही त्यांच्या ओळखीचे नाहीत म्हणून ते तुम्हाला को-ऑपरेट करण्याची शक्यता कमीच आहे. ही रायफल पण मी त्यांच्या नकळत घेऊन आलोय." मिहीर माफीच्या सुरात म्हणाला.

"समजू शकतो!" शक्तीने मिहीरला आश्वासित केलं.

मग शक्तीने त्या रायफलचा फोटो घेतला. आणि कोणाला तरी व्हाट्सएप केला. आणि मग त्याच व्यक्तीला फोन लावला...

"जतीन! तुला एक फोटो पाठवलाय व्हाट्सएपला. एक रायफल आहे. त्याची जरा माहिती काढ. लगेच!"

"ओके!" पलिकडून आवाज आला आणि फोन कट झाला.

शक्ती आणि मिहीर मग जतीनच्या फोनची वाट पाहू लागले...

शक्तीचा मोबाईल घणाणला... शक्तीने तातडीने पहिली रिंग पूर्ण होण्याआधीच तो कॉल रिसिव्ह केला.

"बोल!" तो अधीरतेने म्हणाला.

तिकडे जतीन त्याच्या पीसीवर त्या रायफलची माहिती वरवर पाहता स्क्रोल करत होता. हा जिथे बसला होता ती जागा अत्यंत पसाऱ्याने भरली होती... सगळीकडे कॉम्पुटर पार्टस विस्कटलेले होते. कसल्या कसल्या वायरींचा गुंताच्या गुंता त्याच्या खोलीभर पसरला होता. यावरून तो कॉम्प्युटर इंजिनिअर वगैरे असेल अशी स्पष्टता होत होती. पण तो साधा कॉम्प्युटर

दुरुस्ती करणारा माणूस नव्हता. कारण त्या पार्टस सोबतच बऱ्याच वेगवेगळ्या प्रकारच्या गन्स विघरुन पडल्या होता...

"'बॅरेट एम 107' असं नांव आहे त्या रायफलचं! बॉस, ही स्नाईपर रायफल नाही!"

"मग?" गोंधळून शक्तीने विचारलं.

"मी या रायफलची कंपनी बरेटचं सेल लिटरेचर वाचलं, त्यात कुठेच स्नाईपर असा उल्लेख नाही!"

"तुला म्हणायचं काय आहे?" शक्ती गोंधळून विचारलं.

"ही गन लाईट प्रोटेक्टिव्ह विहेकल्स, प्रोटेक्टिव्ह शेल्टर्स डिस्ट्रॉय करण्यासाठी वापरली जाते. या रायफलच्या वापरावरून तू हा अंदाज नक्कीच लावू शकतोय, की हे लोक किती क्रूर असतील!

"ही रायफल अमेरिकेत बनवली आहे आणि अमेरिकन आर्मी याचा मोठ्या प्रमाणात वापर करते! बाकीची माहिती मी तुला मेसेज करतो." बत्तीस वर्षांचा अर्धवट पांढऱ्या दाढीची खुरटे वाढलेला डोळ्यांवर फायबरचा चष्मा चढवलेला स्थूल शरीरी जतीन कानाला असलेल्या हेडफोनच्या माईकमध्ये बोलला.

"ते मला ऑनलाईनही समजलं असतं!" शक्ती म्हणाला.

"ओ! तर तुला आतली बातमी पाहिजे!" जतीन हसून म्हणाला.

"त्याशिवाय मी तुला का फोन केला असता?!"

"मेसेज करतो!" जतीन हसून म्हणाला.

आणि कॉम्प्युटरवर काही सर्च करण्यात गुंतला...

"अमेरिकन मेड रायफल आहे!" शक्ती मिहीरला म्हणाला.

"म्हणजे अमेरिका यात इन्वॉल्व्ह आहे?! गॉड...! असं असेल, तर इट्स एन इंटरनॅशनल कॉन्स्पिरिसी अंगेंस्ट इंडिया!"

"असू शकतं! भारतीय राजकारणात डायरेक्ट हस्तक्षेप करता येत नाही म्हणून हे केलेलं असू शकतं! पण असंही नाही की ही अमेरिकेत बनते म्हणून फक्त अमेरिकन आर्मी वापरत असेल. सो इतक्या लवकर निष्कर्ष काढणं योग्य नाही! तू माहिती घेत रहा. सगळी फोर्स यामागे लावावी लागली तरी चालेल! सध्या एकच लक्ष्य आहे! या प्रकरणाचा छडा!"

"नो डाऊट! यासाठी नवीन एसपीशी संघर्ष करावा लागला तरी चालेल!" मिहीर उत्तेजित होत म्हणाला.

"नाही! त्यांना विश्वासात घे! मला वेळोवेळी रिपोर्ट करत रहा!" शक्तीने सुलभ मार्ग सुचवला.

"आपण म्हणाल तसं!" मिहिरने सुझाव मान्य केला.

"आता तू निघ! ही रायफल माझ्याकडे असू दे."

"पण सर..."

"मी तुझा संकोच समजतोय. पण मी याचा गैरवापर नाही करणार. विश्वास ठेव!"

"तसं नाही सर पण, पुराव्यातून रायफल गायब आहे हे एसपींना समजल्यावर मी त्यांना काय उत्तर देऊ?"

"डोन्ट वरी! तसं काही झालं तर त्यांचा माझ्याशी फोन जोडून दे. मी काय ते सांगतो त्यांना!"

"मग आत्ताच बोला ना?" मिहीरने इंसिस्ट केलं.

"आत्ता नको. ते घेऊ जाऊ देणार नाहीत. रायफल एकदा का माझ्या ताब्यात आली, की त्यांना नाकारता येणार नाही!"

"फाईन!" मिहीर नाराजीनेच म्हणाला. पण तो शक्तीला मना देखील करू शकत नव्हता.

त्याने शक्तीचा निरोप घेतला,

"चालेल सर! येतो मी!" ती रायफल केस मागील सीटवर ठेवत तो गाडीतून उतरला.

"येतो!" म्हणून तो ऑफिसकडे निघून गेला...

शक्तीने ती रायफल त्या उघड्या केसमध्ये बंद केली आणि त्याची गाडी वळली...

गाडी चालवतच त्याने ब्लुटूथ मोबाईलशी जोडला आणि तो कानावर प्लेस केला. पुन्हा एक कॉल...

"अरे थोडा तरी टाईम देना यार!" जतीन कळवळा.

कॉम्प्युटरवर माहिती गोळा करणं त्याचं चालूच होतं...

"त्यासाठी फोन नाही केला!" शक्ती गाडी चालवत ब्लुटूथमध्ये बोलत होता...

"ऐक!" आणि तो काही सूचना देत गेला...

"तशीच दुसरी रायफल मिळेल?"

"ऑर्डर करता येईल, पण डिलिव्हरीला वेळ लागू शकतो."

"मग त्या रायफलची रेप्लिका मिळेल?"

"होईल! पण वेळ लागेल!"

"किती?"

"दिवस तरी जाईल."

"संध्याकाळपर्यंत. मेक इट फास्ट!"

"तू बॉस असल्यासारखा ऑर्डर करतोयस!" जतीन त्याला खिजवत म्हणाला.

"ठीक आहे काहीच करू नको! पण मग अटकेला सामोरे जायला तयार रहा! लोकल पोलिसांसोबत सायबर सेल आणि इंटेलिजन्स सुद्धा तुझं स्वागतच करतील!"

"ओ! तर आता ग्रेट शक्तीसेन ब्लॅकमेलिंगचा आधार घेणार आहेत तर...!" बाजूच्या बाऊल मधील चिप्स तोंडात टाकत जतीन बोलला.

"फालतू बडबड करण्यात वेळ घालवण्यापेक्षा सांगितलेलं काम कर!"

"ओके. पण मला अजून काही फोटोज् लागतील."

"ठीक. त्यापेक्षा ती रायफल मी तुला हॅन्डओव्हर करतो. ती स्कॅन कर! आणि पुन्हा माझ्या घरी पोहोचव."

"तू नसशील तर?"

"बाहेरच सोड!"

"गुड!"

"वजन, लांबी रुंदी अगदी तंतोतंत. मला मिलीमीटरचं देखील अंतर नको आहे. रायफलवर स्क्रॅचेस असतील तर तेही यायला हवेत. मी केस पाठवतोय त्याचीही रेप्लिका तयार कर! वेल पॅक्ड् करून घेऊन ये!

"आणखी एक! मला सोमेश राजमाने नावाच्या फेक आयडीज् बनवून हव्या आहेत! त्याचं बँक अकाऊंट शोधून त्याचं फेक क्रेडिट कार्ड पण बनव. एसपी सुशेन मित्रचा डेटा सर्च केला तर तुला सोमेश राजमाने मिळेल!" शक्तीने जतीनच्या कामात वरील कामं अधिक केली.

"तू नांवानांव काम वाढवत..."

जतीनचं पुढं काही न ऐकता शक्तीने ब्लूटूथचं बटन दाबून कॉल कट केला आणि त्याने ब्लुटूथ काढून डॅशबोर्डवर फेकला.

त्याची गाडी मार्गक्रमण करतच होती...

ती थांबली ती शौर्यजीत असलेल्या हॉस्पिटलला! गाडी पार्किंगला सोडून तो हॉस्पिटलमध्ये प्रवेशकर्ता झाला. आणि इतक्यात कोणी तरी येऊन लॉक केलेली शक्तीची गाडी खोलली आणि रायफल केस घेऊन तो माणूस निघून गेला...

काही वेळातच शक्ती शौर्यजीतसमोर उभा होता. शौर्यजीतचं फलाहार घेणं चालू होतं.

"काही खाणार?" शौर्यने ऑफर केलं.

शक्तीने मान हलवूनच नाही म्हंटलं.

"आएम एंटेरिंग इन टू द सँग्क्युअरी! ब्लेस मी लक!" शक्ती चेहरा स्ट्रेट ठेऊन म्हणाला.

"तुला शुभेच्छांची गरज केव्हा पासून पडायला लागली शक्तीसेन! यु विल डू गुड! मला माहित आहे!" शौर्य हसत म्हणाला.

"डिस्चार्ज?"

"अजून तरी नाही!"

"वहिनी येणार आहेत?"

"नाही! आणि मी काही संगितंल नाही. तूही सांगू नको. मी मुंबईत कामानिमित्त बराचवेळ आमच्याच तिथल्या घरी राहणार आहे असं तिला येतानाच सांगितलं आहे. त्यामुळे तिला सांगण्याची गरज नाही. मला तिला काळजीत पाडायचं नाही. बरा झालो, की मीच तिच्या समोर जाईन..." थोडा हेल्पलेस होत शौर्य बोलला.

"सॉरी यार..." शक्तीने खंत व्यक्त केली.

"का?" खुदकून शौर्यने विचारलं.

"मोठ्या आशेने तू माझ्याकडे मदत मागायला आलास, पण मी तुला प्रोटेक्ट करू शकलो नाही..." शक्तीने अपराधबोध व्यक्त केला.

"तू नसतास तरी असंच काहीसं झालं असतं. माझी जीवही गेला असता. कुणी सांगावं. तुझी काही चूक नाही. आणि मी माझ्या प्रोटेक्शनसाठी तुझ्याकडे आलो नव्हतो. मला तुझ्याकडून जे अपेक्षित आहे ते तू करतो आहेस यासाठी मीच तुला धन्यवाद द्यायला हवेत!" तोंडाजवळ नेलेलं आख्खं सफरचंद बाजूला करत शौर्य निरागस स्मित करत शक्तीला बोलला!

यामुळे तर शक्तीला शांत वाटण्यापेक्षा अधिकच लाजल्यासारखं झालं.

"मी तुझी सोय माझ्या घरी केली असती, पण जर लोक आपल्या मागावर असतील, तर तिथं हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून तुला तिथं शिफ्ट करत नाही. त्याबद्दल माफ कर!"

"इट्स ऑल राईट. तुझं म्हणणं योग्य आहे!"

"पण डोन्ट वरी. मी तुझी सोय करतो काही तरी. तुला इथं सोडणं पण मला सुरक्षित वाटत नाही!" शक्ती म्हणाला.

त्याने पकडलेला असॅसिन इथं याच हॉस्पिटलमध्ये मेला होता आणि तेही इथं संपूर्ण हॉस्पिटलला सर्व बाजूंनी प्रोटेक्शन असताना हे तो विसरला नव्हता.

पण याबाबद्दल तपास करण्यात त्याला वेळ घालवायचा नव्हता. ये काम पोलीस व इंटेलिजन्स करू शकत होतं... करत होतं...

शिवाय मुख्य सूत्रधार शोधला, तर या सगळ्याची उत्तरं आपसूक मिळणार होती म्हणून शक्तीने असॅसिनच्या मृत्यूकडे लक्ष दिले नव्हते! आणि बहुदा त्याला या उत्तरांमध्ये काही स्वारस्यच नव्हतं...!

इकडे एसपीच्या केबिनमध्ये नवीन अपॉईंट झालेला एसपी सारंग गोखले मिहीरला झापत होता...

"विद्युत म्हणाला, की तू मोस्ट इम्पॉर्टन्ट एव्हीडेन्स असलेली रायफल कुठे घेऊन गेलास आणि परत आणलीच नाहीस! काय केलंस रायफलचं?" एसपी सारंग मिहिरला जाब विचारत म्हणाला.

'या विद्युतला विद्युत गतीनं चोंमडेपणा करायची काय गरज होती?' मिहीर मनातल्या मनात विद्युतला शिव्या घालत म्हणाला आणि...

"सर... ते... मी..." मिहीर मोठ्याने बोलताना अडखळला.

"मी ते काय? किती बेजबाबदारपणा आहे हा? लोक तुम्हाला नाही मला नांवं ठेवतील! म्हणताय जॉईन होऊन एक दिवस नाही झाला आणि याने मोठा एव्हीडेन्स गमावला! पुराव्यांसोबत छेडछाड केल्याचे आरोप लागतील माझ्यावर!" गोखले शिरा ताणवत ओरडला.

मिहीर खाली मान घालून उभा राहिला होता. त्याची खामोशी सारंगच्या डोक्यात अजूनच तिडीक उठवून गेली!

"बोला!" तो ओरडला.

"फॉर्मर असिस्टंट पुलिस इन्स्पेक्टर शक्तीसेन अमर नाईक ती आपल्या सोबत घेऊन गेले आहेत..." एका श्वासात मिहीर बोलून गेला.

"फॉर्‍मर! म्हणजे आता तो फोर्समध्ये नाही! अं?" गोखलेनं राग शांत न होऊ देता विचारलं.

"नाही सर!"

"मग तुम्ही एवढा महत्त्वाचा पुरावा एका सामान्य व्यक्तीच्या हाती दिलाच कसा?" टेबलवर हात आपटत सारंग गरजला.

"ही इज ट्रस्टवर्दी सर!"

"माय ऍस! मी जरा बाहेर काय गेलो तुम्ही तर गोंधळच घालून ठेवलात. जरा मला इथं स्थिर व्हायला तरी वेळ द्यायचात!" सारंग गोखले ओरडला.

"सॉरी सर..." पुन्हा खाली पाहतच मिहीर बोलला.

"तुमचं सॉरी नकोय मला. ती रायफल हवी आहे! आताच्या आता त्याच्याकडून ती रायफल परत घ्या!" आवाज वाढवून सारंग खेकसला.

मिहीर जागचा हलला नाही. त्याची काहीच कृती नाही पाहून सारंग जास्तच रागावला...

"तो कोण आहे त्याला फोन लावा. आत्ताच्या आत्ता! मी बोलतोय!" सारंगने ऑर्डर सोडली.

घाबरून मिहीरकडे पर्याय उरला नाही. त्याने शक्तीला कॉल केला व रिंग होण्याचीही वाट न पाहता मोबाईल सारंग समोर धरला.

"सर..."

सारंगने मिहीरकडून तो मोबाईल जवळजवळ हिसकावूनच घेतला. एव्हाना पलिकडून फोन उचलला गेला होता...

"हॅलो बोल मिहीर!" अजूनही शौर्यजीत समोर बसलेला शक्ती मोबाईलमध्ये बोलला.

"मी मिहीर नाही. न्यू अपॉईंटेड् एसपी बोलतोय!" पलिकडून उखडलेला आवाज!

"हा बोला सर!"

"तुम्ही मिहीरकडून नेलेली रायफल परत आणून द्या. नाही तर मला तुमच्यावर गुन्हा दाखल करण्याशिवाय पर्याय नाही!" सारंगने अक्षरशः धमकी दिली.

"माफ करा सर. वाचस्पतींच्या खुनाची जी एसआयटी आहे त्याचे हेड आयबी डिरेक्टर शौर्यजीत देशमुख यांना ती रायफल पहायची होती. म्हणून घेऊन आलो होतो..."

"ए मी कवा तुला ती रायफल आणायला..." शौर्य बोलत असताना त्याचं वाक्य पूर्ण होण्याआधी शक्तीने त्याच्या तोंडावर हात ठेवून त्याला गप्प केले आणि इशारा करून काही विशेष नाही असं तोंड विचित्र करून सांगितलं.

'पलीकडे मूर्ख माणूस आहे' असा त्याच्या संकेतांचा अर्थ होता. तो समजून शौर्य हसला. तो ओळखत असलेला शक्ती आता त्याच्या रंगात येत होता. त्यानं बाजूच्या ट्रेवरचं केळं उचललं. ते तो दातांनीच सोलू लागला.

"सर माझ्यासमोरच आहेत. आपण बोलू शकता!"

शक्तीने मोबाईल शौर्यजीत समोर धरला. शौर्यजीतने 'काय?' असं इरिटेट भावाने इशाऱ्याने विचारलं.

'बोल!' शक्ती पण इशाऱ्यानेच बोलला. तरी त्याचे ओठ हाललेच. त्याने मोबाईल शौर्यच्या कानाला लावला.

"येस! मी आयबी डिरेक्टर. मला जरा ती रायफल बघायची होती म्हणून मागवली होती. हॉस्पिटलमध्ये असल्याने काही अपडेट्स नाहीत म्हणून आपल्या जॉइनिंगबद्दल समजलं नाही म्हणून ती रायफल अशी मागवावी लागली!" शौर्यने उगाचच थाप मारली.

त्याला पूर्ण बोलूही न देता शक्तीने मोबाईल स्वतःच्या कानाला लावला.

"असं का? ठीक आहे सॉरी. पण प्लिज ती रायफल लवकर हेडक्वार्टरला जमा करा." चाचरत सारंग गोखले बोलला.

"काळजी नको सर. शौर्यजीत सरांचं परीक्षण पूर्ण झालं, की मी ती स्वतः आपल्याला पोहोचवतो!" शक्ती मोबाईलमध्ये म्हणाला.

"ओके थँक्स!"

म्हणत सारंगने फोन कट केला व मिहीरला परत केला.

"पुन्हा अशी चूक नको! मला विचारल्याशिवाय किंवा सूचित केल्याशिवाय काही निर्णय घ्यायचा नाही!" सारंगने ठणकावले.

"येस सर!" मिहीरची मान आणि नजर अजूनही खालीच!

"चला निघा!" सारंगमे आदेश दिला.

हे मिहीरच्या मनासारखं झालं. कधी एकदा या केबिनमधून बाहेर पडतोय असं त्याला झालंच होतं... तो क्षणाचा विलंब न लावता केबिनमधून निसटला.

हॉस्पिटलमध्ये शक्ती मात्र आता गंभीर झाला. त्याने घड्याळ पाहिलं होतं. चार झाले होते. तो तडख उठला.

"काय झालं?" शौर्यनं विचारलं.

"टाईम हॅज कम टु एन्टर इन टू द सँक्च्युअरी!" आपला मिश्किलपणा एका क्षणात झटकून शक्ती बेरकी बनला होता.

"येतो!" तो म्हणाला आणि त्याने शौर्यजीतचा वॉर्ड त्यागला!

शौर्यजीत मात्र चेहऱ्यावर काहीशी चिंता घेऊन जाणाऱ्या शक्तीसेनकडे पाहत राहिला...

शक्ती त्याच्या गाडीतून उतरला आणि घराकडे चालू लागला... दारात दोन रायफल केस पडल्या होत्या. अगदी हुबेहूब!

शक्तीने दोन्ही उचलल्या आणि एक त्याने घरात ठेऊन दिली. दुसरी सोबत घेऊन तो गेटमधून बाहेर पडला.

त्याने रिक्षा केली. ती रिक्षा शक्तीने सांगितलेल्या मार्गावर धावू लागली...

संध्याकाळी चार पंचेचाळीसला शक्ती आरटीओ ऑफीसरशी काही बोलला. खांद्याला ती रायफल केस होतीच! दोघांनी हँडशेक केला आणि शक्ती बाईक घेऊन निघाला. पण त्याची नाही; त्याने पकडलेल्या आणि हॉस्पिटलमध्ये मारलेल्या गेलेल्या असॅसिनची 'कावासाकी निंजा एच 2'!

मग ती कावासाकी आली एसपी ऑफिसला त्याने मिहीरला फोन केला. काही वेळातच मिहीर खाली आला. पण एकटा नाही. सोबत नवीन एसपी सारंग गोखले होता.

"ही तुमची रायफल!" शक्तीने खांद्याला आडवी टाकलेली केस काढून एसपी समोर धरली.

"थँक्स! पण पुन्हा जर काही मदत लागली तर सूचित करा. असं परस्पर काही करू नका." सारंगने स्मित करत ताकीद दिली. हे बोलत असताना त्याने मिहीरकडे पण एक कटाक्ष टाकला होता.

"हो सर!" शक्ती म्हणाला.

एसपी निघाला.

"सॉरी सर!" मिहीर शक्तीला म्हणाला.

सारंग हसत असला तरी त्याने शक्तीला धमकावलं होतं. म्हणून मिहीरने माफी मागितली.

"इट्स ऑल राईट!" शक्ती हसून बोलला.

मिहीरने मग नजरेनेच जाण्याची परवानगी घेतली आणि तो ऑफिसकडे पळाला.

शक्ती आपल्या घरी परतला. त्याची बाईक सुझुकी हायाबुसा गेटच्या आत लागली होती.

शक्ती कुलूप काढून घरात प्रविष्टला. सोफ्यावर पडलेली रायफल केस त्याने घेतली. त्या जागी बसला आणि त्याने ती केस मांडीवर घेऊन ती उघडली. रायफल हाती घेताच खाली त्याला त्याने बनवायला सांगितलेले खोटे आयडी कार्ड्स दिसले. फेक वोटर आयडी, खोटे आधार कार्ड, खोटे क्रेडिट कार्ड, खोटे पासपोर्ट, खोटे पॅन कार्ड एवढंच काय पण खोटे रेशन कार्ड पण बनवले गेले होते. हे जतीनचं परफेक्शन होतं. पण शक्तीला याचं काहीच कौतुक नव्हतं!

रेशन कार्डची शक्तीला तूर्तास गरज वाटली नाही म्हणून त्याने ते टी-पॉयवरच टाकून दिलं. बाकीचे सगळे डॉक्युमेंट्स त्याने आपल्या वॉलेट मध्ये ठेवून घेतले. आणि रायफल निरखून पहायला सुरवात केली.

काहीवेळाने त्याच्या मोबाईलची मेसेज ट्यून वाजली...

शक्तीने मेसेज वाचू लागला. तोच त्याला कॉल आला. त्याने तो रिसिव्ह केला...

"रायफल आवडली?" आपल्या कॉम्प्युटरवरच नजर लावून आपल्याच कामावर खुश असलेल्या जतीनने फुशारकीने विचारलं.

"हो! आणि ती आपल्या ठिकाणी पोहोचली सुद्धा! पण पुन्हा मला ट्रॅक करायची हिंमत करू नको!" शक्ती पलिकडून धमकावत म्हणाला.

"बरं. तुला पाठवलेली माहिती पाहिलीस?" जतीनने विचारलं.

"हो. तू सांगितलंस एम 107 आणि माहिती पाठवलीस एम 82 ची पण. मॅटर काय आहे?"

"तू अजून पूर्ण वाचलेलं दिसत नाही. ब्रिफमध्ये सांगतो ऐक! जवळजवळ एकोणसाठ देश एम 82 या रायफलचा किंवा या रायफलच्या मॉडीफाईड् व्हर्जनचा त्यांच्या आर्मीमध्ये

उपयोग करतात. आपल्या मुंबईतील फोर्स वन कमांडोज् आणि पॅरा एसएफ कमांडोज् पण एम 107 चाच उपयोग करतात!"

"पर्टिक्युलर हीच?" शक्तीने खात्रीसाठी विचारलं.

"हो. युएस मिलिटरीने 'स्टॅन्डर्डाइझ्ड केलेल्या एम 107 ते वापरतात."

"एम 82 आणि एम 107 मध्ये फरक काय आहे?"

"नॉट सो मच. १९८२ ला एम 82 हे मॉडेल कंपनीने डेव्हलप केलं म्हणून याला नाम एम 82 नांव ठेवलं. जेव्हा अमेरिकेन आर्मीने २००२ ला या विकत घेतल्या, तेव्हा त्यांनी त्यांच्या आवश्यकतेनुसार काही बदल करून घेतले आणि याचं एम 107 असं नामकरण केलं!"

"थोडक्यात जास्त फरक नाही!" शक्तीने वैतागाने विचारलं.

"असं म्हणू शकतो!" जतीन म्हणाला.

"माझ्याकडे नेमकी कोणती आहे? एम 107?"

"बरोबर!"

"देन वाय आर यु मेकिंग इट सो कॉम्प्लिकेटेड्?" शक्ती थोडा चिडला.

पण शक्तीला चिडवायला कायमच जतीनला मजा येत असायची...

"बिकॉज देअर इज नथिंग इजी गेटिंग इन थिस वर्ल्ड् माय बॉय!" शक्तीला खिजवण्यासाठी जतीन मस्करीत बोलला.

शक्ती रायफल मांडीवर घेऊन जतीन काय बोलतोय ते ऐकत होता...

"म्हणजे रुलिंग पार्टीवरील संशय बळावतोय. कारण केंद्र आणि महाराष्ट्र दोन्हीकडे 'लोककल्याण'चीच सत्ता आहे!" शक्ती जतीनच्या मस्करीकडे लक्ष न देता विचार करत म्हणाला.

"हो!" जतीनने शक्तीचा तर्क कदाचित योग्य असेल असा शिक्कामोर्तब केला.

"मी तुला बिल पण पाठवलं आहे. तेवढं पे कर! इन टूडेज् वर्ल्ड्, इन्फॉर्मेशन इज मनी! दुसरं थ्रीडी प्रिंटर बाळगणं खर्चिक आहे. सो पे मी वेल!" चिप्स चावत जतीन म्हणाला.

"बघू!" शक्ती पलिकडून म्हणाला.

"आणखी एक! ही रायफल बनवणाऱ्या 'बॅरेट फायरआर्म्स मॅन्यूफॅक्स्चरिंग' कंपनीचा डाटाबेस मी चेक केला आहे. पण इल्लीगल ट्रेडिंग दिसत नाही."

"याचा अर्थ ज्या देशांना या रायफल्स् विकल्या आहेत त्यांनी ही गोष्ट घडवून आणण्याची शक्यता देखील आहे. पण एकोणसाठ देशांमधून इन्वेस्टीगेशन नॅरो करणं थोडं कठीण आहे!" शक्ती विचारातच होता.

"मी ते करू शकतो! बट वेगळे चार्जेस पडतील!" जतीन हावरट हसत म्हणाला.

"राहूदे मी बघतो!" शक्तीने फोन कट केला. रायफल पुन्हा केसमध्ये ठेवून दिली.

एवढ्यात शक्तीच्या मोबाईलची मेसेज ट्यून वाजली.

शक्तीने मेसेज बॉक्स उघडून पहिला. त्यात लिहिलं होतं,

'अमेरिका, युक्रेन, न्यूझीलंड, भारत, जर्मनी' आणि त्या खाली बोल्ड अक्षरात लिहिलं गेलं होतं...

'पैशांची वाट बघतोय!'

पैशासंबंधी जतीनची मस्करी आहे हे शक्तीच्या ध्यानात आले. तरी त्याचे काम झाले होते. जतीनच्या मदतीने एकोणसाठ वरून शोध पाच देशावर येऊन थांबला होता...!

त्याने वॉलक्लॉकवर नजर टाकली. घड्याळात आठ झाले होते. शक्ती उठला. त्याला खाण्यापिण्याची काहीच सूद नव्हती. हे काम झाल्याशिवाय तो आता स्वस्थ बसणार नव्हता!

ती रायफल केस उचलून त्याने पाठीला लावली आणि तो घरातून बाहेर पडला...

तो उभा होता त्याच्या जिवलग प्रिय मित्र शौर्यजीत समोर. केस त्याच्या पाठीला होतीच. शौर्यजीत शांत-दैवत झोपला होता. औषधांची गुंगी असावी हे शक्ती समजला. तरी त्याला जागं न करता शक्ती पुटपुटला...

"आता पुन्हा भेटू न भेटू! काळजी घे!"

त्याने खोली सोडली. बाहेर आल्यावर त्याने एक चावी तेथे संरक्षणासाठी असलेल्या गार्ड्ला देऊ केली.

"मिणचे सावर्डेत माझं एक घर आहे. मुल्ला गल्ली. नाईकवाडा! सरांची तिथं व्यवस्था करा. दुसऱ्या कुणाला याबद्दल कळता काम नये! कळलं?"

"होय सर!" गार्ड् म्हणाला.

"गुड! येतो!"

आणि शक्ती जीवघेण्या मिशनवर निघाला...! परतेल, की नाही त्यालाही माहीत नाही...! पण त्याने स्वतः निवडलेला हा मार्ग होता... आता मागे फिरणे नाही!!!

शक्ती घेऊन आलेली कावासाकी 'सिराज नाईट क्लब'ला लागली होती. तो रायफल केस पाठीवर घेऊनच आत शिरला.

एक मोठा सोफा अक्वायर् करून तो बसला होता. दोन्ही हात गोलाकार सोफ्याच्या आर्मरेस्ट वर पसरून पाय समोरच्या टी-पॉयवर त्याने पसरले होते. ती रायफल केस त्याच्या पायांपाशीच टेबलवर पडली होती.

नाईट क्लब खूपच प्रशस्त होता. इथं येणारे लोक श्रीमंत कॅटेगरीतले असणार हे कोणीही ओळखू शकलं असतं.

डिस्को लाईट्स वेगवेगळे रंग टाकत क्लबभर फिरत होत्या. समोर एक अत्यंत सूंदर मुलगी वय साधारण सत्तावीस-अठ्ठावीस, शृंगारीक गाणं म्हणत होती. तिच्या सूंदरतेचं वर्णन करण्यात शब्दही अपुरे पडतील. विश्व-सूंदऱ्यांनाही लाजवेल अशी तिच्या सौंदर्याची मोहिनी होती. भले भले संन्यासी तिच्या सौंदर्याच्या मोहात पडतील यात शंका नव्हती. अंग भरून कपडे असलेली ती, तरी तिचं सौंदर्य लपता लपत नव्हतं...

तिच्याभोवती व ड्रिंक्स घेणाऱ्या पुरुषांच्या आजूबाजूला विशी-तिशी दरम्यानच्या बऱ्याच ललना त्या सूंदर मुलीच्या सूंदर गाण्यावर नाच करत होत्या...

आणि तथाकथित उच्चभ्रू पुरुष त्या मुलींना रिझवण्याचा प्रयास करत होते. सोबत 'सोमरसा'चे ग्लास अन् ग्लास रिचवले जात होतेच. सिगरेट्स, हुक्का यांच्या धुरांचा नंगानाच पण चालू होता...

या वासनांध लोकांना पाहून शक्तीला मोठं हसू आलं... जीवनाला खरी गती न मिळाल्याने यांच्या झालेल्या दुर्गतीवर त्याला कीव वाटत होती...

या लोकांमध्ये काही किशोरवयातली मुले देखील होती... शक्तीला त्यांच्या भविष्याची चिंता वाटली... कारण हेच या मानवजातीचे भविष्य होते आणि तेच असे अंधारमय...

"साहेब काय आणू?" एका सोफेस्टिकेटेड् वेटरने विचारून त्याची तंद्री भंग केली...

"नंतर ऑर्डर देतो!"

"ओके सर. पण इथं बसण्याचे पण चार्जेस लावले जातात." ऑर्डरसाठी उघडलेली हातातील डायरी बंद करत वेटर म्हणाला.

"नो वरी. एक महत्त्वाची मिटिंग आहे. तसाही वेळ लागणार आहे!"

"ओके सर!"

तो वेटर निघून गेला.

क्लब बाहेर एक पॉश कन्वर्टीबल गाडी 'बीएमडब्ल्यू झी4' येऊन लागली. त्यातून एक व्यक्ती आपल्या गर्लफ्रेंड सोबत उतरला. तो क्लबच्या दिशेने चालत येत असतानाच त्याची नजर प्रवेशद्वारासमोर उभ्या काळ्या रंगाच्या 'कावासाकी निंजा एच 2' वर पडली. जरा पुढं मान करून त्याने गॉगल काढून ती बाईक निरखून पाहिली. काही काळ तो घुटमळला. आणि एक स्मित त्याच्या चेहऱ्यावर तरारलं.

त्याने पुन्हा गॉगल चढवला व आपल्या दोन मैत्रिणींसोबत नाईटक्लबात गेला.

आत आल्या - आल्या त्याची नजर समोरच सोफ्यावर पसरून बसलेल्या शक्तीवर पडली. त्याच्या पायांच्या बाजूला ती रायफल केस होतीच.

आत प्रवेशल्या प्रवेशल्या त्या व्यक्तीने एक नजरभर शक्तीला पाहिलं. शक्ती दरवाज्यावरच नजर लावून होता त्यामुळे साहजिक त्या व्यक्तीची व शक्तीची नजरानजर झाली. आपण त्याच्याकडेच पाहतोय असा शक्तीला संशय येऊ नये म्हणून मग त्या व्यक्तीने सिगार पेटवली. यावेळी क्लबमधलीच एक मुलगी येऊन त्या व्यक्तीला सामील झाली आणि तो सोबतच्या त्या दोन्ही मुलींच्या कमरेत हात घालून त्यांना घेऊन एका टेबलपाशी गेला. ते कोपऱ्यात होतं. पाठीमागून शक्तीला सहज पाहता येणार होतं आणि शक्तीने डावीकडे मान वळवल्याशिवाय तिथलं काही दिसू शकणार नव्हतं. पण ते टेबल फुल होतं. पण जास्त काळ नाही. त्या व्यक्तीने तो टेबल निवडला आहे हे बघताच भारतीय वंशाचा, पण अमेरिकन एक्सेंट असलेला मॅनेजर पळत आला आणि त्याने तिथं बसलेल्या दोन बिझनेसमन टाईप लोकांना उठवलं आणि त्यांना दुसरं टेबल देऊ केलं आणि त्या व्यक्तीला ते टेबल मोकळं करून दिलं.

'बी कंफटेबल सर!' असं तो पुटपुटलेला शक्तीला जाणवलं. गाणं चालू असल्याने त्याला तिथलं संभाषण ऐकू येणार नव्हतं. म्हणून त्याला इन्स्टिक्टवरच अवलंबून राहवलं लागणार होतं.

त्या व्यक्तीने स्वतःला त्या टेबल लगतच्या सोफ्यावर झोकून दिलं आणि दोन्ही सूंदऱ्या त्याच्या दोन्ही बाजूला विसावल्या. वेटर धावत ऑर्डर घेण्यासाठी सज्ज झाला होताच. ती व्यक्ती त्याला ऑर्डर देऊ लागली...

दरम्यान मॅनेजर उठवलेल्या दोघांची माफी मागत दुसऱ्या टेबलकडे घेऊन गेला होता... शक्ती पण मग गाणं गाणाऱ्या मुलीकडे पाहून गाण्याचा आनंद घेऊ लागला!

परंतु काही मिनिटांतच तेथील सगळ्यांचा रसभंग झाला. एक अति उत्साही युवक त्या गाणाऱ्या मुलीकडे गेला आणि तिच्याशी असभ्य वर्तन करू लागला. तिच्याशी शारीरिक लगट करण्याचा प्रयत्न करत समोर नाचू लागला. हे स्पष्ट होतं, की त्या मुलीला ते रुचत नव्हतं. पण तरी ती दुर्लक्ष करून गाण्याचा प्रयत्न करत होती... मॅजेनर दुरून पाहत होता. कदाचित हस्तक्षेप करण्याची त्याच्यात हिंमत नसावी...

पण एक क्षणाला शक्तीलाच ते असह्य झालं. आणि तो त्या स्टेजकडे चालू लागला. त्याने त्या अश्लील वर्तन करणाऱ्या त्या मुलाला हाताला धरून अडवलं.

पण त्याची ही कृती त्या मुलाला राग देऊन गेली. त्या मुलाने पॅन्टला खोवलेली आपली पिस्टल खेचली. पण शक्तीसमोर तो बच्चा होता! शक्तीचा हात त्याच्या अंगावर कधी पडला आणि कधी त्याची पिस्टल त्याच्या हातून शक्तीच्या हाती गेली हे त्याला कळालंच नाही. शक्तीने त्याला डान्स फ्लोअर दाखवला! तो खूप जोरात आपटला होता, काही क्षण त्याला आपण नक्की कुठे तेच समजलं नव्हतं.

एवढं पाहून देखील त्या मुलाचे मित्र काही समजले नाहीत. ते उठून शक्तीच्या दिशेने धावले.

शक्तीने त्यांच्या पायात फ्लोअरवर फायर केलं. 'पुढे येऊ नका!' हे सांगणारा तो संकेत होता.

आपण यौवनाला शहणपणाच्या गोष्टी समजत नाहीत! त्याला मुक्त जंगली गव्याप्रमाणे सत्-असत् न जाणता उधळायचे असते! मस्तवाल हत्तीसारखं सगळं कुचलायचं असतं...

त्या तरुणांनीही तीच चूक केली आणि शक्तीवर हल्ला केला. पण त्यांचा जोर शक्तीवर चालला नाही!

दुसऱ्याच क्षणी चारही जण त्यांच्या मित्राप्रमाणे जमीन चाटत होते. आता मात्र मॅनेजर पुढं झाला. या रोजच्या गिऱ्हाईकांना हटकण्यापेक्षा या नवीन माणसाला रोखणं त्याला जास्त सोपं वाटलं असावं. पण त्याच्या याच वागण्यावर शक्तीला राग आला. खिशातून नोटांचं बंडल काढून त्याने त्या मॅनेजरच्या छतीवर दाबलं. जणू झालेल्या नुकसानाची भरपाईच नाही, तर तो त्या सूंदर मुलीची किंमत देखील त्याला वळती करत होता.

"जर हिचं रक्षण करू शकत नाही, तर हिच्याकडून सर्व्हिस करून घेण्याचा देखील तुम्हाला अधिकार नाही!" शक्ती रागाने म्हणाला.

आणि तिला हाताला धरून खेचत तो त्या सोफ्यापाशी गेला जिथं तो पूर्वी बसला होता. रायफल केस त्याने उचलली आणि तो त्या मुलीला खेचतच बाहेर घेऊन गेला!

हे पाहत असताना एक अनामिक स्मित त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर उमटलं. आतापर्यंत तो मोठ्या उत्सुकतेने पुढची घटना पाहत बसला होता. वेळोवेळी सर्व्ह केलेलं ड्रिंक घेत होता...

बाहेर, शक्ती कावासाकीवर राईड झाला. आणि तो त्या मुलीने मागे बसण्याची वाट पाहू लागला. तीही काही पर्याय नाही पाहून नाईलाजाने बसली. कावासाकी त्या रोडवर धावू लागली...

शक्ती तिला घेऊन एका थ्री-स्टार हॉटेलला घेऊन आला. काऊंटरवर सोमेश राजमानेचं आधार दाखवून, त्याच्याच फेक क्रेडिट कार्डने पेमेंट करून एक रूम बुक केली.

"आपलं लगेज सर?" रिसेप्शनिस्टने विचारलं.

"नाही!" तो रुक्ष म्हणाला.

"गुड नाईट सर!" सूंदर रिसेप्शनिस्ट तितकंच सूंदर स्मित करत म्हणाली.

पण शक्तीने दुर्लक्ष करत, "थँक्स!" म्हंटलं. आणि रिसेप्शनिस्टने दिलेल्या रूममध्ये त्या मुलीला नेण्यासाठी तो तिला हाताला धरून लिफ्टची दिशेने घेऊन गेला.

लिफ्टकडे जात असतानाच एक बेलबॉय शक्तीच्या जवळ आला. त्याच्याकडून ती रायफलची केस घेऊ लागला.

"नो इट्स ऑलराईट!" शक्ती त्याला म्हणाला.

तसा तो बेलबॉय मागे सरकला.

"सॉरी सर!"

"डोन्ट बी. फक्त काही फ्रेश टॉवेल्स, डबल एक्सेल साईझ जर्किन आणि ट्रॅकपॅन्ट रूम सव्वीसला पाठवा. आणि हो! एक मेड मॅडमसाठी पाठवून द्या. मॅडमना काय हवंय ते त्या तिला सांगतील. ओके?" शक्ती त्याला पाकिटातून पैसे काढून देत म्हणाला.

"ओ... ओके सर!" बेलबॉय शक्तीने सांगितलेल्या कामाला पळाला.

शक्तीने रूम उघडली. त्याने त्या मुलीला आत जाण्यास फोर्स केलं आणि मागून रूममध्ये एंटर होऊन त्याने रूम लॉक करून घेतली.

"मला वाटलं तू मला तुझ्या घरी घेऊन जाशील..." ती मुलगी चेहरा स्ट्रेट ठेऊन म्हणाली.

कदाचित तिला शक्तीच्या हेतूवर शंका आली असावी...

"तुला असं का वाटतंय की मी याच शहरात राहतो?" शक्तीने देखील चेहरा सरळ ठेऊन विचारलं.

"म्हणजे नाही रहात का?" तिने विचारलं.

"नाही! फ्रेश हो काही खायचं असेल तर ऑर्डर कर आणि झोपून जा!" तो तिला म्हणाला आणि त्याने ती रायफल वॉर्डरोबमध्ये ठेऊन दिली.

"मला का वाचवलंस?" तिने रूक्षपणे विचारलं.

"का? वाचवायला नको होतं?" त्याने तिच्याकडे वळत विचारलं.

"हं!" ती आपल्या दुर्दैवावरच हसली,

"हे तर रोजचं आहे! काय इथून पुढं रोज वाचवायला येणार आहेस?"

"आता तुला ते काम करण्याची गरज नाही!"

"आणि मग करू काय?"

शक्ती गप्पच राहीला.

"उत्तर नाही ना? मग ज्या सल्ल्यांचं समाधान देऊ शकत नाही असे सल्ले पण देऊ नयेत!" ती थोडं कठोरच बोलली.

आणि जायला तिने दार उघडलं. शक्ती विजेच्या गतीने पुढं झाला आणि त्याने दार लावले आणि तो दाराला सटून उभारला.

"तू कुठंही जायचं नाहीस!" तो तिला बजावत म्हणाला.

"क्लबच्या मॅनेजरला काही पैसे दिले, तर असे समजू नका की तुम्ही मला खरेदी केलं आहे!" ती आवाजात अजूनच कठोरता आणत म्हणाली.

"स्त्रीवर तिच्या इच्छेविना कोण अधिकार गाजवू शकतो? आणि मला तशी अपेक्षाही नाही!" तो म्हणाला,

"मला फक्त तुला मदत करायची आहे..."

हे ऐकून ती मुलगी मागं झाली... एका खुर्चीत अक्षरशः पडली. अचानकच तिला रडू कोसळलं. पण ते दाबून ती फक्त आसवं गाळू लागली. आवाज दाबता येतो... डोळ्यांतून स्रवणारं पाणी कसं अडवणार...

तिची अवस्था पाहून शक्ती देखील गंभीर झाला. तो बेडवर बसला. तिच्याकडे बघत... डोळ्यांत तिच्याविषयी अत्यंत करुणा...

"नांव काय तुझं?" तिला सावरण्यासाठी वेळ देऊन त्यानं तिला विचारलं.

"नम्या..." ती पुटपुटल्या सारखी बोलली.

"आदरणीय!" शक्तीच्या तोंडून तिच्या नांवाचा अर्थ बाहेर पडला.

जिच्या नांवाचाच अर्थ 'सन्मानास पात्र' असा होतो, तरीही तिची ही अवस्था पाहून शक्तीला हळहळल्यासारखं झालं.

'तिच्या सद्यपरिस्थितीला तिचं नांव किती विरोधाभासी आहे'... असं क्षणभरासाठी शक्तीच्या मनात येऊन गेलं...

काहीवेळ ते काहीच न बोलता आहे तिथंच, आहे त्याच अवस्थेत थांबून होते. आणि बेलने खोलीतील शांतता भंग केली.

शक्तीने दार उघडलं. दारावर कोणी आहे हे लक्षात घेऊन दाराकडे न बघताच नम्या सावरून बसली. अश्रू पुसून घेतले.

दारावर बेलबॉय होता. टॉवेल्स आणि शक्तीने सांगितलेली कपडे तो घेऊन आला होता. ती त्याने शक्तीच्या हातात ठेवली.

"मेड थोड्यावेळात येईल." बेलबॉय म्हणाला.

"थँक्स!" शक्तीने कृतज्ञता व्यक्त केली.

बेलबॉय स्माईल करून निघून गेला. शक्तीने दार बंद केलं. त्याने नम्यावर नजर टाकली. त्याने टॉवेल्स व कपडे गादीवर टाकले आणि तो बसून राहिला.

ती सावरून बसली असली तरी ती तिच्या दुःखी विचारातून बाहेर आली नव्हती ते त्याने ताडलं. असह्य होऊन तो उठला. त्याने त्याचा ब्लेझर वॉर्डरोबला अडकवलं. हालचाल झाल्याने स्वाभाविक नम्याची मान शक्तीकडे वळली होती.

शक्तीच्या शोल्डर होलस्टरला दोन्ही बाजूला अडकवलेल्या त्याच्या मॉन्स्टर गन्स नम्या पाहत होती. त्या गन्स झाकण्यासाठी शक्तीने अंगात जर्किन चढवलं.

"प्लिज कुठं जाऊ नको!" तो नम्याला म्हणाला.

आणि दरवाजा बाहेरून लावून घेऊन तो खाली गेला.

"माझ्या रूममध्ये काही चांगलंस खायला पाठवा!" रिसेप्शनिस्टला सांगून शक्ती हॉटेल बाहेर पडला...

त्याने एका लोकल दुकानातून वडापाव घेतला. प्यायला एक जलजीराची 200 मिलीची छोटी बाटलीही विकत घेतली. टाईमपाससाठी काही तरी हवं होतं.

शक्तीच्या हॉटेल रूमबाहेर एक मेड उभी होती. तिनं नॉक केलं,

"रूम सर्व्हिस!" ती म्हणाली.

आतून काहीच उत्तर नाही!

"रूम सर्व्हिस!" अजून मोठ्या आवाजात ती बोलली.

पुन्हा उत्तर नाही. मग काहीवेळ दरवाजा उघडण्याची वाट बघून ती निघून गेली...

खाण्याचं पॅकेज घेऊन शक्ती एका उद्यानात गेला. रात्र झाल्याने ते बंद होतं. उडी मारून त्याने भिंत पार केली होती. मोबाईल काढून त्याने सीसीटीव्ही एप चालू केलं. त्याच्या हॉटेलरूम मधील चित्र त्याला मोबाईल स्क्रिनवर दिसू लागलं... त्याने अडकवलेल्या ब्लेझरमध्ये तो मायक्रो कॅमेरा माऊंट केला होता... वॉर्डरोब बेडच्या उजव्या बाजूला अगदी समोर असल्याने त्याला सगळा व्ह्यू क्लिअर मिळत होता.

वडापाव व जलजीराचा आस्वाद घेत तो रूम मधील हालचालींवर लक्ष ठेवून बसला.

मोबाईलमध्ये त्याला नम्या बेडवर निजलेली दिसत होती. म्हणून मग त्याने थोडावेळ मोबाईल बाजूला केला. त्याने मानेवर लटकत असलेला कॉड मोबाईलशी कनेक्ट केला आणि त्याचे दोन्ही इयरबड्स कानात घातले. ज्यायोगे तिथं काय घडलं, तर ते त्याला ऐकू येत रहावं.

आणि हाती असलेलं त्याचं खाणं तो खाऊ लागला... मिशन पूर्ण होईपर्यंत डायट बियट सगळं तो विसरणार होता...

वडापाव खात असतानाच त्याला काही आवाज ऐकू आल्यासारखं झालं. संभवत: वॉर्डरोब उघडला गेला होता. त्याने कान टवकारले. मांडीवर उपडा ठेवलेला मोबाईल उचलून पाहिलं. त्याची शंका खरी ठरली. कारण कॅमेरा मिस्प्लेस झाला होता. वॉर्डरोब उघडल्याशिवाय किंवा ब्लेझरला हॅट लावल्याशिवाय ब्लेझर हलणं शक्य नव्हतं! शक्ती काळजीपूर्वक पाहत होता.

नम्या हॉटेलच्या लँडलाईनवरून बोलत होती...

"हो मी सेफ आहे! नाही त्याने मला हातही लावला नाही." तिला फोनवर बोलताना शक्ती त्याच्या मोबाईलमध्ये पाहत होता.

पण ती कॅमेऱ्याच्या मध्य टप्प्यात नसल्याने तिची छवी अर्धीमुर्धी दिसत होती. शक्ती निरखून पाहत होता व त्याहीपेक्षा लक्षपूर्वक ऐकत होता... सोबत घेतलेला वडापाव आणि जलजीरा संपवणं चालूच होतं.

"माझं ऐकणार आहेस का? तू मोबाईलमध्ये दाखवली होतीस तशीच रायफल यांच्याकडे आहे! हो काही चूक नाही!"

"काय? गन? नो! डॅनियल तुला माहीत आहे मला तसलं काही बाळगायला आवडत नाही. एक तर हे सुद्धा मी तुझ्या आग्रहासाठी करते आहे!" पलिकडून जे बोललं जाईल त्याला प्रत्युत्तरादाखल ती बोलत होती...

"ठीक आहे! सेफ्टीसाठी मी ठेवून घेईन. पण वापरणार नाही! हिमांशूला पाठवून दे." थोडं थांबून ती वैतागाने म्हणाली होती आणि तिने रिसिव्हर डायलपॅडवर ठेवला.

शक्तीला संताप येण्याऐवजी तो हसला. त्याचा कसला तरी अंदाज खरा ठरला होता...

त्यानं खाणं संपवून पॅकेजेस् कचरापेटीत टाकून दिली. प्लास्टिकसाठी असलेल्या वेगळ्या भांड्यात जलजीऱ्याची बाटलीही टाकली आणि तो आला तसा भिंतीवरून उडी टाकून उद्यानाच्या बाहेर पडला.

तिकडे हॉटेलमध्ये हिमांशू नांवाचा इसम शक्तीच्या रूमचा दरवाजा ठोठावत होता. नम्याने लगबगीने येऊन दार उघडलं. आणि आधी डावीकडे उजवीकडे पाहून शक्ती आसपास नसल्याची खात्री करून घेतली आणि तिने हिमांशूकडे पाहिलं.

हिमांशूने लपवून एक पिस्टल तिला हँडओव्हर केली.

"डॅनियलने त्या माणसाकडून होता होईल तेवढी माहिती मिळवण्याला सांगितली आहे. इंटेलिजन्सला काय समजलंय यावरून पुढील खेळी ठरवायची आहे."

"म्हणून याला जिवंत ठेवलंय?"

"हो! रादर सगळ्यांनाच!"

"ओके! निघ! तो आला आणि तुला बघितलं तर प्रॉब्लेम होईल!"

"जातो, पण लक्षात ठेव! त्याने मिसबिहेव्ह करायचा प्रयत्न केला तर हीचा उपयोग करायला घाबरू नको! डॅनियल सांभाळून घेईल!" त्याने सूचना केली.

"हं!" ती नाराजीने हुंकारली.

तसा तो घाईने पण सावधानतेने निघून गेला.

रात्री खूप वेळभर बाहेर घुटमळून मध्यरात्री तो आपल्या हॉटेलला पोहोचला. आपल्याकडील किल्लीने त्याने नकळत दार उघडलं. आणि आत आला. समोर पाहतो, तर नम्या शांत झोपली होती.

तो बेडला वळून तिच्यासमोरील सेटीवर बसला. झोपेत ती साक्षात सौंदर्यमूर्ती असणारी ती ललना अधिकच निरागस दिसत होती...

पण हिच्या या निरागसतेमध्ये शक्ती अडकणार नव्हता. नाही तर त्याने आधीपासूनच दक्षता बाळगली नसती. त्याने त्याच्या होलस्टरमध्ये अडकवलेली केल-टेक बाहेर खेचली! ती तिच्यावर एम केली. एक डोळा झाकून घेतला. बोट ट्रिगरवर दाब चढवू लागलं आणि एका पॉईंटला...

त्याने बोट रिलीज केलं. ट्रिगरवरचा दाब हटला होता. झटक्याने ट्रिगर पूर्ववत झालं होतं. गोळी सुटली नव्हती! तिला त्याला असंच मारावसं वाटलं नाही.

हिमांशू नांवाचा व्यक्ती नम्याला गन देऊन जाणार होता हे शक्तीने ऐकले होते.

तो जाग्यावरून उठला. त्याने गनसाठी सर्च केलं. तिने सेफ्टीसाठी गन घेतली होती याचा अर्थ तिने ती जवळच ठेवली असणार या तर्काने त्याने ती विसावलेल्या बेडवरच गनसाठी शोधाशोध केली.

तिने गन गादी खाली ठेवणं शक्य नव्हतं. शक्तीने काही गैरवर्तन केलं तर ती हाताशी असावी म्हणून ती अगदीच जवळ ठेवेल. पण मग नक्की कुठं?

शक्तीला जास्त विचार करायला लागला नाही, की शोधावंही लागलं नाही! त्याच्या अपेक्षेप्रमाणे तिने गन उशाला उशीखाली घेतली होती.

शक्तीने काळजीपूर्वक ती आपल्या ताब्यात घेतली आणि तो पूर्वीच्या जाग्यावर आता नम्याच्या गनने तिच्यावर नेम लावून तो बसून राहिला...

नम्याने डोळे उघडले. समोरचं चित्र स्पष्ट व्हायला तिला वेळ लागला. पण जसं ते स्पष्ट झालं; तसं तिला दिसलं, की शक्ती तिच्यावरच गन पॉईंट करून बसला आहे. ती सावध झाली. गडबडीने तिचा हात तिच्या उशाखाली गेला. तिथं काही नव्हतं. ती वेड्यासारखी इतस्थत: तिची गन शोधू लागली. बेडशीट व पांघरूण तिनं अक्षरशः विस्कटलं होतं.

तिची धडपड काही काळ शक्तीने मजा घेत पाहिली आणि...

"ए जरा डोळं उघड! ही तुझीच आहे!" शक्ती इरिटेटेड् चेहऱ्याने म्हणाला,

"आता सांगा आपण इथं का आलात?" शक्तीने गन वर करून थेट तिच्या कपाळावर नेम धरत विचारलं.

ती गप्प होती...

"कुणी पाठवलंय?" त्याने विचारलं.

ती गप्पच राहिली.

"हा डॅनियल कोण आहे?"

ती गप्पच!

"आणि तो हिमांशू?"

ती पुन्हा शांतच... मरणाची भीती मात्र तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती, ती अधिक अधिक गडद होत चालली होती...

"चला! जर तुझा उपयोगच काही होणार नसेल, तर तुला जिवंत ठेवून तरी काय उपयोग?" त्याने स्वतःची केल-टेक काढून त्याला कंप्रेसर लावायला सुरवात केली.

शक्तीचं हे वाक्य ऐकून तर तिच्या चेहऱ्यावरची भीतीची छटा अधिकच गडद झाली.

"मला तुला मारायचं नव्हतं!" ती चाचरत म्हणाली.

"माहीत आहे. पुढं बोल!"

"त्यांनी मला हे करण्यासाठी फोर्स केलं!"

"हे पटत नाही. पुढं!"

"मी खरं सांगते! डॅनियल; तो काही माझा बॉयफ्रेंड नाही..."

"मग?"

"त्याने मला खरेदी केलं आहे!" ती डोळ्यांत आसवं घेऊन ओरडली! कडांना साचलेलं पाणी गालावर ओघळलं...

"माझ्या सुरक्षेची त्याला काही पडलेली नाही. तो माझी काळजी घेतोय कारण तो मला त्याची प्रॉपर्टी समजतोय!" ती चिडून म्हणाली.

हे ऐकून शक्तीला धक्का बसला! त्याने गन बाजूला केली. रिसिव्हर उचलला.

"ऑरेंज ज्यूस रूमवर पाठवून द्या!"

काहीवेळातच दोघे डायनिंग टेबलपाशी होते. रूम सर्व्हीसबॉयने आणून दिलेल्या ज्यूसच्या व्हेसल मधून शक्ती नम्यासाठी आणि स्वतःसाठी ग्लास भरून घेताना नम्याला ऐकत होता...

"माझ्या लहानपणीच माझे आई-वडील वारले. मी ज्या अनाथाश्रमात रहात होती, त्या अनाथाश्रमाच्या सुपरवायझर कदाचित मी सोळा वर्षांची होण्याचीच वाट पहात होती. जशी मी

सोळा वर्षांची झाले, तिने मला एका वेश्येच्या हाती विकले..." बोलताना तिच्या डोळ्यांतून अश्रू घरंगळले.

पण तिची पापणी देखील लवली नाही. ती खोल कुठं तरी शून्यात बघत होती...

शक्तीने ज्यूसचा ग्लास तिच्या समोर धरला. तो घेण्याची सूद तिला नव्हती. म्हणून त्याने तो तिच्या समोर ठेवला.

मागील खिशात पाकीट असल्याने असेच बसता येणार नाही म्हणून त्याने ते काढून डायनिंग टेबलवर टाकले. त्यांतील वस्तूंनी पाकीट जाडजूड झाल्याने ते टेबलवर पडल्यावर उघडले गेले. त्यात एका चार-पाच वर्षांच्या मुलीचा पासपोर्ट साईझ पोटो होता. त्या फोटोवर नम्याची नजर पडली. तिने रुक्ष डोळ्यांनी काही क्षण तो फोटो एकटक पाहिला.

"हा डॅनियल कोण आहे आणि तुझी व त्याची ओळख कशी झाली?" शक्तीने तिची तंद्री भंग केली.

भानावर येत नम्याने शक्तीकडे पाहिलं.

"त्या वेश्येने मला तिच्याकडे ठेवून घेतलं. जायला दुसरी जागा नव्हती. बाहेर पडलं तरी जगाच्या वासनेपासून आपण वाचणार नाही याची जाणीव त्या कोवळ्या वयात झाली होती. म्हणून मग मी ते प्राक्तन स्वीकारलं..." ती शक्तीकडे बघून म्हणाली. तिचं बोलणं चालूच होतं...

"आठ-दहा वर्षे तिथं राहिले. या दरम्यान माझ्यासाठी ती अक्का झाली होती... अक्कानंच या काळात मला गाणं नाचणं शिकवलं. याच काळात तिच्या येणाऱ्या गिऱ्हाईकांना..."

शक्तीने तिला पुढं बोलू दिल नाही. तिचा हात घट्ट दाबून त्याने तिला गप्प केलं.

ती जे सांगते आहे ते खरं आहे, की खोटं हे त्याला माहित नव्हतं! पण जरी ही कल्पना असली तरी ही भयाण कल्पना त्याला ऐकायची नव्हती.

आणि जर खरंच वास्तव असेल, तर हे सत्य वदनं तिच्यासाठी किती कठीण असेल हे तो समजून होता. त्याने तिला वाक्य पूर्ण करू दिल नाही. नम्याचा दाटून आलेला कंठ शक्तीने जाणला होता.

"वर्षभरापूर्वी हा हिमांशू डॅनियलला आमच्याकडे घेऊन आला होता. त्याला मी आवडले. त्याने अक्काकडे माझी मागणी केली. तिने मला त्याला सुपूर्द करण्यास नकार दिला. सोपवणार तर कशी होती ती, मी तिच्यासाठी सोन्याची अंडी देणारी...

"मग डॅनियलने तिला खूप मोठी अमाऊंट ऑफर केली. आधीच लोभी असणारी ती, ती ऑफर नाकारू शकली नाही..."

काही वेळाने स्वतःला सावरून एक दीर्घ श्वास तिने घेतला. अश्रूंनी बारीक झालेले डोळे तिने मोठे केले. यामुळे तिच्या कपाळावर आठ्या तयार झाल्या.

शक्ती हे ऐकताना सुन्न होता. त्याला नम्या सारखंच आपलं दुःख सांगून रिकामं होण्याचा मोह देखील झाला. पण काही क्षणच. कारण लगेचच  त्याने तो आवरला होता!

"घे, ज्यूस घे!" तो तिला म्हणाला.

नम्याने ज्यूसचा ग्लास उचलला. तिने ज्यूसचा एक सीप घेतला. तिची नजर पुन्हा वॉलेट मधल्या त्या मुलीच्या फोटोवर गेला.

"ही मुलगी..." तिने वाक्य पूर्ण न करताच विचारलं. आणि ते करण्याची नम्याला गरजही वाटली नव्हती. एव्हढ्यावरूनच शक्ती काय ते समजणार होता.

"माझी मुलगी! रेवा!"

"कुठे असते?"

"मेलीये! माझ्या एका रायव्हलने माझ्या बायकोला आणि माझ्या मुलीला संपवलं!" तो जराही विचलित न होता जूसचा घोट घेत निर्विकार म्हणाला.

"तुला जराही पश्चाताप वाटत नाही?" नम्या मात्र विचलित झाली होती!

"हं! रिग्रेट? अजिबात नाही! कामात हे कॉम्प्लिमेंट्री आहे! कामाचाच भाग! आमच्या कामात भिला; तो संपला! ज्याने माझ्या कुटुंबाला संपवलं; मी त्याचा समूळ वंशनाश केलाय!" शक्ती भावनाशून्यतेने म्हणाला.

जणू त्याच्यासाठी माणसं मारणं हे चिलटं चिरडल्यासारखं असावं... आणि त्याचा हाच भाव नम्याच्या शरीरातील प्रत्येक अणूमध्ये कातर भरून गेला...

"तुला सत्य जाणून घ्यायचं आहे ना?" तिने आपली भीती लपवण्याचा प्रयत्न करत स्वतःला शांत दाखवत शक्तीच्या डोळ्यांत रोखत विचारलं.

शक्तीने फक्त मान हलवली.

"इंद्रदत्त वाचस्पती यांना का मारलं हे मला माहित नाही. पण डॅनियलचा या मागे हात होता हे नक्की आहे. त्याने हे स्वतः केलं, की कोणाच्या सांगण्यावरून हे पण मला माहित नाही!" तिने मुद्दाच निकालात काढला.

"माझ्याबद्दल काय काय माहीत आहे त्याला?" शक्तीने ज्यूस पितच विचारणा केली.

"विशेष काही नाही. तो तुला टेस्ट करत होता."

"म्हणजे मी नक्की कोण ते त्याला माहित नाही?"

"नाही पण त्याला संशय आहे, की तू पोलिसांसोबत आहेस!"

शक्ती खुदकला.

"आणि म्हणून माझी माहिती काढायला त्यानं तुला माझ्याकडे पाठवलं?" शक्तीने हसत विचारलं.

नम्याने क्लुलेस मान हलवली.

"तू पोलीस आहेस?" तिने शक्तीच्या नजरेला नजर देत विचारलं.

"नाही!" चेहऱ्यावर हास्य घेऊन शक्ती तिला म्हणाला.

"मग तू यांच्या मागे का लागला आहेस?"

"मी कोणाच्याही खूनाचा तपास करत नाही! इन्फॅक्ट वाचस्पतीच्या मारेकऱ्याला कळंबा जेल बाहेर मीच संपवलं आहे!" शक्तीने खोटा बॉम्ब फेकला.

पण तो फुटला बरोबर!

"तू?" नम्याने आश्चर्यकारक उदगार काढले!

"हो!"

"मग डॅनियलला हे कसं माहीत नाही?"

"कारण मला एसपी सुशेन मित्रने अपॉईंट केलं होतं. डॅनियलने ही जबाबदारी त्याच्यावर सोपवली होती. मी जॉब डॅनियलचाच मार्गी लावला, पण आमच्यात इंटरमेडीएट हा सुशेन मित्र होता. मला पैसे, बाईक व रायफल त्यानेच पुरवली होतीत!"

"म्हणजे डॅनियलची तुझ्या बद्दलची शंका..."

"गौण आहे!" शक्तीने तिचं वाक्य पूर्ण केलं. ती कदाचित दुसरा कोणता तरी शब्द वापरली असती, पण अर्थबोध हाच होता!

"मग तू आता डॅनियलच्या मागावर का आला आहेस?"

"मला पर्मनंट जॉब हवा आहे. माझा रेग्युलर इम्प्लॉयर सुशेन तर मेला; आता मी जगणार कसा?"

"तुला डॅनियलचा पत्ता कसा मिळाला?"

"सुशेनने शेवटच्या क्षणी बोलता बोलता मला सांगितलं होतं. की त्याने ज्याच्याकडून जॉब घेतला आहे, तो त्या बार मध्ये येत असतो. म्हणून मी चान्स घ्यावा म्हंटलं. भेटला तर कामाबद्दल बोलता येईल हा विचार!"

"मग सुशेनच्या सांगण्यावरून हॉस्पिटलमध्ये मेला तो?"

"तो मला पकडलेला ऑफिसर होता! मला कधीच पाहिलं नसल्यानं आणि सुशेनच्या इन्फॉर्मेशनवरून डॅनियलच्या माणसांनी मी समजून त्या ऑफिसरला संपवलं! आम्ही दोघं एकाच वॉर्डमध्ये होतो. सुदैवाने मला चेकअपला नेलं होतं, तेव्हा मर्डर अटेंप्ट झाला. म्हणून माझ्या जागी वॉर्ड एकटाच असलेल्या ऑफिसरला मी समजून मारण्यात आलं! मी नक्की कसा दिसतो हे माहीत नसल्याने मारेकऱ्याचा हा गोंधळ झाला होता...

"ही गोष्ट जेव्हा मला समजली तेव्हा मी सुशेनपाशी पोहोचलो. मीच त्याला मारणार होतो. मला पकडला गेल्याने त्याचं नांव बाहेर येईल या भीतीनं त्यानं माझा काटा काढण्याचा निर्णय घेतला होता. आणि डॅनियलला माझी टीप दिली होती. पण मी स्वतःला वाचवलं आणि त्याच्या समोर उभा राहिलो. मला बघून तो इतका घाबरा की स्वतःच आत्महत्या केली! त्याला माहित आहे, आमच्या धंद्यात गद्दारीची सजा; मौत! मग तो सख्खा बाप का असेना!"

"तू डेव्हिल आहेस!" ती शक्तीच्या क्रूरतेवर विषण्ण होत म्हणाली.

"हा!" सोमेश हे छद्मनाम धारण केलेला शक्ती अट्टहास करत हसला व म्हणाला,

"तो तर मी आहेच! आणि जर तुझ्या डॅनियलने मला डबल क्रॉस करण्याचा प्रयत्न केला, तर तोही लवकरच सुशेनला भेटेल; नरकात!"

"तू मला..." तिला वाक्य पूर्ण करण्याचं धाडस झालं नाही...

पण तिचा मतितार्थ समजून शक्ती पुन्हा हसला.

"तू अजून जिवंत नसतीस!"

हे ऐकून तिने सुटकेचा निःश्वास सोडला... पण काय ती खरंच शक्तीच्या कचाट्यातून सुटणार होती...

हे काळच सांगेल...!

## ५. द्वि राक्षस समोरासमोर ( डेव्हिल मिट्स डेव्हिल)...

त्या रात्री शक्ती पुन्हा त्याच नाईटक्लबमध्ये त्याच जागी बसला होता. जशी काही ही जागा आज त्याच्यासाठीच रिक्त ठेवण्यात आली होती. आजही त्याने मिटिंग आहे सांगून ऑर्डर देण्यास टाळाटाळ केली होती! आजही डॅनियल काल सारखाच, पण शक्तीच्या आधी येऊन शक्तीसाठी राखून ठेवलेला सोफ्याच्या डाव्या बाजूला मागे एका कोपऱ्यात त्याच्या अत्यंत सूंदर अशा गर्लफ्रेंड सोबत बसला होता. पण आज ती मुली वेगळी होती.

जशी वेटरने त्या व्यक्ती म्हणजे डॅनियलला ऑर्डर सर्व्ह केली, तसा डॅनियल आपल्या जाग्यावरून उठला. दोन ग्लास उचलून तो शक्तीच्या दिशेने आला. एक ग्लास शक्तीच्या समोर टेबलवर ठेवला व त्याच्या दिशेने सारला.

"आय डोन्ट ड्रिंक!" शक्ती त्याच्याकडे बघत म्हणाला.

"चांगलं करता! मे आय?" डॅनियल म्हणाला.

"ऑफकोर्स! वि आर इन अ फ्री कंट्री!" शक्ती बोलला.

शक्तीने आपले पाय खाली घेतले व तो सावरून बसला.

"डु यु रिअली बिलिव्ह इन दॅट?" डॅनियलने हसून विचारलं.

"डेफिनेट्ली!" शक्ती त्याच्या नजरेला नजर भिडवत म्हणाला.

"हाय! आय एम डॅनियल. डॅनियल गार्सिया!" डॅनियलने आपली ओळख दिली.

"आएम सोमेश राजमाने!" शक्ती मान हलवून म्हणाला.

ड्रिंक पित डॅनियल शक्तीच्या डाव्या हाताला असलेल्या एका हाफ सोफा चेअरवर बसला!

"मी विचारू शकतो? का?" आपल्याच हातातला ग्लास शक्तीकडे उंचावून त्याच ग्लासकडे नजर टाकत डॅनियलने न पिण्याच्या कारणाची शक्तीला पृच्छा केली.

"कारण कामं मार्गी लावायला मला शुद्धीत राहणं आवश्यक आहे!" शक्ती डॅनियलकडे कटाक्ष टाकत म्हणाला.

"पित नाही तर इथं काय करताय?" डॅनियलने मागे सरकून बसत डावा पाय उजव्या पायावर अधांतरी घेत विचारलं.

"एक मिटिंग आहे!" शक्ती म्हणाला.

"कुणासोबत?"

"माहीत नाही!"

"कुणी बोलावलंय?"

"नाही!"

ती व्यक्ती हसली.

"तरी तुम्ही भेटायला आला आहात?"

शक्तीने मग काही न बोलता रायफल केस उघडली. आत 'बॅरेट एम 107' रायफल! खरी!

मागे टेकलेला आणि उजव्या गुडघ्यावर डावा पाय घेऊन मागे रेललेला डॅनियल आश्चर्याने सोफ्याच्या टोकावर झाली.

"तू...?"

"वाचस्पतीच्या खुन्याचा खुनी!"

"पण त्याला तर..."

"ज्याला तुम्ही मारला तो कोणी दुसरा होता."

"आत्ता माझ्याकडून काय हवं आहे?"

"पैसे!"

"पण एसपीने तर या रायफल आणि त्या बाईक सोबत पैसे दिले होते!"

"काम हवंय. त्या कामाचे पैसे मिळतीलच नाही का?" शक्ती कुटील हसला व त्याने डोळा मारला.

शक्तीच्या धिटाईपुढे डॅनियल प्रभावित झाला होता. म्हणजे तसं त्यानं दाखवलं तरी होतं. तो मनसोक्त स्मित करत मागे रेलला.

"काल नेलेल्या मुलीचं काय केलंस?" डॅनियलने विचारलं.

"माझ्याकडे सुरक्षित आहे. आणि आता ती माझ्याकडेच राहील!" शक्ती बेरकी नजर करून म्हणाला. पण त्याच्या या दृष्टीत धमकी नव्हती.

"ऑफकोर्स ऑफकोर्स! कीप हर एज माय फ्रेंड्ली गिफ्ट!" डॅनियल खुश होत चिअर्ससाठी हात उंचावून म्हणाला.

शक्तीने मात्र ग्लास पुढं केला नाही. तो पित नव्हता ना... डॅनियलच्या हे लक्षात आलं. मग त्यानेच शक्तीसाठी ठेवलेला ग्लास डाव्या हाती घेतला आणि आपणच दोन्ही ग्लास एकमेकांना टकरवून चिअर्स केलं!

शक्तीला मात्र त्याला पाहून किळसवाणं वाटत होतं!

एका दमात दोन्ही ग्लास रिचवून डॅनियल उठला. आपल्या खिशातील मोबाईल काढून त्याने शक्तीसमोर टेबलवर ठेवला आणि एग्झिटकडे चालू लागला...

"वॉट आबाऊट थिस गन अँड दि बाईक?" शक्तीने जाणाऱ्या डॅनियलला विचारलं.

"कीप दोज् एज एन अप्रिसिएशन!" डॅनियल मागे न बघताच पुढं चालत बोलला.

त्याची ती मैत्रिण देखील त्याला जॉईन झाली...

क्लबच्या बाहेर, डॅनियलने सोबतच्या मुलीला पैसे देऊ केले.

"टेक अ कॅब!" तो तिला म्हणाला.

आणि तो आपल्या लाल रंगाच्या कन्वर्टीबल 'बीएमडब्ल्यू झी4' कार मध्ये बसून निघाला...

शक्ती बाहेर येऊन त्या गाडीकडे पाहत उभा होता...

त्याने गाडी दूर गेलेली पाहून एक फोन लावला, तो जतीनला!

"डॅनियल गार्सिया नांवाच्या माणसाची कुंडली काढ!" त्याने ऑर्डर सोडली आणि फोन बंद केला.

डॅनियलच्या गाडीत डॅनियल सुद्धा कोणाशीतरी बोलत होता. त्याच्या नेव्हीगेशन स्क्रिनवर हिमांशूचं नांव फ्लॅश होत होतं...

"ऑथेंटीसिटी क्रॉस चेक कर!"

आणि त्याने कॉल हन्ग अप केला!

कोण कुणाच्या प्लॅनमध्ये फसत चाललं होतं... कोण कुणावर कुरघोडी करत होतं... कोण वरचढ ठरणार होतं? शक्ती की डॅनियल?  हे कळायला मार्ग नव्हता...!

शक्तीच्या हॉटेल जवळच थांबलेला हिमांशू त्याच्या कार मधून उतरला आणि हॉटेलकडे चालता झाला!

रिसेप्शनिस्ट जवळ घाईने आला.

"हाऊ कॅन आय हेल्प यु सर?" तिने विचारलं.

"वॉन्ट सम इन्फॉर्मेशन!" तो तिला म्हणला.

"नो सर वी कान्ट शेअर! वि आर् नॉट एबल टू." ती स्मित करत म्हणाली.

"यु विल!" कोटाच्या आत होलस्टरला लटकत असलेली पिस्टल कोट थोडा बाजूला करून दाखवत हिमांशू हसून तिला म्हणाला.

मुळातच क्रूर चेहरा असलेल्या हिमांशूकडे ती गन बघून ती रिसेप्शनिस्ट जणू हिमांशूला संमोहित झाली.

आणि का नाही होणार... मृत्यूपेक्षा मोठं संमोहन दुसरं कोणतं असू शकतं, आणि विरोधाभास म्हणजे ते संमोहन असून सुद्धा हे शाश्वत सत्य आहे, ज्याला कोणालाच सामोरं जावंसं वाटत नाही. मग त्याला ती बिचारी रिसेप्शनिस्ट तरी कशी अपवाद असणार होती?!

"बोला..." ती घाबरत म्हणाली.

मृत्यू समोर बघून तिला मातृभाषा आठवली होती.

"रूम नंबर सव्वीसमध्ये जी व्यक्ती थांबली आहे तिची माहिती!" तोही मराठीत बोलला.

तिने घाबरतच मग होकारार्थी मान हलवली.

"त्याचं नांव काय आहे?"

तिने कॉम्प्युटरमध्ये सर्च केलं.

"स... सोमेश राजमाने!" तिने अडखळत एका झटक्यात सांगून टाकलं.

"काही प्रूफ?" हिमांशूने विचारलं.

"हो. त्यांच्या आधार कार्डचं स्कॅनिंग आहे इथं."

"दुसरं काही?"

"त्यांनी क्रेडिट कार्डने पेमेंट केलं आहे. तेही त्याच नांवाचं आहे!"

"प्रिंट्स दे!"

हिमांशूचा हुकूम पूर्ण होण्याआधीच तिने काय ते समजून त्याची तामिली केली होती. कॉम्प्युटरवर प्रिंटचा ऑप्शन क्लिक केला होता.

कर्... कर्... आवाज करत दोन प्रिंट्स प्रिंटरमधून बाहेर पडल्या. तिने त्या हिमांशूला हँडओव्हर केल्या.

"यांच्याबद्दल कोणालाही कळता कामा नये! नाही तर!"

पुढं काही बोलण्याची हिमांशूला गरज नव्हती. रिसेप्शनिस्ट काय ते समजून चुकली होती. तिने घाबरूनच 'नाही' अशा अर्थाने मान डोलावली आणि अवंढा गिळला.

"गुड!" त्या प्रिंटेड कागदांची घडी करून खिशात कोंबत हिमांशू तिला म्हणाला आणि त्याने हॉटेल सोडले...

बाहेर आल्या आल्या त्याच्या चारचाकीकडे जात त्याने डॅनियलला फोन लावला.

"डॅन, ही इज ऑथेंटिक! नम्याची इन्फॉर्मेशन आणि त्याने सांगितलं सगळं खरं आहे! तो खरंच सुशेनने अपॉईंट केलेला असॅसिन आहे!"

"ओके. बट कीप एन आय! अंडरस्टँड?" दुसऱ्या बाजूने डॅनियलने सूचना केली.

"हो!" हिमांशू गाडीचं दार उघडत म्हणाला.

गाडीत बसून दार जोराने ओढून घेतलं.

शक्ती रंकाळ्यावर उभा होता. त्याला जतीनचा फोन आला. तलावाच्या शांत पाण्याकडे पाहतच शक्तीने कॉल घेतला. तो कोणाचा आहे हे पाहण्याचीही तसदी त्याने घेतली नव्हती. कारण फक्त जतीनचाच फोन येणं त्याला अपेक्षित होतं!

"बोल!" तो मोबाईलमध्ये म्हणाला.

"बहोत ग़लत जा रहा है बॉस तू!" पलिकडून जतीन म्हणाला.

"का काय झालं?"

"डॅनियल हा सरळ माणूस नाही!"

"ते माहीत आहे. मुद्याचं बोल!"

"त्याचा काहीच डेटा नाही. ही इज लाईक ए वॉकिंग घोस्ट!"

"मी पण तर जिवंत मुडदाच आहे!" शक्ती त्याला म्हणाला.

"ही हसण्याची गोष्ट नाही! तू ज्यांच्याशी डील करतोय ते लोक मला बरोबर वाटत नाहीत. कशाचं काही ट्रेस होत नाहीए! ना त्या रायफलचं ओरिजिन समजतंय. ना या डॅनियलचं!" पलिकडून जतीन काळजीने बोलत होता.

"हं!" शक्ती फक्त हुंकारला.

"शेवटी एकच सांगेन, रिटर्न अलाईव्ह... डोन्ट डेअर टू डाय ऑन मी यु बास्टर्ड्!"

"डोन्ट वरी आय विल नॉट!"

"मी तुझी काळजी करत नाही! तू मेलास तर माझे पैसे कोण देणार?"

जतीनने हे मुद्दामच म्हंटलं आहे हे शक्ती जाणून होता. चेहऱ्यावर टेन्शन असून हसू त्याच्या चेहऱ्यावर उमटलं.

"नाही मरणार! मला गरज लागेल तुझी!" शक्तीने कॉल कट केला.

आणि तो अथांग असा रंकाळा बघण्यात गुंग झाला...

त्याला त्याच्या बायकोची गार्गीची आठवण येत होती. नम्याला भेटल्यापासून तो गार्गीच्या आठवणींचा धांडोळा घेत होता, पण त्या आठवणींत सूर मारून त्या ढवळण्याची उसंत त्याला मिळाली नव्हती. म्हणून तो येथे आला होता.

गार्गीसोबत आपल्या किशोरवयात न जाणो किती वेळ त्याने इथं घालवला होता. दोघे किती खुश होते त्यावेळी. भविष्याची कसलीच चिंता नसायची दोघांना. वेळ आणि जग त्यांच्यासाठी विरून गेलेलं असायचं.

शक्तीला पोलिसांत चांगली नोकरी लागली. त्याच्या मेहनतीला यश आलं होतं. दोघांनी घरातल्यांना विश्वस्त घेऊन एकमेकांसोबत राहण्याचं वचन पाळण्यासाठी लग्न देखील केलं होतं...

असं म्हणतात, की लग्नानंतर युगुलाचं प्रेम कमी होतं. कारण प्रियकर प्रियसीचं नवरा बायकोत रूपांतर झालेलं असतं. जे मिळवायचं ते मिळवलेलं असतं म्हणून कदाचित त्या व्यक्तीबद्दल आसक्ती लोपत असावी. पण शक्ती व गार्गी या संभवांना अपवाद होते. दोघे तितकेच एकमेकांना प्रेम देत होते, किंबहुना पूर्वीपेक्षा अधिकच ते एकमेकांच्या प्रेमात होते. दोहों मधला परपसर स्नेहभाव वृद्धीगत झाला होता.

आपल्या किशोरवयीन आठवणींना उजाळा देण्यासाठी दोघे लग्न झालं तरी वेळ काढून अधून मधून इथं यायचे. वेळ घालवायचे...

आणि दहा वर्षांच्या त्यांच्या सुखाच्या संसारात त्यांना ज्या गोष्टीची अपेक्षा होती, ती पूर्णत्वास आली... दहा वर्षांच्या प्रयत्नाने प्रतिक्षेत असलेल्या शक्ती आणि गार्गीच्या संसाररूपी नंदनवनात पारिजात फुलला.

गार्गीने एका गोंडस मुलीला जन्म दिला होता. पारिजात; सर्व इच्छा पूर्ण करणारा कल्पतरू म्हणून त्या मुलीचं 'पारिजात' असं नामाभिधान करण्यात आलं. दुसरं कारण म्हणजे शक्तीला तिला 'परी' म्हणून हाक मारता येणार होती.

त्याने आपल्या मुलीचे लाडाने हेच नांव ठेवले होते...

आपल्या मुलीची आठवण होताच तिला घेण्यासाठी शक्तीचे हात आपसूकच अनावधानाने उंचावले गेले, पण त्याच्या हस्तांना त्याच्या मुलीच्या वास्तवाचा स्पर्श झाला नाही म्हणून त्याची कल्पना भंग पावली! आणि तो भावावर आला!

सारी चित्रं शक्तीच्या डोळ्यांसमोरून धावत होती. त्या चलत्-चित्रांच्याच वेगाने त्याच्या डोळ्यांतून अश्रूबिंदू ओघळत होते...

## ५A. गैर सावज (ऑफ-टार्गेट)...

सोमेश रुपी शक्तीला आणि डॅनियलला भेटून पाच दिवस झाले होते. पण डॅनियलकडून शक्तीला अजून काहीच काम मिळालेलं नव्हतं. ना शक्तीला हवी ती माहिती प्राप्त झाली होती...

दोघे रोज क्लबला भेटत होते. एकत्रच बसत होते... सोबत डॅनियलच्या विश्व-सूंदर सोबतीणी असायचाच... रात्रीच्या वातावरणात तीच भडक लायटिंग... कस्टमर देखील जवळजवळ तेच... डॅनियलच्या समोर टेबलवर तेच स्ट्रिंक... डॅनियलच्या हातात तेच त्याचं एक्सपेन्सिव्ह सिगार... पण समोर गाणारी तरुणी मात्र वेगळी... नाचणाऱ्या मात्र त्याच...

"डॅनियल, काम कधी देणार आहेस?" शक्तीने स्पष्ट विचारलं.

"वाय आर यु इगर तू किल?" हातातील सिगार नाचवत शक्तीला डॅनियलने विचारलं.

"बिक ॉज दॅट इज माय जॉब!" शक्ती त्याला 'बिकॉज' 'दॅट' 'इज' 'माय' 'जॉब' या प्रत्येक शब्दांवर इम्पोज करत ओरडला.

शक्तीच्या बोलण्याचं डॅनियलला हसू आलं,

"बट न ॉट माईन्!" तो समोरील टेबलवरील स्कॉचचा ग्लास उचलत म्हणाला,

"वी आर बिझनेसमन, नॉट अ मर्डरर्स्!" डॅनियलने स्कॉचचा घोट घशाखाली ढकलला.

"देन व्हॉट आबाऊट मी?" शक्तीने रागात विचारलं.

"वी आर फ्रेंड्स नाऊ. विल टेक केअर ऑफ यु!" डॅनियल त्याला म्हणाला.

"मला फुकट खाण्याची सवय नाही!" शक्ती रागाने ओरडला.

"आय कॅन रियलाईझ दॅट! ॲडजस्ट फॉर नाऊ. इट इज अन्सर्टन! बट ट्रस्ट मी, वी हॅव टू डू लॉट्स ऑफ जॉब्स! सो रिलॅक्स फॉर बिट!" डॅनियल शांतपणे शक्तीला आश्वस्त करत म्हणाला.

हे ऐकून शक्तीनं उगाचच झिटलल्यासारखं केलं.

डॅनियल मात्र पुढं चालू असलेलं गाणं, हातातील ड्रिंक व सिगार एन्जॉय करण्यात गुंगला...

काही कारणास्तव तात्पुरते आऊट ऑफ सर्व्हिस असलेल्या उजळाईवाडी एयरपोर्ट, कोल्हापूरला एक मिनी प्रायव्हेट जेट उतरलं. त्यावर कोणत्या तरी बिझनेस ग्रुपचा लोगो होता. पण त्यातून कोणी बिझनेसमन बाहेर पडला नाही. बाहेर पडले ते साठी पार केलेले ब्लू सिल्क फुलस्लिव्ह कोट घातलेले कोणी राजकारणी. पॅन्ट देखील निळ्या रंगाचीच. कोटाच्या आतला शर्ट प्योर् कॉटन. डोळ्यांवर गोल्डन फ्रेमचा चष्मा. अगदी आदर्श राजकारण्याला शोभेल असाच त्या पोलिटीशियनचा पेहराव होता.

बाजूलाच येऊन लागलेल्या एसयूव्ही मध्ये ते बसले. सोबत 'स्पेशल प्रोटेक्शन ग्रुप'चे दोन एजंट्स आणि त्यांच्या कमरेला बेल्जियम कंपनी 'एफएन हर्स्टल्' निर्मित 'फाईव्ह-सेवन' सेमी ऑटोमॅटिक पिस्टल्स!

माननीय पंतप्रधानांनी आपण ओळखलं जाऊ नये म्हणून कितीही दक्षता ठेवली असली, तरी त्यांच्या कपड्यांवरून आणि सोबत असणाऱ्या त्या सोबतच्या दोन पर्सनेल्समुळे त्याची ओळख लपत नव्हती.

कारण या 'स्पेशल प्रोटेक्शन ग्रुप'चे कामच मुळी भारतीय पंतप्रधानाचं संरक्षण करणं असतं!

कोणतेही कार्य पार पाडत असताना आधी आपली झुल उतरवून ठेवावी लागते, मग ती स्वत्वाची, मीपणाची असो, ज्ञानाची असो, किंवा आणखी कशाची. पण मोह आवरणे देखील कठीण ना... म्हणून आयडेंटिटी लपवण्यासाठी कमी लवाजमा घेऊन कोणत्या तरी बिझनेसमनचं प्रायव्हेट जेट आणणं तर त्यांना सुचलं होतं, पण उंची वस्त्र त्यागणं त्यांना जमलं नव्हतं...

शिवाय त्यांचे एसपीजी स्पेशल एंजट्स साधारण कपड्यांत असले, तरी त्यांच्याकडील पिस्टल्स सुद्धा त्यांच्या खऱ्या ओळखीची ग्वाही देऊन जात होत्या.

त्यांची एसयुव्ही जशी उजळाईवाडी एअरपोर्टमधून बाहेर पडली, तशी तेथे बाहेर नजर लावून बसलेला एम मनुष्य कानातील वायरलेसमध्ये पुटपुटला...

"ही हॅज आराईव्हड्!"

थोड्या पॉज नंतर,

"ओके!" म्हणत त्याची टू-व्हीलर त्या गाडीच्या मागे धावली.

संभवत: त्याला पंतप्रधानांच्या गाडीचा पाठलाग करायचा हुकूम मिळाला असेल... ज्याची तो तामिल करत होता.

काही काळ हा पाठलाग असाच चालू राहिला...

एसयूव्हीमध्ये पंतप्रधान पुनीत चिंतपल्ली यांच्या शेजारी बसलेल्या इसपीजी एजंटचे रिअर व्ह्यू मिररवर लक्ष गेलं. त्याच्या दक्ष असण्याची ती परिणीती होती. कोणीतरी आपला पाठलाग करतंय हे त्याच्या ध्यानी आलं.

"सर, वी हॅव बिन फॉलोव्हिंग!" तो मिरर व्ह्यू पाहतच म्हणाला.

त्याची दृष्टी समोरच्या आरशावर खिळलेली पाहून पीएमनी पण समोरच्या आरशात पाहिलं. एक टू-व्हीलर त्याच्याच मागे लागून येत असल्याचं त्यांनाही जाणवलं.

पण लगेचच ती टू-व्हीलर एका वळणारवर उजव्या बाजूला वळली.

पाठलाग करणाऱ्या त्या व्यक्तीला समजले होते, ती गाडीतील लोकांना त्याचा संशय आला आहे आणि तो असाच पाठलाग करत राहिला, तर त्याला कॅप्चर केलं जाईल!

पाठलाग करत आहे असं वाटणारी बाईक वळलेली पाहून गाडीत मग पीएमसह सगळे रिलॅक्स झाले.

पण अजून ते सुटले नव्हते. वळणार थोडं अंतर आल्यावर पाठलाग करणाऱ्या त्या माणसाने आपलं रिस्टवॉच टोपण उघडल्यासारखं उघडलं. आत एक मायक्रो ड्रोन होता. त्याने तो मोबाईलशी कनेक्ट केला. मोबाईल बाईकला माऊंट केला आणि ड्रोन सुरू करून त्याने तो पीएमच्या गाडीच्या मागे धाडला.

पीएमच्या गाडीचा मार्ग त्याने असा धुंडाळला होता... गाडी मार्गस्थ होईल तसा ड्रोन देखील हवाई मार्गे गाडीच्या मागून जात होता...

ड्रोन लहान असला तरी त्याची सिंगल व फ्लाईंग रेंज खूप जास्त होती... याचा फायदा त्या व्यक्तीला पुरेपूर झाला.

पंतप्रधानांची गाडी एका फाईव्ह स्टार हॉटेलच्या बाहेर थांबली. ती जागा या व्यक्तीने बरोबर हेरली. आणि त्याने ड्रोन परत बोलवून घेतला.

शक्ती त्याच्या हॉटेल रूममध्ये असतानाच मिहीरचा त्याला फोन आला... शक्ती आणि नम्या दुपारचं जेवण घेत होते. मिहीरचं नांव बघून तो बाहेर गेला. रूममध्ये त्याच्यासोबत असलेल्या नम्याला या कॉलबद्दल कळू नये हा त्याचा उद्देश. तो अजूनही तिच्यावर विश्वास ठेवू शकत नव्हता.

'एखादं ध्येय पार पाडत असताना माणसानं दक्षता बाळगणं कधीही चांगलच!' शक्तीही तेच करत होता.

"बोल!" खोलीबाहेर आल्यावर शक्तीने कॉल रिसिव्ह केला.

"पीएम कोल्हापूरमध्ये आलेत! त्यांनी एसपींना भेटायला बोलावलंय. सिक्रेट मिटिंग आहे. पीएम कोल्हापुरात आहेत हे कोणालाच माहीत नाही!" मोबाईलवरून मिहिरने माहिती पुरवली.

"ठीक आहे थँक्यू!" शक्तीने मोबाईल खिशात सारला.

तो खोलीकडे वळला. त्याने ती लॉक करून घेतली. आणि गंतव्याकडे निघाला...

माननीय पंतप्रधान पुनीत चिंतपल्ली यांच्या प्रशस्त अशा रूमवर एसपी सारंग गोखले आणि पंतप्रधान चिंतपल्ली आमने-सामने बसले होते...

"केसची काय प्रोग्रेस?" पीएमनी एसपीला पृच्छा केली.

"चालू आहे सर..." एसपी अडखत म्हणाला.

कारण त्यालाही माहीत होतं, काम कुठंवर चालू आहे...

"वाचस्पतींच्या मारेकऱ्याला मारणारा मारेकरी पण मेला असं ऐकलं आम्ही. इथल्या पूर्व एसपींचा अकस्मात मृत्यू! त्यांनी तर स्वतःला गोळी घालून घेतली असं आम्ही ऐकलं. त्या सगळ्याचं काय झालं?" कठोर स्वरात पीएम जाब विचारत होते.

"भूतपूर्व एसपी सुशेन मित्र हे वाचस्पती यांच्या मारेकऱ्यांना सामील होते असं समोर आलं आहे. त्यांनीच प्रयत्न करून त्या मारेकऱ्याला हॉस्पिटलमध्ये संपवला. 'बोटुलिनम टॉक्सिन' इंजेक्ट करून त्याला मारलं गेलंय. त्याला मारणारा मारेकरी पण तेच इंजेक्शन घेऊन मेलेला सापडला.

"मृत एसपी सुशेन यांची परवानगी असल्याने गार्ड्सनी त्या असॅसिनच्या वॉर्डमध्ये डॉक्टरच्या वेशातील त्या मारेकऱ्याला सोडले होते. पण त्यावेळी कोणालाच माहीत नव्हते, की सुशेन गुन्हेगारांना सामील होते. म्हणून गार्ड्सनी सुशेन यांची परवानगी पाहून मारेकऱ्याला वॉर्डमध्ये प्रवेश दिला होता... सुशेन यांच्या आत्महत्येनंतर सगळा प्रकार उघडकीस आला."

"एवढं तुम्हाला समजलंच आहे, तर ते कोण आहेत हे तुम्हाला का कळालेलं नाही अजून? मग ते खरे सूत्रधार अजून सापडले का नाहीत?"

एसपीकडे उत्तर नव्हतं. तो गप्पच राहिला.

तिकडे नम्याचं जेवण झालं, तरी शक्ती रूममध्ये परतला नाही म्हणून तिने बाहेर पाहण्यासाठी दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. तिला दरवाजा बाहेरून लॉक आढळला. शक्ती पुन्हा तिलाच लॉक करून कुठेतरी गेलाय हे तिला समजायला वेळ लागला नाही. तिने तातडीने फोन जवळ केला...

"हॅलो डॅनी! सोमेश मला बंद करून कुठे निघून गेलाय!" तिने शक्तीची माहिती दिली. शक्तीची सत्यता अजूनही तिच्यासमोर आली नव्हती. म्हणून ती अजूनही शक्तीला सोमेशच समजत होती.

"तुमच्या तपासाचं काय झालं? तुम्ही दिलेल्या महितीतवर रॉ ऑपरेट होणार होती. पण तुमच्याकडून काहीच रिपोर्ट डेटा नाही!" इकडे बऱ्याच वेळाच्या शाततेनंतर पीएमनी एसपी सारंगला विचारलं.

"सॉरी सर!" एसपी खजील झाला.

एक तर तो कोल्हापूरात नवीनच अपॉईंट झाला होता. वस्तुस्थिती समजून घेण्याचाही त्याला वेळ मिळाला नव्हता आणि सगळे जण त्यालाच जबाबदार धरत होते म्हणून तो अधिकच वैतागला होता.

"सॉरी हे कांबळीवरच्या ठिगळ्यासारखं आहे!" पंतप्रधान चिंतपल्ली एसपी गोखलेला झापत बोलले,

"ठिगळ्याने कांबळीचं सौंदर्य जसं नष्ट होतं, तसं सॉरी न बिघडलेली नाती किंवा गोष्टी पूर्ववत होत नाहीत!"

ते त्यांच्याच मागे असलेल्या खिडकीकडे चालत गेले. सारंग गोखले पण नम्रपणे उठून उभारला. पीएम बाहेर पाहत थांबले,

"तुम्हाला जरा तरी कल्पना आहे गोखले, की मी कोणत्या परिस्थितीतून जातोय? आधीच ही पंतप्रधानाची गादी म्हणजे काटेरी आसन! त्यात निवडणूकीला एक वर्ष बाकी असताना हे असं! माझ्या बरोबर माझ्या पक्षाची रेप्युटेशन सुद्धा खराब झाली आहे. आणि तुम्ही तातडीने

काम करायचं सोडून माझ्या चिंतेला तुमच्या सॉरीच ठिगळ जोडू पाहताय? आय वॉन्ट रिजल्ट्स एमिडीएट्ली!" पीएमने ऑर्डर सोडली.

"येस... येस सर..." एसपी सारंग गोखले चाचरत म्हणाला.

"या!" मागे न पाहताच पीएमनी सारंगला निघण्यास सांगितले.

सारंग पीएम पुनीत चिंतपल्लीच्या पाठमोऱ्या आकृतीला सल्युट करून रूमबाहेर पडला. पीएम तसेच बाहेर पाहत उभे राहिले...

सारंग गोखलेला आपल्या पोलीस अधीक्षकासाठी असलेल्या सरकारी गाडीतून जाताना पंतप्रधानांच्या मागावर असलेल्या व्यक्तीने पाहिले.

तो हॉटेलच्या समोरील फुटपाथला लागून हॉटेलपासून बराच मागे हॉटेलकडे नजर लावून बसला होता. सारंगला जाताना बघून तो माणूस तडकला. त्याने लगेच डॅनियलला फोन लावला...

"डॅन! हा पीएम एसपीला भेटला आहे! प्रकरणाचा छडा लावल्याशिवाय तो गप्प बसेल असे  वाटत नाही! शुड आय किल हिम? ही इज अलोन नाऊ! ओन्ली टू पर्सनेल्स. बट आय कॅन टेक देम!" एवढं बोलून तो डॅनियलच्या परवानगीची वाट बघू लागला.

"आर यु आऊट ऑफ युअर माईंड? तो कोणी साधारण माणूस आहे का त्याला इतक्या सहज उडवायला यु फुल? आणि त्याला संपवला तर माझा सगळा प्लॅन फसेल! ही हॅस टू लिव्ह ऍट लिस्ट टिल नेक्स्ट इयर! सो बी काम!

"जस्ट कीप अ वॉच! आईल् लेट यु नो, इफ इट इज नेसेसरी!" आपल्या पन्हाळ्याच्या फार्महाऊसवर रूममध्ये बसलेला डॅनियल त्या माणसाच्या आततायीपणावर रागवत, पण वाचा शांत  ठेवत म्हणाला.

"फाईन!" तो माणूस नाराजीनेच डॅनियलचा हुकूम मानत बोलला.

पण त्याला स्वतःला सिद्ध करायचं होतं. आपण काहीतरी करण्यासाठी कॅपेबल आहोत हे त्याला सर्वांना, खास करून डॅनियलला दाखवून द्यायचं होतं. तो त्याच्या बाईकवरून उतरला. पळत रस्ता क्रॉस करून तो हॉटेलच्या बाजूला आला.

कोटाच्या आत असलेली '50 बीएमजी ट्रिपल एक्शन थंडर' हँडगन त्याने कोटाच्या आतून बाहेर काढून. खिडकीतून बाहेर पाहत उभा पीएम त्याच्या बंदुकीच्या टप्प्यात होता. नॉर्मल हँडगन पेक्षा तिप्पट लांबीची (24.21″) आणि सातपट वजनी (7.2 कि.ग्रॅ.) एका सायन्स फिक्शन फिल्ममध्ये शोभेल अशा या हँडगनची एक गोळी पीएम पुनीत चिंतपल्लीच्या शरीराची लख्तरं करण्यासाठी पर्याप्त होती.

ही ब्रीच लोडिंग सिंगल शॉट हँडगनची त्या माणसाने मागील बाजू ओपन करून हँडगनमध्ये 50 बीएमजी गोळी सारून लोड केली. हो तीच गोळी ज्याने वाचस्पतीचा मारेकरी जेल बाहेर उडवलं होता... आणि त्याने गनची मागील बाजू पुन्हा सील केली.

त्याने नेम धरला. ती अजस्त्र हँडगन उंचावून तो भर दिवसा रहदारीच्या ठिकाणी उभा होता. आपण पकडले जाऊ याची त्याला जराही चिंता नव्हती. हे काम त्याला पूर्ण करायचेच होते. माहीत नाही कोणती धुंदी त्याच्या डोक्यावर आणि मनावर स्वार झाली होती... डॅनियलने नको सांगून त्याला काही करून पंतप्रधानाला संपवायचे होते.

त्याचे बोट ट्रिगरवर कसले जात होते. तोच तिथं पोहोचलेला शक्ती त्याच्या चालू कावासाकीला तशीच पाडून त्या माणसाकडे धावला होता. त्याने त्याचा हात बाजूला केला.

फायर झालंच! ट्रिपल एक्शन थंडरच्या  मोठ्या रिकॉईलच्या इम्पॅक्टने दोघे लडखडले. पण दोघांना एकमेकांचा आधार असल्याने ते पडण्यापासून सावरले. पण हा आधार मैत्रीपूर्ण नक्कीच नव्हता. शक्तीने त्याचा हात पकडल्याने त्यांना आधार मिळाला होता. दोघे तडख एकमेकांपासून दूर झाले. त्या माणसाची गन शक्तीच्या हाती आली होती. ती त्याने रिकाम्या डाव्या होलस्टरमध्ये ठेऊन घेतली. आणि  मग त्यांच्यामध्ये फाईट सुरू झाली...!

बंदुकीच्या भल्या मोठ्या आवाजाने आजूबाजूला बघ्यांची गर्दी जमा झाली होती.

वर पंतप्रधान वाचले होते. गोळी त्यांच्या खिडकीच्या वर भिंतीला थडकून भलंमोठं छिद्र पाडून त्यात अडकून राहिली होती. आपल्यावर हल्ला झालाय हे पंतप्रधानांच्या लक्षात आलं आणि त्यांनी झटकन पडदा ओढून घेऊन ते आत गेले.

पंतप्रधान यांच्या रूमबाहेर उभारलेले एजंट्स अशस्त्र आत प्रवेशले. गोळीचा आवाज त्यांनीही ऐकला अवासा. एकाने पीएमला कव्हर केलं आणि एक खिडकीकडे धावला. त्याने पडदा जरा बाजूला करून पाहिलं. बाहेर त्याला कोणी दोघे हातापायी करताना दिसत होते. तो तातडीने आत झाला. तो बाहेर जाण्याच्या प्रयत्नात असताना पीएमनी त्याच्या हाताला धरून त्याला अडवलं व मान हलवून खाली न जाण्यास सुचवलं. तो एजंट मग रिलॅक्स झाला...

इकडे बाहेर पंतप्रधानांना मारण्याच्या प्रयत्नात असलेला युवक शक्तीला संपवण्याचा प्रयास करत होता. त्याच्यावर हल्ला करत होता. पण शक्ती त्याला तेवढाच प्रतिसाद देत होता,

जेवढा एका पिसाटलेल्या रेड्याच्या वाटेतून दूर होण्यासाठी दिला जातो! आणि यामुळे तर त्या माणसाच्या राग अधिकच भडकत जात होता...

शेवटी शक्तीने त्याच्या मॅग्नमने त्या माणसाच्या पायात फायर केलं. गोळीमुळे रस्ता छेदला गेला. शक्तीने मग नेम धरला तो त्या माणसावर!

"गो बॅक! डॅनियल वाट बघत असेल!" शक्तीने त्याला हुकूम सोडला.

तो माणूस हलला नाही. शक्तीकडे रागाने पहात उभारला.

"गो!" शक्ती मोठ्याने ओरडला.

तसा आपल्यासमोर शक्तिशाली मेंढा आल्यावर आपल्या शक्तीच्या मदात मदमस्त झालेला जसा मागे न वळता मागे-मागे सरकतो, तसा तो माणूस शक्तीच्या नजरेला नजर देतच काही पावले मागे वळला.

आणि फिरून आपल्या बाईकवर स्वार होऊन निघून गेला...

आणि मग शक्तीने आपला मोर्चा हॉटेलकडे वळवला.

काहीवेळातच लिफ्टने शक्ती पंतप्रधान असलेल्या फ्लोअरवर होता. पंतप्रधान तेथे वास्तव्यास असल्याने त्यांच्या सुविधेसाठी ते आख्ख्यं हॉटेल रिकामं करण्याचा मॅनेजरची मनीषा होती, पण पंतप्रधान यांनीच त्याला तसे न करण्यास सुचवले. कारण अशाने ते कोल्हापुरात आलेत हे बहुदा उघड झालं असतं. तरीही त्यांच्यासाठी ते राहत असलेला फ्लोअर रिकामा केला गेलाच होता!

शक्ती पंतप्रधान यांच्या रूमसमोर उभारला, तेव्हा त्याला एजंट्सकडून अडवण्यात आलं.

तत्काळ शक्तीने त्याला दिलेली 'स्पेशल आयडी' ब्लेझरच्या छोट्या चोर कप्प्यातून काढली आणि एका एजंट्स समोर धरली. ते काय हे माहीत नसल्याने त्यांच्या चेहऱ्यावर मोठं प्रश्नचिन्ह उपस्थित राहील.

"प्रधानमंत्रीजी को दिखाओ। वे पेहेचान लेंगे!" शक्ती त्यांना म्हणाला.

नुकताच त्यांच्यावर हल्ला झाला आणि खाली हाच एकाशी भांडण करत होता हे त्यांतील एजंटने ओळखलं. त्याने पटकन शक्तीला गनपॉईंटवर घेतलं. हे पाहून दुसऱ्या एजंटने देखील शक्तीवर गन रोखली.

शक्तीने आयडी वरच्या खिशात ठेवत विजेच्या चपळाईने त्यांच्या दोघांच्याही गन्स हिसकावल्या. त्या एजंट्सना देखील समजलं नाही, की त्यांच्या हातून गन्स नाहीशा झाल्या आहेत आणि त्या आता शक्तीच्या हातात आहेत. ते नेम धरलेले हात उंचावूनच होते. जेव्हा त्यांना हे लक्षात आलं, की आपले हात तर रिकामे आहेत, आणि शक्ती आपल्याच गन्स आपल्यावर पॉईंट करून उभा आहे. ते हतबुद्ध झाले.

शक्तीने पुन्हा त्याची आयडी एजंट्स समोर धरली, आत जाऊन ते कार्ड पीएमना दाखवण्याची खूण केली. शक्ती खूप गंभीर होता.

'नो नॉनसेन्स टाईप' त्याचा चेहरा पाहून शक्तीच्या उजव्या बाजूच्या तो एजंट प्रकरणाची गंभीरता समजला आणि तो शक्तीकडून कार्ड आत गेला.

"एक्स्क्यूज मी सर, बाहर कोई आया हैं!" तो सोफ्यावर चिंतेत बसलेल्या पीएम पुनीतला म्हणाला.

"कोन हैं?" पीएमनी गुश्श्यात त्याला विचारलं.

"मालूम नहीं सर. उसने आपको ये दिया है।" ते कार्ड त्याने पुढं होत पीएम समोर धरले.

पीएमने ते घेताच एजंट मागे होऊन अदबीने उभारला. पीएमनी ते कार्ड निरखून पाहिलं.

"भेज दो!" एजंटकडे बघत चिंतित चेहऱ्यानेच पीएमने एजंटला हुकूम केला.

"येस सर!" तो बाहेर निघून गेला.

"सर, आपको अंदर बुलाया है।" बाहेर येऊन तो म्हणाला.

शक्तीने फक्त मान हलवली आणि त्याने दोघांच्या हँडगन्स परत केल्या. तो खोलीत प्रवेशाला.

जसा शक्ती आत चालत आला, पीएम त्याच्याकडेच पाहत होते. तो त्यांच्यासमोर थांबला.

"काय तूच शक्तीसेन नाईक आहेस?"

"हो सर!"

"काय रिपोर्ट?"

"मी इथं रिपोर्ट द्यायला नाही! चौकशी करायला आलो आहे!" शक्ती कठोरपणे म्हणाला.

"कसली चौकशी?" पीएमनी तडकून विचारलं.

"वाचस्पतींच्या खूनाची! आणि त्यांच्या संबंधित सर्व दुर्घटनांची!" शक्ती पीएमच्या नजरेला नजर रोखत म्हणाला.

"तुला पण आमच्यावरच संशय आहे?" पीएमने त्याला विचारपूर्वक पृच्छा केली.

"पुरावे तर तसेच आहेत!" शक्ती दोषारोप करत म्हणाला.

"काय आहेत पुरावे?" पीएमने कठोर स्वरात विचारलं.

"वाचस्पतींच्या खून्याची चौकशी तर होऊ शकली नाही. त्या आधीच त्याला मारला गेला. आणि त्याला ज्या रायफलने उडवलं ती पॅरा स्पेशल कमांडोज् आणि फोर्स वन कमांडोज वापरतात!"

"आणि फक्त एव्हढ्यावरून आम्ही दोषी सिद्ध होतो? हे फॅब्रिकेटेड एव्हीडेन्स असू शकत नाहीत?" पीएम शक्तीच्या तर्काची कीव करत म्हणाले.

"ती रायफल बनवणाऱ्या कंपनीचा डेटाबेस चेक केला आहे. त्यांच्याकडून कोणतीच इल्लीगल डिलिंग झाली नाही!"

"दुसरं कोणीच ही रायफल वापरत नाही? जो देश अमेरिका ही रायफल विकतो तोही याचा वापर करतो. हेही तुम्हाला माहीत असेल. नाही?!" पीएमने विचारलं.

"वापरतं!"

"मग दोष आमच्यावर कसा?" पीएमने शांतपणे विचारलं.

आपल्या तर्काने आपण शक्तीच्या तर्काला हरवले आहे असं वाटून त्यांच्या आवाजात ही शांतता उतरली होती.

"वाचस्पती हे भारतात मोठे राजकारणी असतील, पण जागतिक राजकारणात त्यांची विशेष ओळख नाही! अमेरिकाच नाही, तर मोठ्या ती रायफल वापरणाऱ्या कोणत्याही देशाला त्यांचा खून करण्याचे काहीच कारण मला दिसत नाही!" शक्तीने तात्पर्य सांगितलं.

"आणि जर अमेरिकेला आम्हीच गादीवर असू नये असे वाटत असेल तर?! या शक्यतेचा विचार आपण केला आहात?" पीएमने विचारलं.

शक्ती विचार करू लागला... त्याला चित्र काही अंशी स्पष्ट होत चाललं होतं... याचं स्पष्टीकरण होतं, त्याच्या कपाळावरील मोकळ्या होआंर्या आठ्या!

"बसा!" पीएमनी शक्तीला विराजमान होण्याचा आग्रह केला.

शक्ती समोर बसला.

"सॉरी सर! मला माहीत होतं, आपण या कारस्थानामागे नाही. पण खात्री हवी होती. शिवाय इंद्रदत्त वाचस्पतींच्या मारेकऱ्याला ज्या एम 107 रायफलने जीवे मारलं, ती पाच देशांना विकली जाते. म्हणून मला आपल्याकडून सत्य जाणून घ्यायचे होते..."

"म्हणून हे दोषारोप?" शक्तीच्या हुशारीला आणि धाडसाला दाद देत पीएम हसत म्हणाले.

"माफ करा!" शक्ती म्हणाला.

पीएम पुन्हा हसले.

"पण हे तुम्ही मला स्पष्ट विचारू शकला असता, ही नसती उठाठेव कशासाठी?" त्यांनी विचारलं.

"आपल्याला राग यावा म्हणून. स्पष्ट विचारलं, तर माणूस खोटंही बोलू शकतो! पण रागात माणूस खोटं काहीच बोलत नाही!" शक्तीने स्पष्ट केलं!

पीएम मघाशी झालेल्या जीवनावरील आघाताला आणि चिंतांना विसरून प्रसन्न हसले.

"हुशार आहात! उगाच म्हणत नाहीत, क्रोध हा मदिरेसारखा सर्वमुळ नाशाचं कारण आहे!"

"तुम्ही खूप छान मराठी बोलता!" शक्तीने त्या गंभीर संवादातूनही कॉम्प्लिमेंट दिली.

पीएम पुन्हा हसले. म्हणाले,

"एट्थ ते टवेल्थ पर्यंतच शिक्षण पुण्यात झालं. आणि पुण्याची माणसं काय मराठी शिकवल्या शिवाय सोडतायत होय!" पीएमनी वातावरण हलकं करण्याचा प्रयत्न केला.

शक्ती देखील हसला. पण क्षणभर! त्याला काही स्ट्राईक झालं होतं!

"सिन्स थिस इज सिक्रेट पण तरी आपण इथं येणार असल्याचं कोणा-कोणाला माहीत होतं?" शक्तीने चेहरा गंभीर करत पीएमना विचारलं.

"माझा पर्सनल सेक्रेटरी फक्त!"

"उचल ा!"

शक्तीला काय अधोरेखित करायचं आहे हे पीएम समजून चुकले. त्यांनी लगेच नंबर घुमवला...

"सोमेश राजमाने पीएमला भेटायला गेला आहे! त्याने माझ्यावर हल्ला पण केला!" पीएमला मारायला उद्युक्त झालेला माणूस पन्हाळ्याला डॅनियलच्या फार्महाऊसला पोहोचला होता.

"कारण?" डॅनियलने विचारलं.

"माहीत नाही!"

"मग इथं काय करतात आहेस?" बाल्कनीत सूर्यास्ताकडे पाहत स्कॉचचा आस्वाद घेणारा डॅनियल त्या माणसाकडे वळून म्हणाला.

"स... सॉरी डॅन! पण त्याने माझ्यावर बॅकफायर केलं आणि मला तेथून निघून जायला सांगितलं. मला थांबता आलं नाही तिथं..." तो घाबरत म्हणाला.

डॅनियलने लगेच मोबाईल खिशातून बाहेर काढला. फोन लावला; नम्याला...

तिकडे नम्या हॉटेल रूममध्ये अडकून बसली होती. ती तिला बाहेर काढण्यासाठी रूम सर्व्हिसला सांगूही शकत नव्हती. कारण जर तिने तसं केलं असतं, तर त्याचीही काही सोय तिच्या दृष्टीने सोमेश असणारा शक्ती करू शकत होता. म्हणून ती खोलीत बंद गपचूप बसली होती. लँडलाईन वाजला...

गडबडीने नम्याने कॉल घेतला,

"हॅलो!" ती अधीरतेने म्हणाली.

"हॅलो नम्या! सोमेश आला परत?" डॅनियलने फोनमधून विचारलं.

"नाही!" नम्याने हताश उत्तर दिलं.

"ओके!" डॅनियल म्हणाला.

"प्लिज डॅन! ड्रॅग मी आऊट ऑफ थिस! थिस मॅन इज टॉर्चर! प्लिज डॅन!!!" नम्या कळवळून म्हणाली.

"सॉरी बेबी! बट यु हॅव टू बेअर थिस फॉर अ व्हाईल! बाय!" डॅनियलने पलिकडून फोन हन्ग अप केला...

नम्या असहाय्यतेने शून्यात पाहत वेड्यासारखी अश्रू गाळू लागली... पण काही घटकांच! कारण ती रडणारी मुलगी नव्हती. तिने झटकन उठून खोलीत शोधाशोध सुरू केली...

"काय झालं डॅन?" त्या माणसाने विचारलं.

"तो अजून परतला नाही."

"कॅन आय गो अँड किल हिम?"

"वेट! ही विल रिटर्न!" डोळे बारीक करत डॅनियल म्हणाला. तो त्या माणसाकडे वळला,

"रिमेंबर, यू डोन्ट हॅव टू राईड ऑन दि ऍस ऑल्व्हेज!" डॅनियलने त्याला ताकीद केली!

आणि त्याने स्कॉचचा शिप घेतला.

पंतप्रधानांचा 'मुख्य सचिव' येईपर्यंत शक्तीची आणि पंतप्रधानांची त्यांच्या पथिकाश्रमातील कक्षात मंत्रणा चालू होती...

"मला हाईड आऊट बदलावं लागेल. माझ्या इथं राहण्याने इथल्या लोकांचा जीव धोक्यात येईल! तू कोणती चांगली जागा ओळखतोस?" पीएमनी शक्तीला विचारलं.

"रादर मी तुम्हाला सुचवेन, की तुम्ही इथंच रहावं! ते लोक आता परत येणार नाहीत! दे डोन्ट अफोर्ड टू किल यु! त्यामुळे इथले लोक उलट सेफच आहेत. तरी मी काळजी घेईनच! आय विल हँडल दि कंविकट्स!" शक्तीने पीएमना आश्वासित केलं व पुढं म्हणाला,

"पण मॅनेजर खूप घाबरले असणार. त्यांचे गेस्ट घाबरून निघून जाण्याच्या तयारीत असणार आणि तुम्ही खुद्द पंतप्रधान असल्याने त्यांना तुम्हाला निघून जायला सांगणं अवघड वाटेल. त्यामुळे तुम्ही मॅनेजर यांची प्लिज जरा समजूत काढा!"

"हो. मी बोलतो त्यांच्याशी!" पंतप्रधान विचारांती म्हणाले.

"जर आपल्याला हरकत नसेल, तर मी एक विचारू सर?" शक्तीला आता काही शंका निरसन हवं होतं...

"हं!" पंतप्रधान यांनी संमिती दर्शवली.

"अमेरिकेबद्दल तुम्ही इतके शोअर कसे आहात? म्हणजे तुम्हाला असं का वाटतंय, की अमेरिका तुम्हाला पदच्युत करण्यासाठी इतकी उत्सुक आहे?"

"एक लक्षात घ्या. सरकार कुणाचंही असूदे. एका सरकारची इंटरनॅशनल पॉलिसी दुसरं सरकार पुढं नेत असतं. ही पॉलिसी म्हणजे त्या त्या देशाची आंतरराष्ट्रीय गरिमा व प्रतिमा ज्या त्या आहे तशा राखणे. अमेरिका याला अपवाद नाही! सरकार कोणतंही असू दे. त्यांना स्वतःला सर्वश्रेष्ठच ठेवायचं आहे! यासाठी अमेरिका भारतात मोठ्या प्रमाणात इन्व्हेस्टमेंट करणार होती. पण मी त्यांची इन्व्हेस्टमेंट पॉलिसी रिफ्युज केली! यामुळे त्यांना मला पदावरून खाली करून त्यांना सपोर्ट करणारं कोणीतरी त्यांना भारताच्या पंतप्रधान पदावर बसवायचं आहे!"

"पण इन्व्हेस्टमेंटमध्ये गैर काय आहे? आणि भारतात इन्व्हेस्टमेंट केल्याने त्यांना काय फायदा होणार आहे?" शक्ती चकित झाला.

"माझ्या सूचनेनुसार आपल्या इकनॉमिक अफेअर्सने गठीत केलेल्या कमिटीमार्फत अमेरिकेसाठी बनवलेले रुल्स आणि रेग्युलेशन्स अमेरिकेने मान्य केले नाहीत. मग मी त्यांना परवानगी कशी देऊ? आणि म्हणूनच अमेरिकन पोलिटीशियन्स् आणि बिझनेसमेन माझ्यावर रुष्ट आहेत!" पीएम पुनीत त्यांची भूमिका उघड करत गेले.

"चीन आणि नॉर्थ कोरियावर वचक बसवण्यासाठी अमेरिकेला भौगोलिक दृष्ट्या आशियातील तिसरा मोठा देश असलेल्या भारताची मदत होईल अशी त्यांची कल्पना आहे. रशिया काही त्यांना मदत करायचा नाही. जपान लहान असला, तरी तो शक्तिशाली आहे. पण तरी त्यांच्याकडेही अमेरिकन्स जाणार नाहीत हे उघड आहे. मग राहतो आपणच! त्यांचा अंदाज खराही आहे, कारण जमिनीसोबत आपल्याकडे युथपॉवर पण आहे! फिजिकल स्ट्रेंथ प्लस ब्रेन!

"आणि त्यासाठी त्यांना भारतात डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट करायची आहे. चीनची जागतिक बाजारात असलेली मक्तेदारी अशाप्रकारे अमेरिकेला मोडीत काढायची आहे! सोबत नॉर्थ कोरियाला सुद्धा धाकात ठेवायचे आहे!"

"पण याचा भारतालाच फायदा होईल. मग प्रॉब्लेम काय आहे?"

"फायदा नाही नुकसानच जास्त होईल! हे करत असताना आपली तेवढी उत्पादक क्षमता आहे का हे आधी तपासायला हवं. त्यासाठी आधी योग्य शिक्षण हवं. आपल्याकडे बुद्धीमत्ता आहे, बुद्धिमान लोकं आहेत. पण किती पर्सेन्ट? आपली जादातर तरुणाई नीट शिक्षण घेत नाही. ना कोणते स्किल डेव्हलप करते. यांना कर्तव्यांची जाणीव नाही. आणि याला फक्त तरुणांची उदासीनता कारणीभूत नाही, तर आपली शिक्षण व्यवस्था पण तितकीच दोषी आहे. आणि ती सडलेली व्यवस्था न बदणारं आपलं शासन देखील तेवढंच जबाबदार आहे!

"सी! परफेक्ट इन्फ्रास्ट्रक्चर शिवाय तुम्ही बिझनेस उभा करू शकत नाही. आणि आता आपल्या देशाची शिक्षणाच्या दृष्टीने काय अवस्था आहे तू जाणून असशीलच. आधी तरुण सक्षम बनवायला हवेत. सर्वांना फायनान्शियल एज्युकेशन मिळालं तरच आपल्या जनतेला फायनान्शियली फ्रीडम मिळेल. पैसा मिळवण्याआधी तो खर्चायचा कसा याचं ज्ञान घेतलं पाहिजे. हे शाळेतूनच व्हायला हवं. त्यासाठी आधी एज्युकेशन सिस्टीम सुधारावी लागेल पण याचा विचार कोणीच करताना दिसत नाही...

"शिवाय एवढी मोठी रक्कम भारतात एकत्र इन्व्हेस्ट झाली, तर भारतात जॉब्स तर क्रिएट होतील, पण  मोठ्या प्रमाणात इन्फ्लेशन तयार होईल. आलेला पैसा वापरायचा कसा हेच जर माहीत नसेल, तर लोक भरमसाठ वाट्टेल तसा तो खर्च करतील. मोठ्या प्रमाणात महागाई वाढेल, पर्यायी आपले चलन मूल्य घटेल. आणि हे भारताच्या इकनॉमीला मोठं खिंडार असेल!

"पण अमेरिका याचा विचार करत नाहीए! त्यांचे फक्त प्रॉडक्टिव्हीटीवर लक्ष आहे. क्वॉलिटीवर नाही. ना स्किल डेव्हलपमेंटवर.

"तिसरं कारण म्हणजे, अमेरिकेचा इतका पैसा भारत घेत असेल, तर भारत आपसूक त्यांच्या मिंध्यात जाईल. त्याचं वर्चस्व निर्माण होईल. आणि ते सांगतील ते आपल्याला मूक राहून ऐकावं लागेल. इंडियन बिझनेसेसमध्ये त्यांचे मोठे स्टेक्स असल्याने महत्वाचे निर्णय तेच घेतील आणि पर्यायाने मग भारतीय राजकारणातील सगळे महत्वाचे निर्णय डायरेक्ट-इंडायरेक्ट अमेरिका घेऊ लागेल. आणि आपल्याला काहीच करता येणार नाही! प्रसंगी त्यांच्यासाठी युद्धही करावं लागेल! अमेरिकेची इन्व्हेस्टमेंट मला नको आहे असे नाही, पण प्रमाणात! कोणतीही गोष्ट प्रमाणात ठीक आहे. तिची अती झाली, की माती होतेच!

"मला अमेरिकेला सपोर्ट करायला काहीच प्रॉब्लेम नाही. चीनशी युद्ध नाही, पण हेल्दी कॉम्पिटीशन करायला मलाही आवडेल. पण त्यासाठी मी माझ्या देशाची इकनॉमी व डिग्निटी सॅक्रीफाईज् नाही करू शकत!" पंतप्रधान आपली बाजू सांगून थांबले.

"आणि म्हणून तुम्ही त्याचं प्रोपोसल नाकारलंत?" शक्तीने सगळं नीट ऐकून घेऊन विचारलं.

"येस. यु आर राईट! यांच्या आर्थिक फायदा-नुकसानासाठी मी आपल्या देशाचा गौरव-प्रतिष्ठा, मान-सम्मान त्यांच्यासमोर झुकवणार नाही! यांच्या कोल्डवॉरसाठी माझ्या भारताला रणक्षेत्र म्हणून वापर करण्याची मी यांना परवानगी कदापि देणार नाही!" पंतप्रधान पुनीत आर्मरेस्टवरील मुठी आवळत ठामपणे म्हणाले.

"आय सी!" विचार करत शक्ती म्हणाला.

"आणि तुला माहीत आहे, आपल्यातलं अमेरिकेच्या आत्ता सर्वांत जवळ कोण आहे?" पीएम पुनीत यांनी विचारात हरवलेल्या शक्तीला डोळे बारीक करून प्रश्न केला.

शक्तीने अचानक भानावर येऊन वर त्यांच्याकडे पाहिलं. काही महत्वाचं ऐकायला मिळेल म्हणून त्याने कान विस्तारले होते. लक्ष देऊन तो ऐकण्याचा प्रयत्न करू लागला...

"भारतातली सर्वांत मोठी अपोजिशन पार्टी!" पीएमनी जणू विस्फोट केला.

शक्तीला कानावर विश्वास बसेना!!! तो विचारांच्या अंधकारात अधिकच गुरफटत गेला...

"इंद्रदत्त वाचस्पती यांची..." त्याने वाक्य पूर्ण केलं नाही. पण,

"पार्टी, जनमानस!" म्हणून पीएमनी त्याचं वाक्य पूर्ण केलं.

शक्तीचं डोकं भनभनू लागले. कारण जर असे असेल, तर अमेरिकेने त्यांच्या सर्वांत मोठ्या प्याद्याला स्वतःच का उडवलं असेल? हा मोठा प्रश्न अजगर बनून उपस्थित राहिला होता; ज्याचे वेटोळे शक्ती भोवती अधिकच घट्ट कसले जात होते!

## ६. घरभेदी (ट्रेटर)...

डॅनियलची बीएमडब्ल्यू कधीच कोल्हापूरच्या रस्त्याला लागली होती... बाजूला तो माणूस देखील बसला होता.

"हिमांशू, नम्याला नाईट क्लबला घेऊन ये." डॅनियलने एवढंच बोलून नेव्हीगेशन स्क्रिनवर चालू असलेला कॉल कट करून बंद केला.

शक्ती थांबलेल्या हॉटेलबाहेर उभ्या गाडीतून हिमांशू उतरला आणि हॉटेलकडे गेला.

तीच रिसेप्शनिस्ट, समोर हिमांशूला पाहून ती गोंधळली, घाबरली. तिच्या समोर असलेले एक कपल जाईपर्यंत हिमांशू थोडं मागे उभारला होता. ते जोडपं जसं त्यांना दिलेल्या रूमकडे गेलं, तसा हिमांशू तिच्याकडे आला...

"हाय स्विटी!" तो खट्याळ स्मित करत तिला म्हणाला. डोळ्यांना गॉगल तसाच होता.

"हाऊ कॅन आय हेल्प यु सर..." ती घाबरतच म्हणाली.

इकडे कोणी बघतंय का यासाठी तिची नजर लॉबीभर फिरत होती. दूर मॅनेजर कोणाशी तरी बोलत होता. त्याची नजर विचलित झालेल्या त्या रिसेप्शनिस्टवर पडली. काही तरी गडबड आहे हे लक्षात येऊन तो बोलणाऱ्या व्यक्तीची एक्स्क्यूज घेऊन रिसेप्शन काऊंटर जवळ आला.

"इज एनिथिंग रॉन्ग् सर?" त्याने विचारलं. मग त्याने रिसेप्शनिस्टकडे पाहिलं,

"काय झालं, आशी? काही प्रॉब्लेम?" मॅनेजरने तिला विचारलं.

ती मान हलवून 'नाही' म्हणाली, पण चेहऱ्यावर भीतीची छटा तशीच होती. मॅनेजर अजूनच शंकीत होऊ लागला. याचा संशय जेवढा बळावेल तेवढं आपल्यासाठी धोक्याचं आहे हे लक्षात येऊन हिमांशू बोलला,

"सर, रूम नंबर सव्वीसमध्ये जे आहेत त्यांना भेटायचं आहे."

"आपण कोण?" मॅनेजरने विचारलं.

"मी हिमांशू. माझी बहिण आहे त्या रूममध्ये."

"आय सी." म्हणत मॅनेजरने रिसेप्शनिस्टकडे पाहिलं,

"आशी; कन्फर्म कर!" तो तिला म्हणाला.

"येस सर!" म्हणत तिने गडबडीने फोन उचलला.

बटन प्रेस केलं.

शक्तीच्या हॉटेल रूम मधल्या फोनची रिंग वाजली. नम्याने घाईने क्षणाचाही विलंब न लावता फोन उचलला.

"हॅलो!" ती अधीरतेने म्हणाली.

"हॅलो मॅम, आपले भाऊ आलेत." रिसेप्शनिस्ट बोलली.

"भाऊ?" नम्याने गोंधळून विचारलं.

"हो. हि... हिमांशू नांव आहे त्यांचं..." घाबरलेली रिसेप्शनिस्ट हिमांशूकडे पाहत म्हणाली,

"तुम्हाला भेटायचंय म्हणतायत."

"हो. हो पाठवा. प्लिज... आणि दरवाजाची स्पेअर की आणाल? माझे हजबंड् चुकून लॉक करून महत्वाच्या मिटिंगला गेले आहेत. मी झोपले होते म्हणून त्यांच्या लक्षात आलं नाही..." नम्याने काही तरी जुळवाजुळव केली.

"हो मॅम!" रिसेप्शनिस्टने रिसिव्हर ठेवला.

"त्यांनी तुम्हाला रूममध्ये बोलावलं आहे." ती हिमांशूला म्हणाली.

आणि तिने शक्तीच्या रूमची स्पेअर की त्याच्यासमोर धरली.

"एक मिनिट!" मॅनेजर म्हणाला आणि त्याने बेलबॉयला हाक मारली.

"शंतनू! इकडे ये!"

"गरज नाही. याच दाखवतील की मला रूम." हिमांशू मॅनेजरला म्हणाला. त्याने रिसेप्शनिस्टकडे पाहिलं,

"काही प्रॉब्लेम नाही ना?" त्याने खोटंच विचारलं.

"नो नो." मॅनेजर त्याला म्हणाला,

"आशी, जा यांच्याबरोबर. मी बघतो इथं!"

ती प्रश्नार्थक नजरेनं मॅनेजरकडे पाहू लागली. हिमांशू सोबत जाण्याची तिची इच्छा नव्हती हे तिच्या अशा पाहण्यावरून स्पष्ट दिसत होतं. पण ती मॅनेजरने तिला इंसिस्ट केलं,

"जा. रूम दाखवून लगेच परत ये." मॅनेजर तिला म्हणाला.

त्याला हॉटेलची रेप्युटशन खराब करायची नव्हती.

मग चावी घेऊन रिसेप्शनिस्ट लिफ्टकडे चालू लागली. हिमांशू तिच्या मागून चालला...

रिसेप्शनिस्टने लिफ्टचं बटन प्रेस केलं आणि ती आत गेली. हिमांशू देखील हात शिरला. लिफ्टचं दार बंद झालं आणि लिफ्ट वर सरकू लागली...

लिफ्टमध्ये, दोघे मागील भिंतीला लागून उभे होते.

"यु आर सो ब्युटीफुल. वान्ना गो फॉर अ डेट विथ मी?" हिमांशूने तिच्याकडे सरकत तिला विचारलं.

ती अधिकच घाबरली, पण मान डोलवून नाही म्हणण्याची तिने हिंमत दाखवली. तो हसला आणि बाजूला सरकला.

लिफ्ट शक्तीची रूम असलेल्या फ्लोअरला लागली होती. दार उघडतं न उघडतं तोच रिसेप्शनिस्ट घाईने बाहेर पडली. तिच्या अवस्थेवर हिमांशूला अजूनच हसू आलं.

शक्तीच्या रूमपाशी पोहोचून रिसेप्शनिस्टने घाईने लॉक खोललं. नम्या दाराजवळच येऊन थांबली होती. लॉक उघडण्याचा प्रयत्न होतोय हे लक्षात येऊन ते उघडलं गेल्यागेल्या तिने आधीरपणे नॉब फिरवून दार उघडलं होतं. रिसेप्शनिस्ट मग रडवेला चेहरा झालेल्या नम्याकडे नजर टाकून पुन्हा लिफ्टकडे पळाली.

जात असताना तिला हिमांशूला क्रॉस करून जाणं भाग होतं. तो समोरून संथपणे डाव्या खिशात हात घालून, उजवा हात लोमकळता सोडून रूमच्या दिशेने चालत येत होता.

चेहऱ्यावर मग्रुरीचं हास्य होतंच. पण तिने एक नजरसुद्धा त्याच्याकडे टाकली नाही. हिमांशूच्या चेहऱ्यावर पुन्हा स्मित खिळलं.

रिसेप्शनिस्टने घाईने अनेकदा अधीरतेनं लिफ्टची बटन प्रेस केलं. लिफ्ट येईपर्यंत तिला धैर्य नव्हतं. इथं काय होईल काय नाही हे तिला माहीत नव्हतं आणि ते तिला पाहायचंही नव्हतं. ना या हिमांशू नांवाच्या माणसाच्या तावडीत तिला सापडायचं होतं. लिफ्टचं दार उघडलं तशी ती आत शिरली. लिफ्ट बंद करायला पुन्हा तिची तीच घाई. अनेकदा बटन प्रेस केल्यावर लिफ्टचं दार बंद झालं. लिफ्ट खाली सरकू लागली. हे पाहताना हिमांशूला खूप गंमत वाटली. नम्या देखील हे पाहतच होती. पण तिला मजा वाटत नव्हती. भीती काय असते याचा तिने अनुभव जो घेतला होता...

ती हिमांशूकडे अपेक्षेने पाहत होती फक्त...

"डॅनीने नाईट क्लबला बोलवलं आहे!" हिमांशू तिच्याकडे बघून म्हणाला.

"तुझा नेक्स्ट मूव्ह काय असणार आहे?" पंतप्रधानांनी शक्तीला विचारलं.

"तुमच्या पीएची थेट चौकशी" शक्तीने स्पष्ट केलं.

"माझा अजून विश्वास बसत नाही, की माझा पर्सनल असिस्टंट असं काही करेल!" पीएमनी अविश्वास प्रकट केला.

"मग एक टेस्ट करू. तुमची खात्री पटायला." शक्ती म्हणाला आणि त्याने फोन लावला...

"हॅलो सर बोला." मिहीर त्याच्या डेस्कवर काम करत होता.

"मला रेनेसन्सला येऊन भेट!" पलिकडून शक्तीने सांगितलं,

"एसपीला सांग आणि बाहेर पड लगेच. म्हणावं पीएमचे अर्जंट काम आहे आणि त्यांनी बोलावलं आहे."

"पण सर विश्वास ठेवतील?" मिहीरने शंका व्यक्त केली.

शक्तीने कॉल स्पीकरवर ठेवलेला होता. 'मी बोलतो' अशी पीएमनी खूण केली.

"त्याची काळजी करू नको. एसपींशी पीएम स्वतः बोलतील."

"ठीक आहे. येतो सर."

शक्तीने मिहीरचा फोन कट केला.

"लावू?" शक्तीने पीएमना विचारले.

पीएमनी मान हलवली. शक्तीने एसपी ऑफिसचा नंबर डायल केला आणि फोन पीएमना देऊ केला.

"हा. हॅलो मिस्टर गोखले, तुमचा तो मिहीर नांवाचा ऑफिसर जरा माझ्याकडे लावून द्या." पीएमनी एसपींना फर्मान काढलं.

"हो. हो सर!" म्हणत एसपी पळतच केबिन बाहेर गेला. कॉल कट करून तो मिहीरच्या डेस्कपाशी आला,

"मिहीर तुला पीएमनी बोलावलंय!" तो गडबडीत पण कोणाला ऐकू नजाणार नाही अशा आवाजात म्हणाला.

"हो सर!" उठत मिहीर म्हणाला आणि एसपीला सल्युट ठोकून तो पोलीस हेडक्वार्टर बाहेर पडला.

"या मिहीरचं काय करायचं आहे?" पीएमनी शक्तीची योजना जाणून घेण्यासाठी विचारलं.

"आत्तापासून तो एक आयबी ऑफिसर असेल!" शक्ती एवढंच म्हणाला.

इतक्यात दारावर टकटक झाली. पीएम व शक्ती यांनी दाराकडे पाहिलं.

शक्तीने उठून दार उघडलं. पंतप्रधानांच्या पीएला बाहेर तैनात एका एजंटने आत आणलं. पीएच्या हाती एक सुटकेस होती.

त्याला देखील प्रायव्हेट जेटने इथंवर आणलं गेलं होतं. त्यामुळे जवळजवळ १६४० किमीचं अंतर अवघ्या दोन तासांच्याही आत कापलं गेलं होतं...

"सॉरी शुक्ला! ये आपका काम नहीं है, पर मेरे यहाँ होने की बात सिर्फ आप जानते हैं इसलिए आपको ये काम बताना पड़ा। लागता है कुछ दिन यहाँ रहना पड़ेगा!" म्हणत पीएम यांनी शक्तीला शुक्लाच्या हातून सुटकेस घेण्यास इशारा केला.

शक्ती सूटकेस घ्यायला पुढं झाला.

"कोई बात नहीं सर. इट्स माय जॉब टू असिस्ट यु!" शक्तीला सुटकेस देत बिपीन शुक्ला म्हणाला.

शक्तीने ती घेऊन बेडच्या साईडला ठेवली.

"बैठो!"

शुक्ला पीएमच्या सांगण्यावरून बसला.

"यह कौन है?" शुक्लाने बसत शक्तीबद्दल विचारलं.

"यहाँ के रूम सर्व्हिस के हैं!" पीएमने त्याला उत्तर दिलं आणि शक्तीला म्हणाले,

"आपण जा. जेवणाची तयारी करा. आम्ही आणि आमचे पीए आज एकत्र जेवण करू!" पंतप्रधान शक्तीला म्हणाले.

पण ही सूचना शक्तीसाठी नव्हती कारण हे बोलत असताना त्यांनी आपल्या पीएला आत घेऊन आलेल्या  एजंट (सुरक्षा रक्षका) कडे नजर टाकली होती. ती त्याला सूचना होती आणि ती तो समजला होता!

"येस सर!" म्हणून शक्ती बाहेर गेला.

त्याच्यासोबत एजंट देखील रूमबाहेर पडला. त्याने बाहेरून दार ओढून घेतले. बेल्टला अडकवलेली त्याची वॉकी-टॉकी त्याने खेचली.

"रूम सर्व्हिस! रूम नंबर फिफ्टीन में खाना भेज दिजीए!"

शक्ती हॉटेलबाहेर येऊन मिहीरची वाटच पाहत होता. मिहीर आला शक्ती त्याने त्याला आपली योजना सांगू लागला...

दरम्यान जेवण घेऊन रूम सर्व्हिसची लेडी जेवणाची ट्रॉली ढकलत लिफ्टमधून बाहेर पंतप्रधानांच्या रूमकडे आली.

तिला  एजंट्सकडून दारावरच थांबवण्यात आलं. एका  एजंटने प्रत्येक पदार्थ एका डिशमध्ये थोडं थोडं घेऊन ते चाखलं. काही काळ थांबला. त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही हे पाहून हे अन्न आता पंतप्रधानांनी ग्रहण करण्यास योग्य जाणून त्यांनी तिला जाण्यास सांगितलं.

ती स्ट्रॉली तिथेच ठेवून ती निघून गेली. मग  एजंटच ती ट्रॉली ढकलत आत घेऊन गेला.

तो डायनिंगपाशी ती ढकलगाडी घेऊन आला. जेवण सर्व्ह करण्यासाठी त्याने त्यावरील पात्रे काढून डायनिंग टेबलबर ठेवले व तो जेवण वाढू लागला.

"डोन्ट बॉदर. विल मॅनेज!" पंतप्रधान त्याला म्हणाले.

"येस सर!"  एजंट कमरेत वाकून नम्रपणे म्हणाला आणि तो बाहेर पहाऱ्यासाठी आपली जागा घेण्यास गेला. त्याने दार लावून घेतले.

## ७. लोकशाहीची मूलभूत तत्वे (फंडामेंटल्स ऑफ डिमॉक्रसी)...

हॉटेल बाहेर शक्ती सांगत असलेली सूचना समजून घेऊन मिहीर पंतप्रधानांच्या रूमसमोर येऊन उभारला.

"मिहीर. पीएम सरने बुलाया हैं।" मिहीर बाहेरील एजंट्सना म्हणाला.

एजंटने आत जाऊन कन्फर्म केलं.

"सर, एक आदम ी आया हैं। कह रहा है आपणे बुलाया हैं! नाम मिहीर!"

"भ ेज दो!" पीएसोबत डायनिंग टेबलवर जेवण करणारे पीएम काट्याने घास घेत म्हणाले.

एजंट बाहेर आला.

"जाईए!" दार उघडच ठेवून तो मिहीरला म्हणाला.

मिहीर रूममध्ये प्रवेशला.

"मिहीर देशमुख रिपोर्टिंग सर!" तो सल्युट करत म्हणाला.

तो पंतप्रधानांना तो जेवताना पाहत होता.

"सॉरी सर. बाद मे आऊँ?" त्याने संकोच करत विचारलं.

"नाही! थांब!" नॅपकिनला हात पुसत पीएम खुर्चीतून उठले.

मिहीरकडे आले.

"आह! शुक्ला, मिट आवर् न्यू रिक्रुट फ्रॉम आयबी! मिहीर, नो वन नोज् अबाऊट! सो ही कॅन वर्क अनॉनमस्ली! अँड आय अशोर यु! ही इज डुईंग ग्रेट वर्क." त्यांच्याकडे येणाऱ्या शुक्लाला पीएम प्रसन्न मुखाने म्हणाले.

शुक्ला नाटकी हसला. चेहरा थोडा टेंस्ड् झाला होता.

"मिहीर हे माझे प्रिन्सिपल सेक्रेटरी आणि अत्यंत जवळचे मित्र बिपीन शुक्ला!" पीएमनी पुढं एड केलं.

"हॅलो!"शुक्ला छद्मी स्मित करत मिहीरला म्हणाला.

"हॅलो सर!" मिहीर स्मित करत त्याला म्हणाला.

"काही इन्फॉर्मेशन?" पीएमनी मिहीरला विचारलं.

"येस सर!" सल्युट करून मिहीर पीएमना म्हणाला,

"सर, सगळ्या लिंक्स अमेरिकेशी जाऊन मिळतायत!"

मराठी जास्त कळत नसलं, तरी 'अमेरिका' आणि 'लिंक्स' यावरून शुक्लाला काही अंदाज बांधणं सोपं होतं. आणि ते त्यानं केलं देखील होतं.

"गुड!" पीएम म्हणाले.

"सॉरी सर, मुझे लगता है आपकी ये बाते गोपनीयता के चलते मुझे नही सुननी चाहिए। और वैसे भी इमरजेंसी में मैं घर इन्फॉर्म किए बिना ही आया था! कॉल करके आता हूं!"

"पर खाना?" पीएम त्याला म्हणाले.

"आपका डिस्कशन हो जाए, साथ मे खाएगें।" शुक्ला हसत म्हणाला,

"आता हूं!" खिशातून मोबाईल काढत घाईनेच तो बाहर गेला.

हे पाहून शक्तीच्या म्हणण्यात काही तथ्य आहे ही पीएम यांची शंका बळावत गेली.

त्यांनी मिहीरकडे पाहिलं. मिहीर देखील त्यांना काय म्हणायचंय ते समजला, पण तो गप्प राहिला.

परंतु पीएमनी तत्काळ मन:स्थिती बदलली.

"तू खूप धाडसी आहे. खूप उत्कर्ष करशील आयुष्यात! आणि तुझ्यामुळे आपला देश!" पंतप्रधान त्याच्या खांदा थोपटत म्हणाले.

"थँक्यू सर!" मिहीर आनंदाने उसळत म्हणाला.

पंतप्रधान पुनीत चिंतपल्ली त्याच्यासाठी आदर्श होते. आणि आज शक्तीमुळे आणि त्याहीपेक्षा स्वतःच्या कर्तव्यपारायणतेमुळे, प्रामाणिकपणामुळे आज तो स्वतःच्या मेंटॉर समोर उभा होता. त्याला काय प्रतिक्रिया द्यावी हे समजत नव्हतं...

"आय एम ए बिग फॅन ऑफ यु सर! मी मागच्या इलेक्शन्सला माझं मत आपल्यालाच दिलं होतं!" मिहीर उत्साहाच्या भरात बोलून गेला.

"मला? पण मी तर या मतदार संघात उभारलो नव्हतो!"

"नाही. पण मी माझं मत आपल्याला पाहूनच केलं होतं. म्हणून म्हणालो!" मिहीरने आपली चूक सुधारली.

पंतप्रधान पुनीत हसले.

"मला माहित नव्हतं आपल्याकडे प्रेसिडेन्शियल इलेक्शन्सला सुरवात झाली आहे!" त्यांनी हे बोलून मिहीरची अजूनही होत असलेली चूक शुधारण्याचा प्रयत्न केला.

मिहीर चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह घेऊन उभा होता. पीएम काय बोलतायत, म्हणजे त्यांचा नेमका रोख काय आहे हे त्याला समजत नव्हते.

"माय बॉय आपण 'पार्लमेंटरी इलेक्शन्स्' भरवतो. मग तू मला डिरेक्ट मत कसं देऊ शकतोस?"

"म्हणून तर मी इथे आपल्या पक्षातल्या उमेदवाराला मतदान केलं." मिहीर अजूनही आपला मुद्दा स्पष्ट करत म्हणाला.

पंतप्रधान पुन्हा हसले. त्यांचा मुद्दा अजूनही मिहीरच्या लक्षात आला नाही म्हणून त्यांची ही प्रतिक्रिया होती.

"आणि तुम्ही त्यांच्या कामापासून खूष आहात?"

मिहीर गप्प राहिला. पंतप्रधानासमोर त्यांच्याच पक्षाच्या नेत्याबद्दल वाईट कसं बोलणार होता. त्यांचा कुचकामीपणा तो कसं सांगू शकत होता. ते चुगली केल्यासारखं झालं असतं. आणि बहुदा पंतप्रधानांना ते आवडलंही नसतं...

तिकडे कॉरिडॉरमध्ये एकदम शेवटी जाऊन एजंट्सना ऐकू येऊ नये असा त्याने फोन लावला...

"शुक्ला स्पिकिंग! आयबी एजंट अपॉईंटेड बाय पीएम, नोज् दॅट अमेरिका इज बिहाईन्ड् थिस कॉन्स्पिरसी. ॲज पर माय जजमेंट, ही विल रिच यु सून!" एजंट्स त्याच्यापासून बरेच लांब असून तो खुसपुसल्यासारखा मोबाईलमध्ये बोलला.

"हाऊ डू यु नॉ दॅट?" क्लबात एका रूममध्ये बसलेल्या डॅनियलने खात्री करून घेण्यासाठी विचारलं.

"आय हॅव हर्ड् इट मायसेल्फ!" शुक्ला बोलला.

"व्हॉट आर् यु डुईंग इन कोल्हापूर शुक्ला?" रागावलेला डॅनियलने स्वर थंड ठेवून विचारलं.

"पीएम वॉन्टेड् सम क्लोथिंग, सो ही आस्क्ड्  टू ब्रिंग!" शुक्लाने स्‌वत:ला खरं वाटणारं कारण सांगितलं.

"ओके. बट बी अलर्ट!" डॅनियललाही ते पटलं. तरी तो इतका सावध होता की त्याने शुक्लाला देखील सावध रहायला सांगितलं!

"येस! आय विल इंफॉर्म यु टाईम टू टाईम. बाय!" शुक्लाने फोन कट केला.

इकडे आत खोलीत मिहीर व विद्यमान पंतप्रधान यांचा संवाद चालूच होता... पीएमनी विचारलेल्या प्रश्नावर, की 'मिहीर त्याने मत दिलेल्या खासदाराच्या कामाने संतुष्ट आहे?' यावर मिहीर गप्प राहिला होता... पीएम त्याच्या चुप्पीवरून काय ते समजले होते.

"मला तुझं उत्तर मिळालं!" विचारात मग्न मिहीरला पंतप्रधान म्हणाले.

"म्हणूनच मी म्हणालो. एखाद्या पक्षाच्या पंतप्रधानपदाचा उमेदवार कोण हे बघून कधीच मतदान करू नका! आपल्या विभागात कोण चांगलं काम करू शकतं याचा विचार करून मतदान करा!

"आपल्या भागातील प्रत्येक उमेदवाराचं चारित्र्य पहा, त्याची निष्ठा पहा. कामाबद्दल, जनतेबद्दल आत्मियता किती आहे, त्याला लोकांबद्दल मग ते कोणत्याही जाती, धर्म, वर्ण, कोणत्याही आर्थिक स्थितीतील असोत त्यांच्याविषयी समान प्रेम वाटतं का ते पहा. मग मतदान करा. मग ते कोणत्याही पक्षाचे असोत. जनसेवा करण्यासाठी तेच उत्तम आहेत!

"पंतप्रधान निवडण्याचं काम जनतेचं नाही. ते काम जनतेनं निवडून दिलेल्या खासदारांचं आहे. तेच तुमचे प्रतिनिधी म्हणून पंतप्रधान निवडतात. जर तुम्ही इथं योग्य प्रतिनिधी निवडलात, तर तो योग्य प्रधान निवडेल. जो पुन्हा कर्तव्य समाजसेवा म्हणून करेल! म्हणून कधीच पंतप्रधानाचा किंवा मुख्यमंत्रीचा चेहरा बघून मतदान करू नका! समजलं!" चेहऱ्यावरची प्रसन्नता लोपू न देता माननीय विद्यमान पंतप्रधान मिहीरला लोकशाही व्यवस्था संक्षेपमध्ये समजावून सांगत होते.

"ह... हो सर!" आपली चूक लक्षात येऊन मिहीर कचरत बोलला.

मग पंतप्रधानांनी एका मित्राच्या खाद्यांवर हात ठेवावा तसा हात ठेवला आणि ते त्याला म्हणाले,

"आणखीन एक लक्षात ठेव, कधीच कुणाचा फॅन बनू नको! अशाने आपण आपली सारासार विचार करण्याची क्षमता गमावतो आणि आपल्या आवडत्या व्यक्तीची प्रत्येक गोष्ट मग ती चुकीची का असेना दुर्लक्ष करत जातो, किंबहुना ती बरोबरच मानून स्वतःच त्याचं समर्थन करू लागतो. ती व्यक्ती सोडून आपण दुसरं काही बघतच नाही. मग कुणी त्या व्यक्ती विरुद्ध योग्य टीका जरी केली, तरी आपण टीका करणारा किती बरोबर आहे हे न बघता टीका करणाऱ्यावर राग धरतो.

"आणि हे स्वतःसाठीही आणि समाजासाठीही पोषक नसतं. जरुरीचं नाही तुम्ही कुणामागे गेलंच पाहिजे. मत देताना पक्ष, व्यक्ती बघू नका. तो योग्य आहे का याची चाचपणी करा. मग मतदान करा. जर तुम्ही निवडलेल्या लोकप्रतिनिधीकडून काही चुकत असेल तर

त्याला प्रश्न करण्याचा अधिकार तुम्हाला आहे! त्याच्या चुकीच्या निर्णयाची आलोचना करण्याचाही अधिकार तुम्हाला आहे! नोरण्यात त्रुटी असतील त्याला सूचना करण्याची जबाबदारी तुमची आहे! स्वतःच त्या चुकांवर पांघरून घालू नका.

"त्यामुळे तुमच्या प्रतिनिधींना तपासत रहा. स्वतःला तपासत रहा. मत दिलं म्हणजे आपलं काम संपलं. आता पुढंची पाच वर्षे मी निवडलेला व्यक्ती काय ते बघून घेईल आशा भ्रमात राहू नका. सरकार कुचकामी ठरत असेल, तर जनतेला सूत्रे हाती घ्यावी लागतात. सो, नेहमी डोळस रहा. विवेकबुद्धी जागी ठेवा!" पंतप्रधान मिहीरला सामान्यज्ञान देत होते.

मिहीर आता खरंच डोळस होऊन ते ग्रहण करत होता.

"तुझ्या जवळच्या जेवढ्या लोकांना हे सांगू शकशील तेवढ्या लोकांना सांग! त्यांना सजग कर!" ते मिहीरला म्हणाले.

आणि ते हसले,

"चूक आपल्या लोकांची नाही! आपल्याकडे नागरिकशास्त्रच इनमिन पाच दहा मार्काला आहे. शिवाय आपले विद्यार्थी फक्त मार्कांसाठीच तर अभ्यास करतात. काही नवीन शिकण्यासाठी नाही! आणि म्हणून आपण शिकून अडाणी राहतोय!

"ज्ञान मिळवणं ही खूप रसभरीत आणि सूंदर गोष्ट आहे, पण हा आनंद आपले विद्यार्थी गमावतात. आपले शिक्षक सुद्धा त्यांना हे समजावून सांगत नाहीत आणि जागतिक स्पर्धेला घाबरलेल्या पालकांबद्दल तर न बोललंच बरं..." पंतप्रधान हसत बोलत होते, पण देशाच्या भविष्यच्या चिंतेने आलेली निराशा त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. ते पुढं म्हणाले,

"आपल्याला हवं आहे, आधी उत्तम चरित्र निर्माण करणं! वैयक्तिक स्वार्थातून दूर झाल्याशिवाय आपण एक महान राष्ट्र नाही बनू शकत!"

"पण सर? बरेच लोक देशाची काळजी आहे म्हणूनच तर त्यांना योग्य वाटणाऱ्या पंतप्रधानपदाचा उमेदवार पाहूनच त्याच्या पार्टीला मतदान करतात. त्यांना स्वार्थी कसं म्हणता येईल?" मिहीर थोडा विचलित झाला होता.

"तू त्यातला आहेस!" पीएम हसत म्हणाले.

मिहीर काहीच बोलला नाही. त्याला लाजल्यासारखं झालं...

"देतो. या प्रश्नांचं पण उत्तर देतो. बघ मी यांना स्वार्थी किंवा मूर्ख म्हणत नाही. मी यांना इनोसंट म्हणतो. पण माझ्या दृष्टिकोनात असे लोकच समाजासाठी जास्त घातक असतात. आणि आपल्या समजांना ज्ञान समजून ते घमेंडी व उद्धट पण झालेले असतात. आणि पुन्हा तेच; त्यांना जर खरंच समाजाची चिंता आहे ना, तर त्यांनी त्यांच्या त्यांच्या विभागातला योग्य उमेदवार प्रतिनिधी म्हणून निवडावा. कारण तुमचा तुमचा विभाग डेव्हलप झाला, तर पर्यायाने देशच डेव्हलप होईल, एकटा पंतप्रधान काहीच करू शकत नाही. त्याला तितक्याच चांगल्या व काम करणाऱ्या सहकाऱ्यांची गरज असते म्हणून असे सहकारी संसदेत पाठवा. विधायक योग्यतेचे असतील, तर ते आपला नेता देखील तितकाच योग्य निवडतील!"

मिहीरला पंतप्रधानांनी सांगितलेल्या गोष्टी समजल्या तर होत्या, पण तो आश्चर्यचकित होता. कारण देशाच्या इतिहासात तो पहिल्यांदाच असा पंतप्रधान पाहत होता, जो 'मला मत देऊ नका' असं म्हणत होता!

पण यामुळे मिहीरच्या मनात पुनीत चिंतपल्ली यांच्याबद्दल असलेला आदर आणखीच वाढला व त्यासोबतच 'फॅन' असण्याची भावना मात्र लोप पावली...

"सॉरी सर! आणि थँक्यू!" मिहीरने दोन्ही भावना एकदमच व्यक्त केल्या. पूर्वी अंधपणाने मतदान केल्याने माफी मागितली आणि आत्ता पुढील मतदानासाठी स्वतः पंतप्रधानांकडून योग्य मार्गदर्शन मिळाल्याने आभार!

"तुला पाहून एक कल्पना सुचली!" पंतप्रधान चमकल्यासारखे एक्साईट होत म्हणाले.

"काय सर?" मिहीरने न राहून विचारलं.

"मी विचार करतोय, शाळेत संविधान शिकवणं कम्पल्सरी करावं!" पीएमनी सुचलेली कल्पना बोलून दाखवली.

"हो पण त्यावर परीक्षा घेऊन मार्क्स देवू नका. नाही तर मुलं पुन्हा मार्क्ससाठी ते वाचतील आणि मूळ उद्देश बाजूलाच राहील!" मिहीर स्मित करत म्हणाला.

आणि आपण हे बोलून प्रमाद केलाय हे अचानक त्याला उमगलं तसा तो कचरला.

पण हे पाहून पंतप्रधानच खळखळून हसले. कारण मिहीरचं बोलणं रास्त होतं! त्यांचं हसणं मिहीरची सूचना त्यांना पटल्याचं चिन्ह होतं.

"बरं ये आता. सांभाळून रहा!" पीएम त्याची पाठ थोपटत म्हणाले.

"हो सर!" मिहीर सल्युट करत म्हणाला.

आणि त्याने दार उघडले. आपला फोन संपवून पीए शुक्ला बाहेर दरवाजासमोर येऊन उभा राहिला होता. मिहीरने स्मित करून त्यांचाही निरोप घेतला.

शुक्ला देखील हसला, पण त्याच्या नजरेत बेरकीपणा होता.

मिहीर लिफ्टमध्ये शिरला. लिफ्ट बंद झाली, तसा शुक्ला पीएमच्या खोलीत शिरला आणि आतून दार लावून घेतलं.

## ८. नवीन कारस्थान (अ न्यू कॉन्स्पिरसी)...

शक्तीची कावासाकी (आता शक्तीचीच) एका पेट्रोल पंपला लागली होती...

"साहेब किती?" पेट्रोल भरणाऱ्या कर्मचाऱ्यांने विचारलं.

"फुल करा!" शक्ती म्हणाला.

त्या कर्मचाऱ्याने शक्तीला हवी तेवढी त्याच्या गाडीची टाकी भरली. गाडीत पाच लीटर तेल होते, पण शक्तीला जे काम करावं लागणार होतं, त्यासाठी त्याला किती हिंडावं लागणार हे त्याला देखील माहीत नव्हतं. म्हणून त्याने सतरा लीटरची फ्युल टॅन्क पूर्ण भरण्याचा निर्णय घेतला होता...

"अलीकडे पेट्रोल बरंच महागलंय नाही?" फ्युल डिस्पेन्सरच्या डिजिटल डिस्प्लेच्या आकड्यांवर नजर लावलेला शक्ती पाकिटातून नऊशे साठ रुपये काढून देत त्या कर्मचाऱ्याला म्हणाला.

"होणारच ना साहेब. पेट्रोलच का? सगळंच महागलंय. तिकडं आखाती देशांत युद्धं चालू आहेत, त्याची भरपाई आपण करतोय! या महागाई पायी पुढल्या इलेक्शनला हे सरकार घरी बसतंय का नाही बघा!" कर्मचारी हसत म्हणाला.

"होय!" शक्तीने हसत दुजोरा दिला आणि त्याने गाडी बाहेर काढली.

कर्मचारी दुसऱ्या गाडीची टाकी भरण्यास पुढं सरकला होता...

शक्तीची गाडी शहराच्या मध्य हायवेवर धावत असताना शक्तीला कॉल आला... त्याने बाईक बाजूला लावून कॉल घेतला.

"असाईनमेंट आली आहे. कम फास्ट!" डॅनियल बोलला.

"कुठे?" शक्तीने विचारलं.

"नाईट क्लब!" पलीकडील डॅनियलचा आवाज.

मग शक्तीची बाईक नाईट क्लबच्या दिशेने वळली...

येऊन थांबली ती नाईट क्लबला. तो बाईकवरून उतरला आणि ज्या दोन - चार पायऱ्या होत्या त्या चढून आत गेला.

आत, दरवाजाजवळ एक माणूस थांबला होता. हा या क्लबचा मॅनेजर. दिसण्यावरून तरी ब्राऊन... शक्तीला पाहून त्याने मागून येण्याची त्याला खूण केली आणि तो त्याला त्याच्या केबिनमध्ये घेऊन गेला.

केबिनमध्ये अक्षरशः अंधार होता.  डॅनियल स्कॉचचा ग्लास घेऊन खिडकीजवळ उभा होता. त्या खिडकीला रोलर शटर कर्टन्स बंद होते. पण त्यातून डोकावणारा सुर्यप्रकाश फटींतून आत आल्याने तीव्र होत डॅनियलच्या मुखमंडलाला प्रकाशित करत होता. डॅनियल ड्रिंक घेऊन उभा होता, पण त्याने तो एकदाही ओठाला लावला नव्हता. त्याच्यापासून थोडं दूर पण त्याच्याकडे पाहत पीएमला मारण्याचा प्रयत्न करणारी व्यक्ती उभी होतीच.

मॅनेजर मागून शक्ती केबिनमध्ये प्रवेशला. मॅनेजर मग त्याला डॅनियलला सुपूर्द करून केबिन बाहेर पडला. शक्ती थोडं पुढं चालत जात त्याने शोल्डर होलस्टरला लावलेली त्या

माणसाची हँडगन काढून त्या माणसाकडे टॉस केली. त्या माणसाने ती झेलली व आपल्या ब्लेझरच्या आत असलेल्या होलस्टर मध्ये खोवली.

ती व्यक्ती तिथं असल्याने डॅनियलच्या त्याला बोलावण्याचा अर्थ शक्ती उमगून होता, पण तरी डॅनियलकडून काही विचारणा होईना. तो रोलर शटरच्या फटींतून बाहेर पाहत ग्लास हातात धरून तसाच उभा होता...

"थँक गॉड! फायनली काम आलं!" शक्ती बोलणं चालू व्हावं म्हणून थोडं पुढं होत म्हणाला.

"यु नो माय फ्रेंड! मी पण पिणं क्विट करायचं म्हणतोय. तुझं म्हणणं बरोबर आहे. कामं मार्गी लावायची असतील, तर शुद्धीत रहाणं गरजेचं आहे!" डॅनियल बाहेर पहातच बोलला. हातातील स्कॉचचा ग्लास उपडा करून त्याने पायांत फ्लोअरवर सांडवली.

केबिन खूप उंचीवर होतं. खालून जाणाऱ्या गाड्या, माणसं लहान लहान भासत होती...

"काय झालंय डॅन? काम काय आहे?" शक्तीने गंभीर होत विचारलं.

"तू प्राईम मिनिस्टरला भेटायला का गेला होतास?" डॅनियलने बाहेर पहात विचारलं.

"नाही सांगू शकत!" शक्ती म्हणाला.

"का?" आवाजात जरब आणत पण बाहेर पहातच डॅनियलने विचारलं.

"मी एक असॅसिन आहे! आणि माझे काही नियम आहेत!" शक्ती ठामपणे म्हणाला.

"आणि ते नियम काय आहेत?"

"तू मला काम देणार असशील तर सांगेन!" शक्ती ठामपणे म्हणाला.

"बोल!" डॅनियल खिडकीतून बाहेर पहातच उद्गारला. तुला काम मिळेल हा त्याचा अर्थ होता.

"ओके! माझा पहिला नियम; मी माझ्या क्लायंट्सचे नांव, त्याचे काम किंवा त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे सिक्रेट शेयर करत नाही! नियम दोन; काही झालं, तरी घेतलेले काम पूर्ण करायचंच! मग त्यासाठी काहीही सॅक्रीफाईज करावं लागलं, तरी चालेल!"

"आणि तिसरा नियम?"

"पहिले दोन्ही नियम पाळणे!" शक्तीने भूमिका स्पष्ट केली.

"म्हणजे तू नाही सांगणार, की तू पीएमला का भेटायला गेला होतास?" शांत स्वरात डॅनियलने विचारलं.

"नाही!" शक्तीचं दृढ उत्तर!

"सो बी विथ इट!" म्हणत डॅनियल खिडकी पासून दूर झाला,

"मिहीर म्हणून एक सिक्रेट एजंट आहे. तो माझ्यापर्यंत पोहोचला आहे!"

"होऊन जाईल!" शक्ती त्याला पुढं काही न बोलू देता म्हणाला.

"गुड! पण तू जर पकडला गेलास, तर काय होऊ शकतं हे तू जाणून आहेस!" डॅनियल शक्तीसमोर त्याच्या नजरेत नजर घालून म्हणाला. रिकामा ग्लास अजूनही त्याच्या हातातच होता.

"यु नो माय मोरल्स! जीव जाईल, पण तुझं नांव बाहेर काढणार नाही!"

"त्याबाबतीत मी तुझ्यावर विश्वास ठेवतो. म्हणूनच तुला हे काम देतोय!"

"त्याचा फोटो?"

"मिळेल! आणि हा तुझ्यासोबत जाईल!" खोलीतील त्या तिसऱ्या माणसाकडे ग्लास असलेल्या उजव्या हाताने निर्देश करत डॅनियल शक्तीला म्हणाला. तोच ज्याच्या पासून शक्तीने पंतप्रधानांना वाचवलं होतं.

"तुझा माझ्यावर अजून विश्वास बसत नाही तर?!" शक्तीने नाराजी स्मित करत डोळे खाली करत विचारलं.

"अशा कामात स्वतःवरही विशावस ठेवू नये!" डॅनियल बोलला,

"याचा तुला बॅकअप म्हणून उपयोग होईल!" डॅनियल पुढं शक्तीला म्हणाला.

"हा!" शक्ती कीव करत हसला!

रागाची तीव्र रेषा त्या माणसाच्या चेहऱ्यावर उमटली. तो शक्तीला मारण्यासाठी पुढं झाला, पण डावा हात मधे घालून डॅनियलने त्याला थांबवलं. त्या माणसाला डॅनियलचं ऐकण्याशिवाय पर्याय नव्हता. किंबहुना तो समोर असताना तर नाहीच! तो माणूस थांबला. मागे झाला.

"का? काय झालं?" डॅनियलने शक्तीच्या डोळ्यांत रोखत विचारलं.

"तुला याने ही चुगली तर केली, की मी पीएमला भेटलो. पण याने तुला हे सांगितलं, की तो तिथं काय करत होता?" शक्तीने पथेटिक हसत त्याने डॅनियलला विचारलं.

"त्याला मीच पीएमच्या मागे पाठवलं होतं!" डॅनियल म्हणाला.

"फक्त एवढंच?" शक्तीने विचारलं.

आणि डॅनियलच्या कपाळावर आठ्या उमटल्या. त्याने त्या माणसाकडे पाहिलं,

"व्हॉट डीड यु डू देअर?" डॅनियलने कठोर शब्दांत विचारलं.

"तो बोलेल असं वाटतं तुला? माणसाला दुसऱ्याच्या चुका दिसतात, पण आपले मोठे गुन्हे सुद्धा दिसत नाहीत!" शक्ती हसतच होता.

"म्हणजे? काय केलंय यानं?" डॅनियल चिडून म्हणाला.

"ही ट्रायड् तू किल द प्राईम मिनिस्टर!" शक्तीने त्या माणसाची कृती विदित केली.

"व्हॉट?" डॅनियल अक्षरशः किंचाळलाच!

"तुला काय वाटतं, त्याची गन माझ्याकडे कशी आली असेल? आणि याचा चेहरा कसा सुजला असेल?" शक्तीने स्मित ओसरू न देता विचारलं.

"तू अडवलंस त्याला?"

"हो!"

"तुमचं काय चाललं आहे, मला माहित नाही! मला ते जाणूनही घ्यायचं नाही! पण याला एवढीही अक्कल नाही, की याने जर पीएमला मारलं असतं, तर काय झालं असतं! आणि हा मला बॅकअप देणार! रेहने दो!" शक्ती पुन्हा हसला.

"आणि म्हणून तू त्याला रोखलंस!"

"याप्!" शक्ती उच्चारला.

"मॅनेजर!" डॅनियल शक्तीच्या डोळ्यांत डोळे घालून चिडून ओरडला!

मॅनेजर काय ते समजला होता. कारण येताना तो नम्याला केबिनमध्ये सोबत घेऊन आला होता!

नम्या अस्वस्थ वाटत होती. तिच्या तोंडातील लाळ सुखली होती. तिची नजर कमजोर व अंधुक झाली होती. शरीरी कृश दिसत होती. अंगावर पुरळ उठले होते. शिवाय तिच्या हृदयाचे ठोके वाढले होते... रक्तदाब वाढला होता. कोणत्याही क्षणी ती तोल जाऊन पडेल अशी तिची अवस्था होती. डोळे उघडे ठेवण्याचा ती मोठ्या कष्टाने प्रयत्न करत होती. मॅनेजरने तिला दरवाजाला लागूनच असलेल्या खुर्चीवर बसवलं आणि तो निघून गेला.

शक्ती गोंधळून तिच्याकडे पाहत होता.

"पूर गर्ल! नेहमी डिप्रेशन मध्ये असते. म्हणून तिला अँटीडिप्रेसन्ट घेण्याची सवय आहे. तिने आज जरा ड्रग बदलून बघितलं. ट्रायसिक्लीक अँटीडिप्रेसन्ट! याचा ओव्हरडोस खूप फेटल असतो! तू येण्याच्या काही मिनिटं आधीच ही डोस घेऊन बसली आहे... तिच्याकडे फक्त ट्वेन्टी मिनिट्स आहेत!" डॅनियल रिस्टवॉचवर नजर टाकत थंडपणे पण धमकीच्या सुरात म्हणाला.

शक्ती अगदीच विचलित होऊन तो नम्याकडे पाहत उभा होता.

डॅनियलने ग्लास जमिनीवर सोडून दिला. शक्तीच्या व त्याच्या पायांच्या मध्ये पडून तो फुटला. डॅनियलने शांतपणे आपली पॅन्टेत खोवलेली 'ग्लॉक 19' बाहेर काढली आणि नम्याकडे डोळ्यांत आसवं घेऊन पहात उभ्या शक्तीच्या डोक्याला लावली!

"नाऊ स्पीक! आदर व्हाईस शी विल लूज द चान्स ऑफ लिविंग!" डॅनियल शक्तीला म्हणाला.

शक्ती अहाय्यपणे नम्याकडे पाहत होता...

"बोल! तू पीएमला भेटायला का गेला होतास?" शक्तीच्या डोक्यावर लावलेली गन त्याच्या डोक्यावर रूतवून डावीकडे उजवीकडे फिरवत डॅनियलने विचारलं!

"ही इज माय क्लायंट!" शक्तीच्या डोळ्यांतले पाणी क्षणार्धात सुखले आणि डोळे पुन्हा राकट झालेलं होते.

"काय काम आहे त्याचं?"

"मी नाही सांगू शकत! क्लायंटची आयडेंटिटी रिव्हील करून मी एक रूल मोडला आहे. दुसरा नाही मोडणार!"

"आय नो, यु डू नॉट स्केअर् ऑफ डेथ! पण तू जर बोलला नाहीस, तर पीएम मरेल! आय नो यु डोन्ट वॉन्ट हिम टू डाय सिन्स ही इज युअर क्लायंट! बट नाऊ; ही विल, इफ यु रिमेन क्वाईट! सो ओपन योर् माऊथ!" डॅनियलने भुवया उडवत उपकार केल्यासारखी क्रूरतापूर्वक ऑफर दिली.

डॅनियलने धमकी देऊन शक्तीने तोंड उघडलं नाही! तो फक्त डॅनियलच्या डोळ्यांत जळजळीत नजरेने पाहत राहिला.

"स्पीकअप बॉय! यु हॅव टू सेव योर् गर्ल अलसो! सो स्टॉप वेस्टिंग टाईम!" कुटील स्मिताची लकेर ओठावर खेचत डॅनियल शक्तीला म्हणाला. त्याची ग्लॉक अजूनही शक्तीच्या डोक्याला होतीच!

"जर मला तुझं म्हणणं पटलं, तर मी तुला माफ करेन!" डॅनियल पुढं शक्तीला म्हणाला.

शक्ती काही न बोलता शांतच राहिला... दोन-तीन मिनिटं अशीच गेलीत...

मग डॅनियलनेच त्याची गन खाली घेतली!

"आय रिस्पेक्ट युअर ओर्डीनन्स्! टेक हर् अँड लिव!" डॅनियल शक्तीला म्हणाला.

शक्ती थोडावेळ थांबला. डॅनियल सत्य बोलतोय का ते त्याला पडताळून पहायचं होतं, पण डॅनियलने काहीच हालचाल केली नाही. म्हणून तो खरं बोलतोय याची त्याला खात्री पटली.

आणि तो नम्याकडे धावला.

"तो तिला खुर्चीवरून उभा करत असतानाच...

"सोमेश!" डॅनियल ओरडला.

शक्तीने त्याच्याकडे पाहिलं. डॅनियलने त्याच्या बीएमडब्ल्यूची चावी खिशातून काढून त्याच्याकडे फेकली.

"जॉईन मी लेटर्!" तो म्हणाला.

शक्तीने चावी झेलली होती. त्याने नम्याला हातामध्ये उचलून घेतलं आणि तो केबिन बाहेर पडला...

तक्षणी डॅनियल त्या माणसाकडे वळला. डॅनियलच्या रागाची सीमा नव्हती! डोळे लाल भडक झाले होते! त्याने त्या माणसाला पोटात जोराचा गुद्दा मारला. तो माणूस डॅनियलच्या हातावर वाकला! डॅनियलने त्याच्या कॉलरला धरून त्याला वर केलं. तो माणूस वेदनेने विव्हळत होता!

"तुला मी पीएमवर फक्त नजर ठेवायला सांगितली होती! मग का त्याला मारण्याचा प्रयत्न केलास?" त्या माणसाला अगदी तोंडाजवळ घेऊन डॅनियल ओरडला.

"मी मारणार नव्हतोच! पण तिथं या सोमेशला पाहिलं आणि मला वाटलं हा आणि पीएम मिळून आपल्याला संपवतील. म्हणून..." तो माणूस खजील होत बोलला.

"मग याला का नाही उडवलास? पीएमला टार्गेट करण्याची काय गरज होती?" डॅनियल पुन्हा ओरडला.

"पीएमला मारलं असतं, तर विषयच संपला असता! म्हणून..."

"पुन्हा 'म्हणून'! स्वतःचं डोकं चालवणं बंद कर!" डॅनियल त्या माणसाच्या तोंडावर थुंकी उडवत ओरडला.

"पण जर पीएम मेला असता, तर संसदेत त्याचं कॅबिनेट डिसॉल्व्ह् झालं असतं! अशा परिस्थितीत त्यांचे एमपीज् खरेदी करून आपण सत्तेत येऊ शकलो असतो!" तो माणूस म्हणाला.

"डू यू रिअली थिंक थिस इज दॅट सिंपल?! यु आर् सच अ मोरॉन!" असं म्हणत डॅनियलने त्या माणसाच्या बुद्धीची तुलना सात वर्षांच्या बालकाशी केली होती!

डॅनियलने त्या माणसाची वाढलेली केसं दोन्ही मुठीत आवळली आणि ती डोक्याच्या मागे खेचली. त्याबरोबर त्या व्यक्तीचं डोकं डॅनियलने लावलेल्या जोरामुळे मागे गेलं... तो माणूस कळवळला. शरीराने कणखर असलेल्या त्याच्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं. वेदनेने त्याने डोळे घट्ट मिटून घेतले होते. त्यामुळे ते पाणी त्याच्या पापण्यांच्या कडांनी बाहेर छलकलं आणि कनपट्टी पासून खाली ओघळलं!

"तेवढा वेळ नाही आपल्याकडे! विसरू नको! प्रेसिडेंट त्यांच्याच पक्षाचा आहे! तो त्यांचीच आयडीऑलॉजी पाळतो! त्याने एमिडीएट्ली एक्टिंग प्राईम मिनिस्टर अपॉईंट केला असता आणि त्यावेळी त्या मेम्बरला आपली मेजॉरीटी इन्स्टंट्ली प्रुव्ह करणं शक्य झालं असतं! नंतर त्यांनी वेळ न लावता मेबी फुलटाईम प्राईम मिनिस्टर सुद्धा अपॉईंट केला असता! बट अदरव्हाईज, देअर इज ओन्ली फ्यू मंथ्स् लेफ्ट फॉर दि न्यू इलेक्शन्स्, केअर टेकर प्राईम मिनिस्टर वुड हॅव हँडल्ड् दि गव्हर्नमेंट टिल दि नेक्स्ट इलेक्शन्स!

"अँड आबाऊ ऑल; तू म्हणतोयस तसं झालं असतंच, तरी पुढच्या वर्षी जेव्हा पुन्हा इलेक्शन्स लागतील. अशावेळी प्रामाणिक नसलेल्या उमेदवाराला कोण पुन्हा निवडून देईल? पुढील पाच वर्ष आपली वाया गेली असती. आणि आपण जे घडवून आणलं आहे त्याला काही अर्थ राहिला नसता! पुन्हा आपली सत्ता यायला अनेक वर्षे वाट पहावी लागली असती! म्हणून तू म्हणतोस ते करून काही उपयोग नाही! त्यामुळेच तर पीएमला जिवंत ठेवून आपण पुढील इलेक्शन्ससाठी पार्श्वभूमी तयार केली होती! कळलं???"

डॅनियलने अजूनच जोर लावून त्याची केसं खेचली. तो 'कळलं' हे खूप मोठ्याने किंचाळला होता. जेणे करून तो जे बोलतोय ते त्या माणसाच्या मनावर व पर्यायी बुद्धीवर कोरलं जावं!

"पुन्हा आपलं डोकं चालवू नको! जेवढं सांगितलं जातंय तेवढंच करायचं! मला माझा कोणताही माणूस या प्रकरणात कुठेही अडकू द्यायचा नाही! फॉर् मी, टाईट सिक्ररी इज दि बेस्ट हाईड आऊट! अँड डोन्ट यु डेअर् टू र्युन इट!

"म्हणून तर मी प्रत्येक रिस्की कामासाठी बाहेरील माणसं अपॉईंट करतोय!"

डॅनियलने त्या माणसाला मागे ढकललं. त्याचं आधीच मागे वाकवलेलं डोकं दानकन् त्याच्या मागील भिंतीवर आदळलं!

"यु आर माय स्टेप ब्रदर् अँड फॉर दॅट रिजन, थिस टाईम आएम लेटिंग यु गो! पुन्हा चूक केलीस, तर जिवंत ठेवणार नाही!" डॅनियल लायटरने सिगार जाळत म्हणाला.

बाहेर डॅनियलची कन्वर्टीबल उभी होती. त्याचे छत उघडेच होते. शक्तीने नम्याला पॅसेंजर सीटवर बसवलं. दार बंद केलं आणि तो ड्रायव्हिंग सीटकडे आला. त्याची खूप गडबड होत होती... तो दार न उघडताच उडी मारून गाडीत बसला आणि ती गाडी वेगाने हॉस्पिटलच्या रस्त्याला धावू लागली... त्याचा वेग मोजण्याच्या पलीकडे होता...

फक्त ४.९ सेकंदात शून्य ते शंभर किमी प्रती तास गाठणाऱ्या त्या लाल बीएमडब्ल्यू सिरीज - 'झी 4' मॉडेल - 'एम 40 आय' चा प्रचंड वेग रस्त्यावरील बघणाऱ्यांच्या दृष्टी समोरून क्षणार्धात ती गाडी अदृश्य करून गेला...

गाडी असिमीत वेगाने ट्रॅफिक मधून वाट काढत धावत होती. शक्ती डायव्हिंगमध्ये इतका प्रवीण होता, की एकाचवेळी तो नम्याकडेही लक्ष देत होता आणि त्या भाऊगर्दीतून गाडी देखील काढत होता...

त्याला विचलित म्हणता येणार नाही, पण तो थोडा चिंतित नक्कीच होता...

ती बीएमडब्ल्यू हॉस्पिटलच्या प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांना लागली. शक्ती उडी मारुनच गाडीतून उतरला आणि नम्याच्या साईडला गेला.

एक कंपाऊंडर तिथून बाहेर येत होता.

"तुम्ही इथं गाडी पार्क करू शकत नाही!" त्याने ओरडून शक्तीला सूचना केली.

"हिला पोयजनिंग झालंय!" शक्ती दार उघडून नम्याला हातांत उचलून घेत शक्ती झिटीने ओरडला.

आणि नम्याला उचलून घेऊनच तो हॉस्पिटलमध्ये पळाला. मागून तो कंपाऊंडर आत आला. त्याला ज्या कामासाठी जायचं होतं ते त्याने लांबणीवर टाकलं होतं. तो शक्तीच्या पुढं जाऊन एक स्ट्रेचर घेऊन आला. त्याच्या सोबत आणखी एक कंपाऊंडरला तो घेऊन आला होता...

शक्ती पाशी येऊन त्यांनी स्ट्रेचर थांबवलं. शक्तीने गडबडीने नम्याला ट्रेचरवर ठेवलं. स्ट्रेचर ओ.टी.कडे धावू लागले. शक्ती कंपाऊंडर्स सोबत त्या स्ट्रेचरला ढकलत होता...

"तू जा डॉक्टर साहेबांना घेऊन ये!" स्ट्रेचर घेऊन आलेला कंपाऊंडर सोबत आलेल्या कंपाऊंडरला म्हणाला.

तो कंपाऊंडर स्ट्रेचर सोडून डॉक्टरच्या केबिनकडे धावला...

ऑपरेशन थिएटर बाहेर शक्तीला कंपाऊंडर  थांबवले. आणि तो एकटाच ते स्ट्रेचर ढकलत आत घेऊन गेला.

काही वेळात डॉक्टर त्यांना बोलवायला गेलेल्या कंपाऊंडर सोबत आले. विचलित शक्ती ओ.टी.कडे पाहत उभा होता. डॉक्टरनी त्याला हाक मारली,

"एक्स्क्यूज मी!"

शक्ती त्याच्याकडे वळला.

"काय झालंय पेशंटला?"

"अँटी रिलॅक्सटंटचा ओव्हर डोस झालाय!"

"ओके! काउंटरवर जाऊन प्रोसिजर पूर्ण करा."

शक्ती जागीच खिळला होता.

"जा. मिस्टर नाईक. आम्ही आहोत काळजी घ्यायला. घाबरू नका. जा!"

शक्ती तेथेच थांबला. डॉक्टरला समजलं, की त्याला काही महत्वाचं बोलायचं आहे. सो हे समजून डॉक्टरने सोबतच्या कंपाऊंडरला ओ.टी.त जायला इशारा केला.

"शिर्के. आत तयारी करा जा!" डॉक्टर कंपाऊंडरला बोलला.

कंपाऊंडर ऑपरेशन थिएटरमध्ये आत पळाला.

"पोलिसांना इंफॉर्म करावं लागेल?" कंपाऊंडर गेल्याचं पाहून मग शक्तीने विचारलं.

"मी तुम्हाला ओळखत नाही का? त्याची काही गरज नाही. पण या आहेत कोण?"

"महत्वाच्या साक्षीदार आहेत. मी तुम्हाला यापेक्षा जास्त काही सांगू शकणार नाही! पण प्लिज माझी खरी ओळख पेशन्टला किंवा इतर कोणालाही कळू नये ही विनंती आहे." शक्तीने याचना केली.

"नाही कळणार!" डॉक्टरने आश्वस्त केलं.

"थँक्स!" शक्ती कृतदनतेने म्हणाला,

"आणखी एक विनंती होती..." तो संकोचत बोलला.

"बोला ना."

"मी रिजाईन केलं असलं, तरी आता पोलिसांसाठीच काम करतोय. पण पोलीस इथं आले, तर माझा एक मोठा प्लॅन खराब होईल म्हणून पोलिसांना इथं प्रोटेक्शनसाठी मी बोलवू शकत नाही. प्लिज तुम्ही देखील पोलिसांना काही कळवू नका. फक्त तुमच्या सिक्युरिटीला सावध रहायला सांगा!" शक्तीने विनंतीचा सुरात सूचना केली.

"तुम्ही निश्चिंत रहा नाईक!" डॉक्टरने शक्तीला आश्वासन दिलं.

व शक्तीची नकळतच मान डोलली आणि त्याचे पाय रिसेप्शनकडे वळले...

रिसेप्शन काऊंटरवर शक्तीला दिलेले काही पेपर्स सोमेश राजमाने म्हणूनच त्याने साइन केले. सोमेशच्या नांवे बनवलेल्या कार्डने पेमेंट केलं. पेपर्स रिसेप्शनिस्टला परत करत असतानाच शक्तीचा फोन घणाणला.

"फोन नॉट अलाव्हड्!" रिसेप्शनिस्ट पेपर्स गोळा करत हळू आवाजात दटावत म्हणाली.

"सॉरी!" म्हणत शक्तीने मोबाईल पाहिला डॅनियलने दिलेल्या मोबाईलवर डॅनियलचा फोन आला होता. त्याने वॉल्युम बंद करून फोन चालूच ठेवला...

"लवकरात लवकर पोलिसांत रिपोर्ट करा!" रिसेप्शनिस्ट शक्तीला म्हणाली. तिचे हात पेपर्स फाईलला सेट करत होते.

"हो!" म्हणून शक्ती बाहेर पडला.

बाहेर येऊन शक्तीने डॅनियलचा कॉल घेतला...

"टाईम फॉर द जॉब!" त्या बाजूने डॅनियल बोलला.

"प्रॉमिस मी तू नम्याला काही करणार नाहीस!" शक्ती त्याला म्हणाला.

"तिला काही करायचं असतं, तर मी तुला तिला वाचवूच दिलं नसतं..." डॅनियल उच्चारला.

शक्ती तसाच गाडीत बसला. आणि गाडी क्लबकडे परतीला लागली...

पंतप्रधान पुनीत चिंतपल्ली यांचे प्रिन्सिपल सेक्रेटरी बिपीन शुक्ला यांची पंतप्रधान यांच्या रूमला लागूनच असलेल्या अलीकडील रूममध्ये सोय केली होती.

त्याचा उजवा कान मोबाईलला लागला होता.

"आय विल ट्राय! बट कान्ट गॅरंटी यु!" तो म्हणाला आणि विचार करू लागला...

त्याला काही सुचलं. तो उठला आणि खोली बाहेर पडला...

कोरिडॉरमध्ये डावीकडे काही अंतर चालून तो पीएमच्या खोली समोर उभारला. त्याला पाहून काही न बोलता इजंट्स कडून दार उघडलं गेलं.

तो खोलीत प्रवेशला. पीएम लाईव्ह कॉन्फरन्समध्ये होते. ते पाहून तो थबकला. पीएमची त्याच्यावर नजर गेली. त्यांनी हात करून 'पाच मिनिटं' असं दर्शवून तोच हात सोबतच्या सोफा चेअरकडे केला. हा बसण्यास निर्देश होता.

'वाट बघतो!' अशी शुक्लाने पीएमला खूण केली आणि तो दारापाशीच मागे हात बांधून उभारला. मग काही महत्वाचं जाणून,

"आईल् जॉईन यु लेटर्!" म्हणत पीएम यांनी लाईव्ह कॉन्फरन्स कॉल कट केला.

"आओ बैठो। बोलो!" पीएम शुक्लाला म्हणाले.

पीएमच्या आग्रहावरुन शुक्ला त्यांच्या बाजूला जावून बसला.

पण तो काही बोलला नाही.

"बोलो शुक्ला। कोई दिक्कत है?"

"एक्चुअली सर, आय थिंक वी मस्ट टेक एन आय न दॅट एजंट!"

"व्हाय? यू डोन्ट ट्रस्ट हिम्?"

"मुझे वह थोड़ा डाउटफुल लगा!"

"क्यों? ऐसा क्यों लगा तुम्हे?"

"वह नया है! फिर भी, उसका कोई तो रेकॉर्ड होना चाहिए! पर आप ने कहाँ, की उसका कोई रेकॉर्ड है ही नहीं! इसलिए..."

"वह इसलिए, की मैंने ही आयबी को उसका कोई रेकॉर्ड न बनाने के लिए कहा था! ताकि मैं उसका स्टेल्थली उपयोग कर सकूं!"

"पर फिर सर, क्रॉस चेकिंग तो करनी पड़ेगी!"

"तुमको इतना क्यों उसपर संदेह हो रहा है?"

"क्योंकि उसने लिंक्स अमेरिका से जुड़ रहे है ऐसा कहा, पर कोई प्रमाण नही दिया, जो उसकी बातों का समर्थन करते हो।"

"जब तुम यह कह रहे हो; मुझे भी ऐसा लग रहा है..." पीएम विचार करत म्हणाले,

"तो तुम करना क्या चाहते हो?" त्यांनी शुक्लाला विचारलं.

"मैं उसकी थोड़ी जानकारी इकट्ठा करना चाहता हूं!"

"तो करो! पर तुम यह करोगे कैसे?"

"प्रायव्हेट इन्वेस्टिगेटर को हायर करना होगा!"

"पर क्या तुम यहाँ किसी को जानते हो?"

"नहीं! पर मुंबई मैं पहचान हैं! उसे मैं बुला सकता हूं! पर इसके लिए मुझे उस नए आयबी ऑफिसर का फोटो चाहीए होगा। प्र उसका तो कोई रिकॉर्ड ही नहीं हैं।!"

"यह तो कोई समस्याही नहीं हैं! तुम वह बात छोड़ो! फोटो तुम्हे मिल जाएगा! जाओ आराम करो!"

"ठीक है सर!"

शुक्ला उठून गेला.

दार नीट लागल्याचं जागेवरूनच कन्फर्म करून पीएमनी एसपी सारंग गोखलेला एसपी ऑफिसमध्ये कॉल केला.

"हॅलो एसपी, पीएम बोलतोय."

"जय हिंद सर."

"जय हिंद! तुमचा तो ऑफिसर... मिहीर! त्याला कॉलवर घ्या!"

"हो हो सर!" एसपी गडबडीत बोलला आणि त्याने जाग्यावरूनच हाक मारली,

"मिहीर!"

त्याचा आवाज मिहीर पर्यंत गेला, की नाही माहीत नाही, पण एक कॉन्स्टेबल आत आला.

"मिहीरला बोलाव. अर्जंट आहे म्हणावं!" एसपी गडबडीतच.

"हो साहेब!" कॉन्स्टेबल बाहेर पळाला.

कॉन्स्टेबल मिहिरच्या डेस्कपाशी आला.

"एसपी साहेबांनी बोलावलंय" तो कामात व्यस्त मिहीरला म्हणाला.

"का?" फाईल पाहतच मिहीरने विचारलं.

"अर्जंट आहे म्हणाले. चला लवकर!" कॉन्स्टेबल त्याला बोलला.

मिहीरने वर पाहिलं, पण कॉन्स्टेबलकडे नाही. काही तरी त्याला स्ट्राईक झालं असावं. तो तक्षणी उठला आणि त्याने एसपीच्या केबिनकडे कूच केली.

केबिनच्या दार उघडून,

"मे आय?" फोन धरून बसलेल्या एसपीला मिहीरने विचारलं. तो बोलतोय असं वाटून त्याने हळू आवाजात विचारलं होतं.

"ये! तुझा कॉल आहे!" एसपी लँडलाईनचा हँडसेट मिहीरकडे समोर करत म्हणाला.

मिहीर प्रश्नचिन्ह चेहऱ्यावर घेऊन रिसिव्हर घेतला,

"हॅलो?" तो पुढे कोण आहे याचा अंदाज घेत म्हणाला.

"पीएम बोलतोय!" पलिकडून आवाज!

"जय हिंद सर!" मिहीर तशातशी सल्युट करत एक्सायटेड्ली म्हणाला.

"जय हिंद! आपली योजना वर्क होते आहे. जरा शक्तीसेनला कॉन्फरन्स वर घेता?" पीएम म्हणाले.

"हो सर! लगेच घेतो!" म्हणत मिहीरने रिसिव्हर मोबाईल खिशातून काढला आणि शक्तीचा मोबाईल शोधू लागला.

शक्तीचा मोबाईल नंबर सापडल्यावर त्याने मोबाईल डेस्कवर ठेवला आणि मोबाईलमध्ये नंबर बघून त्याने लँडलाईनचा डायल पॅड खटकवला...

शक्ती नाईट क्लबकडे ड्राइव्ह करत होता... त्याचा स्वतःचा मोबाईल वाजला...

त्याने मोबाईल काढून पाहिला... कोल्हापूर एसपी हेडक्वार्टरचा नंबर त्याला अनोळखी नव्हता.

त्याने लगेच गाडी बाजूला लावली. कॉल रिसिव्ह केला.

"हॅलो?" तो मोबाईलमधून बोलला.

"सर, मिहीर बोलतोय. दुसऱ्या लाईनवर पीएम आहेत!" मिहीर शक्तीला म्हणाला.

"गुड इविनिंग सर!" शक्ती थेट पीएमशी संवाद साधू लागला.

"गुड इविनिंग! मिस्टर शक्ती, तुम्ही तुमचा पॉईंट प्रुव्ह केला आहे. शुक्ला परपेट्रेटर्सना मिळाला आहे! काय तुम्हाला अजून हे कंटीन्यू ठेवायचं आहे? कारण तो मला मिहीरचा फोटो मागतोय! कशासाठी ते मी तुला सांगण्याची गरज नाही!" पीएम गंभीरपणे म्हणाले.

"हो सर! कारण एका मुलीचा जीव धोक्यात आहे! तिला मी कुठे सेफ जागी पण पोहोचवू शकत नाही, कारण ती आत्ता हॉस्पिटलमध्ये आहे... वी हॅव टु डू थिस! सॉरी मिहीर, पण आपल्याला आपल्या प्लॅनला मूव्हऑन करावं लागेल..." फुटपाठच्या कडेला लागलेल्या गाडीत बसून शक्ती बोलत होता.

"काहीच प्रॉब्लेम नाही सर! मला तुमच्यावर विश्वास आहे!" मिहीर धाडस दाखवत म्हणाला.

"मला तुला खरंच हिट करावं लागेल!" शक्तीने त्याला विचार बदलण्याची एक संधी दिली.

"मी पुन्हा तुम्हाला हेच सांगेन सर, आय ट्रस्ट यु!" मिहीरने शक्तीला चिंतामुक्त करण्याचा प्रयत्न केला.

"ठीक आहे तर मग मला फोटो पाठवून दे!" पीएम मध्येच बोलले.

"तुला लोकेशन पण सांगावं लागेल. एक काम कर, फोटो पाठवून लगेच तूच पीएम सरांच्याकडे जा. त्यांना सांग, की त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या माणसाच्या तुला काही लिंक्स मिळाल्या आहेत आणि त्या आधारावर तू सिराज नाईट क्लबवर त्याची शहनिशा करायला जाणार आहेस!" शक्ती त्याला म्हणाला.

"पण का सर?" मिहीरने विचारलं.

"त्यांचं काम सोपं करतोय! नाही तर तुला शोधायला त्यांचा वेळ जाईल आणि पर्यायाने आपलाही!" शक्ती म्हणाला.

तिकडे पीएम शक्तीच्या या अघोरीपणावर अक्षरशः चिंतित होत चालले होते,

"थांब शक्ती! तू असं काही करू नको! आपण शुक्लाला ताब्यात घेऊ. त्याच्या थ्रू आपण सगळ्या कुलघातकांपर्यंत पोहोचू!" काळजीत पडलेले पंतप्रधान शक्तीला थांबण्यास सांगत होते...

"ते तर करायचं आहेच सर! पण शुक्ला तर एक पॉन आहे! सो डज दॅट डॅनियल! एक मोठं चित्र आपल्या समोर खुलं व्हायचं असेल, तर आपल्याला मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचावं लागेल. आपल्याला अंदाज आहे या मागे कोण असू शकतात, पण त्यांच्या आयडेंटिटीज् रिव्हील झाल्याशिवाय आपल्याकडे प्रुफ्स् असणार नाहीत. आणि प्रूफ शिवाय आपण काही करू शकणार नाही! ते मिळवण्यासाठी मला डॅनियलच्या गुडबुक्समध्ये रहावं लागेल. आणि

यासाठी मला त्याचा विश्वास मिळवायला हवा. हे करणं गरजेचंच आहे. म्हणून घाई करून चालणार नाही!" शक्ती पीएमना समजावत होता.

मग पीएम देखील हतबुद्ध झाले,

"डु एज यु विश्! मिहीर, हॉटेलच्या नंबरवर फोटो फॅक्स करा!" पीएमनी फोन कट केला.

"मिहीर, फोटो पाठव! आपला एग्झेक्युशन पॉईंट असेल, दसरा चौक! रात्री एक वाजता!" शक्तीने इन्स्ट्रक्शन देऊन कॉल ठेवला आणि गाडी परत मार्गावर पळू लागली...

मिहीरने सेकंदाचा वेळ न लावता मोबाईलमधून त्याचा फोटो शोधला. आणि त्याने एसपीच्या प्रिंटरशी मोबाईल ब्लुटूथने कनेक्ट करून प्रिंट काढली. दरम्यान त्याने पंतप्रधान उतरलेल्या हॉटेलच्या वेबसाईटवर जाऊन हॉटेलचा फॅक्स नंबर घेतला आणि जशी प्रिंट निघाली, तशी एसपीच्या फॅक्समशीन वरूनच ती प्रिंट फॅक्स केली.

वास्तविक मेल थ्रूही तो फॅक्स करू शकला असता, पण काही पुरावा मागे रहायला नको म्हणून पंतप्रधान यांनी हा मार्ग अवलंबला होता...

एसपी नुसता बघत होता, मिहीर काय काय करतोय... जे चाललेलं त्यात एसपी कुठे खिजगणतीतही नव्हता. मिहीरने देखील अनावधानानेच त्याची परवानगी न घेता सगळं काम पार पडलं होतं. आणि एसपी बोलणार तरी काय होता... स्वतः पंतप्रधान यांचा फोन येऊन ते मिहीरशी वैयक्तिक बोलल्यानंतर... तो बिचाऱ्यागत फक्त पाहत होता.

काम पूर्ण झाल्यावर मिहीरने निघण्याची परवानगी घेण्यासाठी त्याने एसपीला सल्युट ठोकला, तेव्हा कुठे एसपी मिहीरच्या बुटाच्या आवाजाने भानावर आला...

"हं!" तो एवढंच हुंकारला.

तशी मिहीरने केबिन सोडली. एसपी पाहत होता फक्त...

प्राईम मिनिस्टरनी रिसेप्शनला फोन घुमवला.

"हा, एक फॅक्स येईल तो माझ्या रूममध्ये आणून द्या!" ते सूचना देत म्हणाले.

काऊंटरवर असलेली रिसेप्शनिस्ट कॉडलेसवर बोलत होती. तिचं लक्ष प्रिंट होणाऱ्या फॅक्सवरच होतं.

"हो सर एक फॅक्स आली आहे. पाठवते." पलिकडून गोड आवाजात रिसेप्शनिस्ट म्हणाली.

"थँक्स!" पलिकडून पीएम बोलले आणि फोन कट झाला.

रिसेप्शनिस्टने कॉडलेस रिप्लेस केला आणि जवळून एका पॅसेंजरचे लगेज घेऊन जाणाऱ्या बेलबॉयला हाक मारली.

"रवी!" लगेज नेणारा बेलबॉय आवाजाने थबकला.

"जी मॅम?"

"रूम पंधरामध्ये ही प्रिंट देऊन ये!" ती बेलबॉय सोबतच्या नव्या गेस्टकडे वळली,

"सॉरी सर फॉर इंकविनियन्स, इट्स अर्जंट आयल् गेट यु अनादर हेल्पर!"

"इट्स ऑल राईट!" तो गेस्ट हसून म्हणाला. त्याची संमती मिळताच रवी या वेलबॉय ने "सॉरी!" म्हणत त्याचे सामान खाली ठेवले व ती प्रिंट घेऊन पळत लिफ्टमध्ये शिरला.

रिसेप्शनिस्टने जवळील बेल वाजवली. तो आवाज ऐकलेला आणखी एक बेलबॉय तिच्यासमोर हजर झाला.

"साहेबांचं समान त्याच्या खोलीत पोहोचवा!"

"होय मॅडम!" म्हणत त्याने वाटेतच पडलेलं सामान उचललं.

"या साहेब!" तो म्हणाला आणि दुसऱ्या लिफ्टकडे गेला.

तो काय म्हणाला ते गेस्टला समजलं नसलं तरी बेलबॉयची कृती पाहून तो समजला होता. तो त्याच्या मागून गेला.

लिफ्ट येऊन थांबली, रवी नांवाचा तो बेलबॉय लिफ्टमधून बाहेर आला तो थेट पंधरा नंबरच्या खोली जवळ.

"अंदर के साहाब को देना है।" तो बाहेर तैनात एजंट्सना म्हणाला.

"त्याने समोर धरलेली प्रिंट एका एजंटने हाती घेऊन पाहिली. तो त्या प्रिंटवर छापलेल्या माणसाला ओळखत होता. पीएम यांना तो भेटून गेला होता ना... एजंटने ती प्रिंट ठेवून घेतली आणि रवीला जाण्यास खूण केली.

रवीची लिफ्ट खाली गेल्याचं पाहून प्रिंट घेतलेल्या एजंटने दार उघडलं.

"मे आय सर?"

बातम्या पाहत पीएमनी त्या एजंटला आत येण्याची मानेनेच खूण केली.

"बेलबॉय आस्क्ड् मी टु गिव्ह इट टू यु!" एजंट म्हणाला.

"येस आय वॉन्टेड दॅट!" पीएम त्याला म्हणाले.

एजंटने पुढं होऊन ते प्रिंट पीएम यांच्या हाती सोपवलं, ज्यावर मिहीरचा फोटो होता.

"और जरा शुक्ला को बुला लो!" फोटोवर नजर टाकत पीएम एजंटला म्हणाले.

"येस सर!" म्हणून तो बाहेर गेला.

पीएम पाहत असलेल्या बातम्या मोठ्या विचित्र होत्या...

बातमी देणारी वार्ताहर बोलत होती,

"आमच्या हिंदी माध्यमांच्या हाती आलेल्या सूत्रांनुसार पंतप्रधान अचानक कुठेतरी गायब झाले आहेत! अटकेला सामोरे जायला लागू नये म्हणून त्यांनी पलायन तर केलं नसेल..."

आणि असं बरंच काही ती वायफळ बडबड करत होती...

"कालपर्यंत ही आणि हिचं चॅनेल माझ्या प्रत्येक निर्णयाचं कौतुक करत होती आणि आज मलाच बदनाम करत आहेत. वारं उलटं व्हायला लागलं, की पक्षी देखील वाट बदलतात हेच खरं..." पीएम तेलगूमध्ये स्वतःशीच हसत म्हणाले.

कोरिडॉरमध्ये एजंट खोलीबाहेर पडला तसा तो खोली नंबर चौदाला गेला. त्याने दारावर नॉक केलं. काहीवेळाने दरवाजा उघडला गेला. समोर शुक्ला.

"पीएम सर इज् एक्स्पेक्टिंग यु सर!" तो शुक्लाला म्हणाला.

"कमिंग!" शुक्ला म्हणाला.

आणि त्याने एजंटला पुढं होण्यास खुणावलं. ते बघून एजंट त्याच्या जागी परतला.

शुक्ला त्याच्या रूमबाहेर आला व दार लावून घेऊन तो पीएमच्या रूमसमोर उभारला. त्याच्यासाठी दार उघडलं गेलं.

तो आत प्रवेशकर्ता झाला.

"आओ शुक्ला; आओ! ये रही तुम्हारी तस्वीर! अब करो जो इन्वेस्टीगेशन करना है! पर मैं तुमचे बता दूँ; लड़का वफ़ादार है।"

"वह तो मैं भ ी मानता हूँ सर, पर इस सिच्युएशन में एतियात तो बरतनी ही पड़ेगी!" पीएम समोर टेबलवर पडलेली प्रिंट घेत शुक्ला म्हणाला.

"सही है। जो करना है जल्दी करो. ये थोडी देर मे मिलने आने आनेवाला हैं! मुझे इन्वेस्टीगेशन में देरी नहीं चाहिए! अगर ये रुक गया तो इन्वेस्टीगेशन रुक जाएगा!" पीएम चेहऱ्यावर खरंच गंभीरता आणत म्हणाले.

"जी सर!" गंभीरता लक्षात आल्याचा आव आणत शुक्ला बोलला.

"और एक बात; मैं कहा हुँ किसी को पता ना चले इसलिए ये काम तुम्हे बता रहा हूँ!

"हमारे बारे में जो भी चॅनेल्स अफवाह फैला रहे हैं, उन्हें इन्फॉर्मेशन अँड ब्रॉडकास्टिंग मिनिस्ट्री से कहके अन्सर्टन डेज् के लिए अर्जंट ब्लॅक आऊट करावा दो!" पीएमनी फर्मान काढलं.

"पर सर, थिस इज नॉट गुड़ फ़ॉर डिमॉक्रेसी! हम ऐसा नहीं कर सकते!" शुक्ला तात्काळ संभ्रमित होत बोलला.

"चॅनेल्स खरीद सकते थे? खरीदे थे ना? चार साल हमारे गुनगान गाते थकते नहीं थे ये मीडियावाले. शुक्ला, अब इन्हें दिख रहा है, ये अपनी तरफ़ से हमारे लिए कितना भी जोर लगा ले; हम नहीं रहनेवाले! इसीलिए इनकी बोली बदल गयी!" पीएम दात ओठ खात म्हणाले.

"पर सर हमने ऐसा किया, तो सब समझेंगे कि वे लोग जो बोल रहे है, वो सच है!" शुक्ला पुन्हा समजावत बोलला.

"शुक्ला, इन्फॉर्मेशन ब्रॉडकास्टिंग मिनिस्टर से अगर तुम बात नहीं करना चाहते, तो मैं करता हूँ! मैं इस तरफ जूठ फैलने नहीं दे सकता!" असं धमकावत पीएमनी रिसिव्हर तातडीने कानाला लावला.

"नहीं सर मैं देखता हूँ!" शुक्लाने इच्छा नसताना पीएमनी सांगितलेलं काम आता हाती घेतलं.

पीएमनी रागाने आपटत फोनचा रिसिव्हर रिप्लेस केला. शुक्लाने आपली रूम गाठली.

शुक्लाच्या रुममध्ये, त्याने प्रिंटचा फोटो काढला आणि तो डॅनियलला व्हॉट्सएप केला. एवढंच करून तो थांबला नाही. त्याने डॅनियलला फोन केला,

"डॅनियल आय हॅव सेंट द फोटो ऑफ दॅट आयबी ऑफिसर! प्लिज लूक अफ्टर् हिम." त्याने डॅनियलच्या उत्तराची वाटही न पाहता कॉल कट केला.

इथं, पीएम यांच्या खोली बाहेर मिहीर येऊन थांबला होता. आता त्याला अडवण्याचा प्रश्नच नव्हता. एजंट्सनी दार उघडून त्याला डायरेक्ट एक्सेस दिला.

आत तो सल्युट करून उभा राहिला.

"एक मिनिट!" पीएम समोर उभ्या मिहीरला म्हणाले.

त्यांनी ते बसलेल्या सोफ्याच्या साईड टेबलवर असलेला कॉडलेस उचलला व रिसेप्शनिस्टला कॉल लावला...

"रूम नंबर चौदाला जोडा!" काही क्षण थांबून मग...

"शुक्ला जरा मेरे रूम में आओ!"

थोड्यावेळाने जेव्हा दरवाजा उघडला जातोय असं लक्षात आल्यावर पीएम मिहीरला बोलले,

"तो तुम्हे पक्की ख़बर है?"

"हाँ सर, एकदम पक्की! आप पर हमला करनेवाला जेसन गार्सिया नाम का आदमी हैं! यह इसका असली नाम तो नहीं हैं, पर अभी वह इसी नाम से ऑपरेट होता है!"

"क्या वह अब भी यहाँ कोल्हापुर में हैं?"

"यकीनन! वह रात साढ़े नौ - दस के दरम्यां सिराज नाइट क्लब में होगा ऐसी पक्की इंफॉर्मेशन है! रातभर वह वही रेहनेवाला हैं! सो मैं देढ़ बजे वहाँ रेड करूँगा! उसे और उसके कम्पॅनियन्स को वही ख़त्म कर दूँगा!"

शुक्लाला शब्द अन् शब्द कळावा यासाठी पीएम व मिहीर यांनी मुद्दाम हिंदीत संवाद साधला होता! पण ही गोष्ट शुक्लाच्या लक्षात आली नाही. कारण तो गुन्हेगारांना मिळालेला आहे असा यांना त्याच्यावर संशय आहे हे शुक्लाला माहीत नव्हते. म्हणून त्याने गाफील रहात

याकडे लक्षही दिले नव्हते, की आधीच्या भेटीत 'मराठी'त बोलणारे दोघे आत्ता 'हिंदी'त बोलत होते...

"ठीक आहे तू येऊ शकतोस, पण जे करशील ते जीव सांभाळून!" पीएमनी मिहीरला ताकीद दिली!

"येस सर!" तो सल्युट करून निघाला.

मागे शुक्ला उभा होता. करड्या नजरेने मिहिरकडे बघत होता. तो समोरच असल्याने मिहिरने त्याला ग्रीट केलं...

"गुड नाईट सर!" मिहीर स्मित करून म्हणाला.

"गुड नाईट!" शुक्ला बेरकीपणे नजरेनेवरच्या कडांनी पाहत म्हणाला.

ही शुभेच्छा त्याने कशा संदर्भात दिली होती हे मिहीरच्याही लक्षात आलं होतं, पण तो तसं चेहऱ्यावर न दाखवता मुखावरचं स्मित तसंच ठेवून शुक्लाला क्रॉस करून बाहेर गेला.

"आओ शुक्ला!" मिहीरकडे मागे पाहत असलेल्या शुक्लाला बसल्या जागेवरून पीएम म्हणाले.

"आपने बुलाया सर?" समोर पीएमकडे पाहत चेहऱ्यावरील भाव बदलत शुक्लाने विचारलं.

त्यावेळी जर एखादा कमिलियन सरडा तिथं असता, तर शुक्लाला पाहून त्यालाही शरमल्यासारखं झालं असतं...

"जरा टॅक्सेस् के बारे में हम जो नया बिल लाने की सोच रहे है, उसके जरा अपडेट्स देख लो। हमारे सारे इकॉनॉमिकल एडव्हाईजर्स ने बिल पढ़कर कुछ सुचनाएँ दी हो, तो वह

मुझे पढ़ने को दो. और एक बात, अपोजिशन के नारायण चटोपाध्याय जी से भी मैंने उसपर राय मांगी थी। क्या उन्होंने कुछ टिपण्णी की है क्या वो भी जरा चेक कर के बताना!"

"ठीक है सर!" शुक्ला जाण्यास वळला.

"क्या तुमने पर्सनल आय से कॉन्टॅक्ट किया?" जाणाऱ्या शुक्लाला पीएमनी चाचपण्यासाठी विचारणा केली.

"जी सर!" परत पीएमकडे वळत शुक्ला म्हणाला.

तो खोटं बोलतोय हे माहीत असून पीएम त्याला गाफील ठेवण्यासाठी बोलले,

"उसे सीक्रेट्ली काम करने को बोलो. मैं कोई फसाद नहीं चाहता!"

"कोई प्रॉब्लम नहीं होगी सर! आप बेफिक्र रहिए!" शुक्लाने लटकं आश्वासन दिलं.

"जाओ!" पीएमनी शुक्लाला जाण्यास परवानगी दिली.

शुक्लाने ओठ थोडे लांबट करत पण भाव न बदलता स्मित केलं आणि त्याने पीएमची रूम सोडली.

शुक्ला गेला तसे ऑनरेबल प्राईम मिनिस्टर खरं खूप भावणावश झाले... शक्तीच्या खेळापाई मिहीरचा जीव धोक्यात गेला होता... आणि हे माहीत असून ते हे थांबवू शकत नव्हते... यात काही हस्तक्षेप करू शकत नव्हते... कारण हे एक अनोफिशियल मिशन होते... ज्याचे सगळे निर्णय शक्ती घेणार होता...!

'कोणी दिला होता त्याला हा अधिकार... आपण? त्याने स्वतःसाठी हे अधिकार आपल्याकडून काढून घेतले. आपल्याला त्यासाठी बाध्य केले... कोण आहे हा... का आपण यांच्यासमोर इतके हतबल झालोय...'

असे अनको प्रश्न पंतप्रधान यांना सतावत होते... पण त्यांना त्याचे उत्तर एकच मिळत होते... शक्ती जे काही करेल... योग्य करेल... कोठून आला त्यांना या तरुणाबद्दल इतका विश्वास?

'पहिल्यांदाच आपण भेटलोय याला...? मग यांच्याबद्दल एवढा विश्वास का वाटतोय आपल्याला...? यानं आपल्याला वाचवलंय म्हणून...? तो आत्ताही एका मुलीला वाचवण्यासाठी प्रयत्न करतोय म्हणून...? पण तिला वाचवण्यासाठी हा दुसऱ्या एकाचा जीव धोक्यात घालतोय याचं काय...? का हा आपल्या स्वार्थ आहे हे प्रकरण कसंही करून लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी...? याचसाठी आपण त्याला हवं ते करू देतोय का...?'

मिळालेल्या उत्तराचं मंथन करण्यात पीएमनी इतका वेळ खर्च केला, की त्यांना पुन्हा असंख्य प्रश्नांनी घेरलं...

शक्ती गाडी चालवत होता... त्याचं गंतव्य त्याचं त्याला तरी माहीत होतं, नव्हतं की काय असं झालं होतं... का तो कुणी दुसरीकडे चालला होता...?

डॅनियलने त्याला दिलेला फोन वाजला... शक्तीने यावेळी गाडी चालवतच कॉल रिसिव्ह केला...

"फोटो पाठवलाय! बघून घे!" डॅनियल क्लबच्या केबिनमध्येच होता.

शक्तीची गाडी शक्तीने हे ऐकताच कचकन जागेवरच थांबली. जणू गाडीच्या टायर्स रस्त्यात अचानक रुतल्या असाव्यात...

शक्तीने डॅनियलला काहीच उत्तर दिलं नाही. त्याने फोन कट केला. शक्तीने फोन सायलेंट करून वायब्रेट मोडवर टाकला. आणि डॅनियलने पाठवलेला फोटो पाहिला. तो फोटो मिहीरचा होता!...

डॅनियलने पुन्हा शक्तीला फोन फिरवला, पण यावेळी शक्तीने तो उचलला नाही. फोन वाजताच राहिला...

डॅनियल अस्वस्थ झाला...

"वाय ही इज न ॉट रिसिव्हींग द कॉल?" तो वैतागत पुटपुटला.

अजून दोन - तीनदा यत्न करून मग त्याने शक्तीचा नाद सोडून हिमांशूला फोन केला.

"हिमांश ू! नम्याच्या हॉस्पिटल बाहेर आहेस?" डॅनियलने रागाची शिकन तोंडावर आणत विचारलं.

"हो!" हिमांश ू गाडीत बसूनच हॉस्पिटलकडे पहात ग्वाही देत म्हणाला.

"तिथंच रहा! माझ्या फोनची वाट बघ!" शक्ती जर परतला नाही, तर डॅनियल नम्याला मारण्याच्या तयारीत होता.

"हो! बॉस!" हिमांशूने फोन कट केला आणि पुन्हा त्याने हॉस्पिटलकडे नजर टाकली.

दुसरीकडे शक्तीची गाडी एका वेअर हाऊसला लागली. बाहेरून ती गंजलेल्या पत्र्यांची शेड मोडकळीला आल्यासारखी वाटत होती... पण तरी ती मजबूत होती!

शक्ती त्या शेडकडे चालत गेला. बाहेरून असलेलं लॉक त्याने गोळी घालून तोडलं. आणि पत्र्याचं दार उघडून तो आत गेला.

त्या शेडच्या मागे एक बिल्डिंग होती. ती पण जर्जरीत वाटत होती... शक्ती भिंतीला लागून असलेल्या काँक्रीट पायऱ्या चढून वर गेला.

वर एक रूम होती. शक्तीने दाराचं नॉब फिसवून पाहिलं. त्याला ते उघडंच मिळालं. तो आत गेला. त्याने दार बंद केलं.

"या साहेब!" एक मशीनगन असेंम्बल करत असलेला जतीन शक्तीला म्हणाला.

शक्ती चालत त्याच्या उजव्या बाजूला आला आणि समोर भिंतीला अधांतरी अटॅच अशा या कडेपासून त्या कडेपर्यंत असलेल्या जाडजूड मेटल शीटच्या टेबलवर शक्ती तिथल्या पसाऱ्यात काही शोधू लागला...

"लॉक तोडायची काय गरज होती. बोलावला असतास मला!" जतीन त्याला थोड्या झिटीने म्हणाला.

"माझ्याकडे तेवढा वेळ नाही!" शक्ती त्याला हव्या त्या वस्तू गोळा करून एकत्र ठेवत म्हणाला.

"काय गडबड चालल्या तुझी? सगळं विस्कटतोयस तू!" हातातील काम सोडून तो शक्तीकडे पाहत म्हणाला.

"इथं व्यवस्थित काय आहे? मी विस्कटायला?" शक्ती वस्तू गोळा करतच होता.

"इज्जत काढायला आला आहेस का?"

शक्ती काहीच बोलला नाही! त्याने खिशातून बुलेट्स काढून टेबलवर विखुरल्या. त्यात त्याच्या 'केल-टेक 30' हँडगनच्या '.22 विंचेस्टर मॅग्नम रिमफायर' राउंड्स, काही 50 बीएमजी रायफलसाठी,  तर 50 कॅलिबर शक्तीच्या स्वतःच्या '500 बी अँड डब्लू मॅग्नम'साठी!

शक्तीने डोळ्याला फायबर ग्लासचा चष्मा चढवला आणि आपल्या कामाला लागला.

शक्तीने आधी '.22 कॅलिबर' बुलेट घेऊन ती बारीक हतोड्यासारख्या दिसणाऱ्या फायबर 'बुलेट पुलर'च्या त्या साईझच्या गोल इन्सर्टमध्ये अडकवली व ते पुलरमध्ये स्क्रू सारखं फिरवून पुलर टाईट केला. तो पुलर मग त्याने त्या मेटल टेबलवर आदळून बुलेट व कार्टेज केस वेगळे केले. त्या पुलरमध्ये अडकली बुलेट, गन पावडर आणि कार्टेज केस त्याने बाजूला काढली. हीच क्रिया त्याने '50 बी अँड डब्ल्यू कॅलिबर' व '50 बीएमजी' याच्या बुलेट्स सोबत केली. दोन्हीतील गनपावडर्स त्याने कागदावर ओतल्या.

मग त्याने .22 कॅलिबरमधील गनपावडरचे वजन केले व डिजिटल वजनकाट्यामध्ये '.22' कॅलिबर बुलेटसाठी लागणारी '1.6' ग्रॅम गन पावडर मोजून त्याने '50 बीएमजी' केसमध्ये फनेलच्या सहाय्याने मोजलेली गनपावडर क्रमाने भरून त्यांना ल्युब्रिकंट लावलं, यामुळे गनमधून गोळी स्मुद्ली सुटण्यासाठी मदत होईल. मग त्याने गन पावडर भरलेली 50 बीएमजी मास्टरप्रेसला अटॅच करून लिव्हर खाली ओढून जोरात प्रेस केलं. बुलेट पूर्ववत फिक्स झाली.

हीच क्रिया त्याने '500 एस अँड डब्लू' (50 कॅलिबर) बुलेटसोबत केली. त्या त्या बुलेट्सच्या मेजरमेंट्स नुसार तसे तसे इक्विपमेंट्स वापरले होते. त्या दोन्ही बुलेट्स उठून त्याने खिशात घातल्या.

शक्तीला अंदाज होता, की त्याला देखील एक तर एम 107 वापरावी लागेल, किंवा मग त्याची स्वतःची 50 स्मिथ अँड विल्सन मॅग्नम तरी वापरवी लागेल म्हणून त्याने या दोन्हीच्या बुलेट्स पेनिट्रेट केल्या होत्या...

कोणी त्या बुलेट्सना पाहून म्हणू शकणार नव्हतं, ती त्यांच्यातील गन पावडर कमी करून शक्तीने त्या बुलेट्सच्या पॉवर्स रिड्यूस केल्या आहेत... हा! एखादा खूपच एक्सपर्ट असता तर त्याला त्या हाती घेतल्यावर वजनावरून ते लक्षात आलं असतं. पण शक्ती थोडीच त्या दोन बुलेट्स कुणाच्या हाती देणार होता...

"मला कळू शकेल साहेब काय करत आहेत?" शक्तीचा चाललेला खेळ संपलेला पाहून जतीनने विचारलं.

"शक्तीने टेबलवर विस्कटलेल्या इतर बुलेट्स उजव्या हाताने गोळा करून खिशात भरल्या.

"रात्री करेक्ट एक वाजण्याआधी शाहू स्मारक जवळ येऊन थांब."

"का?"

"मी एका ऑफिसरला मारणार आहे! त्याला तू वाचवायचं आहेस!"

"भुलायस काय?" जतीन स्वतः कितीतरी इल्लीगल कामं करत असून त्याने पोलिसाला मारण्याचा कधी विचारही केला नव्हता. 'इल्लीगल' कामं पण 'इथिकली' करावयची हा त्याचा शिरस्ता होता. त्यामुळे शक्तीचा प्लॅन ऐकून त्याच्या अंगावर काटा आला!

"ऑफिसर कोण आहे?" जतीनने विचारलं.

"डीवायएसपी मिहीर देशमुख!" शक्ती निवांत पण गंभीर चेहऱ्याने बोलला.

जतीनला स्वतः भुलल्यासारखं झालं.

"आईची... तुझ्या सोबत तू मला पण मारशील!" जतीन वैतागत ओरडला.

पण शक्तीने त्याच्याकडे दुर्लक्ष केलं आणि सूचना चालू ठेवली...

"एक - दीड इंच टायटेनियमची प्लेट असेल अशा एक बुलेट प्रूफवेस्टची अरेजमेंट कर." शक्तीने शांतपणे सूचना केली.

"अरे अडाणी! एक दीड इंचने या बुलेट्स रोखल्या जाणार नाहीत आणि जरी वेस्टने बुलेट अडवली, तरी या बुलेट्सनी तयार होणारी फोर्स त्या माणसाला मारल्याशिवाय राहणार नाही!" जतीन ओरडला.

"मला माहित आहे! म्हणूनच बुलेट्स मधली गन पावडर कमी केली आहे. इफेक्टिव्ह रेंजच्या बाहेर राहूनच मी गोळी चालवणार आहे. माझ्या सोबत एक व्यक्ती असेल. सो, ऑफिसर मेलाय असं वाटण्यासाठी थोडं तरी रक्त यायलाच हवं. म्हणून फक्त फोर्स कमी करायला टायटेनियम शीटची गरज आहे मला. म्हणूनच टायटेनियम शीट कमी जाडीची हवी आहे. काही प्रॉब्लेम होणार नाही याची फक्त आपण आशा करू शकतो!" शक्ती थंडच होता...

जतीनला काय बोलावं कळत नव्हतं. जतीनने फक्त भुवया उंचावून डोळे मिटून मान हलवली.

"ही बुलेटप्रूफ जॅकेट पोलीस हेडक्वार्टरला जाऊन मिहीर देशमुखच्या हाती दे. जाताना व्यवस्थित पॅक करून ने. कुणाला काही कळता काम नये!" शक्तीच्या इन्स्ट्रक्शन्स.

"तू या ऑफिसरला मारल्यानंतर तुझ्याबरोबर असणाऱ्यांनं हात लावून किंवा जवळ जाऊन पाहिलं तर?" जतीनने शंका व्यक्त केली.

"म्हणूनच हे प्रिपरेशन आहे. पण यात वेळ वेळ व मिहीरचा जीव धोक्यात येईल. सो, त्याची काळजी मी घेईन. मला तेथून सोबतच्या व्यक्तीला घेऊन लवकर निघावंच लागेल त्याशिवाय तू मिहीरला वाचवू शकणार नाहीस."

"तू हे का करतोयस?" जतीनेने निर्णायक विचारलं. त्याला थोपवण्याचा जतीनचा हा शेवटचा प्रयत्न होता... जर त्याने ऐकले नाही, तर आहेच त्याच्या मागून जाणे...

"आएम रिलाईंग ऑन यु ब्रदर्!" शक्ती जतीनच्या प्रश्नाला उत्तर टाळत त्याला नाराजीचा सुरात म्हणाला.

आणि त्याने जतीनची जागा त्यागली. दरम्यान त्याला डॅनियलचे खूप कॉल झाले होते. ते त्याने उचलले नव्हते. फोन फक्त वायब्रेट होत होता...

त्याची गाडी आता क्लबच्या दिशेने पळत होती...

क्लबच्या मॅनेजरच्या केबिनमध्ये मॅनेजरच्या खूर्चीत चिंतित बसलेला डॅनियल खूपच अस्वस्थ झाला होता, पण समोर त्याचा सावत्र भाऊ जेसन असल्याने आपल्या चेहऱ्यावरचे टेन्शन तो दाखवून देत नव्हता. परंतु शक्ती फोन उचलत नाही याने त्याला चांगलेच विचलित केले होते. तो काय करत असेल या विचाराने त्याला हैराण केलं होतं...

शक्ती नक्की कोण हे माहीत जरी नसलं, तरी तो साधारण व्यक्ती नाही हे डॅनियल आता ओळखून होता. आणि यामुळेच तो चिंताक्रांत होता. डॅनियलच्या आज्ञेनुसार जर शक्तीने मिहीरला मारले, तरच शक्ती हा पोलीस किंवा इंटेलिजन्सचा माणूस नसून खरंच तो एक असॅसिन किंवा कॉन्ट्रॅक्ट किलर आहे, ज्याला आपल्या कामाशिवाय कोणाशी कसलेच सोयर - सुतक नाही हे डॅनियलला स्पष्ट होणार होतं.

पण काम स्वीकारलेला शक्ती कामाची वेळ आली तरी अजून पोहोचला नव्हता. तो डॅनियलला टाळत होता का...? असं असेल, तर तो इंटेलिजन्सचा माणूस आहे हे डॅनियलला नक्की होतं!

पण याच्यासाठीही डॅनियलकडे एक हुकूमी इक्का होताच. त्याने नम्याच्या हॉस्पिटल बाहेर असलेल्या हिमांशूला फोन लावला...

वायब्रेट होणारा मोबाईल घेऊन हिमांशूने कॉल रिसिव्ह केला. कॉल कोणाचा होता हे स्पष्ट होतं म्हणून त्याने हॅलो म्हणण्याची तसदी घेतली नाही. पुढून काय आदेश येतोय याची तो वाट पाहत होता...

"हिमांशू, गो फॉर इट!" फोन कट झाला.

हिमांशू हसला! आजपर्यंत जिला तो संरक्षण देत होता; तिलाच आज मारायची त्याच्यावर वेळ आली होती. पण हिमांशू गडबडणारा माणूस नव्हता. त्याला या फालतू भावनिक गोष्टींनी काही फरक पडणार नव्हता. आधी नम्याला संरक्षण देणं हे त्याचं काम होतं, ते तो करत होता. आता तिला मारायचं काम आहे, तेही तो इमाने-इतबारे करणार होता... याच्या नंतर कदाचित त्यालाही आता त्याचं जीवन त्यागावं लागणार होतं हे तो नक्कीच जाणून होता. आणि ते प्राक्तन तो नाकारणारही नव्हता!

आपली '.45 कॅलिबर' 'रुगर एसआर 1911' त्याने बाहेर खेचली. त्याला स्प्रेसर स्क्रू सारखं फिट केलं आणि पार्किंगमध्ये लागून असलेल्या त्याच्या पांढऱ्या टाटा नेक्सॉनमधून तो उतरला. त्याने आपली पिस्टल कोटात लपवली आणि तो हॉस्पिटलकडे चालत गेला. आपल्या कामात प्रोफेशनल हिमांशूने सिक्युरिटीला संशय येऊ नये याची त्याने आपसूक काळजी घेतली होती.

हॉस्पिटलमध्ये तो रिसेप्शनिस्टपाशी आलं.

"एक्स्क्यूज मी, नम्या म्हणून एक लेडीज पेशंट आहे. त्या कोणत्या वॉर्डमध्ये आहेत सांगू शकाल? मी भाऊ आहे त्यांचा." हिमांशूने विचारलं.

रिसेप्शनिस्टने आपला कॉम्प्युटर चेक केला. व ती हिमांशूकडे पाहत म्हणाली,

"सॉरी सर, त्या अजून शुद्धीवर आल्या नाहीत. तुम्ही त्यांना भेटू शकत नाही."

"मी त्यांना त्रास देणार नाही. बाहेर बसून राहीन. प्लिज मॅम!" हिमांशू डोळे ओले करत खोट्याने म्हणाला.

"ठीक आहे! तिसरा मजला. वॉर्ड नंबर सतरा! पण बाहेरच बसा. आत जायचं नाही!" रिसेप्शनिस्टने विचारांती परवानगी दिली.

"होय... होय मॅम. थँक्यू मॅम!" हिमांशू म्हणाला आणि लिफ्टमध्ये शिरला.

लिफ्टमध्ये, त्याचे लक्ष वर जाणाऱ्या अकड्यांकडे होते. तो लिफ्टमधल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याकडे पाहणं मुद्दाम टाळत होता. पण तसं तो भासवत देखील नव्हता. त्याचं सगळं वागणं अगदी सहज होतं... नम्या असलेला मजला जवळ येईल तसं तो स्वतःचे मनोधैर्य अधिकच सज्ज करत होता.

तिसऱ्या मजल्यावर लिफ्ट उघडली. तो बाहेर पडला. आणि त्याचे पाय नम्याच्या रूमकडे चालत सुटले.

काही पावले चालून तो नम्याच्या खोलीजवळ उभा होता. रिसेप्शनिस्टला दिलेलं वचन तो नक्कीच पाळणार नव्हता. दार उघडून तो आत गेला. नम्या व्हेंटिलेटरवर होती. त्याने आपली गन बाहेर काढली. त्याने थोडावेळ विचार केला.

त्याला लक्षात आले, की सप्रेसर असूनही पिस्टलचा आवाज होणार, म्हणून त्याने आपला विचार बदलला. नम्याला मारायचा नाही, तर तिला मारण्याच्या पध्दतीचा...

तो तिच्याकडे चालत गेला. तो तिचा इंहेलिंग मास्क काढणार इतक्यात त्याचा मोबाईल वायब्रेट झाला...

फोन डॅनियलचा असणार हे तो समजला. त्याने नम्याच्या मास्कवर हात ठेवूनच फोन घेतला. तिचा मास्क काढल्यानंतर नम्या तडफडून मरेपर्यंत हिमांशू तिथंच उभा राहणार होता... तिला मरताना पहात... आपण केलेलं काम पूर्ण यशस्वी होतंय की नाही हे बघणं पण त्याचंच काम होतं...

तरी त्याच्या नजरेत नम्या बद्दल कुठेतरी करुणा भासत होती... पण तो ती भावना आत... आत खोल दाबत होता, कारण सोपवलेलं काम त्याला पार पाडायचं होतंच!

"रिट्रीट!" पलिकडून डॅनियलने ऑर्डर दिली.

हिमांशूने नम्याच्या मास्कवरील हात झटक्यात बाजूला घेतला. फोन कट करून खिशात सारत तो नम्याच्या खोलीतून बाहेर पडला. त्याने नम्याकडे पाहण्याची पर्वा केली नव्हती.

इकडे शक्ती मॅनेजरच्या केबिनचे दार पकडून उभा होता. त्याच्या बाजूला जेसन उभा. कदाचित याने दार उघडले असावे, किंवा शक्तीला पाहून तळपायाची आग मस्तकात जाऊन

तो ताडकन उठून शक्तीवर चालून आला असावा... शक्तीला पाहूनच डॅनियलने नम्याला मारायचा प्लॅन कॅन्सल (पुढे ढकलायचा निर्णय) केला होता...

नम्याला मारल्यानंतर शक्ती स्वतः त्याला शोधत आला असता याबद्दल त्याला खात्री होती; मग तो असॅसिन असो वा कोणी पोलीस... म्हणून डॅनियलने नम्याला मारण्याचा घाट घातला होता. पण तूर्तास तरी आता ते करण्याची गरज नव्हती...

"एवढा वेळ का?" डॅनियलने रागात मोबाईल खाली करत विचारलं.

"टार्गेटची माहिती काढत होतो!" शक्ती म्हणाला.

"आणि काय कळालं?"

"तो इथल्या पोलीस हेडक्वार्टर्स सोबत पण रिलेशन ठेऊन आहे!" शक्तीने उत्तर दिलं.

"याचा अर्थ तो खरंच डेंजरस आहे!"

"जर त्याने सुशेन आणि तुझी लिंक शोधून काढली, तर सगळं संपलं!" शक्तीने माहितीत भर घातली!

"टेक केअर ऑफ हिम!" डॅनियलने ठाम निर्णय सुनावला.

"ओके!" शक्तीने प्रपोसल मान्य केलं.

"पण लक्षात आहे ना? तू पकडला गेलास, तर..." डॅनियल आठवण करून देत बोलला होता.

पण त्याला शक्तीने वाक्य पूर्ण करू दिल नाही.

"तूही लक्षात ठेव! मी माझ्या क्लायंट्सची नांवं जीव गेला तरी डिस्क्लोज करणार नाही!" शक्ती म्हणाला.

"आय ट्रस्ट यु. टोल्ड यु जस्ट फॉर दि रिमाईंडर!" डॅनियल म्हणाला.

"नो वरी! माझी 500 बी अँड डब्ल्यू मॅग्नम त्याला माझी ओळख पटवायला जिवंत ठेवणार नाही!" शक्ती आपली मासिव्ह रिव्हॉल्व्हर शोल्डर होलस्टरमधून बाहेर काढत म्हणाला.

"नाही!" डॅनियल म्हणाला.

आणि तो उठून शक्तीसमोर आला. त्याने जवळच असलेल्या जेसनच्या होलस्टरमधली त्याची 'ट्रिपल एक्शन थंडर' खेचली. आणि शक्तीच्या अंगावर फेकली. शक्तीने झेलली.

"युज थिस!"

"अँड यु से यु स्ट्रस्ट मी!" शक्ती चेहरा विक्षिप्त करून डॅनियलच्या नजरेत रोखत म्हणाला.

डॅनियल निर्लज्जासारखा नुसता हसला. शक्तीने त्याच्याकडे एक डिस्गस्टिंग लूक दिला. त्याने आपली रिव्हॉल्व्हर पुन्हा होलस्टरमध्ये खोवली व जेसनची गन त्याच्या हाती आदळून तो बाहेर पडला. डॅनियलने जेसनला शक्तीला फॉलो करण्याचा इशारा केला. जेसन शक्तीच्या मागून बाहेर पडला...

या बाजूला जतीनची आपली धांदल चालू होती...

बुलेटप्रूफ वेस्टच्या पुढील पॉकेटमध्ये त्याने टायटेनियम शीट सरकवली. आणि जतीनने ते पॉकेट सील केलं.

बुलेटप्रूफ वेस्ट तर रेडी झालं होतं. आता हे पोहोचवायचं होतं ते मिहीरपर्यंत...

दुसऱ्या कोणावर हे काम सोपवण्याचा वेळ नव्हता म्हणून जतीन स्वतः ते बुलेटप्रूफ वेस्ट घेऊन बाहेर पडला. डोक्यावर कुरियर बॉय सारखी टोपी घातली होती. एक लांब बंदाची बॅग देखील त्याने तिरकी लटकटी घेतली होती.

पण त्या आधी त्याने ते एका बॉक्समध्ये ते वेस्ट नीट रॅप केलं होतं. त्याच्यावर त्याने शक्तीचं नांव लिहिलं.

कारण हे पॅकेट थेट जाणार होतं, पोलीस हेडक्वार्टर्सला. अनोळखी व्यक्तीने दिलेलं पॅकेज मिहीरने ओळखण्यास नकार दिला असता, तर ते चेक होण्याची मोठी शक्यता होती. आणि स्पष्टीकरण देण्याइतपत वेळ नव्हता. म्हणून शक्तीच्या नावाने तो धोका खूप मोठ्या प्रमाणात कमी होणार होता...

ते पॅकेज घेऊन जतीन पायऱ्या उतरून खाली आला. शेडमध्ये असलेली आपली स्कुटर त्याने आपलं स्थूल शरीर सांभाळत बाहेर काढली. टोपीवरच त्याने स्कुटरच्या हँडलवर लटकेलं ओपन फेस हेल्मेट घेऊन घातलं आणि त्याची स्वारी निघाली...

इकडे शक्ती जेसनला आपल्या रूमवर घेऊन आला होता!

"किती वेळ झालं मी विचारतोय, तू मला इथं का घेऊन आला आहेस?" जेसन शक्ती मागून खोलीत प्रवेश करत शक्तीवर ओरडला.

शक्ती विकट हसला,

"नॉट फॉर मेकिंग लव अफकोर्स!" शक्ती मस्करी करत म्हणाला.

त्याच्या या वाक्यावर जेसन खिजला गेला. चिडून त्याने शक्तीला मागे वळवून त्याची कॉलर पकडली!

"मी शेवटचं विचारतोय!" तो ओरडला.

शक्तीने शांतपणे त्याचे हात बाजूला केले, पण हे करत असताना त्याने थोडा जोर लावून जेसनचे हात दाबले होते.

"आपलं काम रात्री एक वाजता आहे. तोपर्यंत काय रस्त्यावर बसणार आहेस?" शक्ती त्याला म्हणाला.

"पण तुझा प्लॅन काय आहे? तू त्याला कुठं आणि कसा मारणार आहेस?"

"बघशील तू!" एवढंच बोलून शक्ती बाथरूममध्ये गेला.

जेसनला मुसक्या आवळून वाट बसण्याशिवाय आता पर्याय नव्हता...

बाथरूममध्ये शक्तीने शॉव्हर खाली काही काळ सगळ्या गोंधळाचा, विचारांचा निचरा करण्याचा प्रयत्न केला...

तो बाहेर आला तसा जेसन उठून उभारला...

"चल!" तो म्हणाला.

शक्तीने अंगात कपडे चढवले आणि तो खोली बाहेर पडला...

आला तो खाली हॉटेलच्या रेस्टॉरंटमध्ये. त्याने ऑर्डर दिली.

"आर यु किडींग मी?" जेसन चांगलाच चिडला.

"तुला माझा मार्ग योग्य वाटत नसेल, तर जाऊ शकतोस. मी माझं काम माझ्या पद्धतीने करेन!" शक्ती बोलला.

"डॅनीमुळे तुझ्याबरोबर रहावं लागतंय. नाही तर...!" तो चिडून बोलला.

त्याच्याकडे दूर्लक्ष करून शक्ती आलेलं अन्न खाण्यात गुंतला...

खाणं हा त्याचा मोठा विरंगुळा होता... बरेच जण खाण्यासाठी जगतात. हा जगण्यासाठी खातो! म्हणून हवं तेवढं आणि मोजून मापून... पण या धकाधकीत त्याला इतक्यात तेवढं देखील खाणं झालं नव्हतं. वेळ होता म्हणून मग तो हा वेळ सत्कारणी लावत होता...

जेसन त्याच्याकडे वैतागाने चेहऱ्यावर असिमीत राग घेऊन पाहत होता.

शक्तीने त्याला अजून डिवचण्यासाठी तोंडात घालत असलेला घास पुढं करून 'हवं का' विचारलं. असं करून त्याने जेसनच्या क्रोधात भरच टाकली...

जेसनला चिडवायला शक्तीला मजा येत होती...

इथे जतीन कोल्हापूर पोलीस हेडक्वार्टर्स, बावडाला पोहोचला होता. त्याची बाईक गेटला लागली, तोच मिहीर त्याची फोर व्हीलर घेऊन गेट बाहेर पडला. त्याची इथली ड्युटी संपली होती आणि तो आता दुसऱ्या 'ड्युटी'वर निघाला होता...

संध्याकाळ होती, अजून बराच वेळ होता... पण कदाचित त्याला मनाची तयारी करायची असावी... त्याची कामाची वेळ संपली होती आणि तो इथं थांबून काही करूही शकत नव्हता... सो तो हेडक्वार्टर्स मधून बाहेर पडला होता...

जतीनने मिहीरला कधी पाहिलं नव्हतं. शिवाय गाडीत कोण आहे हे पहायला त्याला वेळ नव्हता. त्याला त्याचं काम पूर्ण करायचं होतं.

तो स्कुटर गेटवर ठेवूनच पायात ठेवलेलं पॅकेट घेऊन आत जाऊ लागला, पण एका कॉन्स्टेबलने त्याला काही पावलं चालून गेल्यावरच अडवलं.

"काय? कुठं?" कॉन्स्टेबलने जतीनला विचारलं.

"पार्सल हाय!" जतीन म्हणाला.

"मग दारात गाडी लावून कुठं?"

"साहेब जरा अर्जंट हाय. मिहीर म्हणून कोण हायत, त्यांना त्यांना हे द्यायचं हाय!" जतीन म्हणाला.

"कुणी पाठवलंय?"

जतीनने उगाचच पॅकेजवरील नांव वाचायचं नाटक केलं.

"शक्ती... नाईक... म्हणून कोण आहेत!" नांव वाचून पुढील वाक्य जतीन कॉन्स्टेबलकडे पाहून बोलला.

"अरे खरंच अर्जंट दिसतंय!"

"होय!"

"हे मिहीर कुठं भेटतील?"

"ते काय आत्ता त्यांचीच गाडी गेली की!" कॉन्स्टेबल गडबडीत म्हणाला.

त्याचं पूर्ण वाक्य ऐकायला देखील जतीन थांबला नाही. तो गर्रकन् मागे वळला आणि स्कुटर त्याने गाडी ज्या दिशेला गेली तिकडे घेतली...

काही अंतर स्कुटर पळवल्यावर जतीनला त्याच्या समोरून गेलेली गाडी दृष्टीगोचर झाली...

जतीनने स्पीड वाढवली. त्याने स्कुटर ड्रायव्हिंग सीट जवळ नेली. जतीनची स्कुटर मिहीरच्या फोर व्हीलरच्या समकक्ष धावत होती...

त्याने वर असलेल्या खिडकीच्या काचेवर नॉक केलं.

गाडीत, मिहिरने शंकीत नजरेनं बाहेर त्याच्या सोबतच स्कुटर हाकणाऱ्या व्यक्तीकडे पाहिलं. जतीन त्याच्याकडेच पहात होता. त्याने मिहीरला काच खाली करायला खूण केली.

जशी काच खाली झाली, जतीनने पार्सल खिडकीतून आत मिहीरच्या मांडीवर सरकवलं आणि न थांबता तो वेग वाढवून पुढं निघून गेला.

पण गाडीत पार्सल मांडीवर पडल्या पडल्या मिहीरने ब्रेक लावला होता आणि गाडी जागीच थांबली होती.

असं अचानक अनपेक्षित घडल्यानं भीती वाटणं सहाजिक होतं... पण पार्सलवर शक्तीचं नाव बघून मिहीर रिलॅक्स झाला.

त्याने तातडीने ते पॅकेज फोडून पाहिलं. आत बुलेटप्रूफ जॅकेट! याचे काय करावयचे हे त्याला सांगण्याची गरज नव्हती.

आता तो पूर्ण आश्वस्त व निर्धास्त झाला!

रात्री बाराच्या पुढे... शक्ती जेसनला घेऊन दसरा चौकपासून पूर्वेला शाहू थिएटरजवळ थांबला होता. दसरा चौक पासून सुमारे ४५० मीटर (साधारण १४७७ फूट), पूर्व. त्याच्या कानात ब्लुटूथ लागलेला होता.

सहाजिक कॉन्फरन्सवर मिहीर आणि शाहू स्मारकाच्या मैदान पार्किंगमध्ये आपल्या गाडीत बसून असलेल्या जतीनशी तो कनेक्टेड् होता.

एक वाजायला काही मिनिटं होती... शक्तीने जेसनकडून त्याची गन घेतली. त्यात 50 बीएमजी बुलेट लोड केली आणि ती पिस्टल स्वतःच्या रिकाम्या शोल्डर होलस्टरमध्ये ठेवून घेतली.

सुदैवाने जेसनच्या गनमध्ये देखील एम 107 रायफलसाठी वापरली जाणारी बुलेटच वापरली जात असल्याने शक्तीला अपेक्षा नसताना भलतीच गन बदलावी लागली असली, तरी ते त्याच्या पथ्यावरच होतं. की शक्तीला याचा अंदाज होता... काही असलं, तरी शक्तीचा प्लॅन वर्क होईल याची शक्तीने तरतूद करून ठेवली होती...

शक्तीने डॅनियलने दिलेल्या बीएमडब्ल्यू रेज केली आणि तो शाहू स्मारकाकडे निघाला...

त्याच्या वेगाला सीमा नव्हती... समोरून आसपास त्याच वेगात मिहीरची गाडी येताना तो आणि बाजूला असलेला जेसन देखील पाहत होता.

छत्रपती शाहू महाराजांच्या पुतळ्याच्या १२० मीटर अलीकडेच शक्तीने गाडी झर्रकन आडवी करून ब्रेक मारला. गाडी हॉरीझोन्टल ड्रीफ्ट होऊन थांबली. चाकांतून धुराचा लोट उडाला.

समोरून आलेल्या मिहीरच्या गाडीला पण थांबवणे क्रमप्राप्त होते. शक्ती गाडीतून उतरला होता. त्याने शोल्डर होलस्टर मधून पिस्टल बाहेर काढली. पिस्टलवर स्कोप लावला. इतक्यात जेसन त्याच्या बाजूला येऊन उभारला होता. शक्तीने स्कोपमधून लक्ष साधलं. जवळजवळ अर्धा किलोमीटर लांब वरून येत असलेल्या मिहीरच्या गाडीला शक्ती काही काळ पाहत होता...

आणि शक्तीने फायर केलं. तीक्ष्ण टोक असलेली बुलेट वाऱ्याला चिरत १२० मीटर (सुमारे ३९४ फूट) दूर असलेल्या व शक्तीच्याच दिशेने प्रवास करत असलेल्या मिहीरच्या गाडीच्या बॉनेटवर आदळली. बॉनेट भेदलं गेलं. इंजिन खराब झालं होतं. त्यातून धूर बाहेर पडू लागला...

छत्रपती शाहू महाराजांच्या पुतळ्यापासून पाच एक मीटर पुढं आल्यावर मिहीरची गाडी थांबली...

शक्तीने जेवढी गनपावडर बुलेट कार्टेजमध्ये भरली होती, तेवढी ११४ मीटर पर्यंतच कार्यकुशल ठरणार होती. म्हणून मिहीर फक्त १ मीटरने का होईना, पण डेंजर झोनच्या बाहेर होता.

मिहीरची गाडी पण व्हर्टिकली जरा पुढं घसटत गेली होती. गाडीला कंट्रोल करण्याचा मिहीरने प्रयत्न केला होता व स्टेअरिंग त्याच्या डावीकडे वळवली होती. त्याची मारुती सुझुकी हॉरीझोन्ट थांबली होती.

गाडी अशी अचानक गोळी लागून थांबल्याने तो तिरिमिरीतच गाडीतून उतरला. त्याने गाडीचं बॉनेट पाहिलं. गोळीचे छिद्र स्पष्ट दिसत होतं.

इकडे शक्तीने खास तयार केलेली '50 बीएमजी' बुलेट 'ट्रिपल थंडर' पिस्टलमध्ये मागून नळीत सारली व ती सिंगल शॉटगन रिलोड केली. जसा मिहीर बॉनेट पासून वळला आणि त्याचं तोंड शक्तीकडे झालं, शक्तीला तो लांबून गन उंचावून उभारलेला पाहत होता. त्याने त्याची पिस्टल बाहेर काढण्यासाठी आपला हात होलस्टरकडे नेला. पण शक्तीने त्याला तेवढा वेळ दिला नाही. त्याने मिहीरवर शूट केलं!!!

रस्ता पूर्ण मोकळा असल्याने ते दूर वरून एकमेकांना सहज पाहू शकत होते...

शक्तीने चालवली बुलेट सरळ रेषेत प्रवास करत मिहीरला छातीवर हिट झाली! मिहीर मागे ढकलला गेला. तो आदळल्याने उघडा दरवाजा झाकला गेला आणि तो दारावर घसटतच खाली पडला!

ट्रिपल एक्शन पिस्टलने फायर केल्याने गोळीच्या ती जबरदस्त फोर्स झेलावी लागल्यामुळे मिहीर तक्षणी बेशुद्धावस्थेत गेला होता.

शक्तीला आपल्या कामावर पूर्ण विश्वास होता. म्हणून त्याने स्कोप असलेली पिस्टल जेसनला हँडओव्हर केली आणि स्कोपमधून पहायला सांगितलं.

जेसनने पाहिलं. दूरवर असलेला मिहीर त्याला स्कोपमधून अगदीच जवळ भासत होता. रक्तस्राव चालू झालेला होता... तो त्याला निपचित पडलेला सहज पाहत होता!

तरी जेसनचं समाधान झालं नव्हतं. मिहीर खरंच मेलाय की नाही हे त्याला खात्रीशीर जाणून घ्यायचं होतं. म्हणून त्याने शक्तीला क्रॉस करून बीएमडब्ल्यूच्या ड्रायव्हिंग सीटकडे पावलं टाकली, पण शक्तीनं मागे वळून ड्रायव्हिंग सीटपाशी पोहोचलेल्या जेसनचा हात धरून त्याला अडवलं.

"मला चेक करू दे!" मागे पाहत जेसन ओरडला.

"इथं थांबणं योग्य नाही! तू त्याच्या जवळ गेलास, तर तुझे काही ना काही ट्रेसेस त्याच्या जवळ राहतील! शिवाय फायरिंगचा एवढा मोठा आवाज झाल्यामुळं लोक सतर्क झाले असतील!" शक्तीने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला.

"पण तो मेलाय की नाही हे बघायला पाहिजे!"

"तो मेला नसला, तरी ब्लड लॉसने मारला जाईल! तू त्याची काळजी करू नको! त्याच्या मरणाची न्यूज फोटो सकट तू उद्या पाहशील!"

"मी चेक करणारच!" म्हणत जेसनने शक्तीचा हात झटकला.

"तू माझ्याकडे पर्याय ठेवला नाहीस!"

म्हणत शक्तीने खिशातून जेसनच्या पिस्टलमध्ये आणखी एक 50 बीएमजी लोड केली; यावेळी खरी! कोणतीही छेडछाड न केलेली!

"तुझी पिस्टल माझ्याकडे आहे हे विसरू नको!" पिस्टलचा रिअर भाग लॉक करून शक्तीने वर जेसनकडे नजर टाकली व त्याच्यावर ती पॉईंट देखील केली!

"इतक्या जवळून तुझ्या चिंध्या पण राहणार नाहीत!" शक्ती जेसनला धमकावत बोलला.

शक्ती वेडा माणूस आहे हे जेसन आत्तापर्यंत जाणून चुकला होता. तो झिटीने पाय आपटत त्याच्या जागी जाऊन बसला.

शक्ती पण मग ड्रायव्हिंग सीटवर बसून त्याने गाडी मागे शाहू थिएटरकडे म्हणजे जिथून आली होती तिकडे पळवली.

इकडे तिथे शाहू स्मारकाला लागून असलेल्या मैदानात पार्किंगमध्ये लागलेल्या गाडीत बसून जतीन हे सगळं पाहत होता. जशी शक्तीच्या गाडीचा आवाज अगदी दूर गेलेला त्याला जाणवला, तसा जतीन आपल्या कार मधून उरतून  धावत मिहीर जवळ आला...

पण मिहीरला मदत करण्यापूर्वी प्रथम त्याने आधी मिहीरचा आपल्या मोबाईलमध्ये फोटो काढला. कारण  शक्तीने 'न्यूज' व 'फोटो' संदर्भात दिलेला संकेत त्याने जाणला होता. हे काम त्यालाच करावं लागणार हे तो ओळखून होता!

आणि मग मिहीरला स्वतःच्या गाडीत मागच्या सीटवर घालून जतीनने गाडी सिपीआरकडे पळवली!

गाडीत मागे मिहीरकडे पाहत जतीन टेन्शनमध्ये गाडी पळवत होता... मिहीरच्या गाडीचा प्रवास दक्षिणेला सीपीआरकडे चालला...

"सन ऑफ अ ##! साला रिजाईंड् आहे दोन वर्षांपासून! पण मेंदूला अजून गंज लागला नाही साल्याच्या! मुद्दाम त्याने दसरा चौक निवडला. कारण इथून सीपीआर फक्त एका मिनिटाच्या अंतरावर आहे! इफेक्टिव्ह रेंजची पण परफेक्ट जुळवणी इथं झाली! मला पण यानं माझ्या वजनामुळंच निवडलं!" आ##ला!" जतीनला शक्तीच्या बुध्दीचं कौतुक वाटत होतं.

पण त्यांच्या 'लव-हेट' रिलेशनमुळे तो शक्तीची प्रसंसाही शक्तीला शिव्या घालून करत होता... त्याशिवाय त्याला मुखशुद्धी झाल्यासारखं वाटलं नसतं... तिकडे नक्कीच शक्तीला उचक्या लागत असणार...

पण तसं काही नव्हतं! शक्ती एकदम लांबट व भावनारहित चेहरा ठेवून गाडी चालवत होता...

## ९. पुनर्जीवन (रि-लाईफ)...

दसरा चौकपासून सुमारे एकशे सत्तर मीटर दक्षिणेला असलेल्या सीपीआरला मिनिटभराच्या अंतराने जतीनची गाडी लागली. त्याने कुणाला न बोलावता, स्ट्रेचरची वाट न बघता मिहीरला हातात उचललं आणि तो सीपीआरच्या मुख्यव्दाराकडे धावला...

तो आत आला. एक डॉक्टर त्याला दिसला. त्याने हाक मारली,

"डॉक्टर!"

डॉक्टर मिहीरला मूर्च्छित पाहून तो लगेच जतीनकडे आला.

"काय झालंय!" डॉक्टरने मिहीरकडे न पाहता जतीनला विचारलं.

"गोळी लागली आहे!"

"ही तर पोलीस केस आहे..." डॉक्टर हात वर करण्याच्या इराद्यात होता...

"ह्यो स्वतः पोलीस आहे! लवकर ट्रीटमेंट चालू करा!" जतीन ओरडला.

"ठीक आहे ठीक आहे." डॉक्टर गडबडला.

त्याने कम्पाऊंडर्सना हाक दिली. कम्पाऊंडर्सना पण तत्परतेने धावत आले.

"यांना ओटीमध्ये घ्या!" डॉक्टर तसदीने बोलला.

कम्पाऊंडर्सनी पण इमर्जन्सी लक्षात घेऊन स्ट्रेचरची औपचारिकता न करता मिहीरला जतीनच्या हातून उचललं व त्याला तातडीनं ओटीमध्ये हलवलं. डॉक्टरने देखील त्यांच्या मागून घाईने केली...

जतीन हॉस्पिटलबाहेर आला. त्याचं काम अजून संपलं नव्हतं.

त्याने व्हॉट्सएपमधून शाहू स्मरकाजवळ मिहीरचा काढलेला फोटो शक्तीला पाठवला...

मेसेज आल्याचं वायब्रेट झालं. गाडी चालवत असलेला शक्ती काय ते समजला. त्याने गाडी क्लबकडे घेतली...

जेसन खाली उतरला. पण शक्ती गाडीत बसूनच होता.

"मी नम्याकडे हॉस्पिटलला जातोय. नंतर येऊन भेटतो म्हणून डॅनियलला सांग!" शक्ती म्हणाला आणि जेसनच्या प्रतिक्रियेची वाट न पाहता त्याने गाडी पळवली!

जतीन देखील हॉस्पिटल बाहेर आपली गाडी घेऊन त्याच्या ठिकाणाला लागला होता...

डॅनियल शक्ती बसत असलेल्या सोफ्यावर आपल्या मैत्रिणींसोबत बसला होता. तो स्वतः त्याच्या मैत्रिणींसाठी ड्रिंक्स सर्व्ह करत होता. खूप रात्र झाल्याने इतर कस्टमर्स गेले होते. पण पुढं नाचगाणं डॅनियलने आज तसंच चालू ठेवलं होतं. जेसन पुढं येऊन थांबला, तेव्हा त्याच्यावर नजर पडताच डॅनियलने नाचगाणं बंद करून सोबत बसलेल्या मैत्रिणींना देखील जायला सांगितलं.

क्लब पूर्णतः रिकामा झाला. म्युझिक बारीक आवाजात चालूच होतं. डॅनियलचा शौक क्लबमध्ये माहीत होता.

"हाऊ वॉज इट?" हातातली बाटली टेबलवर बाजूला ठेवत डॅनियलने विचारलं.

"ही फायर्ड् ऑन दॅट एजंट! बट आय डोन्ट ट्रस्ट हिम!" जतीन डॅनियलच्या बाजूला बसत म्हणाला.

"का?" डॅनियलने तडख विचारलं.

"त्याने खूप लांबून फायर केलं. मला चेक सुद्धा करू दिल नाही!" जतीन शंका व्यक्त करत बोलला.

"किती लांबून?" डॅनियलने विचारलं.

"अराऊंड् वन फिफ्टी ऑर टू हँड्रेड् मीटर्स!"

"हॅ! देन नो प्रॉब्लेम! 50 बीएमजीज् रेंज इज सेवन थाऊसेंन्ड् मीटर्स!"

"बट!"

"रिलॅक्स! हॅव अ ड्रिंक!" डॅनियल मागे रेलून म्हणाला.

"पण त्याने मग मला चेक का करू दिलं नाही?" जेसनची शंका दूर झाली नव्हती. त्याने शंकीत विचारलं.

"तुला तो काय बोलला?"

"म्हणाला की मी बॉडीच्या जवळ गेलो तर माझे ट्रेसेस तिथं राहतील..."

"ही वॉज राईट प्रोबॅब्ली!" डॅनियल म्हणाला,

"ही रिअली इज समथिंग आय मस्ट हॅव टू एडमीट!" डॅनियल इम्प्रेस होत म्हणाला.

"हाऊ कॅन यु सो रिलाईबल ऑन हिम? यु आर नॉट लाईक थिस!" जेसन नाराजी व्यक्त करत ओरडला!

"बिकॉज; इफ ही ट्राईज् टू डबल क्रॉस अस, आय विल मेक हिस माईफ हेल! अँड आय ट्रस्ट मायसेल्फ फॉर दॅट!" डॅनियल आत्मविश्वासाने म्हणाला  व एकाच टोस्ट मध्ये त्याने राहिलेलं ड्रिंक संपवलं!

शक्ती नम्याच्या शेजारी बसून होता. तिला मध्यंतरी एकदा नम्या शुद्धीवर आली होती. म्हणून शक्तीला तिच्याजवळ थांबण्याची परवानगी दिली गेली होती.

अचानक त्याला आठवलं. त्याने जतीनने पाठवलेला फोटो पाहिला आणि तो उठून बाहेर गेला.

इकडे पंतप्रधान यांच्या रूममधला फोन घणाणला. रात्रीच्या शांततेत तो आवाज घुमला. पीएमनी तातडीने कॉल रिसिव्ह केला.

जे घडत आहे त्याच्या कल्पनेने त्यांना झोप येत नव्हती. ते काळजीने जागूनच होते...

"सर, कोणी शक्तीसेन आपल्याशी बोलू इच्छितात!" पलिकडून रात्री अपॉईंट असलेली रिसेप्शनिस्ट बोलली.

"जोडून द्या!" पीएमनी परवानगी दिली.

"हॅलो सर!" पुढचा आवाज शक्तीचा होता!

"बोला शक्तीसेन!" पीएम ठामपणे बोलले. पण त्यांची चिंता ओसरली नव्हती.

"सर, मिहीर मेलेली न्यूज चॅनेल्स व न्यूजपेपरला द्यायची आहे!" शक्ती म्हणाला.

तो भिंतीत डोकं खुपसून बोलल्यासारखं वॉर्डमधून बाहेर आल्या आल्या समोरील भिंतीकडे तोंड करून उभारला होता.

"काय म्हणजे तुम्ही खरंच..." पीएम दचकले होते. त्यांना पुढं बोलवलं नाही...

"नाही सर! पण शत्रूंना हे पटायला हवं! म्हणून ही न्यूज जाहीर करावी लागेल! पण सर, त्या आधी एसपीना सांगून मिहीरच्या घरच्यांशी बोलून घ्यायला सांगा. नाही तर हे खरं समजून त्यांना  उगाचच याचा त्रास होईल." शक्ती म्हणाला.

"यु आर राईट! मी बोलतो! तू फोटो ब्रॉडकास्टिंग मिनिस्ट्रीला मेल कर!" पीएम जरा रिलॅक्स होत बोलले.

"हो सर! पण एक रिक्वेस्ट आहे. सध्यातरी यात अपोजिशनचं नांव घेऊ नका. नंतर तुम्ह◌ाला राजकारण करायला खूप वेळ मिळणार आहे!"

"हं!" पलिकडून गंभीर असे पीएम उद्गारले.

"बाय सर!" म्हणून शक्तीने फोन कट केला.

मेल करण्याआधी त्याला आणखी एक काम करणं बाकी होतं. आणखी एकाला आत घेणं गरजेचं होतं!

शक्तीने तो पूर्वी काम करत असलेल्या अँटी टेररिसम सेलला फोन लावला.

"शक्ती बोलतोय! आधार हॉस्पिटल बाहेर पांढरी टाटा नेक्सॉन नंबर एमएच शून्य नऊ एपी सोळा शून्य पाच मध्ये एक व्यक्ती बसून आहे. त्याब्यात घ्या त्याला!" एवढी सूचना देऊन शक्तीने फोन कट केला.

शक्तीची व हिमांशूची प्रत्यक्ष कधी भेट झाली नव्हती. डॅनियलने गोपनीयता म्हणून आपले इम्प्लॉई एकमेकांपासून अपरिचितच ठेवले होते. शिवाय शक्तीवर त्याचा पहिल्या पासून संशय म्हणून त्याने शक्ती व हिमांशूची ओळख मुळी करून दिली नव्हती. तरी शक्तीने हिमांशूला त्याच्या हॉटेल बाहेर, सिराज क्लबमध्ये आणि आता या हॉस्पिटल बाहेर सेम गाडीसोबत अनेकदा पाहिलं होतं. आणि हे शक्तीसाठी पर्याप्त होतं, हिमांशू हा डॅनियलचा हस्तक आहे हे ओळखण्यासाठी!

हिमांशूच्या अटकेच्या तरतूदीचं काम करून मग शक्तीने 'माहिती आणि प्रसारण मंत्रालय' (इन्फॉर्मेशन अँड ब्रॉडकास्टिंग मिनिस्ट्री) ची वेबसाईट शोधून त्यावरून मिनिस्ट्रीचा ईमेल आयडी मिळवला व मिहीरचा दसरा चौकातील बेशुद्ध पडलेला व रक्ताने माखलेला फोटो मेल केला. मेलचा सब्जेक्ट होता, 'पीएम्स् इम्पोर्टन्ट डॉक्युमेंट व खाली मजकूर म्हणून त्याने फक्त आपले नांव लिहिले... 'शक्तीसेन नाईक!'

तो नम्याच्या स्पेशल वॉर्डमध्ये प्रवेशला. जाग आलेली नम्या त्याला आत येताना पाहत होती...

"कसं वाटतंय आता?" शक्ती तिच्याजवळ येत म्हणाला.

"बरी आहे..." नम्याने तोंडावरील ऑक्सिजन मास्क हटवत उत्तर दिलं.

"अजूनही तू डॅनियलशी प्रामाणिक राहणार आहेस?" बाजूच्या स्टूलवर बसत शक्तीने तिला विचारलं.

"तू आहेस कोण?" मागे सरकून बसत नम्याने विचारलं,

"पोलीस आहेस?" स्थिरावून शक्तीच्या नजरेत नजर घालून तिनं प्रश्न केला.

"नाही!"

"मग कोण? आणि हे सगळं का करतोयस?"

"माणूस म्हणून!"

"मला पण वाचवलं ते याच कारणानं?" तिनं विचारलं.

शक्ती नुसता हसला.

'दोन वर्षांपूर्वी मी अँटी टेररिसम सेल, कोल्हापूर पोलीस मध्ये काम करत होतो.'

'आम्ही प्रयत्न करून एक टेररिस्ट ॲक्टिव्हीटी होण्यापासून रोखली होती... काही टेररिस्ट देखील पकडले गेले होते!

'त्या दिवशी जेव्हा मी घरी आलो... गार्गी, माझी बायको खूप चिडली होती... मी काही तरी महत्वाचं विसरलो होतो, म्हणून ती रागावली होती...

'हं! मला अजून आठवत नाही, की मी काय विसरत होतो...

'मग तिचा राग जावा म्हणून मी आऊटिंग प्लॅनिंग केलं...

'रात्री जेव्हा आम्ही घरी परतत होतो; आम्हाला रस्त्यात एबडक्ट् केलं गेलं...'

शक्ती व गार्गीला एका प्रशस्त बंगल्यात आणलं गेलं होतं... आत अंधार होता. ते आत आले तसे लाईट्स लावल्या गेल्या. समोर एक पच्चावन - साठ वर्षांचा इसम सोफ्यावर बसलेला शक्तीला दिसला. सोफेस्टिकेटेड् कपडे घातलेले त्या इसमाचे गुंड त्या श्रीमंतीची व्याख्या करणाऱ्या खोलीत सर्वत्र विखुरले, पेरले गेलेले होते!

तो मस्तवाल इसम हसत शक्तीकडे पाहत होता. गार्गी घाबरली होती... ती शक्तीचा हात पकडून त्याच्या मागे सरकून उभी राहिली.

'आमच्या माणसांना सोडून द्या!' तो शक्तीला बोलला.

भीती दाखवण्यासाठी तो हातातली पिस्टल नाचवत होता.

'हे होऊ शकत नाही! पण त्यांना भेटायची तुला एवढीच इच्छा असेल, तर मी एक करू शकतो; तुला पण त्यांच्यासोबत आत टाकू शकतो!'

'तुम्ही खूप फनी आहेत शक्तीसेन! पण मीही थोडं फन करू शकतो!' तो बोलला.

आणि त्याने शक्ती व गार्गीच्या मागे येऊन उभ्या झालेल्या त्याच्या गुंडाला इशारा केला. तो पुढे झाला आणि त्याने मागून गार्गीचे केस ओढून तिला शक्तीपासून बाजूला केलं. शक्ती विरोध करण्यासाठी पुढे झाला, पण त्याच्या डाव्या बाजूच्या एक गुंडाने शक्तीच्या पोटात गुडघा मारला. शक्ती त्याच्या गुडघ्यांवर आला. शक्तीचे हात मागे ओढून बांधण्यात आले.

'जा! मजा करा!' तो इसम आपल्या गुंडांना बोलला.

रागाने शक्तीचे डोळे मोठे, लालबुंद झाले. तो त्या इसमाच्या बोलण्याचा अर्थ समजला होता...

हे ऐकून त्याचा गुंड गार्गीला आतल्या खोलीत ओढत घेऊन जाऊ लागला...

गार्गीने मग स्वतःला वाचवण्याच्या प्रयत्नात प्रतिकार केला. तिने मागे वळून तिला पकडलेल्या गुंडाचे डोके पकडले व त्याला जोराने खाली वाकवून आपल्या गुडघ्यांवर त्याचे डोके आदळले होते. यात तिच्या केसांना जोरात हिसका बसला होता, पण तिकडे तिने वस्तुत: दुर्लक्ष केलं होतं. शक्तीने तिला सेल्फ डिफेन्स शिकवून ठेवला होता, तो अशा कामी यावा म्हणूनच!

त्या गुंडाला इतक्या जोरात गार्गीचा गुडघा डोक्यात लागला होता, की तो जमिनीवर तोल जाऊन पडला. पण तिचं हे वर्तन त्या सोफ्यावर बसलेल्या इसमाला आवडलं नाही. त्याची पिस्टल चालली! गोळी सुटली...

ती थेट गार्गीचा मेंदू छेदून भिंतीवर आदली.

शक्ती तिच्याकडे पाहत होता... त्या इसमाने त्याच्या समोर गुडघ्यांवर असलेल्या शक्तीची कॉलर पकडली. आपली पिस्टल शक्तीच्या डोक्याला लावली.

'तुझी बायको तर गेली, पण तुझी मुलगी अजून आहे! हा! ती तिच्या आजीकडे आहे हे माहितीये मला!

'नाऊ डू, एज आय से!' तो इसम डोळ्यांत आसवं घेऊन त्याच्या नजरेला नजर देणाऱ्या शक्तीला म्हणाला.

शक्तीच्या डोळ्यांतले पाणी त्या इसमाच्या पायाशी ठिबकले...

"मी त्याच्या पकडलेल्या माणसांना सोडून दिलं...

"पण माझं कर्तव्य मी कसा विसरणार होतो. ट्रॅकिंग डिव्हाईस एकाच्या शरीरात आम्ही इंजेक्ट केलं होतं. त्याच्या आधारावर आम्ही पुन्हा त्या माणसासह त्याची पूर्ण टोळी पकडली!

"माझी सर्व्हिस चालूच होती... पण गार्गीच्या आठवणी मला काम करू देईनात... म्हणून मग नंतर मी नोकरी सोडली!"

"तुझी मुलगी?"

"ती अजूनही तिच्या आजीकडे आहे. गार्गीच्या आईकडे! दोन वर्षांत मी इतकी हिंमत नाही जोडू शकलो, की मी माझ्या मुलीला तोंड देऊ शकेन...!" शक्तीने दीर्घ निःश्वास सोडला.

तो निराश बसून राहिला... नम्याला देखील काय बोलावे सुचत नव्हते! पण ते काही क्षण तसेच शांत जाऊ देऊन ती बोलली,

"मी तुला जी माझी कहाणी सांगितली होती, ती खरंच खरं होती... तू कोण आहेस हे मला जाणून घायचं होतं! कारण तूच मला मदत करू शकतोस अशी माझी धारणा होती! मला डॅनियलला संपवायचं होतं! पण तू कोण आहेस हे समजायला काहीच मार्ग नव्हता. म्हणून मी डॅनियलला मदत करत होते. डॅनियलने तुझी खरी डायडेंटिटी शोधून काढली, तर मला तुझी मदत घेता येणार होती..." ती शक्ती पासून नजर दूर ठेवूनच बोलली.

"मग थेट तू माझ्याशी का बोलली नाहीस?" शक्तीने अधीरतेने विचारलं.

"कारण तू कोण आहेस हे माहीत असल्याशिवाय तुझ्यावर विश्वास ठेवून तुला काही सांगणं मला ठीक वाटलं नाही!" नम्याने भूमिका स्पष्ट केली.

"मग आता बोल!" शक्ती तिला आश्वस्त करत म्हणाला,

"हा डॅनियल कोण आहे?" त्याने भाव बदलून ते करडे करत मुद्याला हात घातला.

"खरंच माहीत नाही! पण वाचस्पती यांच्या खुनामागे त्याचा मोठा हात आहे. तोच सगळं घडवून आणत होता!

"कोल्हापूरमध्ये वाचस्पती यांच्या खुनापासून जे काही संबंधित आहे ते डॅनियलशीच!" नम्याने स्पष्ट केलं.

"एवढ्या मोठ्या कॅस्पिरसीची पार्श्वभूमी कोल्हापूरच का?" सक्तीने त्याला भेडसावत असलेली शंका व्यक्त केली.

त्याची ही शंका रास्तच होती. कारण जी घटना भारताच्या बाजूने जागतिक उलथापालथ करण्याची क्षमता बाळगून होती, त्याचा मोठा आणि महत्वाचा हिस्सा कोल्हापूर सारख्या साधारण शहराच्या मधून जात होता...

"वाचस्पती थोडे आजारी होते म्हणून आरामासाठी ते त्यांच्या मूळ गावी इथं कोल्हापूरला आले होते. इथं त्यांना संपवणं हे कोणत्याही इतर ठिकाणापेक्षा सोपं होतं म्हणून हे शहर निवडलं!" नम्याने खुलासा केला.

"नाईट क्लबची काय भूमिका आहे?"

"ते डॅनियलचंच आहे. वाचस्पती यांना मारणाच्या महिनाभर आधी कव्हर म्हणून ते नाईट क्लब खरेदी केलं. सोबत आम्हा मुलींना पण..." नम्याने सत्यासोबत तिच्या मनात सलणारी खदखद शक्तीने न विचारता व्यक्त केली.

"पण डॅनियल तर बिझनेसमन आहे. मग त्याने थेट या सगळ्यांत लक्ष का घातले?"

"कारण कोणतीही गडबड होऊ नये याची त्याला खात्री हवी होती. म्हणूनच तो स्वतः या सगळ्यात उतरला. पण तो काम अलिप्त राहूनच करत होता.

"तू या प्रकरणात गुंतला नसतास, तर त्याची इन्वॉल्व्हमेंट कधी समोर आलीच नसती!" नम्याने शक्तीला त्याच्या कृतींची आठवण करून दिली.

"डॅनियल आणि जेसनची खरी नांवं ही नक्कीच नसतील?"

"नाहीत! त्यांची खरी नांव मलाही माहीत नाहीत, पण त्याचे वडील हे महाराष्ट्रीय होते. म्हणून त्यांना रेफ्युजी म्हणून भारतात प्रवेश मिळवणं शक्य झालं... चार - साडेचार वर्षे त्यांचे प्लॅनिंग चालू होते. दरम्यान सरकारने त्यांचा नवीन बनवलेला डेटा देखील इरेज केला गेला... सरकार मधली काही माणसं त्यांना सामील आहेत. पण ती कोण ते माहीत नाही..." नम्या तिला ज्ञात असलेली माहिती शक्तीला पुरवत होती.

"त्याची चिंता करू नको! काय अमेरिकेशी डॅनियलचा खरंच सबंध आहे?"

"हो! सिराज क्लबचा मॅनेजर, तो एक सीआयए एजंट आहे! डॅनियल घडवत असलेल्या घटनांना सुपरवायझ करणं हे त्याचं काम आहे!"

पुढं शक्तीने काही विचारलं नाही!

"मी या दलदलीतून तुला बाहेर काढेन! माझ्यावर विश्‍वास ठेव!" म्हणून तो उठला आणि वॉर्ड बाहेर निघाला. अजून बरीच कामं करणं त्याच्यासाठी बाकी होती...

जेसन  त्याच्या रूममध्ये अस्वस्थ होता... एक मुलगी त्याच्या बेडवर झोपून होती, पण त्याला यात काहीच रस नव्हता. शरीरी मध्यम बांधा पण गोठीव. असा तो शर्टलेस बेडच्या कोण्यावर आपल्या पिस्टलला हातात घेऊन सिगरेट दातांत दाबून विचार करत बसला होता...

त्याला डॅनियलचा स्टँड मात्र काहीच पटत नव्हता. तो तातडीने उठला. अंगात शर्ट अडकवून तो भव्य अशा बंगल्याच्या बाहेर आला.

फुटपाथवर फिरत त्याने हिमांशूला फोन लावला,

"हिमांशू, इज शक्ती देअर?" त्याने गुश्श्यातच विचारलं. तोंडी सिगारेट असल्याने त्याच्या प्रत्येक शब्दागणिक धुराचा भपकारा त्याच्या तोंडून बाहेर पडत होता...

हॉस्पिटल पार्किंगमध्ये गाडीत बसून असलेला हिमांशू बोलला,

"नाही! तो आला होता, पण काही वेळापूर्वी कुठं तरी निघून गेला!" हिमांशूने माहिती पुरवली.

आणि त्याने वडापावचा तुकडा तोडला. इतक्यात त्याच्या दारावर एका काळा लेदर गल्व्ह्ज् घातलेल्या हातानं नॉक झालं.

हिमांशूनं काचेकडे पाहिलं. समोर टेररीजम सेलचा ऑफिसर उभा होता. हिमांशूने हातातला वडापाव टाकून दिला आणि त्याचा हात त्याच्या कोटातील होलस्टरकडे गेला.

पण गन काढण्याची संधी ऑफिसरने त्याला दिली नाही! त्याने आपली गनहिमांशू वर पॉईंट केली!

"बाहेर ये!" त्याने हुकूम झाडला.

हिमांशूला पर्याय नव्हता. तो बाहेर आला. पाहतो तर त्याला पाच ऑफीसर्सनी घेरलं होतं. त्याच्या दोन गाड्या मागे लावल्या होत्या. ते त्याच्यावर आपल्या गन्स रोखून उभारले होते... हिमांशूची एक चुकीची हालचाल आणि त्याचा जीवन प्रवास तिथंच संपणार होता...

त्याच्या गाडीच्या काचेवर नॉक केलेल्या ऑफिरसरने पुढं होत हिमांशूच्या कोटाच्या आतली गन काढून घेतली.

"यु आर अंडर अरेस्ट!" पुन्हा हिमांशूवर गन पॉईंट करत तो म्हणाला.

हिमांशूचे हात आपसूक हवेत उंचावले गेले. त्याच्या डाव्या हाती मोबाईल होताच. सगळी घटना जेसन तिकडे ऐकत होता!

जेसनला शक्तीबद्दल हीच माहिती अपेक्षित होती. शिवाय पलीकडे काही गडबड झाली आहे हे तो समजून चुकला होता. तो तक्षणी मागे बंगल्यात पळाला!

"शक्ती इज नॉट इन दि हॉस्पिटल!" तो धावत येतच डॅनियलच्या खोलीत शिरला होता.

डॅनियल सावरला. उठून बसला. तो पाणी ओतून घेऊ लागला.

"सो?" डॅनियलने पाणी ग्लासात ओतून घेत विचारलं.

"ही टोल्ड् मी दॅट ही वॉज गोईंग टू द हॉस्पिटल!" जेसनने खुलासा केला.

डॅनियल तरी काही फरक न पडल्यासारखा चेहरा ठेवून होता...

"अँड हिमांशू हॅज बिन अरेस्टेड्!" जेसनने माहितीत मोलाची भर टाकली!

डॅनियलचे कान खडे झाले! त्याने वर जेसनकडे पाहिलं. एक विकट व त्याहूनही क्रूर हास्य त्याच्या ओठी विसावलं...

काहीवेळ परिस्थितीचा अंदाज घेतला आणि त्याने बॉटल खाली ठेवून समोरच पडलेला आपला मोबाईल उचलला.

एका ट्रॅकिंग सॉफ्टवेअर मध्ये जाऊन त्याने स्वतः शक्तीला दिलेला मोबाईल सर्च केला.

लोकेशन दाखवलं गेलं.

"वेअर इज पीएम स्टेअड्?"

"रेनिसांस!"

"गो. किल हिम! यु विल गेट अ सरप्राईज देअर!" डॅनियल जेसनला म्हणाला!

हे ऐकून जेसनच्या आभावर आनंद मावेनासा झाला! त्याला सलत असलेल्या शक्तीला मारण्याची अखेर संधी मिळाली होती!

परंतु लगेच तो शंकेने घेरला गेला.

"बट व्हॉट अबाऊट यो ग्रँड प्रोजेक्ट?" जेसनने डॅनियलला विचारलं.

"आपण आत्ता जर पकडले गेलो, तर ते कधीच पूर्ण होऊ शकणार नाही! त्यापेक्षा मी अजून पाच वर्ष वाट बघायला तयार आहे!" डॅनियल शांतपणे ड्रिंकचा कडू घोट घसाखाली रिचवत बोलला...

## १०. सत्य (दि ट्रुथ फ्रॉम दि ट्रेटर)...

उघड्या असलेल्या दरवाजातून शुक्ला आत आला. तसा उघडा दरवाजा ढकलला गेला. दरवाजा मागे शक्ती उभा होता. त्याच्या हातात पंतप्रधानांच्या स्पेशल प्रोटेक्शन ग्रुपच्या एका एजंटची 'एफएन हर्स्टल्' होती. शक्तीनेच दार लोटले होते.

"चुपचाप कुर्सी पर बैठो!" तो मागून ओरडला.

शुक्लाने मागे पाहिलं. शक्ती हातात पिस्टल घेऊन उभा दिसला. तो घाबरून खिडकीला अपोजिट उभ्या व त्याच्याकडेच पाहत असलेल्या पीएमकडे वळला. पीएम देखील हतबल होते. असहाय्यता त्याच्या मुखमंडलावर स्पष्ट होती. ते मागे हात बांधून उभे होते. शुक्लाला नजर न देता त्यांनी खाली पाहिलं.

याचा अर्थ शुक्ला समजून चुकला. पीएमनी शुक्लाला शक्तीला सोपवलं होतं हे सहज होतं!

तो गपचूप काही न बोलता मग शक्तीने आधीच रूमच्या मध्यभागी मांडून ठेवलेल्या खुर्चीवर बसला. त्या खूर्ची समोरच आणखी एक रिकामी खूर्ची ठेवली होती. तीवर शक्ती विराजला. हातात पिस्टल तशीच!

"आप किसके लिए काम कर रहे हैं?" शक्तीने थेट प्रश्न केला.

"भारत सरकार के लिए!" कचरत शुक्ला म्हणाला.

"इससे पहले मेरा सब्र टूटे सच बोलला सुरु करें!" शक्तीने धमकावलं.

शुक्ला गप्पच!

"आपको क्या ऑफर मिली अपोजिशन से?" शक्तीने पुढचा प्रश्न केला.

"आप क्या बोल रहे है मैं कुछ नहीं जानता!" शुक्ला आपल्याला सेफ करण्यासाठी खोटं बोलला.

हे करून काही उपयोग नाही हे त्याला माहित होतं; तरी तो बोलला होता!

स्वतःचा जीव वाचवण्यासाठी कोणताही साधारण प्राणी शेवटपर्यंत प्रयत्न करतो! एखादं सावज आपण शिकारीच्या हातून वाचणार नाही हे माहीत असून शेवट पावेतो झुज देतच! आत्ताही तीच परिस्थिती होती!

इथं सावज होता शुक्ला; आणि शिकारी होता शक्तीसेन!

शक्तीने मग जास्त वाट पाहिली नाही. त्याच्या कडील एफएन पिस्टलमधून गोळी सुटली.

ती घुसली ती बरोबर शुक्लाच्या उजव्या गुडघ्यात!

'गुन्हेगाराला शिक्षा करणं हे कोर्टाचं काम आहे' यावर शक्तीचा पूर्ण विश्वास; म्हणून शक्ती त्याला मारणार नव्हता! त्याला फक्त उत्तरं हवी होती!

पण हे दृश्य पाहून पीएम नेमके विचलित झाले! त्यांना काय करावं कळेना. ते खोलीतच सैरभैर गडबडी हालचाल करू लागले. कधी ते पुढं शक्तीकडे पाऊलं टाकायचे, तर कधी तसेच मागे वळायचे. त्यांनी कदाचित पहिल्यांदा असं काही इतक्या जवळून पाहिलं असावं... किंवा मग शुक्ला त्यांच्या विश्वासातला असल्यानं ते विव्हल झाले असावेत...

"काय करतोयस! असं करू नको!" पीएम गयावया करत शक्तीवर ओरडले.

वेदना होतच होत्या, पण पीएमच्या या कृतीनं तर शुक्ला जास्तच घाबरला.

आत काहीही झालं, तरी आत यायचं नाही हे संकेत आधीच दिले गेले असल्याने स्पेशल प्रोटेक्शन ग्रुपचे एजंट्स गोळीचा आवाज आला तरी आत प्रवेशले नव्हते!

शुक्ला चौकशी दरम्यान मेलाच तर माननीय पंतप्रधान यांच्या संरक्षणासाठी त्यांच्या सुरक्षा रक्षकांनी शुक्लाला मारले हे चित्र उभं करणं शक्य व्हावं या विचाराने म्हणून शक्तीने त्या सुरक्षा रक्षकांपैकी एकाची पिस्टल वापरली होती.

"घाबरू नका सर! हे मरणार नाहीत, हा! पायाने अपंग होतील नक्कीच!" शक्तीने एखाद्या राक्षसासारखं क्रूर स्मित करत शुक्लाकडे पाहत बोलला.

शुक्ला तोंडावाटे आपली वेदना बाहेर  पडू नये म्हणून दातांत ओठ जितक्या जोरात दाबता येईल तितक्या जोरात दाबून शक्तीकडे पाहत होता. पण वेदनांनी बाहेर पडण्यासाठी वाट शोधली होती; ते अश्रू बनून डोळ्यांच्या कडांना साचून राहिले होते. पण तेही शुक्ला खाली ओघळू देत नव्हता!

त्याला मराठी समजत नसलं, तरी 'अपंग' हा शब्द हिंदी, मराठीत एकच असल्याने शक्ती काय म्हणाला असेल हे त्याला ध्यानात आले!

"अब बोलोगे?" शक्तीने हसतच विचारलं!

"आप ऐसें किसीं को जबरदस्ती नहीं कर सकते! संविधान इसकइ इजाजत नहीं देता!" शुक्ला रडल्यागत ओरडला.

"अगर संविधान की इतनी चिंता आपको होती, तो आप जनमानस के साथ मिलके ये घिनोना खेल नहीं खेलते! और अगर आप संविधान और कानून की इतनी ही जानकारी रखते हैं, तो आपको ये भी पता होगा, की देश के गद्दारोंकी क्या सजा होती हैं!" शक्ती शांतपणे पण धमकावण्यासाठी बोलला.

त्याचा वार वर्मी लागला होता, तरी त्याने आपल्या 'प्रेमळ' शब्दांत भर टाकली...

"आप जितना देर लगाओगे, उतना खून बहेगा! और जितना खून बहेगा, उतनेही आपके रिकवरी के चांसेस घटेंगे!" शक्तीने धमकावलं.

आता मात्र शुक्लाचा धीर सुटला. त्याला शक्ती जे बोलला ते पटलं होतं. त्याने आत्ता जर सहकार्य केलं नसतं, तर तो इथून पुढं आयुष्यभर एका पायाने अधू झाला असता आणि जर शक्ती एवढ्यावर थांबला नसता तर दोन्ही पायांनी... आणि मग कधीच शुक्ला जीवनभर चालू शकला नसता... पुढची संभावित चित्रं शुक्लाच्या डोक्यांत क्षणार्धात पळाली. आणि त्याने निर्धार केला...!

"जो हो रहा है, अपोजिशन का किया कराया हैं! सब के पीछे डॅनियल है!" तो म्हणाला.

"मालूम है! जो पता नहीं वो बताने की कृपा करें!" शक्ती बोलला.

"लोककल्याण की सरकार गिरे इसके लिए महँगाई बढ़ाने की कोशिश की गई! भ्रष्टाचार के आरोप भी लागए गये! हमारे कुछ पार्टी मेंबर्स एवं मंत्रीयो ने छोटे मोटे गफले किए भी हैं, सो आरोप करके चिंतपल्ली सर, हमारी सरकार और पार्टी के बारे में जनता के मन मे रोष उत्पन्न करने में जनमानस कामयाब हो रही थी, की पीएम ने नई टैक्स पॉलिसी बनाने का प्रस्ताव रखा! इराक और अरब देशों में जारी युद्ध की वजह से महँगाई तो काबू में आ नहीं सकती थी। पर पीएम का मानना था, की हम कर प्रणाली में सुधार करके जनता को राहत तो दे ही सकते हैं! इकसे बारे में इनकी गतिविधियाँ बढ़ी! अपोजिशन को डर सताने लगा, की अगर पीएम सफल हुए तो अगला चुनाव भी हमारी पार्टी ही जीतेगी! सो..."

"इसलिए उन्होंने अपने ही नेता को मरवा डाला!" पीएम पुढं होत शुक्लावर ओरडले!

शुक्ला ने खाली मान घालून अपराधीपणे हो म्हणत तीच मान डोलावली.

उनके सबसे लोकप्रिय नेता इंद्रदत्त वाचस्पती जी को मारकर जनमानस के कुछ नेता जनता, की सहानुभूति गेन करना चाहते थे। और इससे सत्ता पक्ष यानी हमारे लोककल्याण को दोषी रखकर डीएमएफ करने का जनमानस का प्लान था! बेचारे वाचस्पतीजी को उनके मृत्यु के प्लान के बारे में कुछ पता नही था!"

"जो बोओगे, वहीं तो पाओगे!" शक्ती वाचस्पतीला उद्देशून बोलला असला, तरी त्याने शुक्लाला यातून त्याच्या भविष्याचं दर्शन करवण्याचा अट्टहास केला होता.

यावर शुक्ला गप्प मान घालून बसला.

"शुक्ला आपने ही पार्टी से गद्दारी करते तुम्हें शरम नहीं आई?" पीएम पुन्हा ओरडले.

त्यांच्या तळपायाची आग मस्तकसुळ बनत चालली होती!

"पार्टी से क्या इन्होंने तो देश से गद्दारी कर डाली!" शक्ती शुक्लाला चिडवण्यासाठी बोलला...

"ये डॅनियल कोन है?" शक्तीने शुक्लाला पुढं विचारलं.

"डॅनियल तो बड़ेसे जिग्सॉ का छोटासा तुकडा हैं!" शुक्लानं चुप्पी तोडली.

"तुम्हारी तरह?" शक्तीनं उपहासानानं खुदकत विचारलं.

शक्तीला उत्तराची अपेक्षा नव्हतीच. शुक्लाला लाज आणण्यासाठी तो हे उद्गारला होता. म्हणून...

"इसमें डॅनियल का क्या रोल है?" शक्तीने शुक्ला पुढं विचारलं.

"डॅनियल एक बडा इन्व्हेस्टर है, जो अमेरिका के थ्रू इंडिया में इन्व्हेस्ट करना चाहता था! पर पीएम सर के मना करने से उन्होने अमेरिका संग डॅनियल के भी इरादों को भंग किया!"

"महँगाई कैसे बढ़ा दी गई?" शक्तीने प्रश्न केला.

"आखाती देशांत युद्ध घडवून! हो ना?" पीएमनी शुक्लाकडे घृणीत नजरेने पाहत खुलासा केला,

"अमेरिका सोबत असताना हे करणं अवघड ते काय?" पीएमनी आपलं वाक्य पूर्ण केलं.

शुक्लाने दीर्घ श्वास सोडला. कदाचित त्याला अपराधी वाटत होतं, का मृत्यूचं भय होतं... माहीत नाही, पण तो सत्य सांगू लागला...

इतका वेळ झालं शुक्ला वेदना सहन करत होता... मांडीतून खालपर्यंत रक्त वाहून व्हाईट मार्बल फ्लोअर त्याच्या पाया भोवती लाल रंगाचा झाला होता!

"हा! अमेरिका इराण, इराक से अपनी सेनाएँ हटाने वाला था। ट्रूप्स भी कम किए जा रहे थे! पर यह अमेरिका की रणनीति थी! वह डायरेक्ट युद्ध छेड़ना नही चाहते थे। ताकि सम्बंधित देश, यूएन या कोई भी अन्य देश युद्ध के लिए अमेरिका को जिम्मेदार ना पकड़े। इसिलिए उन्होंने इराक में स्थित अपनी सेना हटाई और वहाँ के एवं अन्य अरब देशों के मिलिटन्ट्स और आतंकियों को इनडायरेक्ट्ली हथियार सप्लाय करने लगे! असंतुष्ट तत्व किस देश में नहीं होते? उन जैसों का तो प्रयोग करके अरब देशों में गृहकलह जैसी परिस्थितियां तैयार की गई। जिससे वहाँ के तेल उत्पाद और निर्यात पे उसका परिणाम हो। इसी तरह से तेल के दाम बढ़ा दिए गए थे! अगर संबधित अमेरिकी तेल कपनियां खुद से प्राइज बढ़ाती, तो संशय हो सकता था। इसलिए इतनी बड़ी साजिश गढ़ी गई! डॅनियल भी इसमें अमेरिका के साथ था ही! हथियार पोहोचाना उसीके हाथ मे ही तो था!" शुक्लाने एवढं मोठं कारस्थान उघड केलं...!

"भारत को अपने अधिकार में लाने के लिए इतनी बड़ी साजिश! यकीन नहीं होता!" शक्ती अविश्वासाने बोलून गेला.

"क्यों ना?!" पीएम बोलू लागले,

"अगर तेल का दाम बढ़ गया, तो सिर्फ भारत ही क्यों? पर जो जो देश तेल के लिए इराक एवं सौदी पर डिपेंड हैं, उन सभी पर अधिकार करना अमेरिका को आसान हो जाता! सभी

वस्तुओं की कीमतें तेल की कीमतों पर निर्भर होती हैं! इसीका फायदा यह लोग उठाना चाहते थे!"

"इट्स हॉरीबल!" शक्ती उद्गारला.

"येस! जवळजवळ सर्वच देशांची इकनॉमी ही तेलावर चालते. त्यामुळे अमेरिकेचा हा एक मूव्ह त्यांना सर्व देशावर वर्चस्व मिळवून देण्यास पुरेसा आहे!" पीएम बोलायचे थांबले.

तसा शुक्ला बोलला,

"पर आपके नए डायरेक्ट, इनडायरेक्ट टैक्स पॉलिसीज ने अमरिका व जनमानस के इरादे पस्त कर दिए। इसी कारणवश जनमानस ने उनके सबसे लोकप्रिय नेता को मरवाया ताकि उसका आरोप आप पर और अपनी पार्टी पर आए!"

"तो इस तरह से जनमानस इलेक्शन जितना चाहती थी?! पॉलिटिक्स कितनी घिनौनी चीज है यह सिर्फ सुनता आया हुँ! आज स्वयं अनुभव कर लिया!" शक्ती निराश स्मित ओठांवर घेऊन बोलला.

त्याचे डोळे खालच्या कालीन वरील जटिल नक्षीवर लागले होते. डोळ्यांत भाव शून्य...

"तुमने अभी तो कुछ देखा ही नहीं!" शुक्ला शक्तीला बोलला... राजकारण याच्यापेक्षाही घाणेरडं असू शकतं हे तो इंडिकेट करत होता. आणि हे बोलताना त्याने पंतप्रधान यांच्याकडे नजर टाकली होती. ते पाहून मग पंतप्रधानांनी आपली नजर खाली घेतली. ते म्हणाले,

"मैं तुम्हे टोकूँगा नही शक्ती! हमने भी ऐसे कई पाप किए है!"

शुक्लाकडून विदित घटनाक्रम ऐकून पीएम पिंतपल्ली खूपच विचलित झाले होते... त्यांनी नकळतच अव्यक्तपणे आपले गुन्हे कबूल केले, पण ते नेमके कोणते ते उघड न बोलता त्यांनी फक्त स्वतःच्या मनाला त्यांची पुन्हा आठवण करून दिली.

"डॅनियल और उसका सौतेला भाई देश मे कैसे घुसे?" शक्तीने शेवटचा प्रश्न केला!

"रिफ्युजीज् बनके! इससे उन्हे कोई दस्तावेज या कागज नहीं दिखाने पड़े!"

"इतनी बडी साजिश! यकीन करना मुश्किल हैं!" आता पीएम सुद्धा असमंजस झाले...

"यकीन कर लिजीए प्रधानमंत्री जी! यकीन कर लिजीए!" शक्ती म्हणाला.

गुडघ्यांवर हात टेकवत शक्ती उठला. इथलं आपलं काम त्यानं पार पाडलं होतं!

"मी याला तुम्हाला सुपूर्द करतोय! याला दिल्लीला पोहोचवायची आणि याची नीट चौकशी करण्याची व्यवस्था आपण करालच!" बाहेर जात शक्तीने मागे न पाहताच पीएमवर जबाबदारी सोपवली.

शक्तीने ज्या एजंटची पिस्टल घेतली होती त्याला ती परत करून शक्ती लिफ्टकडे गेला. लिफ्टवरच येत होती म्हणून शक्ती वाट बघत थांबला.

लिफ्ट उघडली... आतली व्यक्ती पाहून त्याचे डोळे विस्फारले. तो जेसन होता! त्याने तोंडाला डोक्यासह कव्हर करणारा लाकडी मास्क घातला होता, तरी शक्तीला त्याला ओळखणं नक्कीच कठीण नव्हतं!

जेसन मास्कच्या आत नक्कीच हसत असणार! अखेर शक्तीला मारायला मिळाल्याचा तो आनंद...

त्याने हातात सज्ज ठेवलेली सप्रेसर असलेली त्याची पिस्टल उंचावली, पण तो फायर करणार इतक्यात शक्तीने बाजूला होत त्याच्या हातावर खालून लाथ मारली. जेसनचा हात वर उचलला गेला व सुटलेली गोळी लिफ्टला वर भलं मोठं छिद्र पाडून गेली. पीएम खोली बाहेरील एजंट्स आपल्या गन्स सज्ज घेऊन लिफ्टकडे धावले...

शक्तीने जेसनला लिफ्टमध्ये ढकललं. तोही आत गेला. दोघांची हातापाई चालू झाली. म्हणून एजंट्सना जेसनवर फायर करणं शक्य होत नव्हतं. ते संधीच्या शोधात सतर्क थांबले.

लिफ्टमध्ये जेसन खिशातून गोळी काढून आपली पिस्टल लोड करण्याचा प्रयत्न करत होता, पण शक्तीने त्याचे हात धरलेले होते. शक्तीने त्याच्या तोंडावर उलटं कोपर आदळून त्याला बाजूला करण्याचा यत्न केला. जेसनचं मास्क असलेलं डोकं लिफ्टच्या मेटॅलिक भिंतीवर आढळलं. ती संधी साधून शक्तीने बटन दाबून लिफ्टचं दार बंद केलं.

म्हणून मग लिफ्टकडे धावत आलेल्या एजंट्सना बाहेरच थांबावं लागलं. लिफ्ट वरच्या दिशेने प्रवास करू लागली...

शक्तीची आणि जेसनची फाईट चालू होतीच. जेसन वापरत असलेली पिस्टल अति घातक असली, तरी ती सिंगल शॉट पिस्टल होती. एकावेळी एकच गोळी त्यात भरून ती शूट करावी लागत असल्याने शक्तीला एडवांटेज होतं. त्याने आपली मॅग्नम पिस्टल बाहेर काढली. तो फायर करत होता, पण जेसन पण कच्चा नव्हता! त्याने शक्तीचे शॉट्स चुकवले. मॅग्नममधून सुटणाऱ्या गोळ्या लिफ्टला मोठी मोठी छिद्र पाडत होत्या...

जेसन शक्तीला बराबरची टक्कर देत होता...

पण टक्कर देणं आणि शक्तीच्या विरुद्ध युद्ध जिकणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत!

शक्तीच्या सर्व गोळ्या रिक्त झाल्या होत्या. आता दोघांत मुष्टियुद्ध सुरू झालं. इथेही जेसन चांगलाच झुंझला. अखेर शक्ती प्रमाणाबाहेर चिडला. त्याने जेसनला उचलून खाली पाडलं आणि जेसनच्या गळ्यावर पाय ठेऊन त्याने जेसनला गुदमरवण्याचा प्रयत्न केला. जेसनची धडपड सुरू झाली. तो झटापट करत होता, शक्तीच्या पायावर जोर जोरात मारत होता, पण शक्ती त्याच्या गळ्यावरून पाय काढायला काही तयार नव्हता. शक्तीने स्ट्रगल करतच आपली '500 एस & डब्लू' लोड केली!

पायऱ्यांवरून वरील सर्वांत शेवटच्या फोअर येणाऱ्या एजंटने गन फायर ऐकलं!

***बॅम!!!***

तो लिफ्ट समोर पोहोचला होता. तो जागीच खिळला. त्याच्या ही नकळत त्याची एमएन हर्स्टल् वरील त्याची पकड घट्ट झाली.

समोर लिफ्ट उघडली, तर शक्ती खाली मरून पडलेल्या जेसनवर आपली मॅग्नम पॉईंट करून उभा त्या एजंट्सला दिसला आणि त्या एजंटने सुटकेचा निःश्वास सोडला.

एजंट शक्तीकडे पाहत होता. काय करावे त्याला सुचत नसावे. शक्ती मात्र जणू काही झालेच नाही अशा अविर्भावात एजंटला आत येण्याची त्याने खूण केली. एजंट काही न बोलता लिफ्टमध्ये गेला. शक्तीने बटन दाबून लिफ्ट बंद केली. लिफ्ट पीएमच्या फ्लोअरकडे वापस गेली...

एजंटची नजर पायाखालच्या जेसनवर होती...

"पीएम के पास कोन?" लिफ्टमध्ये सोबत असलेल्या एजंटला शक्तीने विचारलं.

"दुसरा एजंट हैं!" एजंट देखील आतापर्यंत कुल झाला होता. त्याने उत्तर दिलं.

लिफ्ट उघडली. एजंट लिफ्टमधून खाली उतरला...

"प्राईम मिनिस्टर का और अपना ध्यान रखो!" शक्ती म्हणाला आणि बटन दाबून पुन्हा लिफ्ट बंद केली.

हॉटेल लॉबीमध्ये लिफ्ट उघडली गेली. रात्र असल्याने काही स्टाफ सोडला तर कोणी गेस्ट आपल्या रूम बाहेर नव्हते.

दरम्यान लिफ्टमध्येच शक्तीने आपली पिस्टल होलस्टरमध्ये रिप्लेस केली होती.

लिफ्ट समोर असलेली रिसेप्शनिस्ट गोंधळून शक्तीकडे व आत रक्तात पडलेल्या जेसनकडे पाहत होती. तिने 'आ'वासला होता...

शक्तीने लिफ्ट बंद केली.

"जिवंत आहे! पॉवर तोडून ही लिफ्ट सील करून टाका. हॉस्पिटल आणि पोलिस हेडक्वार्टर्सला फोन करा." शक्तीने बाहेर चालत रिसेप्शनिस्टला इन्स्ट्रक्शन्स दिले होते...

शक्तीने त्याच्या मॅग्नमची 50 कॅलिबरची गन पावडर रिड्यूस करून मिहीरसाठी बनवलेली दुसरी गोळी जेसनवर चालवलेली होती आणि तीही पायावर. त्यामुळे त्याच्या पाय निकामी झाला होता, म्हणून त्याचा जीव वाचला होता. पण जेसन वेदनेने तात्काळ मूर्च्छितावस्थेत गेला होता. पण जरी तो शुद्धीत आला, तरी पाय निकामी झाल्याने त्याला आता इथून उठून जाणं शक्य नव्हतं!

रिसेप्शनिस्ट जाणाऱ्या शक्तीकडे हरवल्यासारखी बघतच होती... तिला भानावर यायला नक्कीच वेळ लागला असेल...

## ११. संग्राम (रँग्नारॉक)...

हिमांशूला इंटेरोगेशन रूममध्ये बसवले गेले होते. त्याचे दोन्ही हात समोरील टेबलच्या दोन टोकांना इंचभर साखळी असलेल्या बेड्यांना बांधले होते.

हिमांशू वाट पाहत होता... पुढं काय होतंय याची... कोण प्रवेशणार...? काय विचारणार...?

पण काही का विचारेनात हिमांशू उत्तरं ठरवून बसला होता...!

आता त्याच्या डोक्यातील विचलन थंड झालं... तो कोणातरी येण्याची वाटच पहात होता...

आणि जो प्रवेशाला; तो शक्ती! शक्तीला पाहून हिमांशूने मनमस्तिष्क मध्ये बांधलेले सारे इमले क्षणांत धाराशाही झाले!

त्याने स्वतःला कितीही तयार केलं असलं, तरी त्याला ही अपेक्षा नक्कीच नव्हती की शक्ती आत येईल...!

"सरप्राईज! सरप्राईज!" शक्ती त्याच्यासमोर बसत म्हणाला!

"तू?" कोरड्या चेहऱ्याने हिमांशू उद्गारला.

"डॅनियलचा मोबाईल अनट्रेसेंबल आहे. नम्याला माहीत असलेल्या ठिकाणी तो असण्याची शक्यता नाही. तुलाच त्याचं वेअरअबाऊट माहीत असेल म्हणून आलो. बोल!" शक्तीने थेट मुद्दा उचलला.

"तुला वाटतं मी बोलेन?" तोंडावर घृणीत मग्रूरी आणत हिमांशू उद्गारला.

"तुझ्या माहितीसाठी सांगतो! इथले सगळे कॅमेरे बंद आहेत! त्यामुळे इथं मी तुझ्याशी काहीही केलं, तरी कोण मला विचारणार नाही! आणि विचारलंच तर सांगेन आत्मरक्षेसाठी मारलं!"

"आणि तुला वाटतं हे लोक तुझ्यावर विश्वास ठेवतील?"

"जे लोक मला इथं एक्सेस देऊ शकतात, ते मी सांगेन ते मान्यही करू शकतात. ते खोटं आहे हे माहीत असून...!" शक्तीने खंडन केले!

आणि त्याने आपली मॅग्नम काढून टेबलवर ठेवली.

"ही काय करू शकते हे माहीत असेलच तुला!" शक्तीने धमकावत विचारलं. शक्तीच्या चेहऱ्यावर कुटील हास्य होतं.

हिमांशू मात्र डोळ्यांतून आग ओकत होता...

हेडकोर्टर्सच्या सेकंड फ्लोअरवरून शक्ती काचेतून बाहेरील रहदारी पाहत उभा होता! पहाट होण्यास फार वेळ नव्हता. तरी आभाळात सूर्याची किरणं पसरण्याऐवजी ते अधिक गडद झालं होतं...

"सर, जुना राजवाडा पोलिसांनी हिमांशूने सांगितलेल्या को-ओर्डीनेट्सवर छापा मारला. पण तिथं कोणी सापडलं नाही! पन्हाळ्याच्या पोलीसांना पण तिथलं फार्म हाऊस रिकामं मिळालं.

"तुम्ही सांगितल्या प्रमाणे कोल्हापूर बाहेर जाणारे सगळे रस्ते सील केलेत. विमानतळ आणि रेल्वे स्टेशन्सवर वॉच ठेवला आहे. तिथेही डॅनियलचा काही स्ट्रेस नाहीत!" एसपी शक्तीला माहिती पुरवत बोलला.

"इन दॅट केस, तो एकाच ठिकाणी असू शकतो!" बाहेर पहातच शक्ती बोलला आणि त्याने एसपीकडे पाहिलं!

अल्प पळातच पाच कोल्हापूर पोलिसांच्या फोर व्हीलर्स कोल्हापूर मध्यवर्ती रस्त्यावर धावत होत्या. सर्वांत पुढं डॅनियलची गाडी होती... जी त्याने शक्तीला दिली होती...

या गाड्या सिराज नाईट क्लबला लागल्या.

गाड्यांतून शस्त्र सज्ज टेररीजम सेल ऑफिसर्स बाहर पडले आणि गन्स उंचावूनच सहा ऑफीसर्स बूटांच्या टाचांचा टापांसारखा आवाज करत सिराज नाईट क्लबमध्ये शिरले!

बाकी सहा कव्हरसाठी बाहेरच तैनात राहिले. आणि चार ड्रायव्हिंग सीटवर तयार!

आत नेहमीच्या राजेशाही थाटात डॅनियल समोरच्या सोफ्यावर बसला होता. एक पाय समोरील टेबलवर.

धाडधाड् आत आलेल्या आणि त्याला घेरलेल्या ऑफिसर्सना पाहून डॅनियल घाबरायचं सोडून हसला.

शक्ती निवांतपणे खिशात हात घालून ऑफिसर्स मागून आत प्रवेशला.

"मला माहित होतं, तू माझी इथंच वाट पाहत असणार!" शक्ती आत आल्या आल्या त्याला म्हणाला.

शक्तीला पाहून तर डॅनियलच्या मुखावरच हास्य अधीकच खुललं!

तो जागचा उठला. सर्व ऑफिसर्सना वाटलं, तो काही करण्याच्या विचारत आहे म्हणून सगळे अधिकच सतर्क झाले. त्यांच्या गन्सवरील पकडी अधिकच घट्ट झाल्या आणि नेम डॅनियलवर पक्का केला.

पण त्यांच्या कल्पनेनुसार काही झालं नाही. डॅनियल वळून पश्चिमेला तोंड करून हाफ सोफ्यावर बसला.

मावळतीला तोंड करून त्याने आपली हार पत्करल्याचा संकेत दिला होता. शक्ती त्याच्यासमोर पूर्वेला तोंड करून बसला.

बाहेर सूर्य उगवत होता आणि आत त्याच्या विजयाचा सूर्य उदयोन्मुख होता...

काही पळ डॅनियल काहीच बोलला नाही! तो फक्त स्मित ओठांवर घेऊन प्रसन्न चेहऱ्याने शक्तीला न्याहाळत होता.

शक्ती काय ते समजला. त्याने आपल्या साथीदारांना बाहेर जाण्याचा इशारा केला. ऑफिसर्स मागे पाऊलं टाकत गन्स पॉइंटेड ठेऊनच क्लब बाहेर गेले.

"मला खूप गोष्टी जाणून घ्यायच्या होत्या. म्हणून हा खेळ अजून खेचायचा होता... पण तुला घाई होती! सो बी विथ इट! आता डायरेक्ट तुलाच विचारतो!" शक्ती बोलला.

"मला खूप कमी लोकं इम्प्रेस करू शकतात!" मग्रुरीचं हास्य करत डॅनियल बोलला.

हा! पण त्याला मूळ विषयाला बगल नक्कीच द्यायची नव्हती!

"मला आनंद आहे मी त्यांतील एक आहे!" शक्ती कोरडा चेहरा ठेऊन ओठांवर स्मित आणत बोलला.

डॅनियल अजूनच प्रसन्न हसला.

"तू जर मला जॉईन झालास, तर आपण जगावर राज्य करू! विल मेक अ ग्रेट फॉर्च्युन!" डॅनियलने ऑफर दिली.

"न◌ॉट इंटरेस्टेड्!" शक्तीने डॅनियलच्या प्रस्तावाचं खंडन केलं.

"आपली लोकं याच मेंटॅलिटीने मागे पडतात! समोर आलेली संधी त्यांना दिसतच नाही! दिसली तर घेण्याची हिंमत नसते!"

"मुद्याचं बोलूया?" शक्तीने बाकी बातचीत कट केली!

"बोल! काय पाहिजे?" डॅनियलने हसून विचारलं.

"हे सगळं का?" शक्तीने थेट विचारलं.

"ज्या अर्थी तू इथपर्यंत आला आहेस, त्या अर्थी तुला तुझी उत्तरं मिळाली असतील!" डॅनियल स्मित ओझरू न देता बोलला.

"मला तुझं कारण हवं आहे!" शक्ती बोलला.

डॅनियलने मन डोलावली. तो बोलण्यास सज्ज झाला...

"तेल; विसाव्या शतकातील सार्वभौम ताकत! आणि इन्फॉर्मेशन ही एकविसाव्या शतकातली! विचार कर; या दोन मोठ्या ताकदी एकाच ठिकाणी केंद्रीत झाल्या, तर काय होईल?! संपूर्ण जग मुठीत!

"तेल आणि इन्फॉर्मेशन दोन मोठे ताकदीचे सोर्स. हे दोन्ही ज्यांच्या हाती असतील, दे विल रुल द एंटायर वर्ल्ड् टू दि इन्फिनिटी! आणि हे पोटेन्शियल भारतात आहे. मी फक्त त्यासाठी पार्श्वभूमी तयार करतोय!

"आज आपण अमेरिकेला साथ नाही दिली, तर कोणी दुसरं देईल! पण हे होईल हे नक्की! भारत हा असिमीत संभावनांचा देश आहे. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी मध्ये आपण सरस

आहोत. भारताच्या टॉप टू इंडस्ट्रीज मध्ये आयटी सेक्टर येतं! अमेरिका भारताच्या टू थर्ड आयटी सर्व्हिसवर विसंबून आहे! आणि म्हणूनच मला हा चान्स दुसऱ्या कोणाला द्यायचा नाही! आय विल मेक माय इंडिया सुपर पॉवर!"

"बट एट व्हॉट कॉस्ट? सक्सेसफुल होण्यासाठी शॉर्टकट निवडला, की उन्नती पटकन होते हे खरं, पण अधोगतीही तेवढ्याच लवकर होते! लॉन्गटर्मचा रस्ता लांब पल्ल्याचा, किचकट नक्कीच असेल, पण त्यातून मिळणारं यश हे अनंत काळ टिकणार आहे! स्वार्थ व अधिकारवादातून तर अहंकार निर्माण होतो आणि अहंकारातून पुढे संघर्ष!

"तू किंवा जनमानसचे नेते, इतर राष्ट्रं; इंक्लुडिंग इंद्रदत्त वाचस्पती, जे जे लोक या इंटरनॅशनल कॉन्स्पिरिसीमध्ये सामील आहेत हे सगळे खूनी आहात! फक्त खूनी!" शक्ती शांतपणे आपलं म्हणणं जोरात मांडत म्हणाला.

"प्रत्येकाच्या दृष्टीत समोरच्याचा मार्ग चुकीचाच असतो!" डॅनियल दुर्दैवी बोलला.

"तू काय बोलतोय कळतंय तुला? आखाती देशात तुम्ही युद्ध घडवून आणलीत! हजारो माणसं मेलीत तिथं! त्याने पण काम होत नाही म्हणून तुम्ही तुम्हालाच साथ देत असलेल्या नेत्याला मारून टाकलं! मग ते सत्य कोणासमोर येऊ नये म्हणून मृत्यूची मालिका रचत गेलात! लाज वाटते बोलायला?" शक्तीमध्ये आवेश भरला.

"नथिंग इज पर्सनल हिअर ब्रदर्! जे काही आहे, ते देश प्रगती पथावर नेण्यासाठी! त्यासाठी शक्ती निर्माण करण्यासाठी!" डॅनियलने पुन्हा आपली भूमिका सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.

"ओके! तुझ्या दृष्टिकोनातून तू जे केलंस, ते भारताला सुपरपॉवर बनवायला; पण मला सांग, तू ज्यांची साथ घेतलीस त्यांनाचाही सेम मोटिव्ह होता? छाती ठोकपणे सांगू शकतोस तू हे?"

"वाचस्पतीचा नक्कीच होता. म्हणून तर तो लोकप्रिय होता आणि म्हणूनच त्याला मरावं लागलं!

"अपोजिशनचा मोस्ट फेमस लीडर मेल्यावर सहानुभूती कुणाकडे जाणार?" डॅनियल हसून म्हणाला.

"यु गाईज आर सिक!" शक्ती ओरडला.

डॅनियल नुसताच हसला!

"आता काय मला अटक करणार?" त्याने विचारलं.

"असंच नाही! तुला असं अटक करून मी तुझा अपमान नाही करणार!" शक्ती उठला!

डॅनियल काय ते समजला.

"ओ! सो वॉन्ट टू गिव्ह मी अ चान्स टू फाईट! हं? इव्हन दो यु नो, आय वोन्ट एबल टू इस्केप! तुला मी इतका लाचार वाटलो?" डॅनियल कीव करत हसला.

त्याने थोडा विचार केला,

"बट नो! आय विल टेक द अपॉर्च्युनिटी! बिकॉज आय डोन्ट वॉन्ट यु टू डिसपॉईंट!" तो उभारत गुडघ्यांवर सरकलेली पॅन्ट खाली सरकवत बोलला.

इतक्यात मागे दुसऱ्या मजल्यावरून खाली आलेला क्लबचा तो मॅनेजर (अमेरिकन सीआयए एजंट) खालच्या दोन पायऱ्या न उतरता उभारला.

"व्हॉट आर् यु डुईंग डॅनियल?" तो ओरडला!

डॅनियलने मागे न पाहता त्याला गप्प होण्यासाठी हात केला.

पण डॅनियल आपल्याला हुकूम देतोय ही भावनाच त्याला सहन झाली नाही! त्याने आपली पिस्टल खेचण्याचा प्रयत्न केला.

इतके दिवस सोबत राहिल्याने डॅनियल त्याला ओळखून होता. डॅनियलने विजेच्या चपळाईने आपली पिस्टल बाहेर खेचून त्याने सीआयए एजंटच्या हातातील पिस्टल उडवली.

सीआयए एजटचा हात जखमी झाला. पिस्टल पायऱ्यांखाली घरंगळत येऊन फ्लोअरवर दूरपर्यंत घसरत जाऊन स्थिरावली होती!

डॅनियलने हातातील पिस्टल नाचवूनच त्याला खाली बसण्यास सांगितलं.

मघाशी अपमान वाटलेला हा सीआयए एजंट आता मात्र एका बछड्यासारखा पायरीवरचा खाली बसला.

आणि त्याच्या समोर शक्ती आणि डॅनियलचं तुंबळ युद्ध सुरू झालं...

दोघेही तोडीस तोड! कोणीही माघार घेणारं नव्हतं!

शक्ती आणि डॅनियल एकमेकांना पुरजोर टक्कर देत होते...

तो सीआयए एजंट हे घमासान पहात बसून होता... काही करण्याचा विचारही त्याच्या मनाला शिवला नाही... याला कारण होतं त्याच्या पुढं घडणाऱ्या शक्ती - डॅनियलच्या विद्‌युतवेगी हालचाली!

शक्ती व डॅनियल दोघांचीही श्रीमुखं सुजलेली होती.

शक्तीच्या ओठांतून रक्त वाहत होतं... तर डॅनियलला देखील बराच मुका मार बसला होता.

कोणी हरतंय की नाही याची शक्यताच दिसत नव्हती... आणि हे युद्ध कधी थांबेल की नाही याचीच शंका उद्भवली होती...

सीआयए एजंट्स नुसताच पहात होता...

बराचवेळ मुष्टियुद्ध झाल्यानंतर दोघेही थकले. एकमेकांपासून लांब पण डोळ्यांत डोळे घालून ते पाहत होते...

शक्तीच्या आधी डॅनियलने स्वतःला सावरलं. हवा तेवढा ऑक्सिजन त्याने फुफ्फुसांत भरून घेतला आणि तो शक्तीच्या दिशेने धावला. शक्तीने अजून स्वतःला कंपोज केलेलं नव्हतं. त्यामुळे डॅनियलची ही पेहेल डॅनियलच्या दृष्टीने निर्णायक ठरणार होती.

त्याने वार केला. शक्ती लडखडला, पण त्याने वार अडवला. दोघांमध्ये पुन्हा हँड टू हँड कॉम्बॅट सुरू झालं...

शक्ती कितीवेळ असं लढत राहणार होता... त्याला काही करून आता ही लढाई थांबवायची होती!

त्याच्या या लढाईत क्लब खळला होता... फर्निचर, ग्लास, बाटल्या यांचे खच्च च्या खच्च क्लबभर पसरले होते.

नाही! तो दमला होता, असं नाही. लढायला तो अजून खूप सक्षम होता; पण अजून कितीवेळ असंच झुंजत रहायचं होतं...

आपल्या सॅटिस्फिकेशनसाठी आपण टेररिसम सेल ऑफिसर्सना वेठीस ठेवलं आहे याची शक्तीला आता खंत वाटू लागली होती...

आता त्याला हा संग्राम थांबवायचा होता... म्हणून मग जसं त्याच्या संघर्षानं क्लबमधील वस्तू फुटून छिन्नभिन्न झाल्या होत्या, त्याप्रमाणे डॅनियलला देखील त्याने छिन्नभिन्न करण्याचं ठरवलं...

आणि शक्तीने आता आपली फायटिंग स्टाईल बदलली. आतापर्यंत तो वेस्टर्न बॉक्सिंग व मिक्स्ड् मार्शल आर्ट या प्रकारांचा वापर करत होता, पण डॅनियल या सर्व प्रकारांचा जाणकार असल्याने शक्तीला विजय मिळवणं कठीण जात होतं... म्हणून आता त्याने खास भारतीय कुस्तीचे डाव टाकायला सुरवात केली...

अचानक झालेल्या या मेथड चेंजमुळे डॅनियल पुरता बावचळला. त्याला शक्तीचे दाव वाचता येईनात. त्यामुळे ते रोखता येईनात. प्रतीवार करता येईना. शक्तीला याचा फायदा होताना सहज दिसत होतं...

अखेर शक्तीने पुन्हा आपला प्रकार बदलला आणि तो हनुमंती कुस्तीचे डाव खेळू लागला... 'बल' आणि 'बुद्धी'चा संगम म्हणजे ही हनुमंती कुस्ती!

शक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचं सार म्हणजे हा कुस्ती प्रकार!

हा प्रकार डॅनियलसाठी अगदीच अनोळखी होता... शिवाय यात शक्तीची ताकद आणि बुद्धी दोन्ही मिळालेली! डॅनियलला हरवायला इतकं पुरेसं होतं आता...

शक्तीने 'उभा कलाजंग' डाव टाकून डॅनियलची पाठ शेवटी जमिनीला टेकवली.

शक्तीने डॅनियलच्या समोर उभा राहून त्याने डॅनियलचा उजवा दंड धरला, क्षणात आपला एक हात त्याच्या मांडीच्या आत घालून शक्ती गुडघ्यावर बसला. डॅनियल त्याच्या पाठीवर ज्या क्षणी आला त्याक्षणी शक्तीने त्याला उचलून स्वतःच्या शरीराला तिरपं केलं होतं आणि त्याच्या प्रतिस्पर्ध्याला, डॅनियलला पाठीवर चितपट केलं होतं!

डॅनियलला भारतीय कुस्ती हा प्रकार कमी जाणकारीचा असला, तरी तो इतकं जाणून होता, की यात पाठ टेकली, की हार निश्चित!

मग त्याने आपले प्रयत्न थांबवले. आपली हार पत्करली. मान्य केली. त्याला जखडून ठेवलेल्या शक्तीला डॅनियलने आपले प्रयत्न थांबवले आहेत हे ध्यानात आले. तोही मग बाजूला होऊन दोन्ही गुडघ्यांवर हात घेऊन ते बांधून बसला.

हे युद्ध कुणाच्या मृत्यूसाठी नव्हतेच. ते होते एकमेकांना सम्मान देण्यासाठी! आणि तो उद्देश पुरा झाला होता!

डॅनियल जमिनीवर पडूनच होता. दोघे खर्च झालेली शक्ती पुन्हा भरून घेत होते... जास्तीत जास्त प्राणवायू शोषत ते तिथेच तसेच आहे त्या स्थितीत थांबले.

आतून हालचाल बंद झाली आहे हे बाहेरील ऑफिसर्सना लक्षात आलं होतं. मघासची सहा जणांची टीम पुन्हा आत प्रवेशली होती.

दोघांनी पुढे होऊन त्यांनी त्या सीआयए एजंटला हाताला धरून बाहेर खेचून घेऊन गेले...

अजून दोघांनी डॅनियलला उचललं व त्यालाही ढकलत बाहेर नेलं गेलं. बाहेर जातानाही डॅनियलची नजर शक्तीवर खिळली होती.

न बोलताही हजारो शब्द तो शक्तीला बोलला होता... आणि शक्ती ही ते समजला होता... त्यांच्यातील तो मूकसंवाद त्यांच्यापुरताच होता...

दोघांनीही स्वतःसाठी होऊ शकणाऱ्या चांगल्या मित्रांना गमावलं होतं... कारण होतं... दोघांची वेगवेगळी विचारधारा...

डॅनियलची विचारसरणी अशी होती, ज्यातून निष्पन्न काही होणार नव्हतं, नवं काही निर्माण होणार नव्हतं... आणि झालंच तर तो फक्त विनाश!

आणि शक्ती! त्याची धरणा सर्वसमावेशक होती... आपल्या उन्नतीसाठी एखाद्या विशिष्ट वर्ग समूहाच्या नष्ट होण्याची आवश्यकता नाही! तर त्यांना सोबत घेऊन आपण परस्पर त्याग व प्रेमाने एकत्रच उन्नत होऊ ही शक्तीची विचारधारा होती! यातून निर्माण झालाच, तर तो सामाजिक बंधुभाव निर्माण होणार होता! म्हणून तर त्याने सगळं नष्ट करून पुनः निर्मिती करण्याच्या डॅनियलच्या प्रस्तावाला नाकारलं होतं... आणि हे करून शक्तीने घातकी व्यक्तित्वाशी बंधुभाव नाकारला होता...!

सर्व गेले, तरी शक्ती बराचवेळ तसाच तिथं थांबला होता...!

काही आठवणीरुपी गोष्टी हृदयात साठवून तो त्या क्लबमधून बाहेर पडला...!

शक्तीची डॅनियलने त्याला दिलेली गाडी रस्त्यावर धावत होती... आणि शक्तीचे विचार त्याच्या गाडीच्याही वेगाला लाजवत त्याच्या मस्तिष्कात गोंधळ घालत होते...

'इथं कोणाला वाईट म्हणायचं? प्रत्येकाला आपल्या देशाला उत्कर्ष बिंदूवर पहायचं आहे! पण यासाठी प्रत्येकाने निवडलेले मार्ग पूर्णतः वेगळे. भिन्न टोकाचे. पण! कोण बरोबर, कोण चूक? हे ठरवणं तसं अवघड नाही... ध्येयं योग्य असली, तरी ती साध्य करण्यासाठी आपण कोणता मार्ग अवलंबतो यावर ते यशस्वी होईल की नाही हे आणि त्या ध्येयाची शुद्धता टिकून असते! शुद्ध ध्येयाच्या आवरणाखाली आपण गुन्हे करत राहिलो, तर ते क्षम्य का असावेत? आशा लोकांना शिक्षा ही झालीच पाहिजे! डॅनियललाही होईल! आणि त्याला साथ देणाऱ्या प्रत्येकाला!'

## १२. पुनरुत्थान (रिजरक्शन)...

शक्ती माननीय पंतप्रधान यांच्या सोबत त्यांच्या रूमच्या बाल्कनीत उभा होता...

त्यांच्या डोक्यावरून बिपीन शुक्लाला घेऊन आलेलं प्रायव्हेट जेट सगळ्या चांडाळ चौकडीला घेऊन दिल्लीच्या दिशेने झोकावलं होतं...

"इथून पुढचा तपास आपली टीम सांभाळेल!" शक्ती वर त्या वायूवेग असल्याने गायब होणाऱ्या जेटकडे पाहत बोलला.

"शुक्ल‍ा नंतर काही बोलले?" शक्तीने विचारलं.

"हो. शुक्लावरील काही केसेस जनमानसने सत्तेवर आल्यावर बंद करण्याचं आश्वासन देऊन वर आरबीआय गव्हर्नर पदाचं लालूच दाखवून त्याला त्यांच्याकडं वळवून घेतलं होतं!" वर पाहत पीएमनी राहिलेल्या प्रश्नाचा पण खुलासा केला.

काही वेळ दोघेही बोलायचे थांबले. मग...

"तर इंद्रदत्त वाचस्पती या‍ंच्या निर्णयानेच त्यांनाच सर्वनाश केला. आणि त्यांच्या उदात्त हेतूने जागा घेतली, ती निहित स्वार्थाने!" पीएमनी आकाशाकडून नजर हटवून शक्तीकडे पाहत उच्चारले!

"हो! खरं आहे; हं! निर्बुद्धासी विचार तो कैसा!" शक्तीने पुष्टी केली.

"शक्तीसेन, खरं सांगू; वाचस्पती खूप विद्वान होते. त्यांचं देशावर प्रेम होतं. समाजाविषयी करुणा होती. त्यांना खरंच जनतेचं भलं करायचं होतं. म्हणूनच अपोजिशन असून मी त्यांची खूप रिस्पेक्ट करायचो. वाटलं नव्हतं, की सत्तेचा लोभ त्यांना इतका लाचार आणि अविवेकी बनवेल..." दुःखी अंतःकरणाने पीएम बोलून गेले,

"एनिवेज्, आपली खूप मदत झाली शक्तीसेन!" पीएम लगेच मूड बदलून कृतज्ञतेने म्हणाले.

"हे माझं कर्तव्य होतं!" शक्ती हसला.

"आपण फोर्स का नाही जॉईन करत?" पीएमनी ऑफर दिली.

"मी तयार आहे! पण मी उद्या तुमच्याही विरोधात गेलो, तर तुम्हाला प्रॉब्लेम होईल!" शक्ती मस्करीच्या सुरात हसून म्हणाला.

"एका नागरिकांचं हेच तर काम आहे! सरकारच्या चुकीच्या निर्णयांना विरोध करणं आणि निर्णय योग्य असेल तरी त्यातील त्रुटी दाखवणं हे जनतेचं कर्तव्य आहे! मला वाईट नाही वाटणार!" पीएम हसून म्हणाले!

"नाही नको!" शक्ती हसला. म्हणाला,

"आपल्याला विरोध करायला मी एक नागरिक म्हणूनच अधिकार ठेवून आहे. मी आहे तसा ठीक आहे!"

शक्तीच्या हजरजबाबीपणाचं आणि धाडसाचं कौतुक करणारं स्मित पंतप्रधान यांच्या मुखावर उमटलं,

"यु आर डेफिनेट्ली द रिबेल!" ते स्मित करून उद्गारले आणि त्यांनी शक्तीला विचारलं,

"आपले मित्र शौर्यजीत कसे आहेत?"

"अजून पाहिलं नाही! पण नक्कीच चांगला असेल." शक्ती हसून खात्रीशीर म्हणाला व...

"एक विचारू सर?" थोडं संकोचतच शक्तीने प्रश्न केला...

"हं!" पीएमनी परवानगी दिली.

"सो, देन व्हॉट इज युअर आयडिया टू मेक इंडिया ग्रेट, अ सुपरपोव्हर?" शक्तीने पीएम चिंतपल्ली यांना विचारलं.

शक्तीच्या प्रश्नावर चिंतपल्ली हसले. शक्ती त्यांच्या आयडिओलॉजीला पडताळतोय हे ते समजले होते. ते बोलले! 'खरं' बोलले...

"दि प्रॉपर एज्युकेशन! फर्स्ट ऑफ ऑल, वी हॅव टू क्रिएट सिंपल येट इफेक्टिव्ह एज्युकेशन सिस्टीम. इट इज नो युज टू टेल पीपल टू युज ऑनलाईन बँकिंग, डेबिट, क्रेडिट कार्ड्स अनलेस गिविंग देम द अवेअरनेस अँड टिचिंग देम हाऊ टू युज दिज थिंग्स. इट इज नो पॉईंट टू टेल पीपल टू बाय इलेक्ट्रिक विहेकल्स अनलेस यू क्रिएट चार्जिंग पॉईंट्स लाईक पेट्रोल पंप्स.

"इट्स पॉईंटलेस! सो वी हॅव टू क्रिएट एन आयडियल इन्फ्रास्ट्रक्चर अबाऊ ऑल! अँड देन सिमिलर्ली वी हॅव टू इन्व्हेस्ट इन बिझनसेस. विदाऊट गुड इन्फ्रास्ट्रक्चर, यु कान्ट बिल्ड अ बिझनेस! मला सांगा ज्या हॉटेलचा रस्ता खराब आहे, त्या हॉटेलला तुम्ही जेवायला जाल? नक्कीच नाही!

"आणि याच्यासाठी आपणास सर्वांत आधी आपल्या युवकांमध्ये किंबहुना सर्व जनतेमध्ये इन्वेस्ट करावे लागेल. सर्वांना फायनाशियल एज्युकेशन दिले गेले पाहिजे. शिवाय जनतेत योग्य चारित्र्य निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. हे एका रात्रीत किंवा कोणत्याही सरकारच्या एक-दोन टेंयोर मध्ये हे होणार नाही. शिवाय त्यांची ती प्राथमिकता सुद्धा हवी. तशी ती असली, तरी याला अनेक वर्षे जातील त्यामुळे काही वर्षांत तुम्हाला भारत सुपरपॉवर होईल अशी जर कोणी तुम्हाला स्वप्न दाखवत असेल, तर तो तुमच्याशी खोटं बोलतोय; तो तुम्हाला फसवतोय हे समजून घ्या!

"आवर युथ, दे आर डिस्ट्रॅक्टेड् अँड दे डोन्ट नो व्हॉट टू डू विथ देअर लाईव्ह्स!" पंतप्रधान बोलत होते.

"आय नो आएम वन ऑफ दोज्..." शक्ती नाराजीने मध्येच बोलला.

त्याकडे पंतप्रधान यांनी दुर्लक्ष केलं. कारण शक्ती त्याच्या आयुष्यासोबत किती मोठं कार्य करू शकतो याची प्रचिती त्यांनी घेतली होती. आणि हीच क्षमता ते भारतातील सर्व तरुणांमध्ये पाहत होते... पण तरी... अजून त्या दृष्टीनं बरंच काम करणं बाकी होतं... म्हणून माननीय पंतप्रधान पुढं म्हणाले,

"दे आर नॉट वर्दी इनफ फॉर बिग! सो आवर जॉब टू मेक देम वर्दी फस्ट!!" त्यांनी संभाषण संपवलं.

पंतप्रधान पुनीत यांनी त्यांची 'आयडिया फॉर नेशन' शक्तीसमोर स्पष्ट खुली केली होती!

"सर, काय सत्ता खरंच इतकी महत्वाची आहे का? की ज्याच्यासाठी लोक एकमेकांच्या जीवाची देखील पर्वा करत नाहीत! किंबहुना एकमेकांचा जीव घ्यायलाही कमी करत नाहीत?" शक्ती आता विचलित झाला.

कारण राजकारणाचं ध्येय जर इतकं उदात्त असलं पाहिजे असं आहे, तर ते कोणत्याच सरकारचं किंवा पक्षांचं मुख्य आचरण का नसतं असा त्याला आता प्रश्न पडला होता...

"एक गोष्ट समजून घ्या, वाईट कोणताच देश नसतो. वाईट असतो तो स्वार्थ! तो देश चालवणारे लोक या स्वार्थापायी वाईट असू शकतात; पण घाबरायचं कारण नाही! कारण ते लोक सुद्धा काही सर्वकाळ तिथं असणार नाहीत! जसे मागचे लोक गेले, तसे हेही लोक बदलतील... कधीतरी असे लोक समाजसेवेसाठी समोर येतीलच ज्यांना स्वार्थापेक्षा समाज महत्वाचा असेल! यासाठीच समाजाचे उत्तम चारित्र्य घडवणे आणि विद्यार्थ्यांना सकस व उपयुक्त शिक्षण देणे ही प्राथमिकता असायला हवी!

"यातूनच असे लोक उद्या घडतील जे एकत्र राहून देशाचा आणि पर्यायाने जगाचा उत्कर्ष घडवतील!" माननीय पंतप्रधान यांनी शक्तीचे शंका निरसन करण्याचा सोप्या शब्दांत प्रयत्न केला...

"महागाईचा बोजा जनतेवर येऊ नये म्हणून आपण कर प्रणाली बदलणार आहात असं मी ऐकलं होतं. मी काही सजेशन देऊ शकतो?" शक्तीने विचारलं.

"जरूर!"

"अर्थशास्त्र सांगतं, की राजाने जनतेकडून कर असा घ्यावा जसा मधमाशी फुलांतून मधु गोळा करते! मधमाशीचे काम पण होते आणि फुलालाही इजा होत नाही!"

"माझाही विचार तोच आहे! पण आजपर्यंत लोकांना जो त्रास झाला, तो मलाही टाळायचा आहे. वास्तविक कर भरणं याला सक्ती असू नये. पण जर असंच ठेवलं, तर लोक करच भरणार नाहीत! म्हणून सक्ती करावी लागते! लोकांना हे समजलं पाहिजे, की ते ज्या समाजात राहतात त्या समाजाप्रती ते काही देणं लागतात! लोकांना हे समजायला हवं, की ते रहात असलेल्या समाजाचा उत्कर्ष हाच त्यांचा उत्कर्ष! म्हणून कर तर टाळता येणार नाही. हा! त्यात शिथिलता नक्कीच आणू!"

"थँक्यू सर! हे ठीक आहे! पण कर गोळा करणारे प्रशासन; त्यांनीही हे लक्षात घेतलं पाहिजे की हा गोळा केलेला कर हा समाजाच्या उन्नतीसाठी आहे! स्वतःच्या उत्कर्षासाठी नाही!"

"मला तुमचा रोख, तुमचा रोष कळतोय! तुम्ही होणाऱ्या घोटाळ्यांबद्दल बोलताय! मला हेही मान्य की माझे काही लोक नीट काम करत नाहीत! पण ते मी सुधारणार आहे. जशी कर प्रणाली सुलभ करण्याचे प्रयत्न चालू आहेत! त्याप्रमाणे त्यावरही लवकरच निर्णय आणि कठोर असे निर्णय घेतले जातील!"

"कर्ज घेऊन पळालेल्या लोकांनाचा पण बंदोबस्त करण्याचे पण प्लॅन्स चालू आहेत. त्यांचा पैसा परत चलनात आला, तरी जनतेला महागाईत बरीच राहत मिळेल. अर्थव्यवस्थेवरचा बराचसा भार हलका होईल!"

"हा, पण त्याची कर्ज राईट ऑफ करू नका म्हणजे झालं!" शक्तीने कोपरखळी मारली.

दोघे खूपच मैत्रीपूर्ण वातावरणात संवाद साधत होते म्हणून शक्तीने हे धाडस केलं होतं.

यावर पीएम मोठ्याने हसले! कारण त्यांनाही माहीत होतं हे राईट ऑफ वगैरे दिखावा असतो प्रत्यक्षात तशा कर्जाची वसुली तशी केली जातच नाही, ना आशा कर्जदारांना कधी शिक्षा होते...

"तुम्ही खूपच काळजी करता!" ते शक्तीच्या पाठीवर थाप मारत म्हणाले.

"जे अनुभवत आहे ते काळजीचंच तर आहे..." शक्तीने चेष्टेचेष्टेत सत्य विदित केलं...

हे ध्यानात येऊन पीएम थोडे गंभीर झाले,

"नाही तसं नाही होणार!" ते मागे हात बांधत म्हणाले.

"शक्तीसेन, मी जाणून आहे, की मी या चार महिन्यांत कितीही प्रयत्न केला, तरी पुढचं इलेक्शन मी हरणार आहे. पण माझ्या प्रयत्नांनी जनतेला थोडा तरी आराम मिळाला, तरी मला ते पुरेसं आहे. पुढं हरलो, तरी पण माझं समाजसेवेचं काम चालूच राहील!" पीएमनी आपली भूमिका स्पष्ट केली.

शक्तीला मात्र बरं वाटत होतं, की या स्वार्थी राजकारणात एकतरी व्यक्ती होता जो समाजाची काळजी वाहत होता... पण म्हणून तो त्यांच्यावर पूर्ण विसंबून कधीच राहणार नव्हता! हेच तर एका 'सुजाण नागरिका'चं 'कर्तव्य' आहे!

"जर आपली परवानगी असेल, तर एक विनंती करू?" शक्तीने संकोचत विचारलं.

"नक्कीच!" पीएमनी परवानगी दिली.

"सर, चीन व उत्तर कोरियावर लक्ष ठेवावं, कारण ते अमेरिकेच्या गतीविधींवर लक्ष ठेवून असणार. त्यांना जर समजलं, की भारतातील काही लोक देखील त्याच्या विरुद्धच्या कारस्थानात सामील होते, तर परिस्थिती गंभीर होऊ शकते.

"त्याच प्रमाणं अरब देशांना सुद्धा आता सांभाळावं लागणार आहे. आपण त्यांच्याप्रती कृतज्ञ आहोत हे त्यांना दर्शवण्याचा ही वेळ आहे. त्यांना त्यांच्या आंतरिक कलहातून बाहेर काढण्यास शक्य ती मदत करावी. याने आपल्या देशाचा देखील फायदा आहेच." शक्तीने सतर्कतेचा इशारा केला व मुख्य विनंती त्याने पुढे बोलून दाखवली. तो म्हणाला,

"आणि सर, कृपया सर्व देशांशी मैत्री पूर्ण व्यवहार ठेवावेत. कारण जे प्रेम आणि सहकार्यांने साध्य होतं, ते युद्धानं नाही होत." शक्ती कळकळीने म्हणाला.

पीएमनी शक्तीची चिंता समजून घेत गंभीरपणे मान डोलावली.

"आणखीन एक शेवटची विनंती!" शक्ती म्हणाला.

"बोला ना!"

"मिहीरची बातमी अजून दिली नसेल!"

"ब्रॉडकास्ट झाली! का? काही प्रॉब्लेम आहे..."

"बातमी चेंज करायची होती... करू शकतो?"

"नक्कीच! बोला!"

"मिहीर वाचलाय आणि तो, एसपी व कोल्हापूर पोलिसांच्या प्रयत्नानेच ही सगळी कॉन्स्पिरिसी उलगडली गेली असं जाहीर करायचं आहे."

"पण हे क्रेडिट तुमचं आहे!" पीएमनी आग्रह केला.

"एकट्याचं नाही! सर्वांचे कष्ट आहेत! प्लिज सर..." शक्तीने विनंती केली.

"ओके. तुमच्या इच्छेनुसार होईल!" म्हणत पीएम बाहेर वळले. बाल्कनीच्या रेलिंगवर हात विसावून ते कोल्हापूर शहराच्या नजारा पाहण्यात गुंतले...

शक्तीने मात्र सगळ्यांतून स्वतःला वेगळं करण्याचा प्रयत्न चालू केला...

*************************************************************

तो आधी त्याच्या हॉटेल रूमवर गेला. तेथे वॉर्डरोबमध्ये ठेवलेली रायफल केस त्याने पाठीला अडकवली. तो लॉबीत आला. राहिलेलं बिल त्यानं चुकतं केलं आणि त्यानं ते हॉटेल सोडलं.

*************************************************************

डॅनियलने दिलेली बीएमडब्ल्यू पोलीस हेडक्वार्टर्सला लागली. शक्ती त्यातून उतरला.

एसपी बाहेरच होता. क्लबमधून जप्त केलेली असॅसिनची शक्ती वापरत असलेली कावासाकी हेडक्वार्टर्सला आणून ठेवली होती.

शक्तीने ती रायफल व डॅनियलने दिलेला मोबाईल एसपीच्या सुपूर्द केला. आणि गाडी देखील तिथंच सोडून तो चालू पडला... रस्त्यापलीकडील रिक्षा स्टॉपला लागलेल्या पुढच्या रिक्षात बसून तो मार्गस्थ झाला...

*******************************************************

आरटीओ ऑफिसला येऊन शक्तीने त्याची सुझुकी हायाबुसा ताब्यात घेतली. तो आपल्या घराकडे लागला...

*********************************************************

घराबाहेर कम्पाऊंडमध्ये सुझुकी लावून शक्ती फोर व्हीलर घेऊन निघाला. गेट लॉक करायला तो विसरला नाही.

********************************************************

नम्या असलेल्या हॉस्पिटलला येऊन तिला सोबत घेऊन बिल पे करून शक्ती निघाला...

*********************************************************

शक्ती मिहीरला सीपीआरमध्ये जाऊन भेटला. सोबत नम्या होतीच. जतीन देखील त्यांना सामील झाला होता...

"तुला भेटायला लोक आलेत." शक्ती मिहीरला म्हणाला.

शक्तीचा आवाज ऐकून मिहीरचं मुखमंडल प्रसन्न झालं. तो शिस्तीत मागे सरकून सावरून बसला.

"हे कोण?" नम्याला व जतीनला पाहत शक्तीने विचारलं.

"हे? या नम्या. वाचस्पती यांच्या केसमधील महत्वपूर्ण साक्षीदार आहेत. आणि हे जतीन. माझे खास मित्र. यांनीच तुला वाचवलं." शक्तीने दोघांकडे पाहत त्यांची ओळख करून दिली.

"थँक्स!" मिहीरने जतीनचे आभार मानले.

"जरा बातम्या बघू." म्हणत शक्तीने टीव्ही ऑन केला. काही हेडलाईन्स नंतर...

टीव्हीवर शक्तीला हवी ती बातमी चालू झाली...

"अखेर इंद्रदत्त वाचस्पती यांच्या नाट्यपूर्ण खूनाचा खुलासा झाला. या कारस्थानामागे त्याचाच पक्ष जनमानस असल्याचं प्रथमदर्शनी समोर आलं आहे. आणि याच सोबत सत्ताधारी पक्ष असलेल्या लोककल्याण पार्टी वरील इंद्रदत्त वाचस्पती यांच्या खूनाचा आरोप पुसला गेला आहे. पुढील माहिती व सत्यता ही केस कोर्टमध्ये उभी राहिल्यावरच समोर येईल. आणि म्हणून हे प्रकरण लवकरात लवकर सुप्रीम कोर्टात घेतले जावे याबद्दल प्रयत्न चालू आहेत! कोल्हापूर सुप्रीडेनडेंट सारंग गोखले यांची महत्वाची भूमिका या प्रकरणाचा छडा लावण्यामागे होती. शिवाय यात जीवाची बाजी लावून मोलाची कामगिरी निभावली, ती कोल्हापूर पोलीसचे डिवायएसपी असलेले मिहीर देशमुख यांनी! त्यांच्या प्रयत्नानेच एवढे मोठे सत्य बाहेर पडण्यास मदत झाली!" लेडी रिपोर्टरने बातमी दिली.

"सर..." आश्चर्याने मिहीरने शक्तीकडे पाहिलं.

"यु डिसर्व्ह थिस बॉय!" शक्ती त्याच्या खांद्यावर थोपटत आनंदाने म्हणाला,

"चल, आम्ही आता निघतो. काळजी घे!" शक्ती म्हणाला.

व शक्तीने मिहीरच्या हातात हात घेत त्याला धन्यवाद दिले. मात्र पुढं काही बोलला नाही...

शक्ती, जतीन, नम्या हॉस्पिटलसमोर उभे होते.

"मी आता निघतो मुंबईला!" शक्ती जतीनच्या हातात हात देत म्हणाला.

"का?" जतीननं विचारलं.

"शौर्यजीत, माझा मित्र. त्याला त्याच्या घरी पोहोचवायचं आहे!" जतीनला इतर देऊन शक्ती नम्याकडे वळला.

"चलायचं?" शक्तीने नम्याला विचारलं.

"तू हो पुढं मी मुंबईतच तुला जॉईन होते! नवीन आयुष्य सुरू करण्याआधी अनाथाश्रमच्या सुपरवायझर आणि अक्काला भेटायचं म्हणते..." नम्या उदासीनता आणत बोलली.

"ओके!" शक्ती गंभीर होत म्हणाला.

त्याने काही पैसे खिशातून काढून तिला दिले.

"आणि माझे पैसे?" हे कशाबद्दल बोलतायत माहीत नसून हे काही तरी गंभीर आहे हे समजून वातावरण हलकं करण्यासाठी जतीनने मस्करी केली.

"आजपर्यंत कवा दिल्यात तवा आता दिन!" शक्ती चेष्टा करत म्हणाला.

"निघा!" जतीन ओरडला.

"तू पैशाला एवढा हावरा का आहेस?" शक्तीने पुन्हा चेष्टेत विचारलं.

"जगात जन्म घेणं एवढंच सोपं आहे. सर्व्हाइव्ह इज टफेस्ट! अँड इट्स टेक मनी!" जतीन म्हणाला.

"तरी तुला मी पैसे देणार नाही! कारण कठीण जीवनाचा अर्थ असा नाही की पैसे कमवायला तुम्ही काहीही कराल! अयोग्य मार्गाने पैसे कमावणे कोणत्याच परिस्थिती योग्य नाही!" शक्ती हसत म्हणाला.

"मी तुला निघ म्हटलंय!" चिडून जतीन बोलला.

शक्ती हसला. तो नम्यासह गेट बाहेर पडला. फुटपाथला लागून पार्क केलेल्या शक्तीच्या कारमध्ये बसून दोघे निघून गेले.

जतीन जाणाऱ्या शक्तीकडे हसत पाहत होता. शक्तीची गाडी गेली, तसा तोही त्याच्या स्कुटरवर राईड झाला.

*******************************************************************************

शक्ती त्याच्या गावाकडील नाईक वाड्यात आला. त्याने शौर्यजीतला आधार देऊन बाहेर घेतलं. शौर्यच्या रक्षणासाठी असलेल्या एका गार्डने गाडीचा दरवाजा उघडला. शक्तीने शौर्यला गाडीत बसवलं. शक्तीची गाडी प्रवासाला लागली...

त्यांच्या मागून गार्ड्स् आपल्या चार चाकीत बसून त्याच्या हेडक्वार्टर्सला निघाले... त्यांचे कार्य समाप्त झाले होते...

*******************************************************************************

दरम्यान पोलीस हेडक्वार्टर्समध्ये सारंग गोखलेने किरकोळ एव्हीडेन्स एका बॉक्समध्ये पॅक केले. त्यावर "पीएमओ, डेल्ही" असं इंग्रजीत लिहिलं. प्राईम मिनिस्टर ऑफिसचा पत्ता असल्याने तो बॉक्स कोणी उघडून तपासू नये व एव्हीडेन्सशी कोणी छेडछाड करू नये म्हणून ही तरतूद.

तो बॉक्स व रायफल केस घेऊन त्याने आपल्या एका ऑफिसरकडे सोपवले. ऑफिसर बॉक्स व रायफल केस सोबत हेडक्वार्टर्स बाहेर पडला.

बॉक्स व रायफल केस सोबतच ऑफिसर बाहेरच उभ्या एका हेवी ट्रेलर ट्रकच्या केबिनमध्ये ड्रायव्हरच्या बाजूला बसला.

ट्रकमध्ये डॅनियलने असॅसिनेशन्ससाठी वापरलेली बाईक व कार आधीच लोड करून ठेवल्या होत्या.

तो ट्रक दिल्लीकडे रवाना झाला...

**************************************************************************

संध्याकाळी शक्तीची गाडी शौर्यजीतच्या मुंबईतील घराला लागली होती. शक्तीने त्याला गाडीतून उतरवून मेनडोअरकडे नेलं. बेल वाजवली.

शौर्यजीतच्या बायकोने दार उघडलं. काहीच अपेक्षा नसताना शौर्यला तसं पाहून तिला रडू कोसळलं.

शक्तीने शौर्यला तिच्याकडे सोपवलं. दोघांना एकांतात सोडून काहीच न बोलता शक्ती आपली गाडी घेऊन तेथून निघाला...

****************************************************************************

काही अंतर कापल्यावर पुढं कॉर्नरला नम्या शक्तीची वाट पाहत उभी होती. शक्तीने आपली गाडी थांबवली. नम्या त्याच्या शेजारी येऊन बसली....

पुढे शक्तीची गाडी थांबली ती त्याच्या गार्गीच्या आईच्या घराबाहेर...

तो गाडीतून उतरला. नम्याला सोबत यायला सांगण्याचं भान त्याला उरलं नव्हतं. पण नम्याच उतरली. त्याच्या मागून चालू लागली...

शक्तीची मुलगी 'पारिजात' बाहेर लॉनमध्येच खेळत होती. तिची आजी झोपाळ्यावर नातीचा खेळ पाहत तिच्यावर लक्ष ठेवून बसली होती.

शक्तीची चाहूल लागताच पारिजातने त्या दिशेने पाहिलं. आपल्या वडिलांना अवघ्या दोन वर्षांने पाहत असलेल्या त्या पाच वर्षांच्या मुलीला आनंद आवरला नाही... ती पळत येऊन शक्तीच्या अंगावर झेपावली... शक्तीने तिला हवेतच झेललं आणि तिला भाव विभोर होऊन प्रेमाने गोल फिरवू लागला...

शक्ती आणि पारिजात दोघेही आसपासचं जग विसरून गेले होते...

त्यांचा हा ब्रह्मानंद सोहळा नम्या व गार्गीची आई लांबूनच आनंदी चेहऱ्याने हे पाहत होते... त्या दोघीही या हर्षभरीत वातावरणाचा आनंद घेत होत्या...!!!

**********************************************

# <u>समाप्त!!!</u>

**ई साहित्य प्रतिष्ठानचं बारावं वर्ष. सुरज गाताडे यांचं ई साहित्यवरचं बारावं पुस्तक.**

तीस महिन्यांत बारा पुस्तकं. प्रत्येक पुस्तक वेगळं. प्रत्येक पुस्तकाचा वेगळा विषय, वेगळा बाज, वेगळी मांडणी. प्रत्येक पुस्तक सुपरहिट. आता तर त्यांचा स्वतःचा असा एक फॅन ग्रुप हजारांच्या घरात गेलेला आहे. जेव्हा त्यांनी आपलं पहिलं पुस्तक प्रकाशनासाठी पाठवलं तेव्हा "प्लीज किमान एकदा वाचून घ्या!!!" अशी विनंती केलेली होती. लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे त्यांना प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. तेव्हा सूरज यांची ही विनंती साहजिक होती. त्यांना या दुष्टचक्रातून बाहेर पडायचं होतं. अशा लेखकांना

बळ देण्यासाठी आपण सर्व वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आता कटीबद्ध आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळेल.

ई साहित्य प्रतिष्ठान

ते देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी. अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, निरंजन कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकरअसे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?